
# डी व्हॅलेरा



5/266
DECCAN VERNACULAR TRANSLATION SOCIETY POONA 1894

विजयसाहित्य, पुणें.

डी व्हॅलेरा

विजयसाहित्य, पुणें.

१। रुपया.

प्रकाशकः
**अनंत सखाराम गोखले,**
५७० शनवार पेठ, पुणें.

## कुलाब्याची दांडी !

—:०:—

लेखक—प्रो. ना. सी. फडके, एम. ए.

चटकदार कथानक, आकर्षक लेखनशैली, ताज्या कल्पना, परिणामकारक प्रसंग, यां नीं ओतप्रोत भरलेली ही कादंबरी अवश्य वाचा ! या कादंबरींतील सृष्टिवर्णनें व स्वभावरेखाटण तुम्हांस अत्यंत नाविन्यपूर्ण व चित्ताकर्षक वाटेल ! ही कादंबरी वाचण्यास विसरूं नका !

मुद्रकः
**अनंत सखाराम गोखले,**
' विजय ' प्रेस, ५७० शनवार, पुणें.

आयरिश धुरंधर

# इमॉन डी व्हॅलेरा

प्रो. नारायण सीताराम फडके, एम. ए.

२

विजयसाहित्य, पुणें.

किंमत १। रुपया.

नोव्हेंबर १९२३

'विजय साहित्यां'तील
पहिलें पुस्तक

हिंमतबहाद्दर

# टेरेन्स मॅक्स्विनी.

प्रो० ना. सी. फडके, एम. ए.

किंमत १ रुपया.

---

पुढील पुस्तकें.

१ कुलाब्याची दांडी (सामाजिक कादंबरी)
२ धर्मसम्मीलन ,, ,,
३ संततिनियमन–शास्त्र व पद्धति.

आमचे मुंबई एजंट—

परचुरे, पुराणिक आणि मंडळी,
माधवबाग, मुंबई नं. ४.

पितृदेवार्पण.

# निवेदन.

या वर्षी 'विजय साहित्या'चीं चार पुस्तकें काढण्याचा आमचा मूळचा विचार कांहीं अकल्पित कारणामुळें सिद्धीस गेला नाहीं. 'मॅक्स्विनी'चें चरित्र प्रकाशित केल्यानंतर डी व्हॅलेराचें चरित्र छापण्याच्या कामास आम्ही प्रारंभ केला. परंतु त्या चरित्राचा असा कांहीं योगायोग आला, कीं चरित्र-लेखकांनीं त्याचें शेवटचें प्रकरण लिहावें व तें छापण्यास घ्यावें तोंच आयर्लंडांत कांहीं तरी विलक्षण घडामोड घडून यावी; असें दोन वेळां झालें. शेवटीं आतां अधिक थांबावयाचें नाहीं असें ठरवून लेखकांनीं चरित्र पुरें केलें तरी इतका विलंब झाला, व वर्ष अखेर दोनच पुस्तकें मालेच्या आश्रयदात्यांना देऊन समाधान मानणें आम्हांस प्राप्त झालें. याबद्दल आम्ही आमच्या आश्रयदात्यांची क्षमा मागतों. पुढील वर्षीं त्यांची अधिक सेवा आमच्या हातून घडेल असा आम्हांस भरंवसा आहे. या पहिल्या दोन पुस्तकांप्रमाणेंच मालेचीं पुढचींही पुस्तकें अंतर्बाह्य सुंदर होतील हें आमच्या परिचित आश्रयदात्यांना व वाचकांना निराळें सांगावयास नकोच.

व्यवस्थापक, '**विजय साहित्य.**'



पूर्ण गुलामगिरी किंवा पूर्ण स्वातंत्र्य या दोनच अवस्था मला समजतात.

—पृष्ठ ६२.

# आयरिश धुरंधर डी व्हॅलेरा

## प्रकरण पहिलें

## धिट्टुकला मुलगा

ती संध्याकाळची वेळ होती. न्यूयॉर्क शहरामधील एका रस्त्याच्या बाजूला लागून असलेल्या एका घराच्या उंबऱ्यावर एक गौरवर्ण, मध्यम वयाची, सुंदर स्त्री आपल्या दोन अडीच वर्षांच्या बाळसेदार मुलाला कडेवर घेऊन उभी होती. रस्ता जरी फार गजबजलेला नव्हता तरी प्रचंड न्यू यॉर्क शहरांतील रस्ता तो! तेथील कमी गर्दी म्हटली तरी आपल्याकडील मोठ्या शहरांतील ऐन रहदारीपेक्षां अधिक असावयाची! रस्त्यांतील नाना प्रकारच्या गमती बोटानें दाखवीत व त्याला समजेल अशा बोबड्या भाषेंत बोलत ती स्त्री आपल्या मुलाला खेळवीत होती. पण मातेच्या कडेवर बसून दुरून गंमत पाहणें त्या मुलाला फार वेळ रुचलें नाहीं. तो कडेवरून खालीं उतरला, आणि आईच्या आंवरण्याला न जुमानतां चिमुकलीं पावलें टाकीत समोर दुकान होतें त्या दुकानापाशीं जाऊन उभा राहिला. दुकानाचा मालक एक इंग्रज गृहस्थ होता. त्या छोट्या लबाडाची ती चपळाई पाहून त्याला फार कौतुक वाटलें, व विक्रीस ठेवलेल्या लहान लहान निशाणांपैकीं दोन निशाणें त्याच्यापुढें करून तो म्हणाला, "ये बाळ, यांपैकीं तुला कोणचें निशाण हवें?"

त्या दोन निशाणांपैकीं एक इंग्लंडचें युनिअन जॅक होतें व दुसऱ्यावर पट्या पट्या आणि तारका काढलेल्या होत्या. त्या दोन निशाणांकडे

कांहीं वेळ अनिश्चित वृत्तीनें पाहून त्या मुलानें शेवटीं तारकांचें अमेरिकन निशाण घेतलें. तें पाहतांच दुकानदार हंसत हंसत म्हणाला, "बरं, आतां तें दे, अन् हें छान छान निशाण घे!"

"अं! नाहीं, नाहीं!" असें पुटपुटत त्या बालकानें हातांतील निशाण अधिकच घट्ट धरून ठेवलें आणि आपला हात मागें घेतला.

"बरं, बरं, नको देऊंस! हीं दोन्ही निशाणं घे तुला, मग तर झालं?" असें हंसत हंसत म्हणून त्या दुकानदारानें आपल्या हातांतील युनिअन जॅक् त्या बालकाच्या कोटाच्या खिशांत घातलें.

पण तो बालक पक्का हट्टी होता. त्यानें तें खिशांतील निशाण ताबडतोब बाहेर जमिनीवर भिरकावून दिलें, आणि रागानें डोळे वटारून पहात तो त्या दुकानदारासमोर मोठ्या ऐटीनें उभा राहिला.

त्या वेळीं एक वृद्ध आयरिश गृहस्थ तो सारा प्रकार पहात दुकानापाशीं उभा होता. त्या चिमुकल्या मुलाची ही विलक्षण कृति पाहून तो चटकन पुढें झाला, त्यानें त्याला उचलून आपल्या हृदयाशीं घट्ट धरलें, त्याचे कितीही मुके घेतले तरी त्याचें समाधान होईना, आणि त्याच्या नेत्रांतून वाहूं लागलेल्या अश्रुधाराही कांहीं केल्या थांबेनात. जुन्या आयरिश देशभक्तांनीं स्थापिलेल्या 'फेनिअन पक्षा'चा हा वृद्ध आयरिश गृहस्थ होता. त्याच्या मतें युनिअन जॅक हें जुलमाचें चिन्ह होतें आणि अमेरिकेच्या निशाणावर स्वातंत्र्याचा कैवार लिहिलेला त्याच्या दृष्टीला दिसत होता. त्यामुळें एका निशाणाचा धिःकार करून दुसऱ्याचा स्वीकार करणाऱ्या त्या सुंदर, धीट बालकाला पाहतांच त्याचें हृदय स्वदेशाभिमानानें आणि कौतुकानें भरून आलें.

एखाद्या कुशल चित्रकारानें त्या वेळचा तो प्रसंग फलकावर रंगविला असता तर त्याचें चित्र अजरामर झालें असतें यांत संशय नाहीं. अपमान झाल्यामुळें रागावलेल्या दृष्टीनें त्या जमिनीवर पडलेल्या युनिअन जॅककडे पाहणारा तो इंग्रज दुकानदार, त्या मोहक बालकाला

हृदयाशीं धरून त्याच्यावर अश्रूंचा वर्षाव करणारा तो वृद्ध गृहस्थ, किंचित् आश्चर्यानें व कुतूहलानें त्या वृद्ध गृहस्थाकडे पाहणारा तो धीट व बाळसेदार मुलगा, या हृदयस्पर्शी प्रसंगाकडे काडीचेंही लक्ष द्यावयास सवड नसलेल्या स्त्रीपुरुषांची रस्त्यावरील गर्दी, दोन्ही बाजूंच्या त्या टोलेजंग उंच उंच इमारती, इतकें नयनमनोहर दृश्य पाहण्याचें भाग्य क्वचितच एखाद्याला लाभतें.

हा मुलगा दुसरा कोणी नसून आज जगांत प्रत्येक स्वातंत्र्यभक्त ज्याचें नांव परमादरानें उच्चारतो तो डी व्हॅलेराच होय. डी व्हॅलेराचें पाळण्यांतील सबंद नांव इमॉन डी व्हॅलेरा असें आहे. न्यूयॉर्क शहरीं सन १८८२ मध्यें आक्टोबरच्या १४ तारखेस त्याचा जन्म झाला. म्हणजे टेरेन्स मॅक्स्विनीपेक्षां डी व्हॅलेरा हा तीन वर्षांनीं लहान. डी व्हॅलेराच्या बापाचें नांव व्हिव्हिअन डी व्हॅलेरा असें होतें, व तो आयर्लंडचा रहिवाशी नसून स्पेनचा रहिवाशी होता. डी व्हॅलेराची आई मात्र अस्सल आयरिश रक्ताची होती. तिचें नांव कॅथराइन कोल. स्पॅनिश पिता आणि आयरिश माता अशा प्रकारें डी व्हॅलेराचा जन्म झाला यांत कांहीं आश्चर्य नाहीं. उलट, प्राचीन कालापासून आयर्लंड व स्पेन या दोन देशांचे जे जिव्हाळ्याचे स्नेहसंबंध चालत आले आहेत, त्यांची ही एक साक्षच होय. जनरल वॉल, ओडोनेल, ओहिगिन्स वगैरे अनेक आयरिश सेनापतींनीं व मुत्सद्यांनीं स्पेन देशाची जी सेवा केली व जिची साक्ष प्रत्येक शतकाच्या इतिहासांत स्पष्टपणें सांपडते त्या सेवेची फेड करण्याकरितांच जणूं काय परमेश्वरी सूत्रानुरूप डी व्हॅलेरानें स्पॅनिश पित्याच्या पोटीं जन्म घेतला !

डी व्हॅलेराचा बाप व्हिव्हिअन हा मूळचा स्पेन देशाचा रहिवाशी. पुढें कित्येक वर्षांनीं त्यानें मायदेश सोडून अमेरिकेस प्रयाण केलें. तो विद्वान्, बहुश्रुत आणि व्यासंगी होता. अनेक भाषांवर त्यानें प्रभुत्व मिळविलें होतें. त्याचा मुख्य धंदा चित्रकाराचा होता. पण त्याची

बुद्धि इतकी सर्वगामी आणि कुशाग्र होती, कीं त्यानें कोणत्याही धंद्यांत कीर्ति संपादन केली असती. लहानपणापासून त्यानें संगीताचा अभ्यास केला होता, आणि तो अकालींच मृत्युवश झाला नसता तर उच्च प्रतीचा संगीतज्ञ म्हणून त्याचें नांव मागें राहिलें असतें. आयरिश संगीताविषयीं त्याला फार आवड होती, आणि कॅथराइन या आयरिश स्त्रीशीं लग्न केल्यापासून तर केवळ आयरिश संगीतानें तृप्त न रहातां आयरिश भाषेचाही अभ्यास करावयास त्यानें प्रारंभ केला. न्यू यॉर्कमध्यें तो असतांना त्याच्या घरीं येणाऱ्या प्रत्येक इसमाचें स्वागत तो आयरिश भाषेंतच करी, आणि अस्खलित आयरिश बोलणारा एखादा गृहस्थ भेटावयास आला, कीं त्याला परमावधीचा आनंद होत असे. कोणाशीं संभाषण करावयाचें झालें, कीं तो आयरिश भाषेंतच प्रारंभ करीत असे, आणि संभाषण ऐन रंगांत आलें म्हणजे कधीं कधीं मनांतील विचार प्रगट करावयास योग्य असे आयरिश शब्द त्याला आठवेनातसे होऊन तो दुसऱ्या भाषेंत बोलूं लागे. मग सर्व मंडळी हंसूं लागत आणि तोही त्या हंसण्यांत मनापासून सामील होत असे.

डी व्हॅलेराची आई कॅथरॉइन ही आयर्लंडमधील लिमेरॉक परगण्यांतील ब्रूरी गांवच्या कोल आडनांवाच्या घराण्यांतील होती. तीही सुसंस्कृत होती, व तिच्या सौंदर्याविषयीं सांगावयाचें झालें तर तिच्याइतकी सुस्वरूप स्त्री हजार पांचशांत सांपडणें दुर्मिळ असेंच म्हटलें पाहिजे. ती ऐन तारुण्यांत होती तेव्हां ब्रूरी गांवाला ती अलंकारभूत समजली जात असे, व १८७९ च्या आक्टोबरमध्यें जेव्हां ती स्वदेश सोडून अमेरिकेला गेली तेव्हां 'गांवाचें सौंदर्य नष्ट झालें!' असे ब्रूरीच्या लोकांनीं उद्गार काढले. प्रथमपासूनच कॅथराइनच्या अंतःकरणांत स्वदेशाभिमान जागृत होता, आणि कांहीं कारणानें तिला अमेरिकेस जावें लागलें तरी आपल्या मायभूमीविषयींचें तिच्यातीलनमी

प्रेम तिळरभही कमी झालें नाहीं. आपल्या घराण्यांतील स्त्रीपुरुषांनीं वेळोवेळीं स्वदेशासाठीं अतुल स्वार्थत्याग केला आहे व आपणही आपल्या घराण्याची उज्ज्वल परंपरा कायम राखली पाहिजे अशी महत्त्वाकांक्षा तिनें ठेवलेली होती.

अशा मातापितरांच्या पोटीं १८८२ सालीं डी व्हॅलेराचा जन्म झाला त्या वेळीं आयर्लंडमध्यें काय स्थिति होती ? आपल्या चिमुकल्या लुसलुशीत मुठी तोंडांत घालून एखाद दुसऱ्या बोबड्या अक्षराचा उच्चार करीत पाळण्यांत पडलेल्या तान्ह्या डी व्हॅलेराच्या कानीं कोणते आवाज पडत होते ? आयर्लंड सुखासमाधानांत होतें काय ? शंभर वर्षांपूर्वी आयर्लंडला पार्लमेंटची सुधारणा इंग्लंडकडून मिळाली तिचा शतसांवत्सरिक उत्सव करण्यांत आयर्लंडचे लोक हर्षमग्न झालेले होते काय ? या प्रश्नांचें उत्तर त्या वेळीं साऱ्या अमेरिकेभर हिंडून लोकांना आयर्लंडच्या स्थितीविषयीं जागृत करणाऱ्या मिशेल डेव्हिटकडून चांगलें मिळालें असतें. आयर्लंडमधील लोकांच्या अनंत दुःखांची कहाणी सांगण्याखेरीज त्याला कांहीं बोलावयास दुसरा विषयच नव्हता. त्याच्या करुण कहाणीचे पडसाद अमेरिकेंतील प्रत्येक खेड्यांत आणि दऱ्याखोऱ्यांत ऐकावयास येत होते. आयर्लंडमध्यें फॉर्स्टरच्या दडपशाहीच्या कायद्याचा अमंल जारीनें सुरू होता. पार्नेल, डिलन, सेक्स्टन वगैरे आयरिश पुढाऱ्यांना इंग्रज सरकारनें तुरुंगांत टाकलें होतें. जुलूम व अन्याय हेंच सरकारचें धोरण होऊं पहात होतें. लोकांमध्यें जागृति उत्पन्न होऊं लागली होती, आणि संपूर्ण स्वराज्याच्या निकराच्या युद्धाला लवकरच तोंड लागणार अशीं स्पष्ट चिन्हें दिसत होतीं ! याच युद्धाचें धुरीणत्व पुढें डी व्हॅलेराच्या हातीं यावयाचें होतें !

१८८४ सालीं डी व्हॅलेराचा बाप फार आजारी पडला व कांहीं दिवसांनीं त्या दुखण्यांतच त्याचा अंत झाला. पतिनिधनानें शोकमग्न झालेल्या डी व्हॅलेराच्या आईला दोन वर्षांच्या मुलाचें संगोपन कर-

ण्याची बिकट जबाबदारी एकटीच्या अंगावर पडलेली पाहून अधिकच काळजी वाटूं लागली. न्यू यॉर्कसारख्या शहरीं कुटुंबाचा पोसता पुरुष नाहींसा होणें म्हणजे कांहीं लहान सहान संकट नव्हे. त्या संकटाच्या भाराखालीं डी व्हॅलेराच्या आईचा धीर दडपून गेला असल्यास नवल नाहीं. तिची स्थिति साधारण बरी असली तरी ती श्रीमंत होती असेंही म्हणतां आलें नसतें. स्वतःचा उदारनिर्वाह करून मुलाचें संगोपन व शिक्षण चालविण्याचा प्रश्न आज नाहीं तरी कांहीं दिवसांनीं जरा बिकटच होण्याचा संभव तिला दिसावा हें साहजिक होतें. ती बुद्धीची आणि धीराची बाई होती, त्यामुळें खटपट करून स्वतःला काम मिळविण्यांत तिला फारसे श्रम करावे लागले नाहींत. पण आपण कामावर गेलों, कीं मुलाला कोण संभाळणार? हा प्रश्न सोडविणें तिला दुरापास्तच वाटूं लागलें. कितीही विचार केला तरी त्या प्रश्नाची सोडवणूक कशी करावी तें तिला सुचेना. शेवटीं एके दिवशीं याच प्रश्नाचा विचार करीत ती सचिंत बसली असतां तिचा भाऊ एडमंड याजकडून तिला एक पत्र आलें. तिच्या या भावाला कनेक्टिकटमध्यें नोकरी होती. त्याला मलेरिआ जडला होता व हवापालट करण्यासाठीं आयर्लंडमध्यें जाण्याविषयीं डॉक्टरांनीं त्याला सल्ला दिला होता. म्हणून आपण आयर्लंडला जाणार आहोंत असें बहिणीस कळविण्यासाठीं हें पत्र त्यानें लिहिलें होतें. एडमंडचें तें पत्र वाचतांच इमॉनला त्याच्या बरोबर आयर्लंडमध्यें पाठविण्याची कल्पना त्याच्या आईच्या मनांत आली. तिची आई एलिझाबेथ—म्हणजे इमॉनची आजी—अजून जिवंत होती; व तिचा दुसरा भाऊ पॅट्रिक हा ब्रूरी गांवामध्यें नॉकमूर येथें आईबरोबर घर करून राहिलेला होता. इमॉनला तिकडे पाठवून दिल्यास मामाच्या नजरेखालीं आणि आजीच्या प्रेमळ जोपासनेनें त्याचें शिक्षण व संगोपन उत्तम प्रकारें होईल असें इमॉनच्या आईला वाटलें. तिनें आपला विचार आपल्या दोन्ही भावांना ताबडतोब कळविला, व त्या

दोघांनाही तो पसंत पडला. भावांची संमति मिळतांच तिनें इमॉनला आयर्लंडला पाठविण्याविषयीं सर्व प्रकारची व्यवस्था केली. पतिवियोगानें आधींच कष्टि झालेल्या आपल्या अंतःकरणाला एकुलत्या एक मुलाचा विरह दुःसह होईल हें ती जाणून होती. परंतु इमॉनला आयर्लंडमध्यें पाठविण्यांतच त्याचें अंतिम कल्याण आहे हें तिनें पक्कें ओळखलें असल्यामुळें आपला दोन अडीच वर्षांचा लाडका मुलगा हातावेगळा करण्यास ती तयार झाली. अंतःकरण घट्ट करून वागण्याचीच ती वेळ होती, व त्याप्रमाणेंच ती वागली.

इमॉनचा मामा एडमंड कोल सुदृढ बांध्याचा, भव्य पुरुष होता. उंचीनें तो सहा फुटांपेक्षां अधिकच होता. बहिणीच्या इच्छेप्रमाणें तो न्यू यॉर्क येथें आला व इमॉनला आपल्या ताब्यांत घेऊन व इतर सारी तजवीज करून त्यानें अमेरिका सोडली. त्याला काय माहीत, कीं आपण ज्या बालकाला उरापोटाशीं धरून आयर्लंडला नेत आहोंत तोच मोठेपणीं आयर्लंडच्या स्वातंत्र्यासाठीं समशेर उपसून इंग्लंडशीं झगडेल, किंवा तोच एका प्रसंगीं इंग्लिश लष्करी कोर्टापुढें आरोपी म्हणून उभा राहून "उद्यां सकाळीं सहा वाजतां तुला गोळी घालून ठार करण्यांत येईल" असा त्याच्या अपराधाबद्दल निकाल सांगण्यांत येईल? एक बाळसेदार सुंदर चुणचुणीत मुलगा आपण आपल्या भावाकडे नेत आहोंत यापलीकडे एडमंडची कांहींच कल्पना असणें शक्य नव्हतें.

सन १८८५ च्या एप्रिल महिन्याच्या २० तारखेला एडमंड इमॉनला घेऊन ब्रूरी येथें पोचला, व त्यानें त्याला पॅट्रिक कोल याच्या स्वाधीन केलें. एव्हांपासून पुढें इमॉनच्या संगोपनाचें व शिक्षणाचें सर्व काम पॅट्रिकच्या हातून झालें. इमॉन जरा मोठा झाल्याबरोबर त्याच्या मामानें त्याला ब्रूरी येथील 'राष्ट्रीय शाळें'त घातलें. इमॉनची बुद्धि लोकविलक्षण होती असें म्हणतां आलें नाहीं तरी पहिल्यापासूनच त्याच्या बुद्धीची कुशाग्रता आणि अभ्यासाविषयीं आवड दृग्गोचर

व्हावयास लागली असें म्हणावयास कांहींच हरकत नाहीं. त्याचे पहिले पंतोजी जॉन केली हे होते. हे गृहस्थ बुद्धिमान् होते. शिक्षकाच्या धंद्यांतच त्यांचे काळे केंस पांढरे झाले होते, आणि लहान मुलांच्या शिक्षणाविषयीं त्यांची कळकळ आणि त्यांचें पवित्र वर्तन यांविषयीं ते विख्यात होते. शिक्षणाविषयींच्या त्यांच्या कल्पना फार उच्च दर्जाच्या होत्या. ठराविक पुस्तकें शिकवून आणि इयत्तांच्या चाळणींतून गाळून काढून मुलाला तयार करूं पाहणें म्हणजे एखादा शर्यतीचा घोडा तयार करण्यासारखें आहे असें ते म्हणत, व असल्या कृत्रिम शिक्षणाचा ते मनापासून धिःक्कार करीत. मुलांच्या अंतःकरणांतील नैतिक व धार्मिक नैसर्गिक भावनांना वळण देण्याविषयीं ते फार दक्षता ठेवीत. व्यवहार व धर्म या दोहोंचेंही उत्कृष्ट मीलन करून शिक्षण देण्याची त्यांची हातोटी मोठी कुशलतेची होती, आणि त्यांच्या हाताखालून गेलेल्या विद्यार्थ्यांवर त्यांच्या शिकवणीचा असा कांहीं एक कायमचा ठसा रहात असे, कीं इतर माणसांपेक्षां ते केव्हांही आपल्या वैशिष्ट्यानें वेगळे दिसत.

डी व्हॅलेरा पहिल्या दिवशीं शाळेंत गेला तेव्हां त्यानें मखमलीचा सुंदर पोषाख केला होता, व त्या पोषाखांत त्याचें मूळचें सौंदर्य अधिकच खुलून दिसत होतें. तो वर्गांत गेला तेव्हां शिक्षकानें त्याला त्याचें नांव विचारलें. डी व्हॅलेरानें 'डी व्हॅलेरा' असें उत्तर दिलें, पण त्या नांवाचा उच्चार शिक्षकाला कळेना. डी व्हॅलेरानें पुन्हां दोन तीन वेळां आपलें नांव शक्य तितक्या स्पष्टपणें सांगितलें तरी शिक्षकाला तें उमजेना. शेवटीं डी व्हॅलेराच्या घराजवळ राहणाऱ्या एका विद्यार्थ्याला जवळ बोलावून त्याकडून शिक्षकानें डी व्हॅलेरा हें नांव लिहवून घेतलें व मग तें हजिरीपटांत दाखल केलें.

दोन तीन वर्षांतच डी व्हॅलेराच्या असाधारण बुद्धीची साक्ष अनेक गोष्टींवरून पटूं लागली. स्वतःच्या वर्गांत शिकविले जाणारे धडे

उत्तम प्रकारें तयार करूनच डी व्हॅलेरा स्वस्थ बसत नसे. वरच्या वर्गांत शिक्षक काय शिकवितात हें पाहण्याच्या जिज्ञासेनें तो हळूच तेथें जाऊन बसे. कोणताही विषय असो, तो कळून घेण्याची डी व्हॅलेराला नेहमीं उत्कंठा असावयाची! पहिल्यापासून गणित विषयांत त्याची बुद्धि उत्तम प्रकारें चालत असे, व शेवटीं शेवटीं तर त्याच्याहून वरच्या वर्गांतील मुलांस गणित शिकविण्याचें काम शिक्षकांनीं त्याकडे सोंपवावें व तें त्यानें हौसेनें आणि दक्षतेनें पार पाडावें असा क्रम चालू झाला होता. बारा वर्षांचा झाल्यापासून तर डी व्हॅलेरा फारच अभ्यासी झाला. संध्याकाळच्या वेळीं रस्त्याच्या कडेला एखाद्या दगडावर किंवा झाडाच्या फांदीवर वाचीत असतांना तो दृष्टीस पडे. जेवावयाच्या वेळींही पुढें टेबलावर आपलें पुस्तक उघडून ठेवल्याखेरीज त्याला चैन पडत नसे. ज्यांत अद्भुत पराक्रमांचीं आणि साहसांचीं वर्णनें आहेत असलीं पुस्तकें वाचण्याचा त्याला विशेष नाद असे. नेपोलिअनविषयींचे अनेक ग्रंथ त्यानें वाचून काढले. साहसांच्या वर्णनांनीं ओतप्रोत भरलेली अॅलेक्झँडर ड्यूमसची "तीन शिलेदार" ( Three Musketeers )ही कादंबरी त्याच्या खास प्रीतींतील होती. त्यानें ह्या कादंबरीचीं अनेक पारायणें केलीं होतीं व त्यांतील कित्येक प्रकरणेंच्या प्रकरणें तो बिनचूक तोंडपाठ म्हणून दाखवी. आपल्या आवडीचें वाङ्मय तोंडपाठ करण्याची त्याला भारी हौस होती, व या बाबतींत त्याची स्मरणशक्तिही असाधारण होती. स्फुट लेख व निबंध लिहिण्याचाही त्याला बराच छंद होता, आणि एखादें पुस्तक वाचलें कीं त्यावरील आपले विचार निबंधरूपानें लिहून ठेवण्याची त्याला संवय होती. ग्रंथांतील सुंदर उतारे मोठ्यानें वाचण्याची त्याला फार आवड असे, व तें तो वाचूं लागला म्हणजे ऐकणाराच्या मनावर परिणाम झाल्यावांचून रहात नसे. त्याच्या बरोबरीचे विद्यार्थि छोटे छोटे नाट्यप्रयोग करीत त्यांत

तो नेहमीं मिसळे. मात्र जी भूमिका करतांना कमरेला म्यान लटकावून हातांत समशेर फिरवितां येईल, किंवा कांहीं तरी पराक्रमाचा अभिनय करतां येईल असली भूमिका निवडून काढून ती आपल्याकडे घेण्याचा त्याचा हट्ट असे, व त्याचे सवंगडी त्याचा तो हट्ट मोठ्या आनंदानें पुरवीतही असत.

या वयांतीलच डी व्हॅलेरासंबंधींची आणखी एक विशेष गोष्ट म्हणजे ही, कीं एखाद्या विशेष प्रसंगीं देवळामध्यें धर्मोपदेशकाचें प्रवचन असलें, कीं तें ऐकावयास तो मोठ्या आस्थेनें व भक्तीनें जात असे. त्या प्रवचनांच्या विषयांविषयीं त्याच्या अंतःकरणांत आदर असे, आणि धर्मोपदेशकाचें वक्तृत्वही त्याच्या मनाला फार आल्हाद देई. हीं प्रवचनें ऐकून परत आल्यावर त्यांबद्दल डी व्हॅलेरा आपल्या सोबत्यांशीं वादविवाद करी, व त्या वादविवादांत त्याच्या अंगीं दिसून येणारें कौशल्य, ज्ञान, आणि सरलत्व पाहून त्याच्या सोबत्यांनाच नव्हे तर मोठ्या माणसांनाही आश्चर्य व कौतुक वाटल्यावांचून रहात नसे. असें सांगतात, कीं एके दिवशीं एक विद्वान् गृहस्थ आपल्या स्नेह्या-बरोबर संभाषण करीत असतां पलीकडे खेळणाऱ्या एका मुलाचा चेहरा त्यांना विशेष तेजःपुंज वाटला, व म्हणून त्याला त्यांनीं जवळ बोलाविलें. त्याचें नांव डी व्हॅलेरा आहे असें कळतांच त्या गृहस्थांना जरा आश्चर्य वाटलें, कारण तें नांव विशेष प्रघातांतील नव्हतें. अशा असाधारण नांवाच्या मुलाविषयीं त्यांना अधिकच जिज्ञासा उत्पन्न झाली, व त्यांनीं त्याला अनेक प्रकारचे प्रश्न विचारले. डी व्हॅलेरानें त्या प्रत्येक प्रश्नाचें उत्तर अशा कांहीं चतुराईनें आणि तत्परतेनें दिलें, कीं हा मुलगा पुढें मोठा कीर्तिमान होणार असें त्या गृहस्थांनीं त्या वेळीं बोलून दाखविलें.

अभ्यासाप्रमाणेंच खेळही डी व्हॅलेराला प्रिय होते. नव्हे, खेळ व तालीम यांचें त्याला वेड होतें असेंच म्हणणें अधिक यथार्थ होईल.

ज्या वेळीं त्याला अभ्यास करावयाचा नसे त्या वेळीं फुटबॉलच्या मैदानावर खेळतांना, किंवा धांवण्याच्या रंगणावर पळतांना तो दिसावयाचा. अभ्यासही नाहीं आणि खेळही नाहीं असला निर्जीव क्रम त्याला मनापासून तिरस्करणीय वाटे. केवळ आळसांत आयुष्याचा एकही क्षण दवडण्याची त्याची इच्छा नसे! बैठ्या खेळांची मात्र त्याला मुळींच आवड नव्हती. मर्दानी खेळांकडे त्याच्या मनाची धांव असे. पुष्कळ वेळां असें होत असे, कीं त्याच्या मामानें त्याला कांहीं निरोप सांगण्यासाठीं किंवा चिठीचपाटी नेऊन देण्यासाठीं पाठवावें, आणि वाटेंत एखादा खेळ चालला असला, कीं डी व्हॅलेरानें त्यांत सामील व्हावें व मग त्याला निरोपाचें भानही राहूं नये किंवा हातांतील चिठीचा कागद मुद्दाम बाजूला ठेवला असला तर तो वाऱ्यानें उडून देखील जावा!

डी व्हॅलेरा तेरा वर्षांचा होता त्यावेळीं जॉन केली हे शिक्षक जाऊन त्यांच्या जागीं गॅरेट हेज नांवाचे शिक्षक आले. डी व्हॅलेराच्या बुद्धी-विषयीं त्यांचें इतकें चांगलें मत झालें, कीं त्यांनीं त्याच्या मामांची मुद्दाम गांठ घेतली, व त्याला एखाद्या मोठ्या शाळेंत पुढील अभ्यासा-करितां पाठविण्याची त्यांस जोराची शिफारस केली. डी व्हॅलेराचे मामा पॅट्रिक कोल यांनीं आपल्या भाच्याची बुद्धिमत्ता केव्हांच ओळखून ठेवली होती. डी व्हॅलेरा हा तैलबुद्धीचा आणि उमद्या अंतःकरणाचा मुलगा आहे हें शाळेंतील शिक्षकांनीं त्यांना सांगावयास पाहिजे होतें असें नव्हे. चार मंडळी जमली म्हणजे डी व्हॅलेरा स्तब्ध बसत असे हें जरी खरें, तरी ज्यांचा त्याला अधिक सहवास होई त्यांच्याशीं त्याला खूप बोलावयास हवें असे. हें ओळखूनच त्याची शाळा सुटली कीं, पॅट्रिक कोल त्याला आपल्याबरोबर पुष्कळ वेळां फिरावयास नेत असत. मग नदीच्या तीरातीरानें ते हिंडत आणि अशा वेळीं डी व्हॅलेरा नाना प्रकारच्या प्रश्नांनीं आपल्या मामाला

भंडावून सोडीत असे. अनेक प्रकारच्या सोप्या व कठीण विषयांसंबंधीं तो माहिती विचारी. यामुळें आपल्या भाच्याला उच्च शिक्षण दिलें पाहिजे असें पॅट्रिक कोल यांनीं आपल्या मनाशीं अर्धवट ठरवून ठेविलेंच होतें. त्यांतच गॅरेट हेज या शिक्षकांच्या शिफारशीची भर पडली. मग काय, ताबडतोब सारी व्यवस्था करण्यांत आली, आणि सन १८९६ मध्यें नोव्हेंबरच्या २ तारखेस रॉथलुर्क येथील 'ख्रिस्ती बंधू'च्या शाळेंत डी व्हॅलेरा दाखल झाला.

डी व्हॅलेराला 'ख्रिस्ती बंधू'च्या शाळेंत घातल्याबद्दल त्याचे मामा प्रशंसनेला पात्र आहेत. पॅट्रिक कोल यांची सांपत्तिक स्थिति यथातथाच होती हें लक्षांत घेतलें असतां ते अधिकच प्रशंसनीय ठरतात. एकंदर विचार केला तर खरोखरच असें म्हणावें लागतें, कीं डी व्हॅलेराच्या संगोपनाचें व शिक्षणाचें काम पॅट्रिक कोल यांच्यासारख्या दूरदर्शी, बुद्धिमान् आणि प्रेमळ मनुष्याच्या हातीं पडलें ही एक ईश्वरी योजनाच म्हटली पाहिजे. पॅट्रिक कोल हे तैल बुद्धीचे आणि दिलदार अंतःकरणाचे गृहस्थ होते. त्यांच्या शरीराचा बांधाही धिप्पाड आणि भव्य होता. त्यांची उंची सहा फूट चार इंच होती, व त्यांचा चेहरा मोठा रुबाबदार दिसे. लिमेरिक परगण्यांत ते प्रसिद्ध होते. मजुरांच्या चळवळींत ते बरेंच लक्ष घालीत, व त्यांचीं व्याख्यानें परिणामकारक असत. १९१६ सालच्या बंडापर्यंत ते वुइल्यम ओब्रायनच्या राजकीय मतांचा पुरस्कार करणारे होते. पॅट्रिक कोल असें सांगत—व ही एक जरा नवल वाटण्यासारखींच गोष्ट आहे—कीं लहानपणीं डी व्हॅलेराला राजकारणाचा विषय बिलकुल आवडत नसे. पॅट्रिक कोल यांच्याकडे त्यांचे मित्र बोलाबसायला वारंवार येत, व मग संभाषण ऐन भरांत आलें, कीं त्या वेळच्या राजकीय पुढाऱ्यांच्या गुणावगुणांची चर्चाही साहाजिकपणेंच सुरू होत असे. अशा वेळीं त्या वादविवादाकडे बिलकुल लक्ष न देतां डी व्हॅलेरा एखादें पुस्तक वाचीत

बसे. एखाद्या मुद्यावर त्याच्या मामानें त्याला कांहीं प्रश्न केला तरी दोन तीनदां खोंचून विचारावें तेव्हां तो उत्तर देई, आणि तेंही मोठेंसें मनापासून दिलेलें नसे.

असो. डी व्हॅलेराच्या घरापासून 'ख्रिस्ती बंधू'ची शाळा सहा मैल लांब होती, सकाळीं शाळेंत जातांना डी व्हॅलेरा रेलवेनें जात असे, व संध्याकाळीं परत यावयाच्या वेळीं कधीं एखाद्या सोबत्याच्या गाडींत किंवा कधीं पायींच तो घरीं येत असे. शाळेंतून परत येतांना रेलवेनें यावयाचें म्हणजे गाडीची वेळ होईपर्यंत थांबणें भाग होतें, कारण शाळा सुटल्यानंतर पुढें तीन तास रॉथलुर्कहून सुटणारी गाडीच नव्हती. अभ्यासांत किंवा मर्दानी खेळांत सारा वेळ घालवूं इच्छिणाऱ्या डी व्हॅलेराला स्टेशनवर तीन तास थांबण्याची कल्पना पटणें शक्यच नव्हतें. म्हणून पायीं घरीं परत येणेंच त्याला बरें वाटे, आणि पुष्कळ वेळां तर असें होत असे, कीं डी व्हॅलेरानें घरीं परत येऊन आपला संध्याकाळचा व्यायाम देखील संपवावा आणि मग लिमेरिकला जाणारी गाडी त्याच्या घरापुढून भकभक करीत जावी !

'ख्रिस्ती बंधू'च्या शाळेंत असतांना डी व्हॅलेरानें फारच झटून अभ्यास केला व त्याचें फलही त्याला लवकरच मिळालें. त्याला ९०० रुपयांची एक शिष्यवृत्ति मिळाली. "सर्वांत निंद्य उधळेपणा कोणता असेल तर मनुष्यानें आपला वेळ व्यर्थ घालविणें हा होय" हे फ्रेंच लेखक व्होल्टेर याचे उद्गार डी व्हॅलेरानें आपल्या दृष्टीपुढें जणूं काय सतत ठेवले होते. त्यानें आपला शाळेंतील अभ्यासक्रम उत्कृष्ट रीतीनें पार पाडला, आणि शिक्षकांचें प्रेम संपादन करून आणि विद्वत्तेबद्दल कीर्ति मिळवून आपल्या मामाच्या उत्तेजनाचें चीज केलें. डी व्हॅलेराच्या या गुणांमुळें पॅट्रिक कोल यांना मोठी धन्यता वाटली व त्याला पुढें कॉलेजांतील शिक्षण देण्याचा त्यांनीं ताबडतोब निश्चय केला.

## प्रकरण २ रें

# बंडखोराला जन्मठेप

रॉथलुर्क येथील शाळेंतील अभ्यासक्रम दोन वर्षांत पुरा करून १८९८ च्या ऑगस्टमध्यें डी व्हॅलेरा डब्लिनच्या ब्लॅकरॉक कॉलेजमध्यें गेला. तेथेंही त्यानें आपलें बुद्धिवर्चस्व प्रगट केलें व दर वर्षी शिष्य-वृत्त्या मिळविल्या. उपशिक्षक या नात्यानें रोज कांहीं तास कॉलेजांत शिकविण्याचें काम करूनही त्यानें उत्कृष्ट रीतीनें अभ्यास केला हें विशेष कौतुकास्पद होय, असें त्या कॉलेजचे अध्यक्ष रेव्हरंड ब्रेनन हे नेहमीं म्हणत. कॉलेजच्या अधिकाऱ्यांची त्याजवर इतकी मर्जी होती, कीं गणित व पदार्थविज्ञानशास्त्र या विषयांच्या प्रोफेसरची जागा रिकामी होतांच तिच्यावर त्यांनीं त्याची नेमणूक केली. त्याचा गणित विषय विशेष तयार होता व तो विद्यार्थ्यांस शिकविण्याची त्याची हातोटीही स्पृहणीय होती.

डी व्हॅलेरा रॉयल युनिव्हर्सिटींतून १९०४ मध्यें बी.ए. झाला. बी.ए. झाल्यानंतर शुद्ध गणित व पदार्थ विज्ञानशास्त्रविषयक गणित हे दोन विषय घेऊन एम. ए.ला बसण्याची त्यानें तयारी चालविली. परंतु याच वेळीं कॅरीस्फोर्ट येथील ट्रेनिंग कॉलेजांत तो गणिताचा प्रोफेसर होता; त्यामुळें एकीकडे शिकविणें व दुसरीकडे एम. ए.च्या परीक्षेची तयारी करणें त्याला उत्तरोत्तर दुरापास्त वाटूं लागलें, व शेवटीं एम. ए.चा विचार त्याला रहित करावा लागला. शेवटीं हा एम. ए.चा बेत अनेक कारणांनीं कायमचा रहित होऊन डी व्हॅलेरा फक्त बी. ए. बीएस्. सी. झाला. बाकी एम. ए.ची पदवी त्याच्या नांवापुढें जरी नसली तरी मोठ्या विद्वानांनाही गप्प बसविण्याइतकें त्याचें ज्ञान होतें. कारण एम. ए.चा अभ्यास करीत असतांना त्यानें अनेक विषयांचा व्यासंग केला. उच्च गणिताचा अभ्यास करतां करतां त्यांतील

अनेक प्रश्नांचा तत्त्वज्ञानाशीं संबंध येतो असें वाटल्यावरून त्यानें त्याही विषयाचा अभ्यास केला. त्याप्रमाणेंच शिक्षणाचें शास्त्र व पद्धति या विषयांवर प्रोफेसर कॉर्कोरीन यांचीं व्याख्यानें त्यानें ऐकलीं. लॅटिन, ग्रीक व फ्रेंच या भाषांचा तर त्यानें अभ्यास केलाच, परंतु आयरिश भाषेंत प्राविण्य मिळविण्यासाठीं त्यानें विशेष मेहनत केली. तसेंच सूर्यकिरणें, विद्युत् वगैरे पदार्थशास्त्रांतील कांहीं शाखांचा त्यानें संशोधक वृत्तीनें अभ्यास करून कांहीं नवे शोधही केले. या सर्व गोष्टींवरून केवळ पदवीसाठीं ग्रंथ वाचण्याची दृष्टि न ठेवतां 'न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते' या उदात्त भावनेला अनुसरून डी व्हॅलेरानें अनेक विषयांचा अभ्यास कसा केला ही गोष्ट वाचकांच्या ध्यानांत सहज येईल.

ब्लॅकरॉक कॉलेजांत डी व्हॅलेरा प्रोफेसरचें काम करीत असतांना त्याच्या शिकविण्याच्या कुशल पद्धतीबद्दल त्याची सर्वांनीं वाहवा केली. कॉलेजला सुटी झाली, कीं तो ब्रूरीला आपल्या मामाच्या घरीं येत असे. फुटबॉलसारखे मर्दानी खेळ तो अजूनही खेळत असे; पण त्या खेळापेक्षां त्याला आतां शिकारीचा फार नाद लागला. तो निशाणबाजींत पटाईत होता व शिकारींत व्यायाम, आनंद, आणि खाद्य या सर्वांचा लाभ होत असल्यामुळें शिकार खेळण्यापुढें इतर सारे खेळ त्याला फिके वाटूं लागले. बंदुकीच्या प्रत्येक भागाचा त्यानें लक्षपूर्वक अभ्यास केला, आणि चांगलें हत्यार दिसलें कीं तें विकत घेतल्याशिवाय तो राहिला नाहीं. दर सुटींत एक नवी बंदूक खरेदी करून तो घरीं येई. उमदा घोडा पाहिला, कीं अरब माणूस जसा मोहित होतो तसाच डी व्हॅलेरा चांगलें हत्यार पाहिलें कीं मोहून जात असे. एकदां तर आपल्या एका मित्राजवळ तो म्हणाला, "बंदुकीइतकी दुसरी कोणती गोष्ट मला प्यारी नाहीं. मी शिपाई होणार आहे कीं काय कोणास ठाऊक!" हे शब्द डी व्हॅलेरानें विनोदानें उच्चारले खरे; पण ते शब्द पुढें पूर्णांशानें

नव्हे तरी अंशतः खरेच होणार होते हें त्याचें त्याला देखील माहीत नव्हतें ! मग इतरांना त्याची काय कल्पना असणार ?

लहानपणापासूनच आयरिश भाषेवर त्याची निस्सीम भक्ति होती. लहानपणीं तो आपल्या आजीजवळून नवे नवे आयरिश शब्द शिकून घेत असे. पुढें मोठेपणींही आयरिश भाषा चांगल्या तऱ्हेनें बोलणारें कोणीं भेटलें, कीं त्याला आनंद होत असे व त्याच्याशीं तो पुष्कळ वेळ संभाषण करी. ब्रूरीमध्यें एक वृद्ध चांभार होता त्याला आयरिश भाषा चांगली येत असे. या चांभाराशीं डी व्हॅलेरानें गट्टी केली व एखादा प्रश्न विचारतांच सुरू होणारें त्याचें लांबलचक चऱ्हाट तो मोठ्या आनंदानें व लक्षपूर्वक ऐकत असे. गोष्टी सांगण्यांत तो चांभार मोठा पटाईत असे. व त्याच्या सांगण्याच्या पद्धतींत एक प्रकारची मौज आणि ताजेपणा असे. या चांभाराच्या बडबडीपासून डी व्हॅलेरानें विविध माहिती मिळविली, व विशेष महत्त्वाची गोष्ट ही, कीं आयरिश उच्चारांचें जें एक सूक्ष्म वैशिष्टय तें त्यानें संपादन केलें.

आयरिश भाषेचा अभ्यास करतां करतांच रॉजर केसमेंट या विख्यात् देशभक्ताशीं डी व्हॅलेराचा स्नेह जमला. टवेन येथील ' आयरिश ' कॉलेजमध्यें त्या दोघांची प्रथम गांठ पडली व तेव्हांपासून त्यांचा स्नेह उत्तरोत्तर वृद्धिंगतच होत गेला. आयरिश कॉलेजांत अध्यापनाचें कामही डी व्हॅलेरानें कांहीं दिवस केलें. आयरिश भाषेविषयीं परमादराची भक्ति असलेली मंडळी या कॉलेजांत जमत. या मंडळींच्या हृदयांतील स्वभाषा व स्वदेश यांविषयींचा अभिमान किती जाज्वल्य होता याची खरी कल्पना त्या कॉलेजांतील विद्यार्थ्यांखेरीज इतरांस होणें शक्य नाहीं. त्या कॉलेजांत आयरिश भाषेखेरीज दुसरी भाषा क्वचितच ऐकावयास येई. शिक्षण आयरिश भाषेंत, गुरुशिष्यांचा सारा व्यवहार आयरिश भाषेंत, शिक्षकांचे वादविवाद आयरिश भाषेंत, थट्टा विनोदही आयरिश भाषेंत. सारांश, त्या कॉलेजच्या इमारतींत आयरिश

भाषेचा आत्मा वावरत आहे असा दुसऱ्या माणसाला भास होत असे. या कॉलेजांतच डी व्हॅलेरा व रॉजर केसमेंट हितगुज करीत बसत व आयरिश भाषेचा पुनरुद्धार करण्याची चळवळ कोणत्या उपायांनीं जोरानें पुढें ढकलावी याविषयीं अनेक प्रकारचे बेत करीत. त्या दोघांचें एकमेकावर अकृत्रिम प्रेम होतें, व त्यांच्या सहकार्यानें आयरिश भाषेच्या चळवळीला खरोखर फार मोठें सहाय्य झालें असतें. पण परकी अंमलाखालीं कुजणाऱ्या राष्ट्रांत अनेक गोष्टी 'झालें असतें' या सदराखालींच जाऊन पडतात! तसेंच याही बाबतींत झालें. रॉजर केसमेंटसारख्या देशभक्ताला इंग्रज सरकारच्या फांसावर १९१४ सालीं मरण आलें, आणि त्याचा व डी व्हॅलेराचा स्नेहसंबंध अकस्मात् कायमचा संपला!

डी व्हॅलेराच्या आयुष्यांतील आणखी एका महत्त्वाच्या गोष्टीलाही त्याचा आयरिश भाषेचा व्यासंगच कारण झाला. ती गोष्ट म्हणजे त्याचा विवाह होय. आयरिश भाषेला चलन देण्यासाठीं 'गेलिक लीग' या संस्थेनें शहरोशहरीं आपले वर्ग काढले होते. अशा एका वर्गांतच डी व्हॅलेरा व कुमारी सिनिड नी फ्लॅनागेन यांची गांठ पडली. डी व्हॅलेरा हा ग्रीक, लॅटिन, फ्रेंच, व जर्मन या भाषांत प्रवीण होता, आणि कुमारी सिनिड ही आयरिश भाषेंत तयार होती. तेव्हां दोघांनीं एकमेकांच्या भाषाकोविदत्वाचा फायदा करून घ्यावयाचें ठरविलें, आणि डी व्हॅलेरानें कुमारी सिनिड इला जर्मन शिकवावयाचें व तिनें डी व्हॅलेरास आयरिश शिकवावयाचें असा क्रम सुरू झाला. अशा प्रकारें त्या दोघांची प्रथम ओळख झाली, परिचयानें त्यांचा स्नेह जमला, व कालांतरानें स्नेहाचें प्रीतींत रूपांतर झालें. सिनिडचें आयरिश भाषेवर चांगलें प्रभुत्व होतें; एवढेंच नव्हे तर, त्या भाषेबद्दल तिला अंतःकरणपूर्वक अभिमान व प्रेम वाटे आणि साऱ्या आयर्लंडभर आयरिश भाषेचा प्रसार व्हावा अशी तिची प्रबळ इच्छा होती. तिचा स्वभाव अत्यंत प्रेमळ,

साधा, आणि मनमिळाऊ होता. अशा तरुणीचें व डी व्हॅलेरासारख्या विद्वान्, सुंदर व दिलदार तरुणाचें प्रेम जमलें यांत आश्चर्य नाहीं. त्यांचा विवाह १९१० सालीं झाला. आतांपर्यंत डी व्हॅलेरास चार मुलगे आणि दोन मुली झालेल्या आहेत.

डी व्हॅलेरा ब्लॅकरॉक कॉलेजांत प्रोफेसर असतांना १९०७ सालीं त्याची आई त्याला भेटण्यासाठीं अमेरिकेहून मुद्दाम आली. डी व्हॅलेराला परत अमेरिकेस न्यावें असा तिचा विचार होता. राज्यकर्ते व प्रजाजन यांच्यामध्यें सुरू असलेल्या झगड्यामुळें आयर्लंड देशांत राहणें विशेष सुखाचें नव्हे असें तिला वाटत होतें. डी व्हॅलेरा अमेरिकेंत आल्यास तेथें त्याच्या असाधारण बुद्धिमत्तेचें खरें चीज होईल अशी तिची कल्पना होती. पण डी व्हॅलेराला आईचा हा बेत विशेष पसंत पडला नाहीं. शिक्षणाच्या साम्राज्यांत त्यानें आतां चांगलीच जागा पटकावलेली होती, विद्यार्थी वर्ग व कॉलेजचे अधिकारी या सर्वांना तो हवासा झाला होता, आणि अध्यापकाचें काम सोडून दुसरीकडे जाण्याची त्याच्या मनाची इच्छा नव्हती. शिवाय, अध्ययन व अध्यापन हाच आपल्या स्वभावाला योग्य असा व्यवसाय आहे अशी त्याची खात्री झाली होती, व त्या व्यवसायांत पूर्ण यश संपादन करण्याचा त्याचा निश्चय होता. 'परमेश्वरानें मला कांहीं फारशी उच्च दर्जाची बुद्धिमत्ता दिली आहे असें नाहीं. पण तिच्या सहाय्यानेंच उच्च दर्जाची जागा मिळविल्याखेरीज मला चैन पडणार नाहीं' असें डॅनिअल ओकोनेल यानें पूर्वी एका प्रसंगीं उद्गार काढले होते. या उद्गारांत प्रतिबिंबित झालेल्या विचारांप्रमाणेंच डी व्हॅलेराच्याही मनांतील विचार होते. त्यानें आपले हे विचार आईपुढें मांडले तेव्हां तिनें त्याला अमेरिकेस चलण्याविषयीं अधिक आग्रह केला नाहीं, व डी व्हॅलेरानें आयर्लंडांतच रहावें असें उभयतांच्या मतानें ठरलें. या वेळीं डी व्हॅलेरा अमेरिकेस गेला असता तर आयर्लंडच्या राजकारणाला

कोणतें वळण मिळालें असतें, व डी व्हॅलेराचें स्वतःचें चरित्र कोणत्या प्रकारचें झालें असतें याविषयीं तर्कवितर्क करण्याचा मोह आपल्या मनाला होणें साहजिक आहे. पण असले तर्क करण्यांत काय अर्थ ? डी व्हॅलेरानें त्या वेळीं आईबरोबर अमेरिकेस जाऊं नये व त्यानें पुढें लवकरच आयर्लंडच्या राजकारणाचा धुरंधर व्हावें या साऱ्या गोष्टी परमेश्वरी सूत्रांनीं ठरलेल्याच होत्या ! त्या घडून आल्यावांचून कशा राहतील ?

सन १९१३ सालापर्यंत डी व्हॅलेरा शिक्षणाच्या शांत वातावरणांत होता. त्याच्या विद्वत्तेविषयीं परमादर बाळगणारे विद्यार्थि, त्याचे सहकारी प्रोफेसर व त्याचे आप्तेष्ट यांखेरीज डी व्हॅलेरा तोंपर्यंत फारसा कोणाला माहीत देखील नसेल. १९२३ सालीं आयर्लंडमध्यें तेव्हां स्वयंसेवकांचीं पथकें उभारण्याची चळवळ* सुरू झाली त्याच वेळीं डी व्हॅलेरानें सार्वजनिक चळवळींत प्रथम भाग घेतला, व तेव्हांपासूनच त्याच्या सार्वजनिक चरित्राला खरा प्रारंभ झाला असें म्हणावयास हरकत नाहीं. १९१३ सालच्या सुमारास आयरिश होमरूलचें बिल कॉमन्सच्या सभेंत पास करून घेण्यासाठीं मुख्य प्रधान ॲस्क्विथ यांची जोरानें खटपट चालली होती. हें बिल धुडकावून लावण्याच्या जाहीर उद्देशानें आयर्लंडचे पुढारी सर एडवर्ड कार्सन यांनीं अल्स्टर परगण्याचें स्वयंसेवक पथक उभारण्याचा निश्चय केला होता. होमरूल बिल पास झालें तर आयरिश लोक आपापसांत युद्ध करतील असें लोक म्हणत होते. होमरूल बिलाविरुद्ध आम्हीं बंड करूं अशी धमकी सर एडवर्ड आपल्या व्याख्यानांतून उघडपणें देत होते. सैन्यांतील कित्येक अधिकाऱ्यांनीं, कांहींनीं गुप्तपणें तर कांहींनीं उघड उघड, या नव्या चळवळीला आपला पाठिंबा दर्शविला होता. इतकेंच

* या चळवळीविषयींची सविस्तर माहिती " हिंमतबहाद्दर टेरेन्स मॅक्स्विनी " या आमच्या पुस्तकांत ७, ८, ९ या प्रकरणांत आम्हीं दिली आहे.

काय, समरप्रसंग उद्भवलाच तर नव्या चळवळींत सामील होऊन काम करण्याचेंही कांहीं थोड्या सेनानींनीं कबूल केलें होतें. याच सुमारास सरकारच्या कृतीला जॉन रेडमंड यांनीं आपली संमति दिली, व आयर्लंडच्या फाळणीलाच रेडमंड यांनीं रुकार दिला असें लोक म्हणूं लागले.

अशा परिस्थितींत १९१३ च्या नोव्हेंबर महिन्यांत डब्लिन येथें स्वयंसेवक पथकाची स्थापना झाली, आणि स्वयंसेवकांची भरती व्हावयास प्रारंभ झाला. 'गेलिक लीग' संस्थेचे बहुतेक सभासद पथकांत दाखल झाले, तसाच डी व्हॅलेराही स्वयंसेवक बनला. साऱ्या आयर्लंडभर स्वयंसेवकांचीं पथकें उभारण्यांत येऊं लागलीं. स्वयंसेवकांच्या कवाइतीही नियमानें व्हावयास लागल्या. सरकारनें या चळवळीकडे दुर्लक्ष करण्याचें सोंग आणलें होतें तरी मनांतून सरकार त्या चळवळीवर बोटें मोडीत होतें हें सर्वांनीं ओळखलें होतें. रेडमंडच्या पक्षालाही ही चळवळ नको होती. पण ती कशी मारावी हें त्यांना समजेना. शेवटीं स्वयंसेवकांचीं पथकें चिरडून टाकणें शक्य नाहीं तेव्हां त्या पथकांच्या कार्यकारी मंडळांत आपले लोक घुसडून तीं निःसत्त्व करून टाकण्याचा रेडमंड यांनीं बेत केला. मीं निवडलेले पंचवीस सभासद तुम्हीं आपल्या मंडळांत घेतले पाहिजेत असें रेडमंड यांनीं कार्यकारी मंडळाला पत्र लिहिलें. रेडमंडशीं या वेळींच भांडण केलें तर पथकांची चळवळच एकदम नामशेष होईल असा विचार करून कार्यकारी मंडळानें रेडमंडचें म्हणणें कबूल केलें. मूळ कार्यकारी मंडळ व रेडमंडचे नवे पंचवीस सभासद यांचा झगडा तेव्हांपासून सुरू झाला. प्रथम फारसा मतभेद झाला नाहीं, परंतु ज्यायोगें पथकांची चळवळच निष्प्राण होऊन जाईल असल्या नव्या धोरणाचा मंडळानें स्वीकार करावा अशाविषयीं जेव्हां रेडमंडच्या सभासदांनीं खटपट सुरू केली तेव्हां मात्र त्यांची व जुन्या सभासदांची

चांगलीच झटापट झाली, व शेवटीं उघड उघड फाटाफूट होऊन पथकांची चळवळ पूर्वीच्या धोरणानें चालू झाली. ही फाटाफूट झाल्यावर 'आयरिश लोकांचे जे जन्मसिद्ध हक्क आहेत त्यांचें रक्षण करण्यासाठीं ही स्वयंसेवकांची चळवळ आहे' असा जाहिरनामा १९१४ मध्यें सप्टेंबरच्या २४ तारखेस निघाला. त्या वेळीं डी व्हॅलेरा डब्लिनच्या पथकांतील एका तुकडीचा अधिकारी होता. १९१४ च्या जुलई महिन्यांत हौथ येथें शस्त्रसामुग्री आणून सांठविण्याचा जो धाडसाचा उपक्रम स्वयंसेवकांनीं केला त्यांत डी व्हॅलेरानें अधिकारी या नात्यानें प्रमुखपणें भाग घेतला; आणि डब्लिनला जात असतां वाटेंत स्वयंसेवकांची व सरकारी शिपायांची गांठ पडून जी चकमक उडाली त्यांत डी व्हॅलेरा जखमीच व्हावयाचा पण थोडक्यांत निभावलें!

या प्रसंगापासून पुढें डी व्हॅलेरानें स्वयंसेवकांच्या कार्यांत आपलें सर्व लक्ष घातलें. शस्त्रास्त्रांबद्दल त्याला कसें प्रेम वाटत असे हें मागें एके ठिकाणीं आम्ही सांगितलेंच आहे. लष्करी पेशाच्या त्याच्या स्वाभाविक आवडीमुळें या स्वयंसेवकांच्या चळवळींत तो मनापासून पडला. त्याची बुद्धिमत्ता व कार्यदक्षता अल्प काळांतच लोकांच्या प्रत्ययास आली, व १९१५ मध्यें लिमेरिक येथें सर्व स्वयंसेवकांचें संमेलन होऊन पाहणी झाली त्या वेळीं पी. एच. पिअर्स यांच्या खालोखालच्या अधिकारावर डी व्हॅलेरा होता. तथापि अजूनही तो विशेष प्रसिद्ध नव्हता व वर्तमानपत्रांतून त्याचें नांव झळकूं लागलें नव्हतें. कारण प्रसिद्धीची त्याला हौस नव्हती; इतकेंच नव्हे, तर प्रसिद्धीची त्याला लाजच वाटत असे. या सुमारास एक गंमतीदार प्रसंग घडला त्यावरून डी व्हॅलेराच्या अंगांत कोणतें पाणी खेळत होतें याची मात्र पूर्ण कल्पना येण्यासारखी आहे. तो प्रसंग असा. सेंट पॅट्रिकच्या सणानिमित्त स्वयंसेवकांची परेड व्हावयाचें ठरलें होतें. ती परेड कशी काय होते तें गुप्तपणें पाहून रिपोर्ट करण्यासाठीं

लॉर्ड पॉवर्सकोर्ट यांस सरकारनें पाठविलें. ठरल्याप्रमाणें परेड सुरू झाल्यावर हे लॉर्ड त्या ठिकाणीं आले, व ज्या जागीं डी व्हॅलेरा आपल्या तुकडीची कवाईत घेत होता त्या जागेवर जाऊन कवाईत करणाऱ्या स्वयंसेवकांची रांग ओलांडून पुढें होऊं लागले. हें पाहतांच डी व्हॅलेरानें लॉर्डसाहेबांस तावडतोब हटकलें व पुढें पाऊल टाकण्याची मनाई केली. ती मनाई पाहून लॉर्डसाहेब गरम झाले व त्यांनीं रागारागानें मनाईचें कारण विचारलें. डी व्हॅलेरानें त्यांच्या रागाला न जुमानतां स्पष्ट सांगितलें, कीं सरकारचें सैन्य रस्त्यानें जात असतां जशी रस्ता ओलांडण्याची साऱ्या लोकांना मनाई असते तशीच ही मनाई आहे, सैन्याच्या शिस्तीपुढें लॉर्ड व भिकारी सारे सारखेच!

स्वयंसेवकांवरील अधिकारी होण्यास डी व्हॅलेरा सर्वस्वी लायक होता. त्या कार्याला लागणारे गुण त्याच्या अंगीं प्रामुख्यानें होते. आयरिश भाषेंत अस्खलित बोलणारा वक्ता म्हणून त्याची प्रसिद्धि होती, तो शूर व धाडसी होता, आणि नेकी आणि शिस्त त्याच्या बोलण्याचालण्यांत हरघडी दिसत असे. दिसावयास तो भव्य दिसत असे. शरीराच्या बांध्याच्या बाबतींत त्यानें आपल्या आईच्या घराकडील वळण घेतलें आहे. सहा फुटांपेक्षांही त्याची उंची अधिक आहे. अंगानें तो लठ्ठ नसला तरी भरभक्कम दिसतो. त्याचा भालप्रदेश विशाल आहे, आणि त्याच्या पाणीदार, पिंगट डोळ्यांतील चमक पाहिली, कीं त्याच्या कराराची व सामर्थ्याची तावडतोब ओळख पटते.

स्वयंसेवकांचा अधिकारी या नात्यानें डी व्हॅलेराचा मॅक्नील, पिअर्स वगैरे पुढाऱ्यांशीं पुष्कळच निकट संबंध आला, व गुप्तपणें होणाऱ्या खास खलबतांतही ते पुढारी त्याला घेऊं लागले. ईस्टरच्या बंडाची तयारी करण्यासाठीं रॉजर केसमेंट हा आयरिश देशभक्त जर्मनींत गेला होता व त्या देशाची सहानुभूति संपादन करून व दारूगोळा, शस्त्रसामुग्री व लढाऊ शिपाई यांनीं भरलेलें एक जहाज

घेऊन तो आयर्लंडच्या किनाऱ्याकडे येत होता. परंतु दुर्दैवानें एका इंग्रजी आरमारी जहाजानें या जहाजाला पकडलें. त्याबरोबर पूर्वी ठरल्याप्रमाणें जहाजाच्या कप्तानानें जहाजाला सुरुंग लावला. दारूगोळा इंग्रजांच्या हातीं पडला नाहीं, पण रॉजर केसमेंट सांपडला. पुढें त्याला फांशीं देण्यांत आलें, व ईस्टरच्या सणांत रविवारच्या दिवशीं डब्लिन, कॉर्क वगैरे कित्येक शहरांत एकदम बंड व्हावयाचें होतें तें झालें नाहीं. इतर शहरांतील बंड तसेंच जिरलें तरी डब्लिन शहरांत सोमवारीं बंडाचें निशाण फडकलें. बंड पुकारण्याचा हुकूम आला तेव्हां पूर्वी ठरल्याप्रमाणें डी व्हॅलेरा आपल्या जागीं बरोबर हजर होता. रिंगसेंड-पासून माउंट स्ट्रीटपर्यंतच्या भागावर हल्ला चढविण्याचें काम डी व्हॅलेराकडे होतें. त्या दिवशीं या भागांत विशेष निकाराची लढाई झाली, कित्येक लोक कामीं आले, व जखमी लोकांची संख्या तर फारच मोठी होती. या निकराच्या चकमकींतच एखाद्या मुरलेल्या सेनापतीला शोभेल असें एक काम डी व्हॅलेरानें केलें. चकमक चालू होती तेथून थोड्याच अंतरावर दारू गाळण्याची एक भट्टी होती. ती भट्टीची इमारत शत्रूच्या लोकांनीं अडविली तर त्यांना तो एक मोठा फायदा होईल हें डी व्हॅलेराला स्पष्ट दिसत होतें. पण नुसती हल्ल्याची सरळ मुसंडी मारून शत्रूला तेथून हुसकावून लावणें आपल्याला अशक्य आहे हेंही त्याला उघड दिसत होतें. शेवटीं ती इमारत वापरण्याचें आपणच सोंग करावयाचें त्यानें ठरविलें. तसें केलें म्हणजे शत्रू कदाचित् तोफांचा भडिमार त्या इमारतीवर करील व पुढें त्यांनाच आश्रयार्थ उपयोगीं पडणारी इमारत त्यांच्याच भडिमारानें जमीन-दोस्त होईल, असा त्यानें अदमास बांधला. आणि तोच शेवटीं खरा ठरला. आपल्या योजनेप्रमाणें त्यानें दिवसा आपलें निशाण त्या इमारतीवर फडकाविलें, आणि रात्रीं त्या इमारतींत दिवे वगैरे लागलेले शत्रूला दिसतील, व आपण त्या इमारतींत वावरत आहोंत असा

शत्रूचा गैरसमज होईल अशी त्यानें व्यवस्था केली. लवकरच शत्रूच्या तोफा गर्जूं लागल्या व त्या इमारतीवर गोळे पडूं लागले. अल्पावकाशांत इमारत उध्वस्त झाली, व अशा प्रकारें स्वतः ज्या इमारतीचा नाश करणें शक्य नव्हतें तिचा शत्रूकडूनच डी व्हॅलेरानें युक्तीनें उच्छेद करविला.

पण दुर्दैवानें डी व्हॅलेराच्या युक्तीचा व शौर्याचा उपयोग झाला नाहीं. बंड अयशस्वी ठरलें आणि शस्त्रें खालीं ठेवून शरण जाण्याबद्दल बंडाचे पुढारी पिअर्स यांनीं बंडवाल्यांना हुकूम सोडले. सगळ्या अधिकाऱ्यांच्या मागून डी व्हॅलेरानें एप्रिलच्या ३० तारखेला शस्त्र खालीं ठेवलें. त्या वेळीं देखील त्याच्या हाताखालचे लोक ताजेतवाने व लढण्यास उत्सुक होते, ज्या जागीं तो होता ती जागा त्यानें पूर्णपणें आपल्या हातीं टेविलेली होती, आणि लढाई पुढें चालू ठेवण्याची त्याची फार इच्छा होती. रविवार ता. ३० रोजीं सकाळीं शस्त्रें खालीं ठेवण्याबद्दल पिअर्सकडून जेव्हां निरोप आला तेव्हां त्याला प्रथम तो खराच वाटेना. कोणी तरी आपल्याला फसविण्यासाटीं ही युक्ति योजिली आहे अशी त्याला शंका आली. पण शोधाअंतीं तो निरोप पिअर्सकडूनच आला होता अशी त्याची खात्री पटली. मग तो हुकूम मान्य करणें त्याला भाग होतें. मात्र शस्त्रें खालीं ठेविल्यानंतर आपल्या सैनिकांना योग्य तऱ्हेनें वागविण्यांत आलें पाहिजे अशी त्यानें जोराची मागणी केली. शस्त्रें ताब्यांत घेणाऱ्या अधिकाऱ्याला तो म्हणाला, "माझें तुम्हीं काय वाटेल तें करा. पण माझ्या शिपायांच्या केंसाला धक्का लागतां कामा नये!" तें वाक्य उच्चारतांना डी व्हॅलेरानें इतक्या ऐटीनें त्या अधिकाऱ्याकडे पाहिलें, कीं तिऱ्हाइताला वाटलें असतें डी व्हॅलेराचाच जय झालेला आहे, व पराजित शत्रूकडील माणसाशींच तो बोलत आहे!

बंडांत सामील झाल्याबद्दल डी व्हॅलेराची चवकशी झाली व त्याला

देहांत शिक्षा ठोठावण्यांत आली. पण पुढें ही देहांत शिक्षा कमी करून जन्मठेपेची शिक्षा त्याला सांगण्यांत आली. असें कां झालें तें नक्की सांगवत नाहीं. कदाचित् जन्मानें तो अमेरिकेचा नागरिक होता म्हणून तसें झालें असेल, किंवा त्याच्या अगोदर कित्येक लोकांना भराभर देहांतशिक्षा ठोठावल्याबद्दल साऱ्या आयर्लंडभर सरकारविरुद्ध एकच हाकाटी झाली असल्यामुळें ती शिक्षा देण्याचें सरकारनें बंद केलें असेंही असेल. शिक्षा झाल्यानंतर ताबडतोब इतर शेंकडों कैद्यांच्या बरोबर डी व्हॅलेराची इंग्लंडला रवानगी झाली, व त्याला लुई येथील तुरुंगांत टाकण्यांत आलें.

आयर्लंडच्या स्वातंत्र्यासाठीं डी व्हॅलेरानें केलेल्या पहिल्या झटापटीचा शेवट असा झाला. डी व्हॅलेरा पराभूत होऊन बंदिखान्यांत पडला! पण दैवाच्या चक्राला लवकरच उलटी गति मिळावयाची होती, आणि डी व्हॅलेरा स्वतंत्र होऊन त्याच्या हातून आयरिश स्वातंत्र्याचा झेंडा आणखी उंच फडकविला जावयाचा होता!

प्रकरण तिसरें

# १९१८ सालची झटापट

सन १९१६ च्या आक्टोबर महिन्यांत इंग्लंडच्या मंत्रिमंडळांत फार महत्त्वाची क्रांति झाली. प्रथम लॉइड जॉर्ज यांनीं राजीनामा दिला, नंतर ॲस्क्विथ पदभ्रष्ट झाले, व लॉइड जॉर्ज यांनीं मुख्य मंत्र्याची जागा पटकावली. लॉइड जॉर्ज मुख्य प्रधान झाल्यापासून इंग्लंडचें आयर्लंडविषयक धोरण धड असेंही नाहीं आणि तसेंही नाहीं अशा तऱ्हेचें झालें. न्याय, अन्याय, लहर, आणि दंडुकेशाही यांचें विचित्र मिश्रण त्या धोरणांत दिसावयास लागलें. ज्या सिन फेन लोकांना चवकशी न करतां तुरुंगांत टाकलें होतें त्या सर्वांना १९१६ च्या डिसेंबर महिन्यांत मुक्त करण्यांत आलें. पण लगेच सन १९१७ च्या फेब्रुवारी महिन्यांत धोरण दुसऱ्या दिशेला झुकलें आणि टेरेन्स मॅक्स्विनी, टॉमस मॅक्कर्टिन वगैरे कित्येक सिन फेन पुढाऱ्यांना एकदम पकडण्यांत आलें. इतक्यांत एक आयरिश कन्व्हेन्शन भरविण्याची कल्पना लॉइड जॉर्ज यांच्या डोक्यांत आली. ही कल्पना जाहीर करतांना त्यांनीं असें स्पष्ट बोलून दाखविलें, कीं आयर्लंडमध्यें कोणत्या प्रकारची राज्यपद्धति असावी याविषयींचा मसुदा तयार करावयास आयरिश लोकांना सांगण्याचें इंग्रज सरकारनें ठरविलें आहे, व त्यासाठींच ही कन्व्हेन्शन भरविण्यांत येत आहे. या सभेंत आयर्लंडांतील सर्व पक्षांच्या व मतांच्या लोकांनीं, रेडमंडच्या अनुयायांनीं, ओब्रायनच्या पक्षाच्या पुरस्कर्त्यांनीं, आणि सिन फेन पक्षाच्या मंडळींनींही भाग घ्यावा, आणि आयर्लंडमध्यें साम्राज्यांतर्गत स्वराज्य कोणत्या स्वरूपाचें असावें याविषयीं या सर्व मंडळींनीं एकमतानें एखादी योजना तयार केली तर ती ब्रिटिश पार्लमेंट पुढें आपण सादर करूं असें लॉइड जॉर्ज यांनीं जाहीर केलें.

जॉन रेडमंड यांना या कन्व्हेन्शनपासून फार फायदा होईल असें वाटलें व देशांतील सर्व पक्षांतील लोक या सभेचें स्वागतच करतील असा आपला विश्वास असल्याचें त्यांनीं बोलून दाखविलें. अल्स्टर येथील युनिअनिस्ट पक्षाच्या मंडळाची सभा भरली तिच्यामध्येंहीं ३५० सभासदांपैकीं अवघ्या चारच सभासदांचें मत विरुद्ध पडून या सभेस प्रतिनिधि पाठविण्याचा ठराव पास झाला. सिन फेन पक्षाच्या लोकांनीं मात्र ही कन्व्हेन्शन म्हणजे बेसावध पुढाऱ्यांना पकडण्यासाठीं सरकारनें मांडलेला सापळा आहे असें लोकांना बजावून सांगितलें, व तिच्याशीं कोणत्याही प्रकारचा संबंध न ठेवण्याचा निश्चय केला. कन्व्हेन्शनमध्यें युनिअनिस्ट पक्षाचे मवाळाग्रणी हजर असल्यावर एकमतानें कांहींही ठरणें शक्य नाहीं असें सिन फेन पक्षाला वाटत होतें. खेरीज असें, कीं सभेंत एकमत झालें किंवा नाहीं तें ठरविणार कोण? तर लॉइड जॉर्ज! अशा परिस्थितींत ही सभा म्हणजे केवळ फार्स होता. " आयर्लंडच्या लोकांना बोलत ठेवण्याची ही एक युक्ति आहे. आणि आयर्लंडचे लोक बोलण्यांत गुंतून दंगा करीनातसे झाले, कीं आम्हीं आयर्लंडच्या मागण्या पुऱ्या केल्या आहेत, आतां तुम्ही महायुद्धांत आमची बाजू उचला असें अमेरिकेस सांगण्याचा ब्रिटिश मुत्सद्यांचा हा डाव आहे " असें सर एफ. ई. स्मिथ यांनीं जें एका प्रसंगीं बोलून दाखविलें तें यथार्थ होतें. अशा प्रकारें सिन फेन पक्ष कन्व्हेन्शनमध्यें बिलकुल सामील न झाल्यामुळें त्या कन्व्हेन्शनला कांहींच महत्त्व उरलें नाहीं, व लॉइड जॉर्ज यांच्या सर्व आशा मावळून त्यांनीं रचलेला व्यूह फसला.

राजकीय वातावरण अशा स्वरूपाचें असतांना वुइल्यम रेडमंड नांवाचे पार्लमेंटचे एक सभासद फ्रान्समध्यें गेले होते ते तेथेंच मरण पावले. ते ईस्ट क्लेअर परगण्यातर्फे निवडलेले होते. त्यांची रिकामी जागा भरून काढण्यासाठीं निवडणूक व्हावयाची ठरली, व प्रत्येक पक्षानें

आपापला उमेदवार उभा केला. डी व्हॅलेरा या वेळीं लुई येथील तुरुंगांत होता. प्रजासत्ताक पक्षानें मुद्दाम डी व्हॅलेरा याचें नांव पुढें केलें. उमेदवार म्हणून त्याला उभें केल्यावर त्याला बंधमुक्त करण्याखेरीज सरकारला गत्यंतर उरलें नाहीं. पण ही प्राप्त गोष्ट करतांना साधल्यास औदार्याचें नाटक करावें व लोकांना चकवावें या हेतूनें सरकारनें डी व्हॅलेराबरोबरच बाकीच्याही सर्व कैद्यांना सोडून दिलें, व कन्व्हेन्शन यशस्वी रीतीनें पार पाडण्यासाठीं सरकार व प्रजाजन यांमध्यें स्नेहभाव उत्पन्न व्हावा व कन्व्हेन्शन फलदायी व्हावी म्हणून ही उदारपणाची कृति आम्ही करीत आहोंत असें सरकारकडून सांगण्यांत आलें.

१८ जून रोजीं तुरुंगांतून सुटून डी व्हॅलेरा डब्लिन शहरीं आला तेव्हां लोकांनीं त्याचें जंगी स्वागत केलें. ईस्ट क्लेअरचे लोक त्याला भेटण्यासाठीं मुद्दाम आले होते; व त्यांनीं त्याला डब्लिनमध्यें थोडाच वेळ थांबूं देऊन लगेच क्लेअरकडे नेलें. तेथें निवडणुकीची तयारी जोरानें चालली होती, व प्रत्येक पक्ष विजयसंपादनासाठीं शिकस्तीचे प्रयत्न करणार हें उघड दिसत होतें. डी व्हॅलेराच्या प्रतिस्पर्ध्याला जॉन रेडमंड सारख्या बडया धेंडाचा पाठिंबा असल्याकारणानें त्याच्याशीं झगडून निवडून येणें सोपी गोष्ट नव्हती. पण डी व्हॅलेराच्या पुरस्कर्त्यांनीं अटोकाट प्रयत्न करण्यासाठीं कंबरा बांधल्या होत्या. त्या वेळीं साऱ्या क्लेअर परगण्यांतील लोकांच्या तोंडीं डी व्हॅलेराच्या यशापशयाचा विषय अहोरात्र भिजत होता. कांहीं झालें तरी आपण डी व्हॅलेरास थोडें तरी मताधिक्य मिळवून देऊं अशी सिन फेन पक्षाच्या लोकांना आशा वाटत होती, व प्रत्यक्ष निवडणुकीचा दिवस जसजसा जवळ आला तसतशी त्यांची ही आशा वाढतच गेली. आणि शेवटीं निवडणूक होऊन मतें मोजण्यांत आलीं, व २९७५ मतें अधिक मिळून डी व्हॅलेरा निवडून आल्याचें जाहीर करण्यांत आलें, त्या वेळीं त्याच्या पक्षाच्या लोकांना

जो आनंद झाला त्याला तर सीमाच नव्हती. एवढें यश मिळेल, व प्रतिपक्ष्याला आपण इतका चीत करूं अशी त्यांना कल्पनाही नव्हती. या निवडणुकीच्या प्रसंगानें क्लेअर परगण्यांत सिन फेन पक्ष कल्पनातीत प्रबळ झाला.

डी व्हॅलेरा निवडणुकींत यशस्वी झाला हें पाहून सरकार मनांतल्या मनांत फारच जळफळूं लागलें. डी व्हॅलेराच्या पक्षाचा नायनाट करावासें सरकारला वाटूं लागलें, व या इच्छेला अनुसरून निवडणुकीच्या वेळीं डी व्हॅलेरास ज्यांनीं ज्यांनीं मदत केली होती त्यांची कांहीं तरी क्षुल्लक सबबीवर धरपकड करण्याचा सपाटा सरकारनें सुरू केला. या लोकांना शिक्षा ठोठावण्यांत आल्या व नीच प्रतीच्या बेरड गुन्हेगारांप्रमाणेंच त्यांना वागविण्यांत येऊं लागलें. या प्रकाराचा निषेध करण्याकरितां या सर्व लोकांनीं तुरुंगांत प्रायोपवेशन केलें. या प्रायोपवेशनांतच शेवटीं टॉमस ॲश हा प्रसिद्ध पुढारी मरण पावला व त्यामुळें जिकडे तिकडे मोठी खळबळ उडाली. यासंबंधीं स्मिथफील्ड येथें प्रचंड जाहीर सभा होऊन तींत डी व्हॅलेरानें भाषण केलें व असा ठराव पुढें मांडला, कीं प्रेसिडेंट वुइल्सन यांच्या चवदा तत्त्वांपैकीं 'कोणत्याही लोकांवर त्यांच्या इच्छेविरुद्ध कोणत्याही राज्यकर्त्यांची सत्ता नसावी' या तत्त्वाला अनुसरून चळवळ केल्याबद्दल इंग्रज लोक आयरिश लोकांचा अनन्वित छळ करीत आहेत इकडे दोस्त राष्ट्रांनीं व अमेरिकेनें लक्ष द्यावें.

आतां डी व्हॅलेरावर सरकारनें फारच करडी नजर ठेवण्यास प्रारंभ केला. गुप्त पोलीस त्याच्या पाठोपाठ सावलीसारखे हिंडूं लागले. तो परगांवीं निघाला, कीं ज्या गांवीं तो जावयाचा असेल तेथील पोलिसांना "आज संध्याकाळीं ४॥।च्या गाडीनें 'पार्सल' येथून निघालें आहे. सावध असा" असले सांकेतिक भाषेचे विद्युत्संदेश जाऊं लागले.

पण डी व्हॅलेरानें आपलें कार्य धिमेपणानें चालू ठेविलें होतें. लॉईड जॉर्जनें भरविलेल्या कन्व्हेन्शनचे कसे बारा वाजले त्याची हकीकत मागें दिलीच आहे. ती परिषद जनतेला नको होती व म्हणूनच ती अयशस्वी ठरली. पण आतां डी व्हॅलेरानें आपल्या पक्षाची परिषद भरविण्याचें ठरविलें, व शेवटीं आक्टोबरच्या २५तारखेस सिनफेनची जंगी परिषद भरली. आयर्लंडच्या निरनिराळ्या परगण्यांतून एकंदर १७०० प्रतिनिधि या सभेस आले होते, व सिन फेन पक्षाचा अध्यक्ष निवडण्याचें महत्त्वाचें काम सभेकडून व्हावयाचें होतें. अध्यक्षाच्या जागेसाठीं आर्थर ग्रिफिथ, काउंट प्लंकेट व इमॉन डी व्हॅलेरा हीं तीन नांवें सुचविण्यांत आलीं होतीं. सिन फेनच्या शत्रूंना वाटत होतें, कीं अध्यक्षांच्या निवडणुकीच्या प्रश्नावरच रणें माजून परिषद मोडेल, व परिषदेच्या वेळीं त्यांनीं तसल्या बातम्या पसरविण्यासही कमी केलें नाहीं. पण त्याचे हे सर्व प्रयत्न विफल ठरले. कारण अध्यक्षाच्या निवडणुकीचा प्रश्न परिषदेपुढें आल्याबरोबर ग्रिफिथ आणि प्लंकेट यांनीं आपलीं नांवें परत घेतलीं व डी व्हॅलेरासारख्या मुत्सद्यास व शूर शिपायास निवडून देण्याविषयीं त्यांनीं परिषदेंतील सर्व सभासदांस विनंति केली. असें झाल्यामुळें डी व्हॅलेरा अध्यक्ष म्हणून निवडून आला व त्याबद्दल सर्वांनीं जयघोषानें आपला आनंद व्यक्त केला.

डी व्हॅलेरावर आयरिश लोकांची किती निःसीम भक्ति आहे हें आतां साऱ्या जगाच्या पुरतें निदर्शनास आलें. डी व्हॅलेरा ही एक बडी शक्ति आहे असें इंग्लंडच्या मुत्सद्यांना वाटूं लागलें. डी व्हॅलेराला पकडीत कां नाहीं असे प्रश्न पार्लमेंट सभेंत कांहीं सभासद विचारावयास लागले. डी व्हॅलेरानें नवें प्रजासत्ताक सैन्य उभारलें तरी सरकार स्तब्ध कसें बसलें आहे असा इंग्रज वृत्तपत्रांनीं ओरडा सुरू केला. डी व्हॅलेराला पकडण्याच्या इच्छेपुरतेंच बोलावयाचें झालें तर ती इच्छा सर-

कारच्या मनांत दुसऱ्या कोणी भरून द्यावयास पाहिजे होती असें नव्हे. सरकार त्याला पकडावयासाठीं इतकें टपलेलें होतें, कीं त्याच्यासाठीं एक अंधार कोठडी सुद्धां जय्यत तयार होती. पण डी व्हॅलेराच्या भाषणांत त्याला पकडण्यासारखा एकही शब्द सरकारला कांहीं केल्या सांपडेना. आयर्लंडला संपूर्ण स्वातंत्र्यासाठींच झगडावयाचें आहे असें तो आपल्या प्रत्येक भाषणांत निर्भीडपणें प्रतिपादन करीत असे हें खरें. पण अमेरिकेचे प्रेसिडेंट वुइल्सन यांनीं स्वायतत्तेसंबंधीं काढलेल्या चवदा तत्त्वांच्या जाहिरनाम्याशीं, व लहान राष्ट्रांबद्दल सहानुभूति दर्शविण्यासाठीं दोस्त राष्ट्रांनीं वेळोवेळीं काढलेल्या जाहिरनाम्यांशीं त्याचीं तीं भाषणें इतकीं तंतोतंत जुळणारीं असत, कीं त्यांवरून त्याला पकडणें सरकारला अशक्य होतें. सरकार आपल्याला केव्हां तरी व कांहीं तरी खुसपट काढून पकडणार हें डी व्हॅलेरा पक्कें समजून होता. त्याविषयीं बोलतांना एका जाहीर भाषणांत तो म्हणाला, " सरकारनें मला पकडावें म्हणून पुष्कळ लोक हाकाटी करीत आहेत. पण मला तुरुंगांत घातलें म्हणून काय होणार ? मी गेलों तर माझ्या मागें माझें काम करावयास दहा मंडळी पुढें येतील, व त्यांचीही जागा भरून काढावयास आणखी दहा लोक तयार होतील ! "

इंग्लंडचे मुत्सद्दी या वेळीं दुहेरी डाव खेळण्याचा प्रयत्न करीत होते. एकीकडे त्यांना जगाला असें भासवावयाचें होतें, कीं केवळ इंग्रजी साम्राज्याविरुद्धच नव्हे, तर साऱ्या दोस्त राष्ट्रांच्या व अमेरिकेच्याही विरुद्ध आयरिश लोक उठले आहेत; व दुसरीकडे आयर्लंडमध्यें विशेष गडबड नाहीं, आम्ही लोकांच्या मागण्या पुऱ्या केल्या असल्यामुळें ते आतां संतुष्ट व शांत झाले आहेत तेव्हां आतां तुम्ही महायुद्धांत पडा असा त्यांना अमेरिकेला आग्रह करावयाचा होता. हा डाव साधण्यासाठीं सरकार नाना प्रकारच्या युक्त्या योजीत होतें. जॉन डिलनसारखे लोक मायदेशाच्या कल्याणाकडे लक्ष द्यावयाचें सोडून

सरकारला मदत करीत होते. डी व्हॅलेरावर अनेक प्रकारच्या आरोपांचा आणि शिव्याशापांचा वर्षाव होत होता. पण त्यामुळें डी व्हॅलेराच्या शांततेचा भंग झाला नाहीं, किंवा त्याचें चित्तही लवमात्रदेखील चळलें नाहीं. २४ नोव्हेंबर रोजीं मॅन्शन हाउस येथें भरलेल्या सभेंत आपल्या टीकाकारांना उत्तर देण्याच्या उद्देशानें तो म्हणाला, "पूर्वीं अनेक वेळां मीं जें बोलून दाखविलें तेंच आजही पुन्हां सांगतों, कीं लहान राष्ट्रांच्या स्वातंत्र्याचें रक्षण करण्याकरितां इंग्लंड खरोखरच या महायुद्धांत पडलें असेल तर आयर्लंडला संपूर्ण स्वराज्य देऊन टाकून तें त्यांनीं खरें करून दाखवावें. आयर्लंड म्हणजे एक डांबिस लोकांचा देश आहे असें फ्रान्सला दाखविण्याचा सरकार-चा प्रयत्न आहे. पण फ्रान्सला आयरिश लोक कसे आहेत तें माहीत आहे. आमचें आणि फ्रान्सचें मुळींच भांडण नाहीं. शस्त्रास्त्रांच्या खणखणाटानें आणि दडपशाहीच्या दर्पोक्तीनें आम्ही दबकूं असें सर-कारला वाटतें कीं काय? आम्ही कशालाच भिणार नाहीं. आमच्या प्रयत्नांना कोणतीच मर्यादा माहीत नाहीं. फक्त नैतिक तत्त्वांचें बंधन आम्ही जाणतों व त्यांचें उल्लंघन मात्र आम्ही कधीं करणार नाहीं. नैतिक व धार्मिक तत्त्वें पायाखालीं तुडवून मारण्यापेक्षां मरणच आम्ही आनंदानें पतकरूं. लॉइड जॉर्जनें ज्या कन्व्हेन्शनचा उपक्रम केला ती मोडून टाकण्यासाठीं आम्ही पुढें सरसावलों आहोंत, असें आमचे टीकाकार म्हणतात. पण आमचें उत्तर असें आहे, कीं आम्हांला मोडून टाकावयाची अशी एकच गोष्ट आहे, आणि ती म्हणजे इंग्लंडशीं असलेला आमचा संबंध. कन्व्हेन्शन भरविण्याची वाटाघाट सुरू झाली तेव्हांच आम्ही साऱ्या लोकांना बजावून सांगितलें, कीं बाबांनों, हा 'घुशीचा सांपळा' आहे, कोळ्यानें पसरलेलें हें जाळें आहे, यांत तुम्ही सांपडूं नका. इंग्लंडच्या मनांत आम्हांला होमरूल द्यावयाचेंच असेल तर त्याला कन्व्हेन्शनसारखे सोहाळे काय करावयाचे आहेत?

होमरूल देण्याचा मन:पूर्वक संकल्प असेल तर असलीं नाटकें न करतां तें देतां येईल. कन्व्हेन्शन मोडण्याची आमची इच्छा नाहीं. इंग्लंडच्याच मनांतून ती उधळून लावून उलट बोंब मारावयाची आहे. कन्व्हेन्शनमुळें राष्ट्राचा कांहीं फायदा झाला तर तो आम्ही पदरांत पाडून घेऊं, तो आम्ही रस्त्यावर फेंकणार नाहीं; पण इतकें मात्र सांगून ठेवतों, कीं तेवढ्यानें संतुष्ट होऊन आम्ही आपली चळवळ थांबवूं अशी कोणाची कल्पना असेल तर ती सपशेल चुकीची ठरेल. आमचें देणें इंग्लंडनें पुरतें चुकतें केलें पाहिजे. त्यांतील बारकासा हप्ता आज आम्हांला दिला तरी तें पैन् पै फिटेपर्यंत आमचा तगादा कायम राहणार. आमच्या जिवांत जीव आहे तोंपर्यंत शिकस्त करून आम्ही झगडा चालविणार. चतकोर भाकरीचा तुकडा पदरांत पडावा म्हणून आमच्या जन्मसिद्ध हक्कांचा आम्ही कधींही विक्रय करणार नाहीं. आमच्या आयुष्यांत आम्हांला कार्यसिद्धि करतां आली नाहीं तर आमच्या मागून येणारी पिढी आमचें निशाण हातांत घेऊन लढत राहील!"

डी व्हॅलेराची व इंग्रज सरकारची अशा प्रकारें झटापट चालू असतांनाच १९१८ साल उजाडलें, व त्या वर्षाला प्रारंभ झाल्यानंतर अल्पावधींतच एक महत्त्वाचा प्रश्न उद्भवून इंग्लंडचें व आयर्लंडचें भांडण विकोपाला जाण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. तो प्रश्न म्हणजे सक्तीच्या लष्करभरतीचा कायदा इंग्लंडप्रमाणेंच आयर्लंडलाही लागूं करण्यासंबंधींचा होय. कॉमन्सच्या सभेंत 'टोरी' पक्षाची जी मंडळी होती त्यांनीं तो कायदा आयर्लंडला लागूं करण्याबद्दल सरकारच्या पाठीमागें सारखें टुमणें लावलें होतें. पण तो कायदा लागूं केल्यास आयरिश लोक खवळून जातील व मग त्यांच्याशीं विलक्षण जोराची झटापट करावी लागेल, या भीतीनें सरकार कचरत होतें, व म्हणून त्या प्रश्नाचा विचार दिवसानुदिवस लांबणीवर टाकण्याचें धोरण त्यांनीं स्वीकारलें होतें. आणि सरकार कचरत होतें तें सकारणच होतें.

कारण त्या कायद्याविरुद्ध आयरिश लोकमत इतकें तीव्र होतें, कीं तो कायदा म्हणजे आपल्या प्रत्यक्ष जीवितावर घाला आहे असें लोकांना वाटत होतें, व वेळच आली तर सरकारशीं उघड उघड लढाई करावयास देखील ते एका पायावर तयार होते. या कायद्याबद्दल डी व्हॅलेरानें एका जाहीर भाषणांत असें बोलून दाखविलें, कीं "या कायद्याबद्दल आमचें काय म्हणणें आहे तें स्पष्ट आहे. तें म्हणणें आम्ही एका शब्दानेंही मागें घेणार नाहीं. मागें घेण्यासारखें तें नाहींच. सक्तीची लष्करभरती करण्याचा इंग्लंडला काडीचाही अधिकार नाहीं. इतकेंच काय, आयर्लंडसाठीं कायदे करण्याचा इंग्लंडला कोणी अधिकार दिला असाच मुळीं आमचा सवाल आहे. इंग्लंडनें केलेले कायदे अगदीं परम कल्याणाचे असले तरी ते आम्हांला नको आहेत."

पण अशा प्रकारें डी व्हॅलेरानें आयरिश जनतेंत तीव्र जागृति केलेली दिसत असून, आणि शहाण्या दूरदर्शी मुत्सद्यांनीं तसें न करण्याबद्दल आग्रहाची सूचना दिली असूनही, शेवटीं सक्तीच्या भरतीचा कायदा आयर्लंडला लागू करण्याचें सरकारनें ठरविलें, व १९१८ मध्यें एप्रिलच्या ९ तारखेस त्याबद्दलचा ठराव लॉइड जॉर्जकडून कॉमन्सच्या सभेंत मांडण्यांत आला. त्या वेळीं भाषण करतांना लॉइड जॉर्ज म्हणाले, "आपण आज ज्या युद्धांत पडलों आहोंत त्यांत इंग्लंडचा जितका संबंध आहे तितकाच आयर्लंडचाही आहे. ज्या वेळीं महायुद्धांत सामील होण्याचा ठराव पास झाला त्या वेळीं आयरिश सभासदांनींही अनुकूल मतें दिलीं होतीं. त्यांनीं तेव्हां तसें मत दिलें याचा अर्थ उघड उघड असाच होतो कीं, आयर्लंड देश या युद्धांत स्वखुषीनें व एकमतानें पडला आहे."

लॉइड जॉर्ज यांच्या भाषणाचा असा परिणाम झाला, कीं पार्लमेंटमधील आयरिश सभासदांना प्रसंग पडेल त्याप्रमाणें कुरवाळण्यास किंवा लाथाडण्यास इंग्रज मुत्सद्दी कसे तयार असतात तें, केवळ

लोकांनाच नव्हे तर, त्या सभासदांना देखील पुरतें उमजलें. वास्तविक महायुद्धाच्या वेळीं सरकारच्या मार्गांत कोणतीही अडचण नसावी म्हणून पूर्वी आयरिश सभासदांनीं अनुकूल मतें दिलीं होतीं. पण आज त्या अनुकूल मतांचा अशा रीतीनें फायदा घेऊन आयर्लंडवर कुरघोडी करण्यास लॉइड जॉर्ज तयार झालेले पाहून त्यांना विस्मय वाटला व संतापही आला. सिन फेन पक्षाचा शहाणपणा आतां सर्व लोकांना पूर्णपणें पटला. पार्लमेंटमध्यें सभासद पाठविणें हें केवळ निष्फळच नव्हे तर धोक्याचें आहे असें कट्टे पार्लमेंटवादी लोकसुद्धां आतां म्हणूं लागले. अशा प्रकारची जागृति जिकडे तिकडे झाल्यामुळें लॉइड जॉर्जचा सक्तीच्या भरतीचा जाहिरनामा बाहेर पडल्यापासून सारे लोक सिन फेन पक्षाला येऊन मिळूं लागले. इंग्लंडनें सक्तीची लष्कर भरती सुरू केली तर आपण काय करावयाचें तें डी व्हॅलेरानें आपल्या मनाशीं कायम ठरवून ठेवलें होतें, व न डगमगतां त्याप्रमाणें वागण्याचा त्याचा निश्चय होता. एका जाहीर भाषणांत तो म्हणाला, कीं "आयर्लंडच्या जन्मसिद्ध हक्कांची इंग्लंडनें कशी पायमल्ली चालविली आहे त्याचें सक्तीची लष्करभरती हें एक नवें उदाहरण आहे. या पायमल्लीविरुद्धच आम्ही आजपर्यंत झगडत आलों. आमचें कार्य न्यायाचें आणि धर्माचें आहे असा आम्हांस दृढ विश्वास असल्यामुळें अगदीं शांत चित्तानें आम्ही या भरतीच्या कायद्याविरुद्ध झगडूं."

डी व्हॅलेराच्या या उद्गारांत व्यर्थ धमकी देण्याची छटा नव्हती, किंवा आपला दिमाख दाखविण्याचीही लकेर नव्हती. ते उद्गार अगदीं साधेसुधे होते. पण त्या साध्या उद्गारांमागें निश्चयाचें उग्र स्वरूप स्पष्ट दिसत असल्यामुळें सहस्रावधि सैनिकांच्या हातांतील नागव्या समशेरी पाहूनही जी दहशत सरकारच्या अंतःकरणांत उत्पन्न झाली नसती ती त्या चार शब्दांनीं उत्पन्न केली.

सरकारनें आयर्लंडमध्यें सक्तीच्या भरतीला प्रारंभ केल्यास जी

प्रतिकाराची चळवळ करावयाची तिच्यामध्यें देशांतील सर्व पक्ष सामील होणें हितावह होईल हें जाणून त्या चळवळीचें धोरण ठरविण्यासाठीं निरनिराळ्या मतांच्या पुढऱ्यांची एक सभा डी व्हॅलेरानें बोलाविली. सरकारचें सर्व राजकारण ज्याप्रमाणें डब्लिन कॅसल्मध्यें शिजत असे, त्याप्रमाणें सिन फेन पक्षाचीं सारीं खलबतें मॅन्शन हाऊस येथें होत असत. या ठिकाणींच डी व्हॅलेरानें बोलावलेली सभा ८ एप्रिल रोजीं भरली. सिन फेन पक्ष, जुना आयरिश मवाळ पक्ष, स्वतंत्र मतवादी पक्ष, आणि मजूर पक्ष या सर्वांनीं आपापले प्रतिनिधि या सभेस पाठविले होते. अशा प्रकारें या सभेला प्रातिनिधिक स्वरूप प्राप्त झाल्यामुळें सक्तीच्या भरतीविरुद्ध कोणत्या प्रकारची चळवळ करावी याविषयीं या सभेंत कांहीं तरी सर्वसंमत धोरण निश्चित होईल अशी लोकांना बरीच आशा वाटूं लागली. ही आशा अधिकच बळावण्यासारखी एक गोष्ट सभेच्या बैठकीस प्रारंभ झाल्यानंतर लवकरच घडून आली, व ती ही कीं त्याच सुमारास मेनूथ येथें भरलेल्या धर्मगुरूंच्या सभेकडे जाऊन सक्तीच्या भरतीच्या बाबतींत त्यांचें काय मत आहे तें समजून घेण्यासाठीं मॅन्शन हाऊस कॉन्फरन्सतर्फे डी व्हॅलेराला पाठविण्यांत आलें. धर्मगुरूंच्या सभेंत गेल्यावर डी व्हॅलेरानें आपले विचार इतक्या उत्कृष्ट रीतीनें त्यांजपुढें मांडले, कीं त्याच्या अंगच्या चिकित्सक बुद्धीचें, देशाभिमानाचें, आणि धिटाईच्या मुत्सद्दी बाण्याचें सर्व धर्मगुरूंना अत्यंत कौतुक वाटलें. आयरिश लोक सक्तीच्या भरतीला विरोध करणार, ही अपेक्षा सरकारनें केलेलीच होती हें खरें, पण डी व्हॅलेराशीं विचारविनिमय केल्यानंतर ज्या प्रकारचा जाहिरनामा धर्मगुरूंनीं काढला, तसला जाहिरनामा ते काढतील असें सरकारच्या स्वप्नींदेखील कधीं आलें नव्हतें. त्यामुळें तो जाहिनामा पाहून सरकार चपापलें. जाहिरनाम्यांत धर्मगुरूंनीं स्पष्टपणें म्हटलें होतें, कीं, "या देशांत सक्तीची लष्कर भरती सुरूं करण्याचा इंग्रज सरकारला कोणत्याही प्रकारचा हक्क नाहीं

असें आमचें ठाम मत आहे, आणि ती भरती हरएक प्रकारच्या उपायांनीं बंद पाडण्यासाठीं एकमेकांस मनोभावानें झटून मदत करण्याची आम्हीं ईश्वराच्या पवित्र नांवानें प्रतिज्ञा करीत आहोंत.”

या जाहिरनाम्यामुळें सरकारच्या कंपूंत खूपच धांदल उडाली, व आतां काय करावें याविषयीं जोराचीं खलबतें सुरू झालीं. उलट, आयरिश लोकांचा धीर या जाहिरनाम्यामुळें शतपट वाढला, आपलें सामर्थ्य दुणावल्यासारखें त्यांना वाटूं लागलें, व आपण झटापट केली तर त्यांत ईश्वर आपली पाठ राखील अशी श्रद्धा त्यांच्या अंतःकरणांत उत्पन्न झाली. लोकांचा हा वर्धिष्णु उत्साह डी व्हॅलेरानें ओळखला. मॅन्शन हाऊस कॉन्फरन्समध्यें कांहींही ठरो, आपण आपलें काम स्वतंत्र रीतीनें केलें पाहिजे असा त्यानें विचार केला. स्वयंसेवकांच्या अधिकाऱ्यांना बोलावून, त्यांच्याशीं खलबतें करून हरएक प्रकारच्या योजना त्यानें तयार केल्या. मॅन्शन हाऊस कॉन्फरन्समध्यें एकमतानें एखादी योजना निश्चित झाली तर तिचा फार फायदा होईल हें त्याला समजत नव्हतें असें नव्हे. पण देशाचा खरा शेवटचा आधार आयरिश स्वयंसेवक व त्यांचे अधिकारी हेच होत हें विसरून चालावयाचें नाहीं असें त्याचें मत होतें, आणि वस्तुतः तेंच खरें होतें. या आपल्या मताप्रमाणें त्यानें सर्व प्रकारची तयारी सुरू केली. शेंकडों कामें उरकण्यांत तो या वेळीं इतका गुंतला होता, कीं एका सेकंदाचेंही रिकामपण त्याला नव्हतें. साऱ्या देशाचें लक्ष या वेळीं त्याच्याकडे लागून राहिलें होतें. राजकरणाचा खरा सूत्रधार आतां तोच होता, व तो काय करतो व आपला डाव कसा मांडतो हें प्रत्येकजण अतिशय उत्कंठेनें पहात होता. मॅन्शन हाऊसमध्यें डी व्हॅलेराची कचेरी असल्यामुळें तेथें लोकांचे थवेच्या थवे अहोरात्र उभे रहात असत, व डी व्हॅलेरा कचेरींतून बाहेर पडला किंवा बाहेरून येऊन कचेरींत शिरला, कीं लोक मोठ्यानें जयघोष करून त्याच्यावरची आपली भक्ति

व्यक्त करीत असत. त्यानें जें कार्य हातीं घेतलें होतें तें लोकांच्या जिव्हाळ्याचें होतें, व ज्या कुशलतेनें आणि धडाडीनें तो तें पार पाडीत होता ती धडाडी व कुशलता पाहून लहान, थोर, सर्व मंडळीस तो परमप्रिय वाटूं लागला होता.

डी व्हॅलेराची शक्ति दिवसें दिवस वाढत आहे व आतां दिरंगाई केली तर गोष्टी आवांक्याबाहेर जातील, अशी आतां सरकारची खात्री पटली. पण अमेरिका व बहुतेक वसाहती यांची आयर्लंडविषयीं सहानुभूति होती, आणि कांहीं तरी सबळ कारण दाखविल्याखेरीज डी व्हॅलेराला पकडल्यास त्या देशाच्या व आपल्या मैत्रींत वितुष्ट येईल हें इंग्रज मुत्सद्दी पूर्णपणें ओळखून होते. म्हणून डी व्हॅलेरानें जर्मनीशीं गुप्त कारस्थान करून आयर्लंडमध्यें बंड उभारण्याचा कट केला आहे असा ओरडा करण्याचें सरकारनें ठरविलें. या बेताप्रमाणें अवश्यक तेवढी सर्व तयारी केल्यानंतर सरकारनें 'जर्मन कटा'चें हें नाटक रंगभूमीवर आणण्याचा निश्चय केला, व ता. १८ मे १९१८ रोजीं आयर्लंडचे नवे बडे लाटसाहेब लॉर्ड फ्रेंच व चीफ सेक्रेटरी शॉर्ट यांनीं एक जाहिरनामा प्रसिद्ध केला. त्या जाहिरनाम्यांत म्हटलें होतें, कीं कांहीं आयरिश लोकांनीं जर्मनीशीं गुप्त व्यवहार ठेवून राजद्रोह केल्याचें सरकारच्या नजरेस आल्यावरून, आणि 'जर्मन कटा'ची अत्यंत खात्रीलायक बातमी सरकारच्या हातीं आल्यावरून हा कट नाहींसा करण्यासाठीं जोराचें धोरण स्वीकारण्याचें सरकारनें ठरविलें आहे, व या कामीं प्रत्येक राजनिष्ठ प्रजाजन सरकारला सर्व प्रकारें मदत करील असा सरकारला दृढ भरंवसा आहे.

हा जाहिरनामा प्रसिद्ध झाला त्याच्या आदल्याच रात्रीं डब्लिन येथें आणि इतर शहरीं सांपडले तेवढे सिन फेन पुढारी एकाएकीं पकडण्यांत आले. डब्लिनकडून येणाऱ्या आगगाडींतून ग्रे स्टोन्स येथें डी व्हॅलेरा रात्रीं सव्वा दहा वाजतां उतरला व त्याबरोबर त्यास पकड-

ण्यांत आलें. आर्थर ग्रिफिथ, काउंट प्लंकेट, मार्कीव्हिक्झ बाई वगैरे कित्येक मंडळींची धरपकडही त्याच रात्रीं झाली. 'जर्मन कटा'चें नाटक करून डी व्हॅलेराला पकडण्यांत सरकारला एका दगडानें दोन पक्षी मारावयाचे होते. एक तर दोस्त राष्ट्रांपुढें आयर्लंडची बेअब्रू करावयाची, आणि शिवाय डी व्हॅलेरा व त्याचे साथीदार यांना तुरुंगांत डांबून टाकून लष्करभरतीचा मार्ग निष्कंटक करावयाचा, असा दुहेरी कावा सरकारला साधावयाचा होता. डी व्हॅलेराला पकडण्यांत आपण कोणत्याही प्रकारचा अन्याय केला नाहीं असें दाखविण्याचे सरकारनें शक्य तेवढे प्रयत्न केले. डी व्हॅलेराला पकडल्याबद्दल इंग्लंडची प्रजा रागावण्याचा संभव होता असें नव्हे, किंवा आयर्लंडचें लोकमत खवळलें तरी त्याबद्दल सरकारला मोठीशी पर्वा होती असेंही नव्हे. पण तो काळ असा होता, कीं अमेरिकेची मर्जी संभाळण्यासाठीं इंग्लंडच्या मुत्सद्यांची धडपड चाललेली होती, व अमेरिकेचा आपल्यावर राग होऊं नये म्हणूनच डी व्हॅलेराच्या धरपकडीचें समर्थन करण्याचे श्रम इंग्रज मुत्सद्दी घेत होते. डी व्हॅलेरा वगैरे पुढारी जर्मन कटांत सामील असल्याबद्दलचा कोणकोणता पुरावा आपल्याजवळ आहे तें जाहीर करण्यासाठीं सरकारनें एक खास खलिता प्रसिद्ध केला.

या खलित्यांत खऱ्याबरोबर खोट्याचीही मोठ्या हातचलाखीनें सरमिसळ करण्यांत आली होती. सरकारची ही सारी कैफियत लबाडीची आहे हें लोकांनीं केव्हांच ओळखलें होतें. तशांत लॉर्ड विंबोर्न यांनीं जेव्हां असें जाहीर केलें, कीं थोड्याच दिवसांपूर्वीं मी व्हाइसरॉय असतांना मला या कटाचा मागमूसही कोठें दिसला नाहीं, तेव्हां तर लोकांना सरकारचें कारस्थान पुरतेंच उमगलें. तो खलिता प्रसिद्ध झाला तेव्हां डी व्हॅलेरा कैदेंत असल्यामुळें आपल्यावर करण्यांत आलेल्या खोट्यानाट्या आरोपांचें निराकरण करणें त्याला शक्य नव्हतें.

पण त्याचे स्नेही व चाहते स्तब्ध बसले नाहींत. सरकारचा खलिता प्रसिद्ध होतांच त्यांनीं एक जाहिरपत्रक काढलें व सरकारचा खोटेपणा चव्हाट्यावर आणला.

पकडल्यानंतर डी व्हॅलेरा यास फ्रॅंगॉच येथील तुरुंगांत रवाना करण्यांत आलें. डी व्हॅलेराची याप्रमाणें उचलबांगडी केल्यानंतर लष्कर भरतीचा प्रश्न पुनः हातीं घेण्यास आपल्याला मोकळीक आहे असें सरकारला वाटलें. पण आतां लष्कर भरतीची भाषा बोलतांना सक्ती हा शब्द वगळून आपखुषींची भरती अशी भाषा वापरण्याचा सरकारनें उपक्रम आरंभिला. आयर्लंडमध्यें खुषीची लष्कर भरती यशस्वी झाली नाहीं तर मग आम्ही सक्तीच्या कायद्याचा अंमल सुरू करूं असें सरकार म्हणूं लागलें. पण खुषीची भरती ही केवळ वरून बोलण्याची भाषा होती. वास्तविक सरकारनें सक्तीच्या भरतीलाच प्रारंभ केला होता. शिवाय 'खुषी'च्या भरतीची मोहीम सुरू असतांना लोकांचें भाषणस्वातंत्र्य सरकारनें हिरावून घेतलें, सभाबंदीचे हुकूम काढले, आणि भरतीविरुद्ध कोणी अवाक्षर काढलें, कीं त्याला पकडून तुरुंगांत टाकण्याचा सपाटा चालविला. पण सरकारची ही दडपशाही निष्फल ठरली. आयर्लंडच्या तरुणांना डी व्हॅलेरानें चांगली शिकवणूक देऊन ठेवलेली होती. सरकारनें ५०००० रिक्रूटांची मागणी केली होती. पण पुरे ५० रिक्रूटही सरकारला मिळेनात. ब्रिटिश सैन्यांत दाखल होण्याऐवजीं आयरिश स्वयंसेवकांच्या पथकांत शेंकडों लोकांनीं नांवें दाखल केलीं, आणि सरकारला पैशाची मदत मिळण्याचें लांबच राहून हजारों पौंडांचा फंड देशकार्यासाठीं जमूं लागला. रोजच्या रोज लोकांचीं मनें भरतीच्या प्रश्नाविरुद्ध अधिकच भडकूं लागलीं, व सरकारचे व आयरिश जनतेचे आतां चांगलेच दोन हात होणार अशीं स्पष्ट चिन्हें दिसूं लागलीं.

त्या झगड्याचा परिणाम काय झाला असता तें सांगणें कठीण

आहे. पण तो झगडा होऊंच नये असा ईश्वरी संकेत असल्यामुळें तो प्रसंग अजीबात टळला. कारण त्या प्रसंगाचें मूळ कारणच नष्ट झालें. १२ आक्टोबर रोजीं जर्मनीनें प्रेसिडेंट वुइल्सन यांच्या चवदा तत्त्वांस मान्यता दिली, ९ नोव्हेंबर रोजीं कायसरनें राजपद सोडलें, आणि ११ नोव्हेंबर रोजीं सकाळीं ११ वाजतां सुटलेला तोफेचा गोळा महायुद्धांतील शेवटचाच गोळा ठरला!

याप्रमाणें महायुद्धच अकस्मात् तहकूब झाल्यामुळें भरतीचा प्रश्नही आपोआपच नष्ट झाला. पण तो नाहींसा झाला तर दुसरा एक तितक्याच महत्त्वाचा प्रश्न पुढें आला. डिसेंबर महिन्यांतील सार्वत्रिक निवडणुकी हाच तो प्रश्न होय. या निवडणुकींत लोकांनीं सिन फेन पुढऱ्यांना इतक्या दणदणीत मताधिक्यानें निवडून दिलें, कीं सारा आयर्लंड देश सिन फेन असल्याबद्दल आतां संशयाला यत्किंचितही अवकाश राहिला नाहीं. ग्रे स्टोन्स येथें पकडून डी व्हॅलेराला सरकारी लोक घाईघाईनें नेत होते त्या वेळीं त्यानें 'शांत रहा आणि विश्वास सोडूं नका!' येवढाच संदेश लोकांना सांगितला होता. या त्याच्या संदेशा-प्रमाणेंच त्याच्या अनुयायांनीं वर्तन ठेवलें असें या निवडणुकीवरून दिसून आलें. ही निवडणूक पार पाडल्यानंतर डी व्हॅलेराला सरकारनें बंधमुक्त करावें अशी आयरिश लोकांनीं जोराची मागणी सुरू केली. १७ जानेवारी १९१९ या एकाच दिवशीं साऱ्या आयर्लंडांत ठिक-ठिकाणीं मिळून शेंकडों सभा झाल्या, व प्रत्येक सभेंत डी व्हॅलेराच्या सुटकेविषयीं ठराव करण्यांत आले. सरकार डी व्हॅलेराला सोडील असा मुळींच रंग दिसेना. पण लोक निकराची मागणी करीत आहेत व सरकार आपला हेका सोडीत नाहीं असा प्रकार इकडे आयर्लंडमध्यें चालू असतांना तिकडे लिंकनच्या तुरुंगांत डी व्हॅलेरानें आपल्या सुटकेचा प्रश्न आपण स्वतःच सोडविला; आणि डी व्हॅलेरा तुरुंगांतून निसटल्याची बातमी ३ फेब्रुवारी रोजीं आली तेव्हां आयरिश जनतेच्या आनंदाला पारावार राहिला नाहीं!

प्रकरण चवथें

## मस्तवाल मुत्सद्द्यांना शह

लिंकनच्या अभेद्य तुरुंगांतून डी व्हॅलेरा निसटला ही बातमी प्रसिद्ध होतांच जिकडे तिकडे मोठी खळबळ उडाली. या बातमीनें आयरिश लोक साहजिकपणेंच आनंदित झाले. इंग्लंडमध्यें मात्र तिचा परिणाम फार निराळा झाला. सरकारच्या योजना पार ढांसळून पाडून सरकारच्या इभ्रतीवर डी व्हॅलेरानें जबरदस्त प्रहार केला असें लोकांना वाटलें. कांहीं लोकांनीं तर असे उद्गार काढले कीं, एका आयरिश बंडखोरानें ज्या सरकारच्या डोळ्यांत अशा प्रकारें त्यांच्याच घरांत असतांना धूळ फेंकली त्या सरकाराचे प्रजाजन म्हणवून घेण्याची आम्हांला लाज वाटते. डी व्हॅलेराची बंधमुक्तता इतक्या अचानकपणें घडून आली होती, कीं त्या अद्‌भुत प्रसंगाकडे साऱ्या जगाचें लक्ष वेधणें अपरिहार्य होतें. इंग्लिश लोकांनीं कितीही दांत ओंठ खाल्ले व मुठी वळल्या तरी त्याचा कांहीं परिणाम होणें शक्य नव्हतें. परराष्ट्रांतील वृत्तपत्रकार डी व्हॅलेराच्या हालचालींत आतां अधिक लक्ष घालूं लागले. डी व्हॅलेरा-विषयींची बारीकसारीक माहिती देखील विद्युत्संदेशांच्या द्वारें साऱ्या देशांत पसरूं लागली. पॅरिसमध्यें त्या वेळीं चाललेल्या तहपरिषदेस हजर असलेल्या अँड्रे निओलिस नांवाच्या एका प्रमुख वृत्तपत्रकाराला तर डी व्हॅलेराच्या हकीकतीविषयीं इतकें कुतूहल उत्पन्न झालें, कीं तहपरिषदेची बातमी घेण्याचें काम दूर सारून सीन टी. ओकेली या आयरिश गृहस्थांची त्यानें मुद्दाम मुलाखत घेतली. व " डी व्हॅलेरा तुरुंगांतून निसटला तरी कसा ? " असा त्यांस मोठ्या आतुरतेनें प्रश्न विचारला. ओकेली यांनीं त्या प्रश्नास असें उत्तर दिलें, कीं " मला इतकेंच सांगणें शक्य आहे, कीं या सुटकेसाठीं किती तरी दिवस खटपटी कराव्या लागल्या. कारण ज्या लिंकनच्या तुरुंगांत डी व्हॅलेरा

होता त्या तुरुंगावर सरकारनें अतिशय कडक पाहरा ठेवला होता. नऊ महिनेपर्यंत इष्टमित्रांनाच नव्हे तर डी व्हॅलेराच्या पत्नीला देखील त्याला येऊन भेटण्याची परवानगी नव्हती."

इतका सक्त बंदोबस्त असूनही डी व्हॅलेरानें आपली सुटका करून घेतली. प्रथम अनेक युक्त्या योजून तुरुंगाच्या दाराला जें कुलूप असे त्याच्या किल्लीचा ठसा मेणावर उठवून घेण्याचें काम डी व्हॅलेरानें साधून घेतलें. या वेळीं आपल्या इष्टमित्रांस विनोदी चित्रें पाठविण्याची तुरुंगांतील लोकांस परवानगी होती. या परवानगीचा फायदा घेण्याचें डी व्हॅलेरानें ठरविलें, व त्याप्रमाणें त्यानें दोन कार्डांवर दोन चित्रें काढलीं. एका चित्रांत असें दाखविलें होतें, कीं दारूनें झिंगलेला एक इसम एका कुलुपांत किल्ली घालण्याचा प्रयत्न करीत आहे. 'माझा आंत शिरकाव होत नाहीं' असें त्या चित्राखालीं लिहिलें होतें. दुसऱ्या चित्रांत एक इसम तुरुंगाच्या कुलुपाला एक किल्ली चालविण्याचा प्रयत्न करीत असल्याचें दाखवून त्या चित्राच्या डोक्यावर 'माझी सुटका होत नाहीं' असें लिहिलें होतें तीं दोन्ही कार्डें तुरुंगाच्या अधिकाऱ्यांच्या तपासणीसाठीं गेलीं तेव्हां त्या चित्रांच्या विनोदांतच ते गर्क झाले, त्यांत कांहीं विशिष्ट गूढार्थ असेल अशी त्यांना शंकाही आली नाहीं, व तीं त्यांनीं पास करून डी व्हॅलेराच्या स्नेह्यांकडे जाऊं दिलीं. डी व्हॅलेरानें चित्रांत जी किल्ली काढली होती ती तुरुंगाच्या खऱ्या किल्लीची हुबेहूब प्रतिमा होती, व तीं चित्रें हातीं येतांच डी व्हॅलेराच्या मित्रांनीं त्याच्या मनांतून त्या चित्रांच्या द्वारें कोणता संदेश सूचित करावयाचा होता तें ताबडतोब ओळखलें. त्यांनीं ताबडतोब चित्रांतील किल्लीबरहुकूम एक किल्ली बनवून घेतली व ती एका केकमध्यें घालून डी व्हॅलेराकडे पाठवून दिली. ठरलेल्या वेळीं मिशेल कॉलिन्स व हॅरी बोलंड हे दोघे मोटार घेऊन जय्यत तयारीनें उभे होते, आणि मित्रांकडून आलेल्या किल्लीच्या

सहाय्यानें तुरुंगाचें मागील दार उघडून जेव्हां डी व्हॅलेरा बाहेर पडला तेव्हां क्षणार्धाचाही बिलंब न करतां ते तिघेही पूर्वीं ठरलेल्या जागीं मोटारींतून निघून गेले.

डी व्हॅलेराच्या या साहसाची बातमी कळतांच तें साहस त्यानें कसें केलें हें समजून घेण्यास व सध्यां तो कोठें आहे व काय करतो आहे त्याची बातमी मिळविण्यास सारे वृत्तपत्रकार अधीर झाले. एका फ्रेंच वृत्तपत्रानें प्रसिद्ध केलें, कीं डी व्हॅलेरा हॉलंडच्या मार्गानें फ्रान्समध्यें आला असून तो सध्यां पॅरिस शहरीं आहे. एका इंग्लिश पत्रानें असें छापलें, कीं प्रेसिडेंट वुइल्सन यांस भेटण्यासाठीं डी व्हॅलेरा अमेरिकेस गेला आहे. उलट 'डेली क्रॉनिकल' पत्रानें डब्लिन येथील एका पकडा-पकडीची बातमी छापून असें म्हटलें होतें, कीं डी व्हॅलेरा सध्यां डब्लिनच्या आसपास असल्यामुळें तो सांपडेल या आशेनेंच सरकारनें ही धरपकड केली. अशा प्रकारें जो तो वृत्तपत्रकार आपली कल्पनाशक्ति चालवून डी व्हॅलेराविषयींच्या 'विश्वसनीय' बातम्या छापीत होता. अवघ्या चार दिवसांच्या अवधींत एकमेकांपासून हजारों मैलांच्या अंतरावर असलेल्या निरनिराळ्या शहरांत डी व्हॅलेरास प्रत्यक्ष पाहिल्या-बद्दलच्या खास बातमीदारांच्या या 'विश्वसनीय' बातम्या किती विश्वसनीय होत्या हें काय अधिक सांगावयास पाहिजे?

साऱ्या जगाचें लक्ष इतक्या उत्कंठेनें डी व्हॅलेराकडे लागलेलें होतें. अशा वेळीं त्याला पुन्हां पकडण्यासाठीं सरकार शिकस्तीचे प्रयत्न करून पहात होतें. गुप्त पोलिसांचा तांडाच्या तांडा या कामीं लावण्यांत आला होता. इंग्लंडमधून बाहेर पडण्याचा जो जो म्हणून संभवनीय मार्ग होता त्याच्यावर पराकाष्ठेचा जागता पाहरा ठेवण्यांत आला होता. कदाचित् डी व्हॅलेरा अजून लिंकन शहरांतच असेल अशी तुरुंगाच्या गव्हर्नरला शंका आल्यावरून त्यानें शहरांतील प्रत्येक घराची झडती घेतली. शहरांत जे आयरिश लोक होते त्यांच्या घरांची

तर फारच कसून तपासणी करण्यांत आली. पण त्या गव्हर्नरला किंवा सरकारला डी व्हॅलेराचा शोध कांहीं केल्या लागला नाहीं. त्या ' उंच, सडपातळ, आणि पाणीदार पिंगट डोळ्यांच्या इसमा 'चा मागमूस सांपडेना. डी व्हॅलेराच्या शोधाच्या कामीं पराभूत झाल्यावर सरकारनें आपला पराभव औदार्याच्या पांघरूणाखालीं छपविण्याचा प्रयत्न केला. डी व्हॅलेरा सुटला तर सुटला, नाहीं तरी आम्ही त्याला थोड्याच दिवसांनीं सोडून देणार होतों, असें लोकांना भासविण्यासाठीं सरकारनें साऱ्या सिन फेन लोकांना तुरुंगांतून सोडून दिलें.

कारागृहांतून स्वतःची मुक्तता करून घेतल्यावर डी व्हॅलेरानें कांहीं दिवस मौनव्रत स्वीकारलें होतें. पण नंतर त्यानें तें मौन सोडलें व आयरिश जनतेला एक संदेश पाठविला. हा संदेश एका जाहीर सभेंत फादर ओफ्लॅनागन यांनीं वाचून दाखविला. " देशाचें कार्य करण्यासाठींच मीं तुरुंगांतून बाहेर आलों आहे व तें मी करीत आहे " येवढाच तो संदेश होता. पुढें कांहीं दिवसांनीं डी व्हॅलेराबरोबरच निसटलेला सीन मॅक्गॅरी हा मॅन्शन हाऊसमध्यें झालेल्या एका जलशाचे प्रसंगीं स्वयंसेवकांच्या खड्या पाहऱ्यांत एकाएकीं आलेला व अकस्मात् नाहींसा झालेला लोकांनीं पाहिला. तेव्हां त्यावरून आपला परमप्रिय पुढारी डी व्हॅलेराही आयर्लंडमध्यें सुखरूप येऊन पोंचला असला पाहिजे असा लोकांनीं तर्क केला. नंतर हळू हळू वृत्तपत्रांच्या बातमीदारांनीं डी व्हॅलेराच्या मुद्दाम घेतलेल्या मुलाखती प्रसिद्ध व्हावयास लागल्या. सरकारच्या निष्णात गुप्त पोलिसांनाही डी व्हॅलेराचा ठावठिकाण लागूं नये, आणि अमेरिकन, फ्रेंच व इंग्लिश पत्रांच्या बातमीदारांना त्याच्या मुलाखतीदेखील घेतां याव्या ही केवढी आश्चर्याची गोष्ट होय? सिन फेन पक्षांत त्या वेळीं किती शिस्त होती हें या गोष्टीवरून चांगलें दिसून येतें. अर्थात् बातमीदारांना डी व्हॅलेराच्या मुलाखती मिळाल्या तरी तो कोठें आहे याविषयीं त्यांना काडीमात्रही अंदाज करतां येऊं

नये अशी डी व्हॅलेराची मंडळी खबरदारी घेत असत. या मुलाखती बहुतकरून सूर्यास्तानंतर होत असत; व आपण कोणत्या प्रदेशांत आहोंत हें बातमीदाराला कळत नसे, इतकेंच नव्हे, तर ज्या इमारतींत मुलाखत होई तिचें बाह्य स्वरूपदेखील त्याच्या दृष्टीस पडत नसे. 'डेली क्रॉनिकल' पत्राचा बातमीदार ए. इ. कॉपिंग यानें यासंबंधीं असें वर्णन केलें होतें, कीं "त्या वेळीं मध्यरात्र झाली होती. जिकडे तिकडे गडद अंधकार पडला होता. मला एका मोटारींत बसविण्यांत आलें, व ती अतिशय वेगानें चालूं लागली. शेवटीं ती एका ठिकाणीं थांबली व मला डी व्हॅलेरासमोर नेण्यांत आलें. डी व्हॅलेरा बोलाचालायला फारच आनंदी वृत्तीचा आहे. त्याचे नेहमींचे फोटो आपण पाहतों त्यांत त्याची मुद्रा विशेष आकर्षक दिसत नाहीं. पण त्याला प्रत्यक्ष पाहतांच हें मत पार बदलून जातें. कामाची दगदग आणि हालअपेष्टा यांमुळें त्याचा चेहरा जरा विकृत झाला आहे. तथापि तो बोलूं लागला म्हणजे त्याच्या डोळ्यांत कांहीं विशेषच चमक दिसूं लागते, आणि त्याच्या तोंडाभोंवतीं हास्याच्या लहरी खेळूं लागतात."

सरकारनें सर्व सिन फेन लोक सोडून दिले तेव्हां यापुढें अज्ञातवासांत राहण्याची गरज नाहीं असें डी व्हॅलेराला वाटलें. त्याला सरकार पुन्हां पकडील हें शक्य नव्हतें. कारण सरकारला दडपशाहीची कितीही हौस असली तरी या वेळीं सिन फेन पक्षाविरुद्ध चढाईचें धोरण स्वीकारण्यापेक्षां जरा बेतानेंच घेण्यांत फायदा आहे हें सरकार जाणून होतें. हा सर्व विचार करून डी व्हॅलेरा प्रगट झाला. १९१८ च्या डिसेंबर महिन्यांत जी निवडणूक झाली त्यांत ईस्ट क्लेअर व ईस्ट मेयो या दोन भागांतर्फे लोकांनीं त्याची निवडणूक केली होती. या निवडणुकींत मवाळ पक्षाचे अध्वर्यु जॉन डिलन हे डी व्हॅलेराचे प्रतिस्पर्धी होते. पण त्यांना डी व्हॅलेरापेक्षां ४४६१ मतें कमी पडलीं. मवाळ पक्षाचा या निवडणुकींत इतका पराभव झाला,

कीं पूर्वीं त्यांचे ६८ सभासद होते ते आतां अवघे ६ च निवडून आले. 'राष्ट्रीय' पक्षाचे ६ सभासद, युनिअनिस्ट पक्षाचे २६ सभासद, व बाकीचे ७३ सिन फेन सभासद अशी ती निवडणूक झाल्यामुळें सिन फेन पक्ष किती प्रबळ होता व देशांत त्याला केवढें प्रचंड पाठबळ होतें हें अगदीं स्पष्ट झालें. हें पाहतांच डी व्हॅलेरानें एक महत्त्वाचें काम केलें. २१ जानेवारी १९१९ रोजीं त्यानें 'डेल आयरेन'ची त्या वर्षाची पहिली सभा बोलाविली व त्या सभेंत 'आयरिश स्वातंत्र्याचा जाहिरनामा' प्रसिद्ध केला. ही जाहिरनाम्याची गोष्ट अत्यंत महत्त्वाची होती. कारण आतां यापुढें आयर्लंडमध्यें ब्रिटिश सत्ता चालू नसून आयरिश रिपब्लिकची सत्ता सुरू आहे असेंच सारे आयरिश लोक समजणार असा त्या जाहिरनाम्याचा अर्थ होता. या जाहिरनाम्याच्या जोरावरच परराष्ट्रांपुढें, विशेषतः अमेरिकेपुढें, डी व्हॅलेराला आयर्लंडची कैफियत मांडतां आली. आणि शेवटीं या जाहिरनाम्यामुळेंच लॉइड जॉर्ज वठणीवर येऊन आयर्लंडच्या पुढाऱ्यांशीं समेट करण्यास त्यांनीं आपण होऊन आपली तयारी दर्शविली. तो जाहिरनामा असा होता:—

"ज्या अर्थीं आयर्लंडच्या लोकांना स्वातंत्र्याचा जन्मसिद्ध हक्क आहे, ज्या अर्थीं परकी अंमलाविरुद्ध आज सतत ७०० वर्षें आयरिश लोकांनीं सशस्त्र झगडा चालविलेला आहे, ज्या अर्थीं या देशांतील इंग्रजी सत्तेला लोकांची काडीमात्रही संमति नाहीं व ती सत्ता शस्त्रास्त्रांच्या जोरावर आणि अनीतीवरच आजपर्यंत उभी राहिलेली आहे, ज्या अर्थीं १९१६ सालीं ईस्टरच्या सोमवारीं डब्लिन येथें आयरिश लोकांच्या तर्फे आयरिश रिपब्लिकन सैन्यानें आयरिश प्रजासत्ताक राज्य स्थापन झालें असल्याचें जाहीर केलें, व ज्या अर्थीं डिसेंबर १९१८ च्या निवडणुकींत प्रजासत्तावादी लोकांना प्रचंड बहुमतानें निवडून देऊन आयरिश रिपब्लिकविषयींची आपली निष्ठा लोकांनीं

स्पष्टपणें प्रगट केली आहे, त्या अर्थीं आज या राष्ट्रीय पार्लमेंटमध्यें जमलेले आम्ही प्रतिनिधि पूर्वीं स्थापन झालेल्या आयरिश रिपब्लिकला पुन्हां जाहीर मान्यता दर्शवितों, आणि या रिपब्लिकला पूर्ण मूर्त स्वरूप यावें यासाठीं हरएक प्रयत्न करण्याची आम्ही प्रतिज्ञा करतों. आम्ही असेंही जाहीर करतों, कीं आयर्लंडच्या लोकांविषयीं कायदे करण्याचा अधिकार आयरिश लोकांनीं निवडलेल्या प्रतिनिधींनाच फक्त आहे, त्यांनीं केलेले कायदेच तेवढे आयरिश लोकांना बंधन-कारक आहेत, आणि आयरिश पार्लमेंटखेरीज दुसऱ्या कोणत्याही पार्लमेंटविषयीं निष्ठा बाळगण्याचें आयरिश लोकांवर बंधन नाहीं. त्याचप्रमाणें आम्ही असें जाहीर करतों, कीं आयर्लंडमध्यें परकीयांनीं सत्ता चालविणें म्हणजे आमच्या जन्मसिद्ध हक्कांवर स्वारी करण्यासारखें आम्हीं समजतों, व ही सत्ता आम्ही केव्हांही सहन करणार नाहीं. इंग्रजी लष्करानें आमचा देश ताबडतोब सोडून जावें असें आम्ही बजावतों.

"आमच्या स्वातंत्र्याला जगांतील सर्व स्वतंत्र राष्ट्रें संमति देतील व आम्हांला तीं मदतही करतील अशी आमची दृढ आशा आहे. आम्हांला स्वातंत्र्याचा पूर्णपणें उपभोग घ्यावयास मिळेपर्यंत अंतर-राष्ट्रीय शांतता प्रस्थापित होणार नाहीं असें आम्ही जाहीर करतों.

" ज्या सर्वसाक्षी व सर्वशक्तिमान प्रभूनें आमच्या पूर्वजांना स्वातंत्र्या-साठीं घोर युद्ध करण्यास सामर्थ्य दिलें त्याच्या न्यायीपणावर अढळ निष्ठा ठेवून आम्ही त्यास सर्वस्वी शरण जात आहोंत. आमच्या स्वातंत्र्य युद्धाचा शेवट लवकरच होणार असें आज दिसत आहे. अशा वेळीं त्या प्रभूची कृपादृष्टि आमच्यावर असो अशी आमची प्रार्थना आहे."

एकीकडे पॅरिस शहरीं दोस्त राष्ट्रें तहपरिषदेचा खल करीत होतीं, तर दुसरीकडे सर्व जगापुढें आपली कैफियत मांडण्याच्या कामांत डी व्हॅलेरा व त्याचे मदतगार गुंतले होते. इंग्लंड कोणतें धोरण स्वीका-

रील व काय करील याविषयीं काडीचीही पर्वा करावयाची नाहीं, असें त्यांनीं ठरविलें होतें. आयरिश प्रजासत्ताक राज्यानें स्पष्टपणें आंखलेला कार्यक्रम त्यांच्यापुढें होता. त्या कार्यक्रमाला साऱ्या जनतेनें आपलें पूर्ण पाठबळ दिलें होतें, आणि हा कार्यक्रम तडीस नेण्याचा त्यांचा कृतनिश्चय होता. प्रेसिडेंट वुइल्सनचीं चवदा तत्त्वें त्यांनीं आपल्या डोळ्यांपुढें ठेवलीं होतीं, आणि लहान राष्ट्रांविषयीं दोस्त राष्ट्रांनीं वेळोवेळीं जे सहानुभूतीचे जाहिरनामे काढले होते त्यांचाच त्यांनीं आपल्या चळवळीला आधार घेतला होता. इंग्रज राज्यकर्त्यांना जर कांहीं अनिष्ट असेल तर तें हेंच होतें. जुगोस्लाव्ह, युक्रेनियन वगैरे लोकांच्या बाबतींत बोलतांना स्वयं-निर्णयाच्या तत्त्वाला डोक्यावर घेऊन नाचावयास त्यांची तयारी होती, पण तेंच तत्त्व कोणी आयर्लंडला लागूं करूं लागलें, कीं त्यांच्या कपाळाला आंठ्या चढत. आयर्लंडची वाचाच बंद करून टाकण्याची त्यांची खटपट होती. सभाबंदी व भाषणबंदी हा तर रोजचा क्रम होऊन बसला होता. लष्करी कोर्टापुढें रोज खटले चालू होते. लोकांना शिक्षा सुनावण्यांत येत होत्या. लोकही बिनदिक्कत तुरुंगांत जात होते. आणि या साऱ्या दडपशाहीनें आयर्लंडच्या कार्याची पीछेहाट होण्याऐवजीं प्रगतीच होत होती. इंग्रजी न्यायकोर्टें आम्ही ओळखीत नाहीं असें सिन फेन पक्षाचे लोक म्हणूं लागले होते, व त्यांच्यावरखटले भरले तर खटल्याचा सारा प्रकार ते हास्यास्पद करून टाकीत.

याच सुमारास, म्हणजे डी व्हॅलेराच्या मुक्ततेनंतर एका पंधरवड्यानें अमेरिकेंतील अखिल आयरिश रहिवाशांची फिलाडेल्फिया येथें एक प्रचंड परिषद भरली. आयर्लंडच्या कार्यासाठीं इतकी जंगी परिषद अमेरिकेंत आजपर्यंत भरली नव्हती. या 'आयरिश रेस कन्व्हेन्शन'ला एकशें तीस प्रतिनिधि आले होते. हे सर्व प्रतिनिधि बडे मानमरातबाचे लोक असल्यामुळें त्यांच्या म्हणण्याला फार महत्त्व होतें. या कन्व्हेन्शननें केलेल्या ठरावांपैकीं मुख्य ठराव असे होते, कीं इमॉन डी व्हॅलेरा,

आर्थर ग्रिफिथ, आणि काउंट प्लंकेट यांना तहपरिषदेपुढें आयर्लंडची कैफियत मांडण्यास परवानगी मिळावी व प्रेसिडेंट वुइल्सन यांचें स्वयं-निर्णयाचें तत्त्व आयर्लंडला लागू करण्यांत यावें. या परिषदेंतच एक कमिटी नेमण्यांत येऊन तिच्यातर्फे पॅरिस शहरीं आयर्लंडसाठीं खटपट करण्याकरितां, वॉल्श, डन आणि रिॲन यांस पाठविण्यांत आलें.

अमेरिकेंतील आयरिश लोक याप्रमाणें आयर्लंडच्या स्वातंत्र्यासाठीं खटपट करीत असतांना इकडे खुद्द आयर्लंडमध्यें डी व्हॅलेराचें काम अव्याहत चालूंच होतें. १७ मे रोजीं तहपरिषदेचे अध्यक्ष एम्. क्लेमेंको यांजकडे आयरिश प्रजासत्ताक राज्याकडून खालील खलिता पाठविण्यांत आला:—

"महाराज,

"सध्यां चालू असलेल्या तहपरिषदेंत जो तहाचा खर्डा निश्चित होईल त्यावर ब्रिटिश राज्याच्या प्रतिनिधींच्याही सह्या होतील, व आयर्लंडचीही संमति त्या सह्यांतच अंतर्भूत झाली असें समजण्यांत येईल अशी आमची कल्पना आहे.

"म्हणून आयर्लंडच्या वतीनें कोणत्याही प्रकारें बोलण्याचा किंवा करार करण्याचा ब्रिटिश प्रतिनिधींना हक्क नाहीं ही आयरिश प्रजासत्ताक राज्यानें पूर्वीं अनेक वेळां जाहीर केलेली गोष्ट आज आम्ही त्या राज्याच्या वतीनें पुन्हां जाहीर करीत आहोंत. या गोष्टीकडे आपण लक्ष द्यावें, व तहपरिषदेचेंही लक्ष वेधावें अशी आपणांस विनंति आहे. ब्रिटिश मुत्सद्यांच्या सह्यांनीं पुरा झालेला कोणताही तहनामा आयरिश लोक बंधनकारक समजणार नाहींत. कायदेशीरपणें ज्या तहाला आयरिश प्रतिनिधींची संमति मिळेल तो तह आयरिश लोक मोठ्या आनंदानें व तत्परतेनें पाळतील. परंतु आयर्लंडच्या वतीनें संमति देण्याचा अधिकार ब्रिटिश प्रतिनिधींना मुळींच असूं शकत नाहीं. तहपरिषदेमध्यें आयर्लंडतर्फे बोलण्यास व जे तहनामे होतील त्यांवर आयरिश राष्ट्रातर्फे

सह्या करण्यास आयरिश राष्ट्रानें आम्हांला प्रतिनिधि म्हणून नेमलें आहे असें आम्ही आपणांस कळवितों. महाराज, आमच्या सादर प्रणिपातांचा स्वीकार व्हावा.

इमॉन डी व्हॅलेरा.
आर्थर ग्रिफिथ.
जॉर्ज नोबल काउंट प्लंकेट."

पुन्हां २६ मे रोजीं या तिघांच्या सह्यानिशींच आणखी एक खलिता पाठविण्यांत आला. त्यांत आयर्लंडमध्यें ब्रिटिश अधिकाऱ्यांनीं किती दडपशाही माजविली होती त्याचें दिग्दर्शन करून पुढें असें म्हटलें होतें, कीं आयर्लंड ताब्यांत ठेवण्याचा इंग्लंडला कोणताही हक्क नाहीं, व हा हक्क तहपरिषदेपुढें नाशाबीत करण्याची आयर्लंडच्या प्रतिनिधींना संधि देण्यांत यावी.

अशा प्रकारें तहपरिषदेच्या सभासदांपुढें आपलें म्हणणें मांडण्याची संधि मिळावी म्हणून डी व्हॅलेरानें शक्य तितकी खटपट केली. पण तहपरिषदेंत इंग्लंडच्या मुत्सद्यांचाच प्रभाव प्रबळ होता. ईजिप्तच्या शिष्टमंडळाचा मुख्य झगलूल पाशा याला ज्याप्रमाणें तहपरिषदेपुढें बोलण्याची परवानगी मिळाली नाहीं, त्याचप्रमाणें डी व्हॅलेरालाही ती परवानगी नाकारण्यांत आली. तहपरिषदेंत आयर्लंडचें कांहीं देखील काम झालें नाहीं. टी ओकेली व डफी यांनीं डी व्हॅलेराची व तहपरिषदेच्या सद्गृहस्थांची एकदां मुलाखत तरी व्हावी म्हणून पुष्कळ प्रयत्न केले. पण परिषदेस जमलेल्या राष्ट्रांनीं डी व्हॅलेरास मुलाखत देण्याचें साफ नाकारलें. ज्या उदात्त तत्त्वांसाठीं महायुद्ध झालें तीं तत्त्वें डोळ्यांपुढें ठेवून दोस्त राष्ट्रें थोडींच परिषद चालवीत होतीं? परिषदेस जमलेल्या साऱ्या राष्ट्रांची स्थिति हाडकावर नजर ठेवून बसलेल्या श्वानांप्रमाणें होती. प्रत्येकाची नजर कोणत्या ना कोणत्या तरी हाडकावर होती, व हें हाडूक आपल्यापासून हिरावून घेण्यासाठीं कोणी

पुढें आलेसें वाटलें, कीं त्याची गुरगुर सुरू होई. "तहपरिषदेस जम-लेले प्रतिनिधि खाजगी स्वरूपाची मुलाखत द्यावयास तयार असत. परंतु परिषदेचे अधिकारी या नात्यानें भेटावयास जाऊन कोणी त्यांच्या दारा-वर थाप मारली, कीं ते भराभर खिडकीबाहेर उड्या टाकीत" असें वॉल्श यांनीं एके प्रसंगीं विनोदपूर्ण वर्णन केलें तें अगदीं यथार्थ होतें. आयर्लंडचें कोणतेंही म्हणणें ऐकण्यास आपण तयार नाहीं अशी बे-मुर्वतीची वृत्ती लॉइड जॉर्ज यानीं प्रथम स्वीकारली होती. पण नंतर मागें लिहिल्याप्रमाणें अमेरिकेंतील लोकमताचाही आयर्लंडच्या कार्याला जोराचा पाठिंबा मिळाला तेव्हां लॉइड जॉर्ज जरा नरम आले, व त्यांनीं मग निराळ्याच युक्त्या लढविण्यास प्रारंभ केला. अमेरिकेहून येणाऱ्या वॉल्श-प्रभृति प्रतिनिधींची स्वतः भेट घेण्याचें त्यांनीं कबूल केलें, पण या भेटीची वेळ मात्र दिवसेंदिवस लांबणीवर टाकण्याचा डाव त्यांनीं सुरू केला. वाटल्यास वॉल्श वगैरे मंडळींनीं आयर्लंडमध्यें जावें व तेथील परिस्थिति प्रत्यक्ष पाहून डी व्हॅलेराशींही चर्चा करावी अशीही आपली कबूली लॉइड जॉर्ज यांनीं बोलून दाखविली. त्याप्रमाणें वॉल्शप्रभृति मंडळी आयर्लंडला गेली. त्यांच्या या सफरीमुळें तहपरिषदेची कोंडी त्यांस फोडतां आली नाहीं तरी दुसरा एक फार महत्त्वाचा फायदा झाला. सफर पुरी केल्यानंतर त्यांनीं जो रिपोर्ट तयार केला त्या रिपोर्टांत इंग्रजांच्या पदरीं अन्यायाचें व जुलुमाचें पुरतें माप घातलें गेलें. हा रिपोर्ट प्रसिद्ध झाल्यापासून अमेरिकन लोकांना आयर्लंडच्या चळवळीविषयीं फार सहानुभूति वाटूं लागली. हा रिपोर्ट पाहतांच आपण करावयास गेलों एक आणि झालें भलतेंच असें लॉइड जॉर्ज यांना होऊन गेलें. त्यांना मनस्वी संताप आला, व वॉल्श आयर्लंडहून परत आल्यावर मुलाखतीसाठीं आपल्या-कडे येऊं नये म्हणून 'मी मुलाखत ध्यावयास तयार नाहीं' असें त्यांनीं त्यास संतापाच्या भरांत कळविलें. प्रेसिडेंट वुइल्सन यांनीं वॉल्श व

डन यांची भेट घेतली. परंतु त्या भेटींत कांहीं एक निष्पन्न झालें नाहीं. "मीं चवदा तत्त्वांचें प्रतिपादन केलें खरें, परंतु माझ्या तत्त्वांना धाब्यावर बसवून बाकीचीं राष्ट्रें तहाचा खर्डा तयार करीत आहेत, व त्या धटिंगणांच्यापुढें माझें कांहीं चालत नाहीं" असली रडवी कबुली बोलून दाखवून प्रेसिडेंट वुइल्सन यांनीं वॉल्श व डन यांची बोळवण केली.

तहपरिषदेंत असें होणार व आयर्लंडच्या कार्याला त्या परिषदेच्या कडून विशेष पाठिंबा मिळणार नाहीं, असा डी व्हॅलेरानें पूर्वींपासूनच थोडा फार तर्क बांधून ठेवला होता. इंग्लंड, फ्रान्स वगैरे सर्वच 'दोस्तां'ना आपआपले स्वार्थ थोडया फार अंशानें साधावयाचे असल्या-मुळें एकमेकांच्या चोऱ्यांकडे दुर्लक्ष करणाऱ्या सहकारी दरोडे-खोरांप्रमाणें ते वागतील, हें भाकीत व्हॅलेरानें आपल्या मनाशीं आधीं-पासूनच करून ठेविलें होतें. तेंच भाकीत खरें होण्याचीं चिन्हें दिसूं लागतांच डी व्हॅलेरानें निराळाच उपाय अंमलांत आणण्याचें ठरविलें. स्वार्थाचें आसन न सोडतां गुर्मीची भाषा बोलणाऱ्या इंग्लंडच्या मस्त-वाल मुत्सद्यांना असा कांहीं रामबाण शह देण्याचें डी व्हॅलेरानें योजून ठेवलें होतें, कीं तो शह बसतांच तहपरिषदेंत झालेल्या तहाचा खर्डा कुचकामाचा कागदाचा चिटोरा ठरण्याची इंग्लंडला भीति वाटूं लागली, व डी व्हॅलेराची गांठ घेण्याचें साफ नाकारणारे लॉइड जॉर्ज आपण होऊन समेटाचें बोलणें बोलूं लागले. डी व्हॅलेराच्या या अलौकिक मुत्सद्दीपणाच्या शहाचें विवेचन पुढील प्रकरणांत करूं.

## प्रकरण पांचवें

# अमेरिका जागी केली

सन १९१९ च्या जून महिन्याच्या प्रारंभीं डी व्हॅलेरा अकस्मात् आयर्लंडमधून नाहींसा झाला! लिंकनच्या तुरुंगांतील सुटकेप्रमाणेंच हें त्याचें नाहींसें होणें अद्‌भुत होतें. कारण डी व्हॅलेराला आयर्लंड-मध्येंच डांबून ठेवण्याच्या हेतूनें सरकारनें आयर्लंडच्या बेटाभोंवतीं आपल्या आरमाराचा असा कांहीं पोलादी वेढा दिला होता, कीं पर-राष्ट्रीय सेक्रेटरीचा लेखी परवाना जवळ असल्याखेरीज आयर्लंडबाहेर पडणें कोणालाही शक्य नव्हतें. आणि असला परवाना तर डी व्हॅलेरानें कधीं मागितलाही नव्हता! मग तो आयर्लंडमधून गेला तरी कसा? प्रत्येकाला याबद्दल मोठें गूढ पडलें. तो समुद्रांतून गेला, कीं विमानांतून निसटला याचा कोणालाच उलगडा पडेना. तो कसा गेला हें त्याचें त्यालाच माहीत. तो गेला एवढें खरें!

इंग्लंडमधील लोकांना वाटलें, कीं डी व्हॅलेरा तहपरिषदेपुढें आपलें म्हणणें मांडण्यासाठीं पॅरिसला गेला असावा. पण असा तर्क करणाऱ्यांना हें माहीत नव्हतें, कीं आतां डी व्हॅलेराच्या मनांत तहपरिषदे-विषयीं काडीइतकासुद्धां विश्वास उरलेला नव्हता. पॅरिस शहरीं जाऊन तेथें जमलेल्या धेंडांना भेटण्यासाठीं त्यांच्याकडे हेलपाटे घालीत आपला वेळ दवडण्याइतका तो दुधखुळा नव्हता. पण तो कोठें गेला असावा याविषयीं लोक आपापली मति चालवून तर्क लढवीत होते इतकें खरें. अखेर २१ जून रोजीं हॅरी बोलंड यानें जाहीर केलें, कीं डी व्हॅलेरा न्यू यॉर्क शहरीं येऊन उतरला आहे.

ॲस्टोरिआ हॉटेलमध्यें डी व्हॅलेरा उतरला, व तेथेंच त्यानें आपली कचेरी थाटली. अमेरिकेंतील निरनिराळ्या संस्थानांकडून संदेशांचा व निमंत्रणांचा त्याच्यावर सारखा वर्षाव होऊं लागला. त्याच्या खोली-

भोंवतीं सारखी गर्दी होऊन राहिली, प्रमुख वर्तमानपत्रकारांनीं आपले बातमीदार त्याच्या मुलाखतीसाठीं पाठविण्याचा धडाका लावला, आणि आयरिश राजकारणाविषयींच्या त्याच्या विचारांनीं दैनिक पत्रांचे कॉलमच्या कॉलम भरून निघूं लागले. त्याच्या भोंवतालची ती गर्दी, त्याचा तो तेजःपुंज चेहरा, आणि त्याच्या सामर्थ्याविषयीं इंग्लंडला वाटणारा दरारा पाहून आपण आयर्लंडच्या अनभिषिक्त राजाचेंच दर्शन घेत आहोंत असें कोणालाही वाटलें असतें. तारुण्यांत डी व्हॅलेरा फारच सुंदर होता. तुरुंगांतील हाल अपेष्टांमुळें व राजकारणाच्या चिंतेमुळें त्याचें तें मूळचें सौंदर्य आतां कायम राहिलें नव्हतें, तरी त्याच्या भव्य मूर्तीचा व रुबाबदार चेहऱ्याचा परिणाम प्रत्येकाच्या मनावर ताबडतोब होत असे डी व्हॅलेराला एकदां प्रत्यक्ष भेटून त्याच्याशीं हस्तांदोलन करण्याची उत्कंठा प्रत्येकाला लागलेली होती. या बाबतींत 'पिट्सबर्ग डिस्पॅच'च्या एका लेखकानें मोठें सुंदर वर्णन केलें होतें. तो लिहितो, "मला डी व्हॅलेरा आवडेल हें मला पहिल्यापासूनच माहीत होतें. पण तो मला इतका आवडेल अशी मला कल्पना नव्हती. त्याचे फोटो आपण पाहतों त्यांसारखा तो मुळींच दिसत नाहीं. मी बसलों होतों त्या दिवाणखान्यांत येऊन त्यानें माझें स्वागत केलें तेव्हां हाच डी व्हॅलेरा कीं काय अशी मला क्षणभर शंका वाटली. तो जरा कृश असेल व त्याच्या हालचाली अगदीं सावकाशीच्या असतील अशी माझी कल्पना होती. पण ती अगदीं चुकीची ठरली. एक तर इतर मोठ्या लोकांप्रमाणें त्यानें मला दिवाणखान्यांत मुळींच तिष्ठत ठेविलें नाहीं. माझ्या नांवाची चिठी आंत त्याच्याकडे जातांच तो ताबडतोब बाहेर आला, व मला भेटण्यांत त्याला खरोखर अत्यंत आनंद झाल्याप्रमाणें त्यानें माझ्याशीं हस्तांदोलन केलें. तो अगदीं पुरा सहा फूट उंच आहे, कदाचित् थोडा जास्तच असेल. तो अगदीं सरळ ताठ उभा राहतो, त्याच्या हालचालींत तडफ भरलेली आहे,

आणि त्याच्याकडे पाहिल्याबरोबर हा अगदीं सणसणीत प्रकृतीचा मनुष्य असला पाहिजे अशी खात्री पटते. त्याचे केंस जरा पिंगटसर आहेत. एकही केंस पांढरा झालेला नाहीं. आणि त्याचे ते पाणीदार पिंगे डोळे इतके अवर्णनीय आहेत, कीं असले डोळे मीं कधीं पूर्वी पाहिल्याचें मला आठवत नाहीं. गर्विष्ठपणाची किंवा अहंमन्यतेची अंधुक देखील छटा त्याच्या वागण्यांत दिसून येत नाहीं. खरोखरीचे मोठे लोक असतात तसा डी व्हॅलेरा आहे. साधेपणा, प्रेमळपणा आणि अंतःकरणाचा मोकळेपणा यांचा तो मूर्तिमंत पुतळा आहे. 'किंग आल्बर्ट किंवा प्रिन्स ऑफ वेल्स यांना भेटण्यापेक्षां तुम्हांला भेटण्याची मला शतपट अधिक उत्कंठा होती' असें मीं त्याला म्हटलें तेव्हां त्यानें हास्य केलें. आयरिश स्वातंत्र्याचा मी पुरस्कर्ता नसतों तरी डी व्हॅलेराचा मी पुरस्कर्ता झालों असतों. त्याच्या उमदेपणाला सीमा नाहीं !"

या वर्णनाप्रमाणें सर्वच अमेरिकन लोकांची डी व्हॅलेराविषयींची वृत्ति होती. त्याचें व्यक्तिवैशिष्ट्य आणि तो ज्या कार्यासाठीं झटत होता त्या कार्याचें पावित्र्य या दोहोंमुळें अमेरिकन लोकांच्या उत्साहाला भरतें आलें, व त्यांचें आयर्लंडविषयींचें प्रेम कळसाला पोंचलें. त्याचा जिकडे तिकडे सन्मान होत होता खरा, पण आपला स्वतःचा बडेजाव वाढवून घेण्याची त्याला यत्किंचितही इच्छा नव्हती. उलट निरनिराळ्या संस्थानांतून त्याची जाहीर मिरवणूक काढून लोकांनीं आनंदानें जयघोष केला तेव्हां "या जयघोषांतील प्रत्येक आरोळी आयर्लंडच्या स्वातंत्र्या-साठींच असली तर मला अधिक आनंद होईल" असें त्यानें प्रत्येक वेळीं बोलून दाखविलें. त्याच्या असाधारण बुद्धिमत्तेविषयीं आदर प्रगट करण्याकरितां निरनिराळ्या युनिव्हर्सिटयांनीं व कॉलेजांनीं त्याला सन्मानाच्या पदव्या अर्पण केल्या त्या वेळीं देखील "हा सर्व सन्मान माझा नसून माझ्या स्वदेशाचा आहे असें मी समजतों" असेच उद्गार त्याच्या तोंडून बाहेर पडले.

डी व्हॅलेरा अमेरिकेस येण्यापूर्वी 'डेल आयरेन'नें आयरिश प्रजासत्ताक राज्यासाठीं दहा लाख पौंडांचें कर्ज उभारण्याचा ठराव पास केला होता. यांपैकीं पांच लाखाचे बाँड ताबडतोब बाहेर काढावयाचे होते व ते निम्मे आयर्लंडमध्यें व अर्धे अमेरिकेमध्यें खपवावयाचे होते. अमेरिकेंतील आयरिश लोकांच्या निरनिराळ्या संस्थांनीं ही रक्कम गोळा करावयाचें काम जारीनें सुरू केल्यामुळें डी व्हॅलेराला या कामांत फारसें लक्ष घालावें लागलें नाहीं. इतकेंच नव्हे, तर अमेरिकेंत हें काम इतकें झपाट्यानें व्हावयास लागलें, कीं २५ लाखांची रक्कम केव्हांच जमून तयार झाली व पूर्वीं इच्छांकीं ठेवलेला आंकडा मुद्दाम वाढवावा लागला. पण फंड जमविणें हें डी व्हॅलेराचें मुख्य कार्य नव्हतें. सॅन फ्रान्सिस्को येथील ५०००० श्रोतृसमुदायाच्या सभेमधील अत्यंत वक्तृत्वपूर्ण भाषणांत त्यानें आपल्या कार्याचा उल्लेख करतांना असें म्हटलें, कीं,

"मी अमेरिकन लोकांकडे मुद्दाम आलों आहे, व अमेरिकन लोकांनीं मला जें सहाय्य केलें आहे त्यामुळें माझें केव्हांच समाधान झालें आहे. तुमच्याकडून आयर्लंडला द्रव्याची मदत मिळवावी हा माझा इकडे येण्यांत एक उद्देश होता हें खरें; पण या देशांत येऊन मला जें कार्य प्रामुख्यानें करावयाचें तें हें, कीं आयरिश प्रजासत्ताक राज्याला तुमची मान्यता मिळवावयाची. द्रव्याचें विशेष महत्त्व नाहीं. आमचा देश मोठा आहे, समृद्धही आहे. द्रव्यबळाची आम्हांला फारशी ददात नाहीं. आमचें प्रजासत्ताक राज्य तुम्ही मान्य केलें नाहींत व मला ढीगभर द्रव्य दिलेंत तर त्यांत मला काडीइतकेंही समाधान होणार नाहीं. उलट मला एक पै देखील न देतां आमच्या राज्याला तुम्ही आपली मान्यता दर्शविलीत तर त्यांत मला शतपट अधिक समाधान होऊन मी मोठ्या आनंदानें स्वदेशीं परत जाईन."

ठिकठिकाणच्या सभांमधून बोलतांना डी व्हॅलेरा आयरिश राज-

कारणाचें यथायोग्य स्वरूप लोकांना समजावून देत असे व त्याची भाषा व विचारसरणी इतकी सरळ व स्पष्ट असे, कीं सभेंतील प्रत्येक मनुष्य त्याच्या बाजूचा होऊन घरीं परत जात असे. तो म्हणे,

"आम्ही अमेरिकेकडून आमच्या प्रजासत्ताक राज्याला मान्यता मागतों याचा अर्थ असा मुळींच नव्हे, कीं इंग्लंडशीं अमेरिकेनें युद्ध करावें अशी आमची इच्छा आहे. आयर्लंडचें स्वातंत्र्य कबूल करणें म्हणजे कांहीं इंग्लंडविरुद्ध हत्यार उपसणें नव्हे. आधीं अमेरिकेशीं युद्ध करण्याची इंग्लंडला इच्छाच नाहीं. आणि युद्धाची इच्छा असलीच तरी आज इंग्लंड इतकें दरिद्री झालेलें आहे, कीं त्या युद्धासाठीं प्रथम अमेरिकेकडूनच कर्ज काढणें त्याला भाग पडेल. तेव्हां आयर्लंडचा प्रश्न सोडविण्यास अमेरिकेनें मदत केलीच पाहिजे. आज सतत ७०० वर्षें इंग्लंडशीं आम्ही झगडत आहोंत, आणि इंग्लंड आमच्या कारभारांतून आपला हात पुरतेपणीं काढीपर्यंत आम्ही असेच झगडत राहणार! वस्तुतः आमचें व इंग्लंडचें कांहीं वैर नाहीं. इंग्लंडनें आमचें स्वातंत्र्य कबूल केलें, कीं आज वरवर जें वैर दिसत आहे तेंदेखील ताबडतोब नाहींसें होईल. आम्ही इंग्लंडशीं प्रेमानें हस्तांदोलन करावयास तयार आहोंत. फक्त स्वयंनिर्णयाचें तत्त्व आमच्या बाबतींत इंग्लंडनें मान्य केलें पाहिजे, व आमच्यावर कोणाची व कोणत्या स्वरूपाची सत्ता असावी तें आमचें आम्हांला ठरवूं दिलें पाहिजे. आयर्लंडचा एक मोठा प्रश्न आहे असा इंग्रज सरकार उगीच ओरडा करीत असतें. जो प्रश्न मुळीं वस्तुतः नाहींच त्याच्या बिकटपणाविषयीं बाऊ दाखविण्यांत काय अर्थ आहे? धर्माचा प्रश्न, बेलफास्टचा प्रश्न, वगैरे सारे प्रश्न केवळ बतावण्या आहेत. कांहीं तरी करून मुठींतील सत्ता कायम ठेवण्यासाठीं या बतावण्या इंग्लंड करीत आहे. आयर्लंड-मधील अंतर्गत भानगडी म्हणून ज्या गोष्टींकडे बोट दाखविण्यांत येतें त्या साऱ्या गोष्टींचा आम्हांला पूर्ण स्वातंत्र्य मिळतांच आम्ही चुटकी-

सरसा समाधानकारक निकाल लावून टाकूं. आम्ही स्वतंत्र झालों तर त्यायोगें ब्रिटिश साम्राज्याच्या सामर्थ्यांत कोणत्याही प्रकारचें न्यून न येतां आमच्या भरभराटीमुळें इंग्लंडला एक नवा आधार मिळाल्या-सारखेंच होईल. आमचे दोघांचेही हितसंबंध निगडित होऊन आम्ही एकीनेंच वागूं व एकमेकांचा एकमेकाला कल्पनातीत उपयोग होईल."

अशा तऱ्हेच्या स्पष्ट, सुसंगत आणि कोणाच्याही बुद्धीला पटेल अशा विचारसरणीनें डी व्हॅलेराचीं भाषणें भरलेलीं असल्यामुळें त्यांचा अमेरिकन लोकांवर फारच परिणाम होत असे. डी व्हॅलेरा व त्याचा पक्ष आयर्लंडसाठीं भलभलत्या मागण्या करतो, असा ब्रिटिश लोकांनीं केलेला ओरडा आजपर्यंत त्यांच्या कानांवर नेहमीं येत असे. पण आतां प्रत्यक्ष डी व्हॅलेराचीं भाषणें त्यांनीं ऐकलीं तेव्हां ब्रिटिश लोकांचा तो ओरडा निरर्थक आहे व डी व्हॅलेराची मागणी सर्वथैव समर्थनीय आहे अशी त्यांची पुरती खात्री पटली.

डी व्हॅलेरा जेथें जेथें जाई, तेथें तेथें त्याचें अननुभूत स्वागत होत असे. अमेरिकन राजकरणांत इतक्या उत्साहाची खळबळ पूर्वीं फारच थोड्या प्रसंगीं दिसून आली असेल. संस्थानांचे गव्हर्नर, शहरांचे अध्यक्ष, हायकोर्टांचे न्यायाधीश, सेनेटर, धर्मगुरु, असे प्रत्येक पंथाचे, मताचे व दर्ज्याचे लोक डी व्हॅलेराचा सन्मान करण्यांत अहमहमिकेनें पुढें होत होते. डी व्हॅलेराचें काम निःसत्व करण्यासाठीं वर्तमानपत्रांच्या व इतर मार्गांनीं आपल्या बाजूची चळवळ अमेरिकेंत चालू ठेवण्यास इंग्लंडनें कमी केलें नाहीं. या कामासाठीं लॉर्ड नॉर्थक्लिफ यांनीं कोट्य-वधी रुपये बाजूला काढून ठेवले. ग्रे, ऑक्लंड गीड्स यांच्यासारखे धूर्त मुत्सद्दी अमेरिकेस मुद्दाम पाठविण्यांत आले होते. पण डी व्हॅलेरापुढें त्यांचें तेज फिकें पडलें. त्यांच्याकडे कोणी ढुंकून देखील पाहिलें नाहीं. डी व्हॅलेराच्या मार्गांत अडचणी उपस्थित करण्यास ब्रिटिशांचे एजंट सदैव तयार असत. परंतु डी व्हॅलेराच्या लोकप्रियतेच्या लाटेपुढें त्यांचे

हे प्रयत्न पार नामशेष होऊन जात. याबद्दलचें एक उदाहरण मोठें मनोरंजक आहे. शार्लोटी येथें डी व्हॅलेराचें जाहीर व्याख्यान व्हावयाचें होतें. पण ब्रिटिश एजंटांनीं सर्व पत्रकारांना फितवून ठेवल्यामुळें त्या सर्वांनीं व्याख्यानाच्या आगाऊ नोटिसा आपल्या पत्रांत छापण्याचें नाकारिलें. या युक्तीनें डी व्हॅलेराचें व्याख्यान बंद पडेल अशी ब्रिटिश एजंटांची अपेक्षा होती. पण प्रतिपक्षी कोणत्या मगदुराचा होता हें त्या बिचाऱ्यांच्या ध्यानांत नव्हतें. वर्तमानपत्रांचा तो संप पाहतांच डी व्हॅलेराबरोबर नेहमीं फिरणारा चार्लस मॅक्स्विनी हा ताबडतोब शार्लोटी येथें गेला, व अवघ्या चोवीस तासांत एका चार पानी वर्तमानपत्राचा खास अंक लिहून काढून त्यानें त्याच्या दहा हजार प्रति प्रसिद्ध केल्या. अमेरिकेंतील आयरिश रहिवाशांनीं त्या प्रति रस्तोरस्तीं विकल्या, ठरल्याप्रमाणें सभा झाली व अत्यंत यशस्वी रीतीनें ती पारही पडली, आणि ब्रिटिश एजंटांच्या फजितीला पारावार उरला नाहीं.

आपल्या एजंटांची डी व्हॅलेराच्या लोकप्रियतेच्या लाटेपुढें अनुकंपनीय स्थिति होत असलेली पाहून तसले एजंट पाठविण्याचें वैय्यर्थ्य ब्रिटिश सरकारला लवकरच पटलें, व मग त्यांनीं निराळाच कावा योजण्याचें ठरविलें. स्वराज्यविरोधी म्हणून विख्यात असलेल्या अल्स्टर परगण्यांतील प्रॉटेस्टंट धर्माचे कांहीं बगलबच्चे निवडून काढून ब्रिटिश सरकारनें त्यांचें एक शिष्टमंडळ बनविलें व डी व्हॅलेराचें कार्य हाणून पाडण्यासाठीं त्या शिष्टमंडळाची अमेरिकेस रवानगी केली. कूट नांवाचे पार्लमेंटचे एक सभासद या शिष्टमंडळाचे प्रमुख होते. एकीकडे डी व्हॅलेरा आयर्लंडची स्वराज्याकांक्षा अमेरिकन लोकांस पटवून देत असतां या शिष्टमंडळानें आयर्लंड इंग्लंडच्या सत्तेखालीं नांदावयास आनंदानें तयार आहे असें सांगण्याचा सपाटा लावला. आयर्लंडमधील मूठभर चळवळे लोकच काय ते ब्रिटिश राज्याशीं भांडून स्वराज्याची हाकाटी करीत आहेत असा संभ्रम अमेरिकन लोकांच्या मनांत उत्पन्न व्हावा,

असा ब्रिटिश सरकारचा डाव होता. पण डी व्हॅलेरानें इतकें उत्तम कार्य आधींच करून ठेविलें होतें, कीं असल्या गोष्टीनें अमेरिकन लोकांची फसवणूक होणेंच शक्य नव्हतें. रेव्हरंड डॉक्टर ग्रॅटन मायथन यांनीं तर असें जाहीरपणें बोलून दाखविलें, कीं १८६१ मध्यें गुलामगिरी नाहींशी करण्यासाठीं झालेल्या युद्धाच्या वेळीं ज्याप्रमाणें कांहीं निर्दय, स्वार्थसाधू लोक गुलामगिरीची तरफदारी करीत होते त्याप्रमाणेंच हे अल्सटरहून आलेले प्रतिनिधि स्वार्थासाठीं देशाभिमान विकून काम करीत आहेत. त्याचप्रमाणें रेव्हरंड डॉक्टर अर्विन यांनीं लोकांना स्पष्ट बजाविलें, कीं या शिष्टमंडळाला 'राजकारणांतील एक लहानसा सरकारी पक्ष' यापलीकडे कांहीं किंमत नाहीं.

अल्स्टरच्या स्वराज्यविरोधासंबंधीं एखाद्या सभेंत बोलावयाचा प्रसंग आला म्हणजे डी व्हॅलेरा म्हणे,

"अल्स्टरचा हा प्रश्न केवळ ब्रिटिश सरकारच्या चिथावणीनें उद्‌भूत झालेला आहे. ब्रिटिश राज्याशीं आयर्लंड संयुक्त आहे त्यांतच आमचा संतोष आहे असें अल्स्टरवाले सांगतात खरे; पण इंग्लंड व आयर्लंड यांची संयुक्तता कोणत्या प्रकारची आहे तें तुम्हांस माहीत आहे काय? मासेमाऱ्याच्या गळाला मासा अडकला म्हणजे त्या गळाची व माशाची जी संयुक्तता असते तीच आज इंग्लंड आयर्लंडची आहे. ही संयुक्तता कितीही फायद्याची असली तरी ती आम्हांस नको आहे. आयर्लंडच्या सिंहासनावरून ब्रिटिश राज्य उठल्यानंतर मग त्यांच्या भरभराटीनें आम्हांस आनंद होईल. पण आज त्यांचे आमच्यावर अनन्वित जोर जुलूम चाललेले असतांना स्वत:ला संयुक्त म्हणवून घेऊन त्यांच्या पराक्रमाचे, कीर्तीचे किंवा यशाचे वांटेकरी होण्याची आमची लवमात्र इच्छा नाहीं."

डी व्हॅलेराच्या असल्या मुद्देसूद भाषणांच्या माऱ्यापुढें अल्स्टरवाल्या शिष्टांच्या वायबारांचा कितीसा टिकाव लागणार? येथें आपली डाळ

शिजणें शक्य नाहीं असें त्यांस लवकरच वाटलें, आणि रडकीं तोंडें करून ते आयर्लंडला परत गेले.

ब्रिटिश लोकांनीं वाटेल तें केलें तरी त्यांच्या भुंकण्याकडे लक्ष न देतां गजेंद्राप्रमाणें आपली चाल चालू ठेवण्याचा डी व्हॅलेराचा निश्चय होता. त्याला पुष्कळ कामें करावीं लागत खरीं. पण सगळ्या कामांत त्याचा उद्देश एकच होता. वुल्फ टोनच्या शब्दांत त्या उद्देशाचें वर्णन होण्यासारखें आहे. वुल्फ टोन एकदां म्हणाला, 'या जुलमी राज्याचें उच्चाटण करणें, अनंत दुःखांची परंपरा प्रसवणारा साम्राज्यसंबंध तोडून टाकणें, आणि माझ्या प्रिय देशाचें स्वातंत्र्य प्रस्थापित करणें हे माझे उद्देश आहेत!'

साम्राज्यांतर्गत स्वराज्यानें, किंवा होमरूलनें आयर्लंडचें समाधान कां होत नाहीं याविषयीं डी व्हॅलेरा प्रत्येक सभेंत मोठें मार्मिक विवेचन करी. तो म्हणे,

" संपूर्ण स्वातंत्र्याचा आयरिश लोकांना जन्मसिद्ध हक्क आहे, व त्याखेरीज इतर कोणत्याही गोष्टीनें त्यांचें समाधान होणार नाहीं. आम्हांला किती स्वातंत्र्य असावें त्याचें मोजमाप ठरविण्याचा इंग्लंडला काय अधिकार आहे? आमच्या राष्ट्रीय मानापमानाचा सारा हिशोब चुकता झाल्याखेरीज आम्ही स्वस्थ बसणार नाहीं. याचाच अर्थ असा, कीं आमचें प्रजासत्ताक राज्य सर्वत्र मान्य झालें पाहिजे. इंग्लंडशीं संयुक्तता व विभक्तता या दोहोंच्या मधली कांहीं एखादी अवस्था आहे हें मला समजतच नाहीं. पूर्ण गुलामगिरी किंवा पूर्ण स्वातंत्र्य या दोनच अवस्था माझ्या मनाला समजतात. एक इंग्लंड आम्हांला पूर्णपणें गिळून टाकून आमचें राष्ट्रीयत्व पार नष्ट तरी करून टाकील, किंवा इंग्लंडचा संबंध सर्वस्वी तोडून टाकून आम्ही पूर्ण स्वातंत्र्याचा उपभोग तरी घेऊं. या दोनच गोष्टी शक्य आहेत. आयर्लंडला हवें असेल तर ब्रिटिश साम्राज्यांतर्गत स्वराज्य द्यावयास आमची तयारी आहे असें इंग्लंड नेहमीं म्हणत असतें. पण असें म्हणणें पोरकट-

पणाचें व अर्थशून्य आहे. एखाद्या कैद्याला स्वातंत्र्य देऊन कोठडींत डांबण्यापैकींच ही गोष्ट आहे."

आयर्लंडच्या प्रजासत्ताक राज्याला मान्यता दर्शविण्यास अमेरिकन सरकारला तुम्ही भाग पाडा असें डी व्हॅलेरा अमेरिकन लोकांना प्रत्येक भाषणांत सांगत होता. आपल्या भाषणांत तो कधीं कधीं हिंदुस्थान, ईजिप्त व कोरिआ यांचाही उल्लेख करीत असे, व तेथेंही स्वातंत्र्यासाठीं झगडा कसा चालला आहे तें सांगत असे. पण डी व्हॅलेरानें अमेरिकेंत असतांना सर्वांत मोठी कामगिरी केली ती ही कीं, पॅरिस येथें दोस्त राष्ट्रांनीं जो राष्ट्रसंघ निर्माण केला त्याची त्यानें कंबर पार मोडून टाकली. पॅरिस येथें कायम होणाऱ्या तहाविषयीं पहिल्यापासूनच अमेरिकन लोकांना फारसा विश्वास नव्हता. अशा स्थितींत डी व्हॅलेराच्या चळवळीची भर पडतांच लोकमताचा प्रवाह त्या तहाविरुद्ध चांगलाच जोरानें वाहूं लागला. त्या तहाची त्यानें इतकी कांहीं सुंदर फोड करून दाखविली, कीं सर्वजण त्या तहाचा तिरस्कार करूं लागले. तहांतील दहाव्या कलमावर डी व्हॅलेराचा सर्व कटाक्ष होता. त्या कलमाप्रमाणें असें ठरविण्यांत आलें होतें, कीं राष्ट्रसंघांत जीं राष्ट्रें सामील झालीं त्यांनीं एकमेकांच्या राज्याचा प्रदेश जसाच्या तसा कायम ठेवण्यास एकमेकांस मदत करावी. या कलमाचा उघड उघड अर्थ असा होत होता, कीं ब्रिटिश साम्राज्य जसेंच्या तसें कायम ठेवण्यासाठीं इंग्लंडला युद्ध करावें लागल्यास त्या युद्धांत मदत करण्याचें इतर राष्ट्रांनीं इंग्लंडला वचन दिलें. या कलमाला उद्देशून डी व्हॅलेरा म्हणे,

"हा राष्ट्रसंघ म्हणजे आजच्या सत्ताधाऱ्यांची सत्ता आणि आज जे गुलाम आहेत त्यांची गुलामगिरी तशीच कायम रहावी यासाठीं निर्माण केलेली एक संस्था आहे. चोरांच्या कंपूनें परस्पर सहाय्यासाठीं केलेल्या नियमांपेक्षां या राष्ट्रसंघाच्या नियमांची अधिक किंमत नाहीं.

तुमच्या अमेरिकन राष्ट्रानें असल्या तहाच्या खर्ड्यावर सही केली तर आयर्लंडच्या पायांतील शृंखला ठोकून घट्ट बसविण्याचें घोर पातक तुम्ही केलें असेंच सारें जग म्हणेल."

याचा परिणाम असा झाला, कीं तहावर सही करण्याचें अमेरिकन सेनेटनें साफ नाकबूल केलें.

डी व्हॅलेरानें अमेरिकेंत केलेल्या कार्याचें सांगोपांग वर्णन करावयाचें म्हटलें तर त्याविषयीं एक स्वतंत्रच ग्रंथ लिहावा लागेल. त्यानें एकंदर ८००० मैलांचा प्रवास केला, रोज अठरा अठरा तास काम केलें, आणि भाषणें कितीं केलीं त्याला तर गणतीच नाहीं. त्याची कीर्ति जगाच्या कानाकोपऱ्यापर्यंत जाऊन पोंचली. स्वतंत्र, परतंत्र सर्व देशांतील लोकांना त्याचे शब्द पटले. दूरदूरच्या देशांतून त्याला अभिनंदनपर संदेश आले. अमेरिकन रहिवाशांत हजार प्रकारच्या धर्मांच्या, मनोवृत्तींच्या व मताच्या लोकांचा अंतर्भाव झालेला असल्यामुळें त्यांची अंतःकरणें काबीज करण्यास पहिल्या प्रतीच्या मुत्सद्याची व वक्त्याची जरूर होती; व तें काम डी व्हॅलेरानें इतक्या यशस्वी रीतीनें केलें, कीं त्यानें तोंडांतून बाहेर काढलेला एकही शब्द परत घेण्याची त्याच्यावर कधीं पाळी आली नाहीं. अमेरिकेंतील प्रत्येक विद्वानानें व बड्या माणसानें डी व्हॅलेराविषयीं धन्योद्गारच काढले. प्रसिद्ध रशियन मूर्तिकार ओस्कार यांपोल्स्की यानें असें बोलून दाखविलें, कीं, "इमॉन डी व्हॅलेरानें पेटविलेली ज्योत कधींच विझावयाची नाहीं!" त्या वेळीं अमेरिकेंत असलेले आपले देशभक्त लाला लजपतराय यांनीं तर असे उद्गार काढले, कीं, "१९२५ सालीं आयर्लंडपेक्षां हिंदुस्थानांतच सिन फेन मताचे लोक अधिक उत्पन्न होतील!" डी व्हॅलेराच्या भाषणांचें अमेरिकन लोकांना विलक्षण वेड लागलें होतें. 'अमेरिका' नांवाच्या पत्रांत रेव्हरंड जेम्स डॅली यांनीं डी व्हॅलेराविषयीं फारच मार्मिक वर्णन केलें होतें. त्या वर्णनांतील खालील उतारा वाचण्याजोगा आहे.

" स्वातंत्र्यार्थ सुरू असलेल्या या आयरिश लढाईंत इमॉन डी व्हॅलेरा आपल्या अंगच्या गुणांनीं उत्कृष्ट धुरंधर ठरला आहे. आयरिश लोक मूळचे भावनाप्रधान असूनही त्यांना आंवरून धरण्याचें बिकट काम त्यानें केलें आहे; व शत्रूनें कितीही भंडावून सोडण्याचे प्रयत्न केले तरी स्वतःपुढें व देशापुढें निश्चित कार्यक्रम मांडून शांतवृत्ति न सोडतां, तो कार्यक्रम पार पाडण्यासाठीं तो रात्रंदिवस झटत आहे. आज जवळ जवळ वर्षभर तो आमच्यांत आहे. त्याच्या शिरावरील कार्य किती कठीण! पण पहावें तों तें कार्य करण्याची त्याची शैली अशी अजब आहे, कीं ती पाहून त्याचे शत्रू रागानें वेडे होत असतील! त्याच्या कार्याचा विघात करावयास किती लोक टपलेले होते, पण त्या सर्वांच्या नाकावर टिच्चून त्यानें आपली कामगिरी केली! एखाद्या मुत्सद्याला अभिमान वाटेल अशी कामगिरी डी व्हॅलेरानें केली यांत संशय नाहीं. त्याची बुद्धि विलक्षण आहे. त्याच्या मेंदूंत गणित विषय जणूं भिनला आहे. इंग्लंडशीं वैर करतांना देखील त्यानें त्या वैराचा गणिती हिशोब केला आहेसें वाटतें. थोड्याच वर्षांपूर्वीं डब्लिन शहरीं देशकार्य करीत असतांना प्राण गमावण्याचा त्याच्यावर प्रसंग आला होता. त्या वेळच्या बंडांत सर्वांत शेवटीं शस्त्र खालीं ठेवणारा हा होता. त्याच्या जिवावर अनेक प्रसंग गुदरले आहेत, इंग्रजांच्या तुरुंगांत तो खितपत पडलेला आहे, तुरुंगांतून पळून जातांना आपले प्राण त्यानें धोक्यांत घातले आहेत, आणि इंग्रजी न्यायाला धाब्यावर बसवून त्यानें कित्येक दिवस अज्ञातवासांत काढले आहेत. इतकेंच नव्हे, तर निजलेल्या आयर्लंडला जागें करण्यासाठीं, आणि साऱ्या जगांत लोकसत्तेचा झेंडा फडकविण्यासाठीं रक्ताचा सडा शिंपडण्याची वेळ जर आतां यापुढें आली तर सर्वांत पुढें पाऊल डी व्हॅलेराचेंच पडेल.

"नवल हें, कीं इतक्या जाज्वल्य भावनांनीं डी व्हॅलेराचें अंतःकरण भरलेलें असतांनाही आयरिश स्वातंत्र्यार्थ चाललेल्या झगडयांत त्याचें

काम थंडपणानें व धिम्या अंतःकरणानें चाललेलें आहे. इंग्लंडविषयीं निष्कारण द्वेषबुद्धि त्याच्या अंतःकरणांत नाहीं. मत्सर, दुष्टावा, असल्या विकारांना त्याच्या स्वभावांत जागा नाहीं. तो एक अलौकिक ध्येयपूजक आहे. त्या ध्येयाच्या तेजानें त्याच्या मुखमंडलावर प्रभा फांकल्यासारखी दिसते. आपलें ध्येय शेवटीं लोकांना पटणार अशा दृढ विश्वासाचें तेज त्याच्या दृष्टींत चमकतें, आणि आज त्या ध्येयाचें शिक्षण देण्यासाठीं लोकांचीं आर्जवें करावयास आपण तयार असलेंच पाहिजे अशा विचारानें त्यानें आपलें कार्य धडाडीनें चालू ठेविलें आहे.

"त्याच्या अंगचा सर्वांत प्रमुख गुण म्हणजे त्याचें मार्दव. मोठे लोक नेहमीं मृदु असतात असें नाहीं. 'वज्राहून कठीण व लोण्याहून मृदु' ही अवस्था फक्त संतांनाच साध्य होते. इमॉन डी व्हॅलेरा हा एक संत आहे!"

डी व्हॅलेराच्या कित्येक भाषणांस हजर राहिल्यानंतर आर्चबिशप मॅनिक्स यांनीं एकदां असें म्हटलें, कीं "डी व्हॅलेराच्या भाषणानें जितका प्रचंड उत्साह श्रोतृसमुदायांत उत्पन्न होतो तितका दुसऱ्या कोणाच्याच भाषणानें उत्पन्न झालेला मीं आजपर्यंत पाहिला नाहीं. आयरिश प्रजासत्ताक राज्याविषयीं डी व्हॅलेरा बोलूं लागला, कीं देशाभिमानाचें वारें त्याच्या अंगांत शिरून तो इतक्या भावनापूर्ण आवेशानें भाषण करी, कीं कित्येक वेळां श्रोत्यांच्या नेत्रांतून प्रेमाश्रु वाहूं लागत." एका सभेची हकीगत देतांना एका वर्तमानपत्रानें असें म्हटलें होतें, कीं—

"आयरिश रिपब्लिकला मान्यता देण्याची केवढी अनावार इच्छा लोकांच्या मनांत आहे त्याचें काल शिकॅगो येथील सभेंत पूर्ण प्रत्यंतर आलें. कालच्या सभेला एक लाख लोकसमुदाय लोटला होता. सभास्थान गर्दीनें कोसळावयास टेकलें होतें, आणि बाहेर रस्त्यावर लोकांची अतोनात खेंच उडाली होती. आयरिश रिपब्लिकचा अध्यक्ष इमॉन डी व्हॅलेरा हा बोलावयास उठला तेव्हां लोकांनीं इतक्या प्रचंड जयघोषानें त्याचें स्वागत केलें, कीं आजपर्यंत कोणाचें असें स्वागत झालें

असेल किंवा नाहीं याविषयीं शंका वाटते. टाळ्यांच्या गजरानें व नाना प्रकारच्या आरोळ्यांनीं सभास्थान हादरून गेलें. अर्धा तासपर्यंत हा जयघोष सारखा चालू होता. डी व्हॅलेरा नुसता उभा राहिला होता. त्या घोषापुढें त्याला बोलणें शक्यच नव्हतें. शेवटीं नुसत्या जयघोषानें तृप्त न होऊनच कीं काय, लोकांनीं त्याला खांद्यावर उचलून घेतला, अमेरिकन व आयरिश निशाणें जिकडे तिकडे फडकविण्यांत आलीं, डी व्हॅलेरानें चुंबन घ्यावें म्हणून तान्हीं मुलें वर उचलून त्याच्या हातीं देण्यांत आलीं, आणि त्या अथांग जनसमूहांत टाळ्या, आणि आनंदाच्या आरोळ्या यांचा एकच हलकल्लोळ उडाला!"

डी व्हॅलेरा इकडे अमेरिकेंत याप्रमाणें कार्य करीत असतांना तिकडे आयर्लंडमध्यें काय परिस्थिति होती? तिकडे इंग्रज सरकारनें जुलुमाची व अन्यायाची परमावधि करून सोडली होती. ऐन मध्यरात्रीं लोकांच्या घरांवर छापे घालून त्यांची धरपकड होत होती. कोणत्याही प्रकारची चळवळ केली नसतां शेंकडों लोकांना तुरुंगांत घालण्यांत येत होतें. तात्पुरतीं अस्तित्वांत आलेलीं कोर्टें भराभर क्रूर, रानटीपणाच्या शिक्षा फ़र्मावीत होतीं. खाजगी घरांना, नगरभवनांना, गिरण्यांना, कारखान्यांना व शेतांनादेखील खुशाल आगी लावल्या जात होत्या. सभ्य लोकांना कांहीं कारण नसतां फटके बसत होते. कांहींची कत्तलही होत होती. आणि हे सर्व भयंकर अत्याचार सरकारच्या लष्करांतील शिपाईच करीत होते. या अनाचारांचा जिकडून तिकडून तीव्र निषेध होत होता. पण सरकारच्या मनांत दयेचा किंवा धर्माचा अंशही उरला नसल्यासारखें सरकारचें अमानुष धोरण अव्याहत चालूच होतें. याच वेळीं कॉर्कचा मेयर टेरेन्स मॅक्स्विनी व इतर अनेक देशभक्त कारागृहांत अन्नत्याग करून राहिले होते, व त्यांच्या अन्नत्यागाकडे लक्ष न देतां सरकार त्यांना सोडण्याचें नाकारीत होतें. या अन्नत्यागाच्या व्रतांतच शेवटीं मॅक्स्विनीच्या प्राणांची आहुति पडली, व त्या विलक्षण बातमीनें साऱ्या

जगाचें अंतःकरण कंपित झालें. मॅक्स्विनीला सरकार ज्या रीतीनें वागवीत होतें तिचा निषेध करण्यासाठीं डी व्हॅलेरानें न्यू यॉर्कमध्यें पुष्कळ सभा भरविल्या, व मॅक्स्विनीच्या देशभक्तीबद्दल अत्यंत गौरवाचे व उत्तेजनाचे संदेश त्यानें आयर्लंडमध्यें पाठविले. फादर डॉमिनिक यांच्या नांवानें पाठविलेला एक संदेश असा होताः—

"माझ्या तर्फे आपण लॉर्ड मेयर मॅक्स्विनीचें सप्रेम अभिनंदन करावें. सारें आयरिश राष्ट्र त्यांचें ऋणी आहे. त्यांची स्फूर्ति त्यांच्या पश्चात्‌ही राष्ट्रांत कायम राहील व तिच्यामुळें आत्मक्लेशाचें नवें तेज लोकांच्या अंतःकरणांत उत्पन्न होईल. मॅक्स्विनीच्या अतुल स्वार्थत्यागाचीच पवित्र शपथ घेऊन आम्ही त्यांचे संवगडी अशी प्रतिज्ञा करतों, कीं त्यांनीं आपले प्राण व्यर्थ खर्चीं घातले असें आम्ही होऊं देणार नाहीं."

या संदेशाला फादर डॉमिनिक यांजकडून डी व्हॅलेराच्या नांवानें उत्तर आलें तें असेंः—

"आपल्या अभिनंदनपर संदेशाबद्दल मॅक्स्विनी अत्यंत आभारी आहेत. आरंभिलेल्या आत्मयज्ञांत आपल्या धीराच्या शब्दांचें त्यांना बहुमोल सहाय्य होईल. त्यांनीं प्रभूवर हवाला टाकला आहे, आणि आपल्या प्राणत्यागानें आयरिश रिपब्लिकच्या कार्याची प्रगति होईल अशी त्यांची दृढ श्रद्धा आहे. तुमच्या अमेरिकेंतील कार्यांत प्रभू तुमचा पाठीराखा असो एवढीच त्यांची प्रार्थना आहे."

आयर्लंडमध्यें अशी निकराची परिस्थिति उत्पन्न झालेली पाहून तिकडे परत जावेसें डी व्हॅलेराला वाटूं लागलें. त्याची अमेरिकेची सफर पूर्णपणें यशस्वी झाली होती. खुद्द अमेरिकन सेनेटनें प्रत्यक्ष ठरावाच्या रूपानें जरी अजून आयरिश प्रजासत्ताक राज्याला मान्यता दिली नव्हती, तरी साऱ्या अमेरिकन जनतेची मान्यता त्यानें पूर्णपणें मिळविल्यामुळें तो ज्या कार्यासाठीं मुख्यतः अमेरिकेस आला तेंही आतां झाल्यासारखें होतें. हा सर्व विचार करूनच डी व्हॅलेराचें मन

आयर्लंडकडे ओढ घेऊं लागलें. आयर्लंडमध्यें परत प्रवेश करणें अशक्य होतें हें तो जाणून होता. आयर्लंडभोंवतीं इंग्रजी आरमाराचा कडेकोट वेढा आहे, व लॉइड जॉर्जची परवानगी मिळविल्याखेरीज त्या वेढ्यांतून वाट मिळणें अगदीं असंभवनीय आहे हेंही त्याला ठाऊक होतें. पण असल्या अडचणींचा डी व्हॅलेरापुढें कधींच टिकाव लागला नाहीं. लिंकनच्या तुरुंगांतून जो निसटला, आणि ब्रिटिश आरमाराच्या हातावर तुरी देऊन जो सहा महिन्यापूर्वी आयर्लंडमधून अमेरिकेस आला, त्याला अमेरिकेंतून आयर्लंडमध्यें जातांना ब्रिटिश आरमाराच्या कोंडीची काय पर्वा वाटणार? आयरिश राष्ट्रांतील स्फूर्ती-प्रमाणेंच डी व्हॅलेरालाही थोपवून धरणें कठीण आहे असें डी व्हॅलेरानें मागें दोन वेळां ब्रिटिश मुसत्द्यांना दाखविलें होतें. तीच गोष्ट त्यानें आतां तिसऱ्यांदा त्यांना पटविली.

प्रकरण सहावें

## तह जवळ आला

शुक्रवार, तारीख २४ डिसेंबर १९२० रोजीं डी व्हॅलेरानें आयर्लंडच्या किनाऱ्यावर पुन्हां पाय ठेवला. तो पूर्वी जसा अकस्मात् अमेरिकेस गेला तसाच तो एकाएकीं आयर्लंडमध्यें प्रगट झाला. इंग्रज सरकारनें डी व्हॅलेराच्या हालचालीवर अतिशय जागता पहारा ठेवला होता. डिसेंबरच्या १३ व्या तारखेस त्यानें न्यू यॉर्क येथील अॅस्टोरिआ हॉटेल सोडलें त्या क्षणापासूनच त्याचा आयर्लंडमध्यें प्रवेश होऊं नये याविषयीं सरकारनें सर्व प्रकारची तजवीज केली. आयर्लंडच्या सर्व बंदरांवर पहाऱ्याचा बंदोबस्त करण्यांत आला आणि अमेरिकेहून येणाऱ्या प्रत्येक जहाजावर चढून त्याची कसून तपासणी करण्याचे अधिकाऱ्याना हुकूम सुटले. पण इतकें करूनही शेवटीं सरकारला डी व्हॅलेरानें चकविलें व तो २४ तारखेस अगदीं सुखरूप आयर्लंडमध्यें परत आला.

या वेळीं आयर्लंडमध्यें कोणत्या प्रकारची परिस्थिति होती त्याचें दिग्दर्शन मागील प्रकरणांत केलेंच आहे. डिसेंबर महिन्याच्या प्रारंभापासूनच आयर्लंडशीं समेटाचें बोलणें दुसऱ्याकडून बोलविण्याचा उपक्रम लॉइड जार्ज यांनीं सुरू केला होता. लॉइड जॉर्जच्या सांगण्यावरूनच सिन फेन पुढाऱ्यांच्या भेटी घेण्यासाठीं आर्चबिशप क्लून व इतर मंडळी डब्लिन शहरीं आली होती. दोन्ही पक्षांनीं तात्पुरता तह करून एकमेकांशीं लढणें थांबवावें असा समेट बहुतेक होत आला होता इतक्यांत बोनर लॉ यांच्या सल्ल्यावरून सरकारनें अशी अट घातली कीं, आयरिश लोकांनीं आपलीं हत्यारें सरकारच्या स्वाधीन करावीं. आयरिश रिपब्लिकच्या सैन्यानें ही अट साफ नाकबूल केली व होत आलेल्या तहाचा मनसुबा पार फिसकटून गेला. टोरी पक्षाचा बदसल्ला ऐकण्याऐवजीं आपण आपल्या मूळ बेताप्रमाणें वागलों असतों तर बरें

झालें असतें असा लॉइड जॉर्जला आतां पश्चात्ताप वाटावयास लागला. इंग्रज सरकारविरुद्ध चालविलेल्या युद्धांत लोकांचें सर्व प्रकारें इतकें अपरिमित नुकसान झालें होतें, कीं आतां हा झगडा थांबेल तर बरें अशी हळू हळू लोकांची वृत्ति व्हावयास लागली होती. अशा वेळीं लॉइड जॉर्जनें तहाचें बोलणें काढल्यास पदरांत पडेल तेवढा स्वराज्याचा हप्ता स्वीकारावयास युद्धाला कंटाळलेले आयरिश लोक तयार होण्याचा संभव होता. या तहाच्या भुलथापांनीं आयरिश लोकांत फाटाफूट होण्याचीही भीति होती. अशा वेळीं स्वदेशीं जाऊन जनतेला धीर दिला पाहिजे व आपल्या ध्येयापासून ते च्युत होत असतील तर त्यांचा तोल संभाळला पाहिजे असें वाटल्यामुळेंच डी व्हॅलेरा परत आला होता.

तो अगदीं वेळेवर येऊन ठेपला. त्यानें थोडी दिरंगाई केली असती तर कार्यनाश खास झाला असता. सरकारच्या व जनतेच्या झटापटीला या वेळीं फारच उग्र स्वरूप प्राप्त झालें होतें. फ्रान्सच्या रणांगणावरून परत आलेल्या सैनिकांची धाड सरकारनें आयरिश लोकांवर सोडून दिली होती. निराशा उत्पन्न करण्यासारखा प्रसंग येऊन ठेपला होता. परंतु जनतेचा डी व्हॅलेरावर इतका निःसीम विश्वास होता, कीं त्याच्या तोंडचे चार धीराचे शब्द ऐकल्याबरोबर लोकांना दुप्पट आवेश चढला, आणि डोकावून पाहणारा पराभव पार नष्ट होऊन जयाची चाहूल साऱ्या लोकांना ऐकूं यावयास लागली. स्वदेशांत परत आल्याबरोबर डी व्हॅलेरानें आपला संदेश प्रसिद्ध केला. त्यांत त्यानें असें म्हटलें होतें, कीं—

“ ज्या स्वातंत्र्यासाठीं आपल्यांतील शूर वीरांनीं आजपर्यंत आपल्या प्राणांचा यज्ञ केला त्या स्वातंत्र्याचा विक्रय करून अर्धीमुर्धी स्वतंत्रता पदरांत घेण्याइतका नीच नराधम कोणी असेल असें मला वाटत नाहीं. वेळ कठीण आहे, चहूंकडे निराशेचा अंधार पसरला आहे, जगांतील इतर राष्ट्रें आपल्या गाऱ्हाण्यांची दाद घ्यावयास तयार

नाहींत हें सर्व खरें. पण शेवटीं आपलाच विजय होणार ही श्रद्धा आपण ठेवली पाहिजे. आपला निश्चय ढळूं देतां कामा नये, आणि आपल्या मागून येणाऱ्या पिढीसाठीं स्वातंत्र्य मिळवून देण्याच्या कार्याचा उरलेला भाग पार पाडण्याकरितां धीरानें कमर कसून नव्या वर्षाचें स्वागत केलें पाहिजे!"

परिस्थिति रोजच्या रोज बदलत होती, व दिवसानुदिवस ब्रिटिश सरकार नव्या नव्या पेंचांत पडत चाललें होतें. शेवटीं डी व्हॅलेराशीं स्वतः जातीनें समेटाचें बोलणें सुरू करण्याशिवाय लॉइड जॉर्ज यांस गत्यंतर उरलें नाहीं. हें बोलणें काढण्यास कांहीं तरी प्रसंग मिळावा म्हणून २२ जून रोजीं बेलफास्ट येथें राजाकडून भाषण करविण्यांत आलें, व आतां यापुढें तरी आयर्लंडमध्यें शांतता नांदावी अशी इच्छा राजाच्या तोंडून वदविण्यांत आली. नंतर लॉइड जॉर्ज याजकडून डी व्हॅलेरास पत्र आलें तें असें:—

"महाराज,

राजेसाहेबांनीं शांततेविषयीं जी इच्छा परवां प्रदर्शित केली ती पुरी करण्यासाठीं आपल्याकडून शक्य ती खटपट करण्याची ब्रिटिश सरकारची फार इच्छा आहे. आजची संधि वायां जाऊं देणें सरकारला उचित वाटत नाहीं, व म्हणून आयर्लंडच्या दक्षिण व उत्तर भागांच्या प्रतिनिधींबरोबर वाटाघाट व्हावी अशी ही शेवटची विनंति करून पाहण्याचें सरकारनें ठरविलें आहे. दक्षिण भागांतील बहुमताचे तुम्ही लोकनियुक्त प्रतिनिधि आहांत म्हणून तुम्हांला, व उत्तर आयर्लंडचे प्रतिनिधि सर जेम्स क्रेग यांना हें आमंत्रण आम्ही पाठवीत आहोंत.

(१) तुम्ही व जेम्स क्रेग यांनीं वाटाघाटीसाठीं लंडनला यावें, व समेट कसा घडवून आणतां येईल त्याविषयीं शक्य तेवढा विचार करावा.

(२) यासाठीं तुमच्या मनाला वाटेल त्या सहकारी मित्रांना तुम्ही

आपल्याबरोबर आणावें. या सभेंत भाग घेण्यासाठीं आयर्लंडतर्फे जे जे प्रतिनिधि येतील त्यांच्या सुरक्षिततेबद्दल सरकार अर्थातच हमी घेईल.

"आज कित्येक वर्षे चालू असलेल्या या झगड्यानें आयर्लंडमध्यें अनंत भेद उत्पन्न केले आहेत, आणि इंग्लंडच्या व आयर्लंडच्या लोकांत परस्पर वैरभाव माजविला आहे; एवढेंच नव्हे तर जे दोन देश मित्रभावानें, शेजारधर्मानें व सहकारितेनें वागले असते तर साऱ्या मनुष्यजातीच्या प्रगतीला व सुधारणेला मदत झाली असती त्यांची फारकत करून, या झगड्यानें एकंदर मानवजातीचेंही अपरिमित नुकसान केलें आहे. हा झगडा आतां तरी थांबावा अशा अंतःकरणपूर्वक इच्छेनें आम्ही हें निमंत्रण तुम्हांस देत आहोंत. राजेसाहेबांनीं प्रदर्शित केलेली इच्छा पूर्ण करण्यासाठीं जी जी अवश्य ती ती गोष्ट करण्यास आम्ही राजी आहोंत, व आम्ही ज्याप्रमाणें तुमच्याशीं अत्यंत प्रेमभावानें वागण्याची इच्छा करतों त्याप्रमाणेंच तुम्हीही आमच्याशीं वागावें अशी आमची विनंति आहे.

डी. लॉइड जॉर्ज."

या निमंत्रणास डी व्हॅलेराकडून ताबडतोब उत्तर गेलें तें असें:—

"महाराज,

तुमचें पत्र पावलें. शक्य तेवढया सहकारी मित्रांचा सल्ला घेण्याचें काम मी करीत आहे. या दोन बेटांतील लोकांमध्यें कायमचा सलोखा घडून यावा अशी आमची अंतःकरणपूर्वक इच्छा आहे. परंतु आयर्लंडचीं शकलें पाडण्याचा हट्ट तुम्ही न सोडाल व स्वयंनिर्णयाचें तत्त्व तुम्हीं झुगारून द्याल तर हा सलोखा घडवून आणण्याचे सर्व मार्ग खुंटतील असें आम्हांस वाटतें. तुमच्या पत्रास सविस्तर उत्तर देण्यापूर्वीं स्वदेशांतील अल्पमताच्या पुढाऱ्यांशीं चर्चा करण्यासाठीं सभा बोलावण्याच्या उद्योगांत मी आहे.

इमॉन डी व्हॅलेरा."

यानंतर सर जेम्स क्रेग वगैरे उत्तर आयर्लंडच्या पुढाऱ्यांशीं चर्चा करण्यासाठीं डी व्हॅलेरानें त्यांस एका सभेला येण्याविषयीं निमंत्रण पाठविलें. परंतु डी व्हॅलेराशीं बोलणें करण्याचें सर जेम्स क्रेग यांनीं साफ नाकारलें, व लंडनच्या सभेंत आपली भेट होईल तेथेंच काय बोलावयाचें तें बोलतां येईल असें डी व्हॅलेरा यास त्यांनीं कळविलें. त्यावर डी व्हॅलेरानें जेम्स क्रेगला असें पत्र पाठविलें:—

" महाराज,

येथें सोमवारीं होणाऱ्या सभेसाठीं मीं मुद्दाम धाडलेलें आमंत्रण तुम्हांस स्वीकारतां येत नाहीं याबद्दल मला अतिशय वाईट वाटतें. लॉइड जॉर्ज यांच्या सूचनेंत कांहीं अनिष्ट गोष्टी गर्भित असल्यामुळें त्यांची सूचना मान्य करण्यासारखी नाहीं. आयर्लंडच्या लोकांत जे कांहीं मतभेद आहेत त्यांचा निकाल आयरिश लोकांना करतां येण्यासारखा आहे. इंग्लंडशीं समेटाचें बोलणें करतांना आयरिश लोकांत फाटाफूट नसावी, व आयर्लंडचें म्हणणें अगदीं एकमतानें पुढें मांडलें जावें ही फार महत्त्वाची गोष्ट आहे हें कांहीं मीं सांगावयास पाहिजे असें नाहीं.

इमॉन डी व्हॅलेरा."

डी व्हॅलेरानें बोलाविलेली पुढाऱ्यांची सभा शुक्रवार, ता. ८ जुलई रोजीं मॅन्शन हाउस येथें झाली, लॉइड जॉर्जच्या खलित्याप्रमाणें दोन्ही बाजूंनीं लढणें थांबवावें असें ठरलें, हा तात्पुरता तह सोमवार, ता. ११ जुलई रोजीं दुपारीं बारा वाजल्यापासून सुरू झाला, आणि लंडन येथील सभेस आपण यावयास तयार आहों असें डी व्हॅलेरानें कळविलें.

लंडनच्या सभेला जाण्यापूर्वीं डी व्हॅलेरानें एक जाहिरनामा प्रसिद्ध केला त्यांत जनतेला शांतता व शिस्त राखण्याची आग्रहाची विनंति केली होती, आयर्लंडचे प्रतिनिधि लंडनच्या सभेंत आपली शिकस्त करून पाहतील असें आश्वासन दिलें होतें, व पूर्वींच्या इतिहासावरून

पाहतां या सभेंतून विशेष कांहीं फलनिष्पत्ति होईल अशी फार आशा लोकांनीं न बाळगतां पुन्हां वेळच आली तर झटापट सुरू करण्याची तयारी ठेवावी अशी सूचना शेवटीं दिली होती.

लंडनमधील डाउनिंग स्ट्रीट येथील कचेरींत ता. १४,१५,१८ व २१ अशा चार दिवशीं रोज तास दोन तास याप्रमाणें डी व्हॅलेरा व लॉइड जॉर्ज यांचीं खलबतें झालीं. त्यानंतर इंग्रज सरकारतर्फे जी बातमी प्रसिद्ध करण्यांत आली ती ही—

"आज सकाळीं पुन्हां डी व्हॅलेरा व लॉइड जॉर्ज यांचें एक तासभर खलबत झालें. तहाची औपचारिक सभा कोणत्या तत्त्वावर बोलवावी याविषयीं निश्चित कांहीं ठरलें नाहीं. उद्यां डी व्हॅलेरा आयर्लंडला परत जाईल, व आपल्या सहकारी मंडळींशीं वाटाघाट करून जें काय ठरेल तें लॉइड जॉर्ज यांस कळवील."

याच्या आदल्याच दिवशीं संध्याकाळीं आयर्लंडचा प्रश्न मिटविण्यासाठीं लॉइड जॉर्ज यांनीं आपली योजना सादर केली होती. त्या योजनेंत म्हटलें होतें, कीं साम्राज्यांत राहिल्यानेंच आयर्लंडच्या सर्व सामाजिक, राजकीय व धार्मिक ध्येयांची पूर्तता होईल, कानडा वगैरे वसाहतींत ज्याप्रमाणें साम्राज्यांतर्गत स्वराज्यामुळेंच इंग्लंड व फ्रान्स किंवा इतर देश यांचें अनेक शतकांचें हाडवैर नाहींसें झालें त्याप्रमाणें आयर्लंडमध्येंही घडून येण्यास कांहीं हरकत नाहीं, आणि साम्राज्यांतील सर्व राष्ट्रांशीं सहकारिता करूनच आपल्या देशाला भाग्याच्या कळसाला पोंचविण्याचें कार्य आयर्लंडच्या पुढाऱ्यांस करतां येईल, असा विचार करून आयर्लंडला साम्राज्यांतर्गत स्वराज्य देण्याचें सरकारनें ठरविलें आहे. मात्र या स्वराज्यदानांत पुढील अटींचा अंतर्भाव होईल. त्या अटी अशा, कीं आयर्लंड व इंग्लंड या बेटांभोंवतालच्या समुद्रावर इंग्रजी आरमाराचें वर्चस्व राहिलें पाहिजे, इंग्लंडचें संरक्षण करण्यासाठीं आयर्लंडच्या जमिनीवर कांहीं गोष्टी करणें इंग्लंडला अवश्यक वाटलें

तर त्या गोष्टींत आयर्लंडनें मदत केली पाहिजे, इंग्रजी फौजेंत आयरिश लोकांची खुषीची भरती आतांप्रमाणेंच चालू रहावी, इंग्लंडनें व आयर्लंडनें एकमेकाच्या मालावर संरक्षक जकात बसवूं नये, आणि महायुद्धामुळें इंग्लंडला जें कर्ज झालें त्याचा वाजवी हिस्सा आयर्लंडनें फेडावा.

डेल आयरेनच्या मंत्रिमंडळातर्फे लॉइड जॉर्जच्या खलित्यास डी व्हॅलेरानें ता. १० ऑगस्ट रोजीं उत्तर पाठविलें तें असें:—

" महाराज,

" तुमच्या तारीख २० जुलईच्या खलित्यांत जी एक योजना पुढें करण्यांत आली आहे तिला डेल आयरेनची संमति मिळणें अशक्य आहे असें प्रत्यक्ष भेटींत मीं तुमच्याजवळ बोलून दाखविलेंच होतें. येथें आल्यावर मीं आपल्या सहकारी मंडळींचा विचार घेतला आहे. माझें पूर्वींचेंच मत कायम आहे असें मी या पत्रद्वारें कळवितों.

" तुमच्या खलित्यांत आयर्लंडचा राष्ट्रीयत्वाचा हक्क मान्य करणारा जेवढा भाग आहे तेवढा आम्हांस पसंत आहे. पण खलित्याच्या शेवटीं ज्या अटींचा उल्लेख आहे त्या राष्ट्रीयत्वाला विघातक असल्यामुळें खलित्यांत विलक्षण असंबद्धता उत्पन्न झाली आहे.

" इंग्लंडपासून पूर्ण विभक्त होण्यांतच आपल्या सर्व ध्येयांची साध्यता होण्यासारखी आहे अशी आयरिश लोकांची खात्री आहे. साम्राज्यांत शिरल्यानें आपल्या मनोवृत्तीला न पटणाऱ्या अनेक भानगडी नाइलाजानें करणें भाग पडेल अशी आयरिश लोकांना भीति वाटते. या व इतर अनेक कारणांसाठीं साम्राज्यांतर्गत स्वराज्य घेण्याची त्यांची इच्छा नाहीं. इंग्लंडपासून आयर्लंडनें पूर्ण विभक्त होण्यांतच दोन्ही देशांचें खरें कल्याण आहे अशी माझी व माझ्या सहकारी मित्रांची ठाम समजूत आहे. इंग्लंडचे शत्रू आयर्लंडचा उपयोग करून इंग्लंडवर घाला घालतील ही इंग्लंडची भीतीच मुळीं निराधार आहे. पण ती साधार

आहे असें गृहीत धरलें तरी शेवटीं कायम होणाऱ्या तहनाम्यांत ती भीति नाहींशी करण्यासारख्या अटी घालतां येण्यासारख्या आहेत.

" आयर्लंडमधील पक्षभेदांचा प्रश्न सर्वस्वी आयरिश लोकांच्या हातीं राहिला पाहिजे. आमचे अंतर्गत प्रश्न सोडविण्याचा यत्किंचित्‌ही अधिकार इंग्लंडला असल्याचें आम्ही कधींही कबूल करणार नाहीं.

" समंजसपणाची व न्यायाची कोणतीही गोष्ट आम्ही कधीं नाकबूल करणार नाहीं. आम्हांला कोणत्याही अटी पुढें करावयाच्या नाहींत किंवा कशावरही हक्क शाबित करावयाचा नाहीं. आम्हांस एकच गोष्ट पाहिजे आहे. ती म्हणजे आमचें स्वातंत्र्य. आजपर्यंत चालत आलेल्या भांडणाबद्दल तुम्ही खेद प्रदर्शित करतां. पण त्या भांडणाला आयरिश लोकांच्या स्वातंत्र्यावर इंग्रज राज्यकर्त्यांनीं केलेला हल्लाच सदैव कारण झालेला आहे. तुमच्या सरकारला सुबुद्धि सुचत असेल तर हा हल्ला या क्षणाला थांबू शकेल. समंजसपणाचा व शांततेचा मार्ग कोणता तें स्पष्ट दिसतच आहे.

इमॉन डी व्हॅलेरा."

यावर ता. १३ ऑगस्ट रोजीं लॉइड जॉर्ज याजकडून डी व्हॅलेरास खलिता आला त्यांत विशेषतः असें म्हटलें होतें, कीं इंग्लंडशीं राजनिष्ठ न राहण्याचा आयर्लंडला हक्क आहे हा मुद्दा इंग्लंड कधींही कबूल करणार नाहीं, व भूगोलदृष्ट्या आयर्लंड इंग्लंडच्या अतिशय जवळ असल्याकारणानें त्याचा साम्राज्यांत अंतर्भाव होणेंच अवश्यक आहे.

यानंतर १६ व १७ ऑगस्ट या दोन दिवशीं डेल आयरेनची साधारण सभा भरली व इंग्लंडच्या सूचनांचा त्या सभेंत विचार करण्यांत आला. डी व्हॅलेरानें दोन वेळां वक्तृत्वपूर्ण भाषणें करून त्या सूचनांचा फोलपणा स्पष्ट करून दाखविला. इंग्लंडसारख्या लबाड शत्रूशीं आपल्याला वागावयाचें आहे हें विसरूं नका असें त्यानें सभासदांना पुनः पुन्हां बजाविलें. डेल आयरेननें एकमतानें ब्रिटिश सूचना

नापास केल्या, व तो निकाल कळविण्यासाठीं लॉइड जॉर्ज यांस डी व्हॅलेरानें २४ ऑगस्ट रोजीं खलिता पाठविला. त्यांत विशेष या मुद्यावर जोर दिला होता, कीं भूगोलदृष्ट्या आयर्लंड इंग्लंडजवळ आहे म्हणून त्याला पूर्ण स्वातंत्र्याचा उपभोग घेतां येऊं नये हें तत्त्व अत्यंत घातुक आहे. हें तत्त्व कबूल केल्यास हॉलंड व डेन्मार्क जर्मनीच्या कबज्यांत जातील, बेल्जम फ्रान्सनें गिळंकृत करावें असें ठरेल, पोर्चुगालचे लोक स्पेनच्या गुलामगिरींत जातील, आणि या जगांत स्वातंत्र्य उरणारच नाहीं. खलित्याच्या शेवटीं डी व्हॅलेरानें असें लिहिलें होतें, कीं स्वयंनिर्णयाच्या व्यापक तत्त्वाच्या पायावरच इंग्लंड आयर्लंडचा खरा सलोखा होणें शक्य आहे, व तें तत्त्व कबूल करून तहाची वाटाघाट करण्यास इंग्लंड तयार असेल तर त्या वाटाघाटीसाठीं आपले सर्वसत्ताधारी प्रतिनिधि निवडून पाठविण्यास आयर्लंड तयार आहे.

यानंतर उत्तरेंप्रत्युत्तरें कांहीं काळ चाललींच होतीं. लॉइड जॉर्जनें प्रत्येक पत्रांत लिहावें, कीं जितका उदारपणा दाखविणें शक्य आहे तितका आम्ही दाखवीत आहोंत, ग्रॅटन, डेव्हिस वगैरे आयरिश पुढाऱ्यांनीं नेहमीं साम्राज्यांतर्गत स्वराज्याचीच मागणी केली होती व तेंच आज आम्ही देत आहोंत, व उलट डी व्हॅलेरानें प्रत्येक पत्रांत प्रतिपादावें, कीं आयर्लंडला पूर्ण विभक्त स्वातंत्र्याचा हक्क आहे व राजनिष्ठेची शपथ घेऊन इंग्लंडच्या राजाचें प्रभुत्व आम्ही कधींच कबूल करणार नाहीं, असा क्रम चालला होता.

शेवटीं असें ठरलें, कीं एकमेकाला खलिते धाडीत बसून वेळ दवडणें धोक्याचें आहे. तेव्हां कोणीच कोणावर आगाऊ कोणतीच अट न लादतां दोन्ही देशांच्या प्रतिनिधींची सभा भरवावी व तींत कांहीं तडजोड होते कीं काय तें पहावें. या कराराप्रमाणें आयर्लंडचे सर्वसत्ताधारी प्रतिनिधि निवडून पाठविण्यासाठीं ता. १४ सप्टेंबर

रोजीं डेल आयरेनची खाजगी सभा भरली, व इंग्लंडशीं वाटाघाट करण्यासाठीं खालील प्रतिनिधि निवडण्यांत आले.

१ आर्थर ग्रिफिथः—परराष्ट्रीय मंत्री (प्रतिनिधिमंडळाचे अध्यक्ष).

२ मिशेल कॉलिन्सः—खजिनाखात्याचे मंत्री.

३ आर. सी. बार्टन.

४ ई. डगनः—मीथ व लाऊथ परगण्याचे डेप्युटी.

५ जी. जी. डफीः—रोम येथील वकील, व डब्लिनचे डेप्युटी.

आमचे अमुक अमुक प्रतिनिधि वाटाघाटीसाठीं येतील असें कळविण्यासाठीं मॅकग्राथ व हॅरी बोलंड यांच्या हस्तें एक खलिता पाठविण्यांत आला. लॉइड जॉर्ज यांना त्या खलित्यांतील मजकूर रुचण्यासारखा नव्हता. त्यांनीं त्या दोघांची एक तासभर मुलाखत घेतल्यावर त्यांना त्या खलित्यासकट डब्लिनला परत लावून देऊन त्यांच्याबरोबर असा निरोप पाठविला, कीं या खलित्यांतील कांहीं विधानांत फेरफार करावयास पाहिजे आहे तो करून तो पुन्हां मजकडे पाठवा, तोंपर्यंत तो खलिता मीं फोडलाच नाहीं असें मी समजून चालेन. पण लॉइड जॉर्ज यांना पाहिजे होते ते फेरफार करण्यांत आले नाहींत इतकेंच नव्हे, तर तो खलिता जसाच्या तसा प्रसिद्ध करण्यांत आला. हें पाहतांच इंग्रज मुत्सद्दी बिथरून गेले, इनव्हर्नेस येथें वाटाघाट करण्यासाठीं ठरविण्यांत आलेली सभा रद्द करण्यांत आली, व या नव्या परिस्थितींत कोणत्या मार्गानें जावयाचें त्याविषयीं माझ्या सहकारी मंडळींचा सल्ला मला घेतला पाहिजे असें लॉइड जॉर्ज यांनीं कळविलें. ज्या खलित्यानें हा सारा प्रकार झाला तो असा होताः—

"आयरिश राष्ट्राच्या महत्त्वाकांक्षा व साम्राज्याचा संबंध या दोहोंचा कांहीं मेळ घालणें शक्य आहे कीं नाहीं हें ठरविण्यासाठीं बोलाविण्यांत येणाऱ्या सभेंत भाग घ्यावयास आमची ना नाहीं. ही आमची तयारी पूर्वीं १० ऑगस्टच्या पत्रांतच आम्ही दर्शविली होती.

म्हणूनच प्रतिनिधींचीं नांवें मंजूर करून घेण्यासाठीं आम्ही डेल आयरिनची सभा बोलावीत आहोंत. तुम्ही सुचविल्याप्रमाणें २० सप्टेंबरला इनव्हर्नेस येथें आमचे प्रतिनिधि हजर राहूं शकतील असें आम्हांस वाटतें.

" या शेवटच्या पत्रांत हें नमूद करणें अवश्य आहे, कीं आजपर्यंतच्या पत्रव्यवहारांत आम्हीं पुनः पुन्हां विशेष कटाक्षानें दर्शविली तीच आमची भूमिका अजूनही कायम आहे. ती ही कीं,—

> आमच्या राष्ट्रानें स्वतःचें स्वातंत्र्य जाहीर केलेलें आहे, व आम्ही एक स्वयंशासित राष्ट्र आहोंत असें आम्हीं गृहीत धरून चाल्तों. अशा स्वयंशासित राष्ट्रानें पाठविलेले प्रतिनिधि या नात्यानेंच आम्हांला तहाच्या वाटाघाटींत भाग घेतां येईल.

स्वयंनिर्णयाच्या तत्त्वाविषयीं आम्हांस इतकेंच म्हणावयाचें, कीं आपल्या दोन देशांचा खरा सलोखा या तत्त्वाच्या पायावरच काय तो होऊं शकेल. या तत्त्वाचा अर्थ काय करावा याविषयीं वाद माजविण्यांत अर्थ नाहीं. तो उघड आहे.

इमॉन डी व्हॅलेरा."

हा खलिता वाचतांना लॉइड जॉर्ज यांची तब्येत कशी फिरली तें वर सांगितलेंच आहे. १४ सप्टेंबर रोजीं त्यांनीं तारेनें उत्तर धाडलें, कीं

" मंगळवार ता. १३ रोजीं तुमचा खलिता घेऊन जे इसम आले त्यांना मीं कळविलें, कीं एका स्वतंत्र व स्वयंशासित राष्ट्राचे प्रतिनिधि या नात्यानें तुम्ही आमच्या राजेसाहेबांच्या सरकारशीं वाटाघाट करावयास येण्याच्या हक्काचा ज्या अर्थीं तुम्ही पुनरुच्चार केलेला आहे त्या अर्थीं तुमचें आमचें बोलणें होणें शक्य नाहीं. या हक्कासंबंधीं तुमच्या खलित्यांत जो पॅरिग्राफ आहे त्याचे केवढे भयंकर परिणाम होतील हें मीं त्यांना सांगितलें, आणि त्या खलित्यांत फेरफार करावयास तुम्हांला

संधि मिळावी म्हणून पाहिजे तर तो मला पोंचलाच नाहीं असें समजावयास मी तयार आहे इतकेंसुद्धां त्यांस मीं अश्वासन दिलें. इतकें झाल्यानंतरही तुम्ही तो खलिता प्रसिद्ध केलात. तेव्हां पुढच्या आठवड्यांत होणाऱ्या सभेची सारी व्यवस्था मला रद्द केलीच पाहिजे व माझ्या मंत्रिमंडळाचा सल्ला घेतला पाहिजे. आमचें काय ठरेल तें मी तुम्हांस कळवीनच. पण सध्यां माझी प्रकृति जरा नादुरुस्त असल्यामुळें थोडासा विलंब होणें अपरिहार्य आहे. सध्यां तुम्हांस इतकें कळविणें अवश्य आहे, कीं मीं पूर्वीं स्पष्ट केली होती ती भूमिका कबूल असेल तरच सभा शक्य आहे, तुम्ही म्हणतां ती भूमिका पतकरून आम्ही तुमच्याशीं वाटाघाट करणें म्हणजे आयर्लंड साम्राज्यापासून विभक्त झालें आहे व तें एक स्वतंत्र प्रजासत्ताक राज्य आहे याविषयीं आमच्या राजेसाहेबांच्या सरकारनें मान्यता देण्यासारखेंच होईल. आपल्या दोन्ही देशांत शांतता नांदावी म्हणून राजेसाहेबांच्या सरकारनें जी उदारबुद्धि दाखविली तिचें याहून चांगलें चीज व्हावयास पाहिजे होतें. पण आतांपर्यंत आम्हीच आपली जागा सोडून पुढें आलों. तुम्ही एक पाऊलदेखील सरकलां नाहींत, व आपलें मूळचें पालुपद दर खलित्यांत चालू ठेवलेंत.

डी. लॉइड जॉर्ज."

डी व्हॅलेरानें लगेच १६ सप्टेंबरला खालील प्रत्युत्तर धाडलें.

"महाराज,

तुमची तार काल रात्रीं मिळाली. तुमच्या ७ सप्टेंबरच्या पत्रांतील भूमिका मान्य करून आम्ही या सभेचें निमंत्रण स्वीकारलें व आमची भूमिका कोणती याविषयीं कांहींच खुलासा केला नाहीं तर आमच्या म्हणण्याचा लोक विपर्यास करतील व आमच्या कार्याची हानि होईल हें तुम्हांस कसें समजत नाहीं याचें मला आश्चर्य वाटतें.

आतांपर्यंतच्या पत्रव्यवहारांत तुम्ही तुमच्या सरकारची वृत्ति स्पष्ट केलीत; आम्ही आमची मनोवृत्ति स्पष्ट केली. आपल्या दोघांच्या भूमिकां-

मध्यें विरोध नसता तर आज ज्या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठीं सभा व्हावयाचें घाटत आहे तो प्रश्नच उद्भवला नसता. असले बिकट प्रश्न सोडविण्याच्या वेळीं ते सोडविणारे लोक प्रत्यक्ष परिस्थितीशिवाय दुसऱ्या कोणत्याही पूर्वग्रहांनीं आपलीं मनें दूषित होऊं न देतां कामाला लागले तरच कांहीं फलनिष्पत्ति होईल हें उघड आहे.

इमॉन डी व्हॅलेरा."

त्याच दिवशीं मुख्य प्रधानांकडून डी व्हॅलेरास तारेनें उलट उत्तर आलें तें असें:–

"महाराज,

तुम्ही काल रात्रीं तारेनें जो मजकूर मला कळविला तो समजला. स्वतंत्र राष्ट्राचे प्रतिनिधि या नात्यानें तुमच्याशीं आम्हीं वाटाघाट केली तर ती 'पूर्वग्रहदूषित' होणार नाहीं असें म्हणणें म्हणजे कांहीं तरी बोलण्यासारखें आहे. तुमच्या प्रतिनिधींचें अशा रीतीनें स्वागत करणें म्हणजेच मुळीं साम्राज्यांतून आयर्लंड बाहेर पडल्याचें कबूल करण्यासारखें होईल. अशा वाटाघाटीनंतर तुमची मर्जी लागली तर तुम्ही राजेसाहेबांशीं मित्रत्वाचा तहनामा कराल हें खरें. पण त्याबरोबरच हेंही खरें, कीं तसला तहनामा न करतां तुम्ही दुसऱ्याच एखाद्या राष्ट्राशीं दोस्तीचा तहही करूं शकाल. म्हणून माझ्या पूर्वींच्या पत्रांत दिग्दर्शित केलेली भूमिका सोडण्यास आम्ही तयार नाहीं. राजनिष्ठेच्या तत्त्वावरच साम्राज्याची सारी इमारत आज घटकेला उभी आहे. तें तत्त्व रतिभरदेखील ढळलेलें आम्ही सहन करणार नाहीं. स्वतंत्र राष्ट्राचे प्रतिनिधि म्हणून तुम्हांस येऊं देणें म्हणजे त्या तत्त्वाची पायमल्ली होऊं देण्यासारखें आहे. तुम्ही जोंपर्यंत तसें येण्याचा हट्ट धरतां तोंपर्यंत आपल्यामध्यें वाटाघाट होणें शक्य नाहीं.

डी. लॉइड जॉर्ज."

यावर डी व्हॅलेरानें तारेनें प्रत्युत्तर दिलें. त्यांत म्हटलें होतें, कीं:—

" महाराज,

उत्तरादाखल मला इतकेंच सांगावयाचें आहे, कीं तुम्ही तुमच्या ७ तारखेच्या पत्रांतील ज्या तत्त्वांचा उल्लेख करतां तीं समजूनच आम्ही प्रथम सभेचें आमंत्रण स्वीकारलें. तुम्ही आपलीं तत्त्वें सोडावीं असें आम्ही कधींच म्हणणार नाहीं. पण आम्हांला आमची बाजू स्पष्ट करणें भाग आहे. ती स्पष्ट केल्याबद्दल सभा मोडत असेल तर त्याबद्दल आम्हांला दिलगिरी वाटते. दोन्ही देशांचें कल्याण ज्या वाटाघाटींतून निष्पन्न होईल अशी वाटाघाट व्हावी येवढा एकच उद्देश आमच्या अंतःकरणांत आहे.

इमॉन डी व्हॅलेरा."

लॉइड जॉर्जकडून १८ सप्टेंबर रोजीं असें उत्तर आलें, कीं:–

" महाराज,

तुमची तार काल रात्रीं मिळाली. तुम्ही आपला हट्ट सोडावयास तयार नाहीं असें दिसतें. तुम्ही ज्या वेळीं जुलई महिन्यांत माझ्या मुलाखतीला आलांत तेव्हां ही गोष्ट तुम्ही प्रतिपादिली नाहीं. उलट मीं तुम्हांला पहिलें आमंत्रण पाठविलें त्यांत " लोकप्रिय पुढारी " या नात्यानेंच फक्त मीं तुम्हांला बोलाविलें होतें, व त्या नात्यानेंच तुम्ही आलांत. आपल्या मुलाखतीच्या प्रसंगीं अगदीं प्रारंभालाच मीं तुम्हांस बजाविलें होतें, कीं आमच्या तक्ताशीं आलर्यंडनें राजनिष्ठ राहिलें पाहिजे, व ब्रिटिश राज्यसंघांत राहूनच आयर्लंडनें आपली उन्नति करून घेतली पाहिजे. आपल्यामध्यें कांहीं तडजोड व्हावयाची असेल तर ती याच पायावर होणें शक्य आहे.

" तुमची जुलई महिन्यांत मुलाखत घेतली तशीच 'लोकनियुक्त पुढारी' या नात्यानें तुमच्या प्रतिनिधींची भेट घ्यावयास मी तयार आहे. स्वतंत्र व स्वयंशासित राष्ट्रानें पाठविलेले वकील या नात्यानें तुमच्याशीं खलबत केल्यास आम्ही आमच्या तक्ताशीं द्रोह केल्यासारखें

होईल. म्हणून पुन्हां म्हणतों, कीं तुमच्या १२ तारखेच्या पत्रांतील दुसरा पॅरिग्राफ तुम्ही परत घेतल्याखेरीज वाटाघाट होणें अशक्य आहे.

डी. लॉइड जॉर्ज."

डी व्हॅलेरानें यावर जें प्रत्युत्तर धाडलें त्यांत त्यानें पुन्हां आपली बाजू स्पष्टपणें पुढें मांडून नंतर म्हटलें होतें, कीः—

"आतां हा संदेश–प्रतिसंदेशाचा क्रम असाच पुढें चालू ठेवल्यास एकमेकांच्या मनांतील गैरसमज कमी होण्याऐवजीं वाढतील मात्र, आणि तहाचा जो थोडा फार संभव आहे तोही नष्ट होईल असें मला वाटतें. आम्ही सर्वस्वी शरण यावें असा तुमच्या ता. ७ च्या पत्राचा अर्थ आहे, किंवा कोणतीच बाजू कोणत्याच तऱ्हेनें बांधली न जातां होणाऱ्या सभेचें निमंत्रण देण्याचा त्या पत्राचा उद्देश आहे? तसा उद्देश असेल तर तें निमंत्रण आम्ही स्वीकारतों, व तुम्ही ठरवाल त्या वेळीं तुमच्या सरकारशीं वाटाघाट करावयास आमचे प्रतिनिधि येतील.

इमॉन डी व्हॅलेरा."

२९ सप्टेंबर रोजीं लॉइड जॉर्जकडून उत्तर आलें, तें असेंः—

" महाराज,

आपल्या दोघांमध्यें जो पत्रव्यवहार झाला त्याचें आमच्या राजेसाहेबांच्या सरकारनें लक्षपूर्वक अवलोकन केलें आहे. या पत्रव्यवहाराच्या पायावर सभा बोलावून तुमच्याशीं वाटाघाट करणें त्यांस अशक्य वाटतें. तथापि हा पहिला प्रयत्न संपला असें समजून वाटाघाटीचा दुसरा नवा प्रयत्न करण्यास त्यांची तयारी आहे. म्हणून या पत्रद्वारें आम्ही तुम्हांस पुन्हां निमंत्रण देतों. वाटाघाटीची सभा ११ आक्टोबर रोजीं लंडन येथें भरेल. त्या सभेंत आयर्लंडचे 'लोकनियुक्त पुढारी' या नात्यानें तुमच्या प्रतिनिधींशीं आम्ही खलबत करूं, व आयर्लंडच्या आकांक्षा आणि ब्रिटिश साम्राज्याचा

व आयर्लंडचा संबंध या दोहोंचा मेळ कसा घालावयाचा त्याची चर्चा करण्यांत येईल.

डी. लॉईड जॉर्ज."

हें आमंत्रण डी व्हॅलेरानें स्वीकारलें, व ठरलेल्या दिवशीं वाटाघाटीसाठीं आमचे प्रतिनिधि लंडनला येतील असें त्यानें लॉईड जॉर्ज यांस कळविलें. वाटाघाट व्हावयाचें निश्चित ठरलें, व आतां आपले पुढारी लंडनला जाणार हें वर्तमान समजतांच आयरिश लोकांच्या मनांत आशानिराशांचें काहूर माजलें. कदाचित् ही वाटाघाट फलदायी होऊन आपल्या देशाला स्वातंत्र्य व शांतता यांचा लाभ होईल अशा आशेनें त्यांचीं अंतःकरणें क्षणभर आनंदित होत, तर लगेच दुसऱ्याच क्षणीं त्यांचें मन त्यांना सांगे, न जाणों, इंग्लंडसारख्या धूर्त राष्ट्राशीं गांठ आहे तेव्हां कदाचित् आपले प्रतिनिधि एखाद्या मायावी मोहाला बळी पडतील व नकली स्वातंत्र्य पदरांत घेऊन येतील, किंवा कदाचित् वाटाघाटींत दोन्ही पक्षांच्या म्हणण्यांतील विरोध कायम राहून पुन्हां देशांत जिकडे तिकडे दंगाधोपा माजून राहील ! काय होतें काय नाहीं अशा अधीर मनोवृत्तीनें लोकांचें लक्ष वाटाघाटीच्या बातमीकडे लागलें ! इतके दिवस डी व्हॅलेरानें जी निकराची बाणेदार लढाई केली, व देशाभिमानाचें आणि आत्यंतिक स्वार्थत्यागाचें खडतर व्रत स्वतः आचरून साऱ्या जनतेकडूनही आचरविलें त्या व्रताचें उद्यापन होण्याची वेळ प्राप्त झाली असें आयर्लंडला वाटूं लागलें. शत्रूच्या अनन्वित छळानें गांजलेल्या व अवर्णनीय पराक्रम करून दमलेल्या आयर्लंड देशाचें अंतःकरण या वेळीं उत्सुकतेनें बावरें झालें !

## प्रकरण सातवें

# तह झाला पण सिंह गेला

आयर्लंडचे प्रतिनिधि वाटघाटीसाठीं लंडनला गेले असतांना आयरिश जनतेच्या मनांत कोणते विचार गर्दी करीत असतील ते डी व्हॅलेरा पूर्णपणें जाणून होता. म्हणूनच लंडनची सभा सुरू होण्याच्या सुमारास त्यानें खालील जाहिरनामा आयर्लंडमध्यें प्रसिद्ध केला.

" बांधवहो,

ज्या सभेसाठीं आपले प्रतिनिधि लंडनला गेले आहेत ती फार महत्त्वाची आहे. आपल्या देशाचा भविष्यकाळ कोणत्या प्रकारचा होईल तें त्या सभेवर अवलंबून आहे. आपल्या देशांतील प्रत्येक व्यक्तीच्या हिताहिताशीं त्या सभेचा जिव्हाळ्याचा संबंध पोंचतो. पूर्वी आपल्यामध्यें कितीही मतभेद असले तरी आज एकजुटीनें उभें राहणें यांतच साऱ्या राष्ट्राचें परम हित आहे. आपण पाठविलेले प्रतिनिधि आपली मोठी जबाबदारी पूर्णपणें ओळखून आहेत. साऱ्या देशाचा त्यांना पाठिंबा आहे व त्यांच्यावर साऱ्या जनतेचा विश्वास आहे असें आपल्या वर्तनानें आपण त्यांना वाटावयास लाविलें पाहिजे. ब्रिटिश राज्यकर्ते व आयर्लंड यांचा तंटा समाधानकारक रीतीनें मिटावा अशी आपल्या सर्वांप्रमाणें त्यांच्या अंतःकरणांतही उत्कट इच्छा आहे, पण तसा तो मिटविणें आपल्या हातांत सर्वस्वीं नाहीं हेंही ते समजून आहेत. आपण ज्या हक्कांसाठीं आजपर्यंत झगडलों तो असा आहे, कीं त्याविषयीं तडजोड किंवा त्वयार्ध मयार्ध करणेंच शक्य नाहीं. आजपर्यंत आपण ज्या यातना सोसल्या त्यांचें चीज करण्यासारखें स्वातंत्र्य आपल्याला देणारा तह झाला तरच तो चिरकाल टिकेल, व असल्या तहानेंच काय तो आजपर्यंतच्या लढ्याचा शेवट होऊं शकेल. असला तह घडून येणें सोपें नाहीं.

"आजपर्यंत इंग्लंडनें आपला हक्क तरवारीच्या जोरावर गाजविला. तो हक्क सोडून द्यावयास आज इंग्लंड तयार होईल हें फारसें संभवनीय नाहीं. तो हक्क व तह यांचा मूलभूत विरोध आहे. आपण कितीही शहाणपण व चातुर्य दाखविलें तरी तें अपुरेंच पडेल ही गोष्ट आपले प्रतिनिधि जाणून आहेत. खऱ्या शांततेचा लाभ आपल्याला व्हावयाचा असेल तर तो आपल्या प्रतिनिधींच्या मुत्सद्देगिरीनें होण्यासारखा नसून, जन्मसिद्ध हक्क गमाविण्यापेक्षां मरण पतकरण्याची साऱ्या राष्ट्राची एकजात तयारी असेल तर त्या तयारीनेंच होईल. हालअपेष्टा सोसूनच आयर्लंडनें आजच्या परिस्थितीपर्यंत मजल मारली आहे. यापुढेंही कराव्या लागणाऱ्या स्वार्थत्यागाकडे व भोगाव्या लागणाऱ्या संकटांकडे पाहून या वेळीं आयर्लंड कचरेल तर आजपर्यंतची लढाईही वायां जाईल. शत्रूच्या धमकावणीला भिऊन आपण आपला एक मुद्दा सोडला, कीं लगेच दुसरा, लगेच तिसरा अशा प्रकारें सर्वस्वीं हार खाण्याचा आपल्यावर प्रसंग येईल. निर्भय मनानें व अढळ निश्चयानें सत्याच्या कणखर भूमीवर उभें राहून आयर्लंडनें आपलें म्हणणें अगदीं कायम ठेवलें पाहिजे. नाहीं तर शत्रू आपल्याला चकवील आणि आपला सर्वतोपरी पराजय होईल.

"म्हणून ही वाटाघाट चालू असतांना आपल्या देशाचा नैतिक दर्जा यत्किंचित्‌ही कमी झाला तरी तें घातुक ठरेल, व त्या दर्जाला कमीपणा आणण्यासारखी कृति किंवा विचार जो करील तो आयर्लंडचाच नव्हे तर साऱ्या मानवजातीचा शत्रू ठरेल. आपल्यांत फूट पडावी, आपला उत्साहभंग व्हावा आणि आपलें सामर्थ्य कमी व्हावें यासाठीं आपले शत्रू हजार युक्त्या करतील. आपण सर्वांनीं सावध राहिलें पाहिजे. आपल्या प्रतिनिधींवरील आपल्या मनांतील विश्वास आपण व्यक्त केला, आणि देशाची शिस्त कायम राखिली तरच आपली एक-

जूट आहे असें लोकांना वाटेल. म्हणून हा विनंति-अर्ज मी करीत आहे.

डब्लिन, १० आक्टोबर १९२१ इमॉन डी व्हॅलेरा"

शेवटीं नेमलेल्या दिवशीं ही महत्त्वाची वाटाघाटीची सभा सुरू झाली. तिचें काम झटपट उरकण्याची साऱ्या प्रतिनिधींची खटपट होती. सभा मोडते कीं काय अशी परिस्थिति अनेक वेळां उत्पन्न झाली. सभेला पहिला अपशकुन झाला तो पांचवे जॉर्ज राजे व रोमचे पंधरावे पोप यांनीं परस्परांस पाठविलेल्या संदेशांमुळें. पोपचा पंचम जॉर्जना संदेश आला तो असा:—

"इंग्लंड व आयर्लंड यांजमध्यें तह होण्यासाठीं खलबतें पुन्हां चालू झालीं हें पाहून आम्हांस अतिशय आनंद होत आहे. आज शतकानुशतकें चालत आलेलें हें वैर शमवून शांतता प्रस्थापित करण्याचें श्रेय ईश्वर आपणांस देवो अशी प्रार्थना आहे."

जॉर्ज राजाकडून पोपला संदेश गेला तो असा:—

"आपल्याकडून आलेल्या संदेशानें आम्हांस फार समाधान झालें. आपल्याप्रमाणेंच माझीही प्रभूजवळ अशीच प्रार्थना आहे, कीं सध्यां लंडनमध्यें चालू असलेल्या परिषदेच्या निकालानें **आयर्लंड देशांतील अडचणींचा** शेवट होऊन शांततेच्या व सुखाच्या नव्या युगाचा उदय होवो."

राजांच्या या संदेशांत आयर्लंडविषयीं एक विशिष्ट कल्पना सूचित असल्यामुळें तिचें निराकरण करण्याकरितां पोपला तारेनें आपलें म्हणणें कळविणें डी व्हॅलेरास जरूरीचें वाटलें. म्हणून त्यानें पोपला ताबडतोब खालील मजकुराची तार पाठविली:—

"आपण ग्रेट ब्रिटनच्या राजांना संदेश पाठविलांत व त्यांत आयर्लंडच्या कल्याणाविषयींची कळकळ प्रदर्शित केलीत हें पाहून आयरिश लोकांना फार फार समाधान वाटत आहे. पण राजांच्या

संदेशांतील 'आयर्लंड देशांतील अडचणी' या संदिग्ध प्रयोगानें आयर्लंडच्या अडचणी फक्त 'अंतःस्थ' आहेत असा अजाण माणसाचा गैरसमज होण्याचा संभव आहे. तसा गैरसमज आपण करून घेणार नाहीं अशी आमची खात्री आहे. आयर्लंडच्या अडचणी फक्त 'अंतःस्थ' आहेत हेंही खरें नाहीं, व ब्रिटिश लोकांच्या राजाशीं निष्ठेनें वागण्याचें कर्तव्यही आयरिश लोकांना कबूल नाहीं. लोकांनीं योग्य रीतीनें निवडलेल्या प्रतिनिधींनीं आयर्लंडचें संपूर्ण स्वातंत्र्य विधिपूर्वक पूर्वींच जाहीर केलेलें आहे, व ज्या ज्या वेळीं लोकमतप्रदर्शनाची संधि आली त्या त्या वेळीं त्या स्वातंत्र्यास जनतेनें मान्यता दर्शविलेली आहे. खरी अडचण अंतस्थ नसून ब्रिटिश संबंधाबद्दलची आहे. ब्रिटिशांनीं आपली इच्छा आयर्लंडवर लादण्याचा हट्ट चालविल्यामुळें आणि आयरिश लोकांचें स्वातंत्र्य व जन्मसिद्ध हक्क हिरावून घेतल्यामुळेंच साऱ्या अडचणी व भांडणें उपस्थित झालीं आहेत जगांतील इतर लोकांप्रमाणेंच ब्रिटिशांशींही स्नेहसंबंध राखून शांततेनें राहण्याची आमची इच्छा आहे. परंतु इतकीं वर्षें परमावधीचे हाल सोसूनही आम्हीं झगडा चालू ठेवला आहे यावरूनच आमची स्वातंत्र्याविषयींची तळमळ किती तीव्र आहे तें दिसून येईल. तें स्वातंत्र्य हातचें जाऊं द्यावयास आम्ही कोणत्याही मोहानें तयार होणार नाहीं.

इमॉन डी व्हॅलेरा."

डी व्हॅलेरानें पोपला केलेली ही तार पाहतांच इंग्रजी वर्तमानपत्रांनीं मोठें काहूर माजविलें. येवढ्यावरूनच ती तार करणें किती अवश्य होतें हें दिसून येण्यासारखें आहे. डी व्हॅलेराचा जागृत मुत्सद्दीपणा पाहून त्याचे शत्रूही दांतओंठ खात. लॉइड जॉर्ज यांनीं डी व्हॅलेरास तहाचें निमंत्रण पाठवितांना तुम्ही 'लोकप्रिय पुढारी' या नात्यानें या, असा कावेबाजपणाचा सूचक शब्दप्रयोग आपल्या खलित्यांत घुसडून दिलेला पाहतांच डी व्हॅलेरानें ती फसवेगिरी ओळखून त्या

शब्दप्रयोगाविरुद्ध खलित्यामागोमाग खलिते धाडून लॉइड जॉर्ज यांस कसें जेरीस आणलें तें वाचकांस सांगितलेंच आहे. पुन्हां या वेळीं राजांच्या संदेशांतील आयर्लंडला कमीपणा आणणारे व आयरिश लोकांविषयीं गैरसमज उत्पन्न करणारे धूर्ततेचे शब्द ताबडतोब टिपून काढून त्यांचा सणसणीत निषेध करून डी व्हॅलेरानें आपली मुत्सद्देगिरी दुसऱ्यांदा जगाच्या निदर्शनास आणून दिली. डी व्हॅलेरा आपल्या देशकार्याविषयीं अत्यंत दक्ष असे. त्या कार्याची हानि करण्यासारखी एखादी गोष्ट कोठें घडते कीं काय याविषयीं तो पराकाष्ठेची सावधानता ठेवीत असे, आणि गरुडाच्या दृष्टीप्रमाणें तीक्ष्ण दृष्टि ठेवून आपल्या विरुद्ध कोठें कांहीं फडफडलें, कीं त्यावर तो ताबडतोब झडप घातल्याशिवाय रहात नसे. आपले मुत्सद्देगिरीचे डाव डी व्हॅलेरावर लागूं होत नाहींत म्हणून चडफडण्याचा व शिव्याशाप देण्याचा प्रसंग इंग्रजांवर यापूर्वीं अनेक वेळां आला होता. तसलाच या वेळचाही प्रसंग होता. डी व्हॅलेरानें पोपला तार धाडावी हा अत्यंत उर्मटपणाचा व खुनशीपणाचा प्रकार होय असा आयर्लंडचे माजी चीफ सेक्रेटरी यांनीं ओरडा केला, आणि लॉइड जॉर्ज यांनीं तर जाहीरपणें असेंही म्हटलें, कीं या तारेमुळें तहाची वाटाघाट चालू राहील किंवा नाहीं याची देखील शंका आहे.

पण इंग्रज प्रधानांनीं व त्यांच्या साथीदारांनीं केवढाही गिल्ला केला तरी डी व्हॅलेराची शांतता मुळींच ढळली नाहीं एक तर तो हें पूर्णपणें जाणून होता, कीं इंग्रजांच्या मनांत खरोखरीच धडपणें तह करावयाचा असेल तर त्यांनीं वरवर कितीही आरडाओरड केली तरी तहाचा बेत बिनसणें शक्य नाहीं. शिवाय तो हेंही ओळखून होता, कीं या तहाच्या वाटाघाटींत आयर्लंडला जें पाहिजे आहे त्याची निष्पत्ति होणें असंभवनीयच आहे. म्हणून ब्रिटिश वर्तमानपत्रांच्या व बड्या धेंडांच्या हलकल्लोळाकडे लक्ष न देतां त्यानें आपल्या देशाची

तयारी जय्यत ठेवण्याचें कार्य चालू ठेविलें होतें. तहाच्या वाटाघाटीचा निकाल काय होतो हें पहावें असें म्हणून तो हात जोडून स्वस्थ बसला नव्हता. उलट तो निकाल आपल्याविरुद्ध झाल्यास काय काय करावें याविषयींच्या योजना त्याच्या मनांत घोळत होत्या. क्लेअर, गॅलवे वगैरे ठिकाणच्या स्वयंसेवकांच्या पथकांची पाहणी त्यानें चालू ठेवली होती.

या वेळींच एक महत्त्वाचा प्रसंग घडून आला. त्या प्रसंगीं डी व्हॅलेराचा जो सन्मान करण्यांत आला तो आजपर्यंत मिळालेल्या सर्व बहुमानांपेक्षां श्रेष्ठ होय असें त्याच्याच बुद्धिप्रधान मनाला वाटलें, म्हणून त्या प्रसंगाचें महत्त्व विशेष आहे. तो प्रसंग म्हणजे आयर्लंडच्या राष्ट्रीय विद्यापीठानें त्याला 'कुलगुरुत्व'—Chancellorship—अर्पण केल्याचा समारंभ होय. या समारंभाच्या वेळीं डी व्हॅलेरास अनेक मानपत्रें देण्यांत आलीं. त्या सर्वांना उत्तरादाखल भाषण करतांना डी व्हॅलेरानें असें बोलून दाखविलें, कीं एकंदर राष्ट्रीय जीवनाचा प्रवाह ज्या विद्यापीठांतून वाहतो, राष्ट्राच्या आत्म्याच्या तेजानें जें सदैव चकाकतें, व एकीकडे राष्ट्राच्या आकांक्षा व भावना प्रतिबिंबित करून दुसरीकडे त्या भावना व आकांक्षा अधिकाधिक जोमदार होण्यास ज्याची मदत होते तेंच विद्यापीठ 'राष्ट्रीय विद्यापीठ' या पदवीला पात्र आहे. विद्यापीठाचें हें ध्येय साध्य करण्यासाठीं आयरिश भाषेचा उद्धार व पुरस्कार करणें हें एकच साधन होय असें आपलें मत त्यानें यापूर्वीं अनेक वेळां प्रदर्शित केलें होतें, व त्याच मताचें त्यानें या भाषणांत विवरण केलें. तो नेहमीं म्हणे,

> "स्वभाषा किंवा स्वातंत्र्य या दोहोंपैकीं एकच गोष्ट तुला मिळेल, कोणती पाहिजे बोल, असें जर कोणी मला म्हटलें तर स्वभाषाहीन स्वातंत्र्य पतकरण्यापेक्षां स्वातंत्र्यविरहित स्वभाषाच मी आनंदानें पतकरीन."

या मताचें विवरण करतांना तो अशी विचारसरणी पुढें मांडीत असे, कीं:—

“ स्वभाषेचा बचाव करणें हें या पिढीचें मुख्य कर्तव्य आहे. आपलें राष्ट्रीय स्वातंत्र्य आज नाहीं उद्यां परत मिळेल. त्याविषयीं फारशी शंका नाहीं. तें कार्य आपल्या हातून तडीस गेलें नाहीं तरी पुढची पिढी तें पार पाडील. पण स्वभाषेची गोष्ट अशी नाहीं. तिचें संरक्षण आपणाच, आजच्या या पिढीनेंच केलें पाहिजे, नाहीं तर स्वभाषा अजीबात कायमची नष्ट होऊन जाईल. पुढची पिढी स्वतंत्र असावी म्हणून वाटेल तो स्वार्थत्याग करावयास जे आपण आज तयार आहोंत ते त्या स्वातंत्र्यवृक्षाच्या फलासमान असलेली स्वभाषा त्यांना मिळाली नाहीं तरी चालेल असें म्हणून स्वस्थ बसणार काय? जें स्वभाषेचें धन एकदां नाहींसें झालें कीं पुढच्या पिढीला परत मिळवितां येणें शक्य नाहीं, त्याची चोरी होऊं देण्याइतके आपण अभिमानशून्य व विचारहीन आहोंत कीं काय?”

आयर्लंडमध्यें डी व्हॅलेराचा असा बहुमान होत असतांना, व स्वयंसेवकांची जय्यत तयारी ठेवण्यांत तो गुंतला असतांना तिकडे लंडनची परिषद चालूच होती. डिसेंबरच्या प्रारंभीं ती परिषद मोडण्याच्या बेतांत येऊन लोक अस्वस्थ मनानें तिच्याविषयीं अनेक तर्क करूं लागले. तहाच्या ज्या अटींचा मसुदा ब्रिटिश सरकारनें सादर केला त्या डेल आयरेनच्या मंत्रिमंडळाला पसंत पडेनात. म्हणून तहाचा शक्य तितका प्रयत्न करून पहावा या हेतूनें आयर्लंड ज्यास्तींत ज्यास्त आपलें म्हणणें सोडण्यास किती तयार आहे त्याचें दिग्दर्शन करणारा एक उलट मसुदा तयार करून ब्रिटिश सरकारकडे पाठविण्यांत आला. त्या मसुद्यास इंग्रज सरकार मान्यता देईना, तहाची सभा मोडली अशी बातमी आली, आणि ती बातमी येतांच सोमवार तारीख

५ डिसेंबर रोजीं आयरिश रिपब्लिकन सैन्याची जमवाजमव करण्याचे डी व्हॅलेरानें हुकूम सोडले.

पण दुसऱ्याच दिवशीं प्रातःकालीं तहावर सह्या झाल्याची बातमी आली, व ती येतांच "ओहो, जिंकली!" असे आनंदोद्गार डी व्हॅलेराच्या तोंडून बाहेर पडले. आयर्लंडकडून गेलेल्या तहाच्या मसुद्यावर उभय पक्षांच्या सह्या होत नसल्या तर ब्रिटिशांचा मसुदा मान्य करण्यापूर्वीं डब्लिनला पाठवावा असे आयरिश प्रतिनिधींना हुकूम होते. तसा मसुदा डब्लिनला न येतां तह झाला येवढीच बातमी आल्यामुळें डी व्हॅलेराचा साहजिकच असा तर्क झाला, कीं आपल्याकडून गेलेला मसुदाच इंग्लंडनें मान्य केला. या तर्कामुळेंच आनंदित होऊन वर सांगितल्याप्रमाणें त्यानें उद्गार काढले. पण हे त्याचे विजयोद्गार क्षणिकच ठरले, व थोड्याच वेळांत त्याच्या आनंदाला धक्का बसला. तहाची सविस्तर प्रत हातीं पडतांच त्याला स्पष्ट दिसून आलें, कीं आयरिश प्रजासत्ताक राज्याच्या मर्मस्थानीं घाव घालणारीं कलमें त्या तहांत आहेत. तें पाहतांच त्याचा पहिला हर्ष पार नाहींसा होऊन त्याच्या सर्व आशा पार विलयाला गेल्या. आयर्लंडचें खडतर नशीब अजून संपलें नाहीं अशा विचारानें त्यानें एक दीर्घ श्वास सोडला, व लगेच खिन्न झालेल्या आपल्या अंतःकरणाला धीर देऊन पुढील कार्यासाठीं त्यानें कंबर बांधली!

लंडनला गेलेले आयरिश प्रतिनिधि परत आले. तहाला डेल आयरेनची संमति मिळाल्यावर तहाला आयर्लंड देशाची संमति मिळाली असें ठरावयाचें होतें. डेलची साधारण सभा बोलावण्यापूर्वीं कार्यकारी मंडळाची सभा ( Cabinet ) भरणें अवश्य होतें. त्याप्रमाणें ती सभा सुरू झाली. सभेंत मतभेद माजल्याच्या दाट बातम्या देशभर पसरूं लागल्या, व शेवटीं त्या खऱ्याही ठरल्या. कारण खालीं दिलेलें पत्र डी व्हॅलेराच्या सहीनें आयरिश वृत्तपत्रांत प्रसिद्ध झालें.

"आयर्लंडच्या रहिवाशांनो,

ग्रेट ब्रिटनशीं होऊं घातलेल्या तहाचा मसुदा वर्तमानपत्रांतून तुमच्या वाचण्यांत आलाच असेल. गेल्या तीन वर्षांतील प्रत्येक निवडणुकीच्या वेळीं देशांतील बहुमताच्या ज्या इच्छा स्पष्टपणें दिसून आल्या त्यांच्याशीं या तहाच्या कलमांचा पूर्ण विरोध आहे. असला तह मान्य करण्याविषयीं डेल आयरेनला किंवा राष्ट्राला शिफारस करावीसें मला वाटत नाहीं, हें सर्वांस ताबडतोब कळविणें हें माझें कर्तव्य आहे असें मी समजतों. माझ्याप्रमाणेंच आपले गृहमंत्री ऑस्टिन स्टॅक व संरक्षण मंत्री कॅथल ब्रूघा यांचें मत आहे. पुढच्या बुधवारीं ११ वाजतां डेल आयरेनचें जाहीर अधिवेशन व्हावयाचें ठरत आहे. मध्यंतरीं साऱ्या लोकांनीं पूर्वीप्रमाणेंच शिस्तीचें वर्तन कायम ठेवावें. डेलच्या कार्यकारी मंडळांत जरी मतभेद असले तरी पूर्वीप्रमाणेंच सर्व सभासदांनीं आपलीं कामें चालवावीं असें ठरलें आहे. सैन्याची व्यवस्था अर्थात् जशीच्या तशी पूर्वींच्या अधिकाऱ्यांच्याच हुकमतींत राहील. लोकांच्या खऱ्या कसोटीची वेळ आतां आली आहे. द्वेषबुद्धि मनांत न ठेवतां, आणि शिव्याशापांनीं तोंड न विटाळतां या प्रसंगाला आपण सर्वांनीं तोंड दिलें पाहिजे. आपले राजकीय मतभेद मिटविण्याचा रीतसार मार्ग स्पष्ट दिसण्यासारखा आहे. त्या मार्गापासून आपण भ्रष्ट होतां कामा नये, आणि या बाबतींत डेल आयरेनच्या कार्यकारी मंडळाचें वर्तन साऱ्या लोकांनीं आदर्शवत् मानलें पाहिजे.

इमॉन डी व्हॅलेरा."

ज्या तहाचा विचार करण्याकरितां डेल आयरेनचें जाहीर अधिवेशन व्हावयाचें होतें त्या तहांत मुख्य मुख्य कलमें अशीं होतीं, कीं:—

( १ ) कानडा, ऑस्ट्रेलिया, न्यू झीलंड यांसारखीच साम्राज्यांतर्गत मान्यता आयर्लंडला असावी. आयरिश लोकांविषयीं कायदे

करणारें आयर्लंडचें पार्लमेंट असावें. आयर्लंडच्या सरकारला ' आयरिश फ्री स्टेट ' ( आयर्लंडचें स्वतंत्र राज्य ) असें नांव असावें.

( २ ) कानडा वगैरे साम्राज्यांतर्गत राज्यांप्रमाणेंच आयर्लंडचें व ब्रिटिश पार्लमेंटचें नातें असावें.

( ३ ) कानडा येथें ज्याप्रमाणें गव्हर्नर जनरल नेमण्यांत येतो त्याप्रमाणेंच बादशहांचा प्रतिनिधि म्हणून आयर्लंडमध्यें गव्हर्नर जनरल नेमण्यांत यावा.

( ४ ) मी आयरिश फ्री स्टेटशीं व त्याप्रमाणेंच पंचम जॉर्ज बादशहा व त्यांचे वारस यांच्याशीं राजनिष्ठ राहीन अशी आयरिश पार्लमेंटच्या प्रत्येक सभासदानें शपथ घ्यावी.

याखेरीज राज्यव्यवस्थेच्या निरनिराळ्या तपशिलांविषयीं इतरही पुष्कळ कलमें होतीं, व विशेष महत्त्वाची गोष्ट ही, कीं एका कलमांत असें म्हटलें होतें, कीं उत्तर आयर्लंडनें 'आयरिश फ्री स्टेट'मध्यें सामील व्हावयाचें किंवा नाहीं तें १९२० च्या कायद्याप्रमाणें अस्तित्वांत आलेल्या उत्तर आयर्लंडच्या सरकारच्या मर्जीवर अवलंबून असावें, व आपली राज्यव्यवस्था विभक्त असावी असें त्या सरकारनें ठरविलें तर एक कमिशन येमण्यांत मेऊन त्याच्या मार्फत उत्तर व दक्षिण आयर्लंडच्या सरहद्दी निश्चित करण्यांत याव्या.

अशा स्वरूपाचा हा तहाचा मसुदा होता. साम्राज्यांतर्गत मान्यता डी व्हॅलेरास कधींच कबूल नव्हती, ब्रिटनशीं राजनिष्ठ रहण्याच्या शपथेविरुद्ध तो पहिल्यापासून होता, व आयर्लंडमध्यें उत्तर सरकार व दक्षिण सरकार असे दोन सवते सुभे असावेत या कल्पनेचा त्यानें नेहमीं निषेधच केला होता. अशा स्वरूपाचा होऊं घातलेला तह डी व्हॅलेरास नको होता यांत मुळींच आश्चर्य नाहीं. हा तह नको तर मग कोणत्या प्रकारचा तह पाहिजे असा कोणीं प्रश्न केला तर त्याला डी व्हॅलेराचें उत्तर तयार होतें. आयर्लंडच्या राजकीय आकांक्षा

पूर्ण करणाऱ्या तहाचा तपशीलवार मसुदा त्यानें लिहून काढला होता, व त्यांत वर निर्दिष्ट केलेले त्याचे तीन कटाक्षाचे मुद्दे त्यानें अंतर्भूत केले होते.

इंग्लंडनें सुचविलेला तह आयर्लंडनें मान्य करूं नये म्हणून डी व्हॅलेरानें आपल्याकडून शक्य तितकी खटपट केली. डेल आयरिनमध्यें तहाची चर्चा होण्यापूर्वीं आयरिश लोकांस उद्देशून त्यानें एक जाहिरनामा काढला. तह पास केला असतां काय दुष्परिणाम होतील, व तह अमान्य केल्यानें अंतिम हित कसें साध्य होईल याविषयीं त्या जाहिरनाम्यांत थोडक्यांत विवेचन केलें होतें. तो जाहिरनामा असा होता.

"देशबांधवांनो,—तुमच्यावर अरिष्ट कोसळणार आहे, संभाळा! एखाद्या सैन्यांत एकदम उद्भवलेल्या पटकीच्या रोगाहूनही भयंकर अशा परिस्थितींत तुम्ही सांपडलां आहांत. दुष्काळाचे भयंकर दिवस काढल्यानंतर माणसाला ज्याप्रमाणें अन्नाची अनावर लालसा वाटते त्याप्रमाणें इतकीं वर्षें लढाईच्या धांदलींत घालविल्यामुळें विश्रांतीसाठीं तुम्ही उत्सुक झालेले असलांत तर तें सहाजिकच आहे. पण या तुमच्या नैसर्गिक इच्छेचा फायदा घेऊन तुमचे शत्रू आपलें कारस्थान पार पाडीत आहेत हें विसरूं नका. या वेळीं तुम्ही गाफिल राहिलांत तर आजपर्यंतचा तुमचा सारा स्वार्थत्याग व्यर्थ ठरेल, जें मिळविलें आहे तेंही नष्ट होईल, आणि अल्पावधींतच तुम्ही सर्वस्वाला मुकाल.

'शांतता', 'शांतता', असा नुसता घोष करून कां शांतता मिळत असते! जे असला घोष आज करीत आहेत ते तुम्हांला शांतता तर मिळवून देणार नाहींतच; पण तुमच्या भरंवशाचा फायदा घेऊन तुमचा घात मात्र करतील. तुमचीं वर्तमानपत्रें खरींखुरीं राष्ट्रीय असतीं तर त्यांनीं तुम्हांला या तहाविरुद्ध इशारत दिली असती. पण तीं राष्ट्राला योग्य सल्ला देण्याऐवजीं राष्ट्रकार्याचा बिघाड करावयालाच उपयोगी पडणारीं आहेत. मागें आपली व आपल्या शत्रूंची निकराची

झुंज चालली असतांना शत्रूंच्या हुकमतीखालीं वागून या वृत्तपत्रांनीं तुमच्या नीतीचा प्रवाह गढूळ करण्याचें निंद्य कर्म केलें. नंतर मागच्या जुलई महिन्यांत शत्रु तहाचें बोलणें करण्याच्या विचारांत असतांना ज्या शिस्तीच्या जोरावर तुम्ही यशस्वी झालांत त्या शिस्तीचा मोड करण्याचें पाप याच वृत्तपत्रांनीं केलें, आणि अगदीं परवां परवां देशाचे प्रतिनिधी लंडनमध्यें तहाचीं खलबतें करीत असतांना याच वृत्तपत्रांनीं शत्रूची बाजू सबळ करण्याचा अधमपणा केला. तीं वृत्तपत्रें आज तुम्हांला इशारा देण्याऐवजीं तहाच्या मसुद्याकडे मेंढरांप्रमाणें दौडत नेत आहेत यांत आश्चर्य तें कसलें? पण असल्या भलत्या घोडदौडीनें तुम्ही शत्रूच्या जाळ्यांत सांपडलांत, तर जें जग आज तुमच्या वीरश्रीची स्तुति करीत आहे तें तुमच्या अक्कलशून्यतेचा उपहास व तिरस्कार करील हें विसरूं नका. ज्या तहाबद्दल तुमचा तुम्हांसच पुढें तीव्र पश्चात्ताप होईल व तुमचीं मुलेंबाळें तुम्हांला शिव्याशाप देतील त्या तहावर उतावळेपणानें सही करूं नका. हा तह म्हणजे तंट्याचा कायमचा निकाल आहे, असें सोंग करून त्या तहावर सील ठोकावयास तुम्ही उद्युक्त झालां आहांत; पण माझी खात्री आहे, कीं हा तह म्हणजे खरा निकाल नव्हे. या तहानें भांडण थांबणें शक्य नाहीं असेंच तुमचें मन तुम्हांला सांगत असेल. इंग्लंडशीं वागण्यांत आयर्लंड आजपर्यंत कधीं चकलें नाहीं, मग आजच त्याला कां चकूं देतां? आयरिश स्वातंत्र्यासाठीं चाललेल्या युद्धाचा नैतिक पाया ढांसळूं देऊं नका. मनोभावानें आणि प्रामाणिकपणानें हा तह पाळणें शक्य नाहीं असें तुमचें अंतःकरण तुम्हांला सांगत असतां त्याला मान्यता कां देतां? जे लोक तुम्हांला तह मान्य करण्याचा बदसल्ला देतात ते आयर्लंडचेही हितचिंतक नव्हत, किंवा इंग्लंडचे, किंवा मानवजातीचेही हितसाधक नव्हत.

तुम्ही आपल्या पायावर धोंडा पाडून घ्यावा म्हणून तुम्हांला जे आग्रह

करीत आहेत त्यांना खुशाल 'नाहीं' म्हणून धीटपणानें सांगा. ज्या तहाच्या योगानें या देशांत ब्रिटिश सत्ता प्रस्थापित होईल असल्या तहास संमति द्यावयास ते तुम्हांस सांगत आहेत. आपले हात आपल्या हातांनींच बांधून घ्यावयास ते तुम्हांला सांगत आहेत. ही संधि फार मोलाची आहे. दोन राष्ट्रांमध्यें युद्ध सुरू झालें म्हणजे विशिष्ट परिस्थिति जुळून येऊन अशी संधि एकदांच येत असते. अदूरदृष्टि, भेकड मुत्सद्दी ही संधि घालवीत आहेत, पण त्यांना तुम्ही तसें करूं देऊं नका. तहाला खरी मान्यता, मुत्सद्यांची नव्हे तर, जनतेचीच लागत असते. खरा तह मुत्सद्यांशीं नव्हे तर, जनतेशींच व्हावयाचा असतो. जोंपर्यंत भीतीला आणि अविश्वासाला जागा आहे तोंपर्यंत जनतेचें समाधान होणें शक्य नाहीं. तुमच्यापुढें असलेला तह झाला तरी भीति व अविश्वास राहणार हें तुम्हांला समजतें. मग शंभर वर्षांपूर्वीं झालेल्या एका नकली तहानंतर जसें रण माजलें तसेंच आणखी शंभर वर्षें वैराचा वणवा पेटवणारा हा तह कशासाठीं पतकरतां?

लंडनची परिषद चालली असतांना समेट करण्यासाठीं आपल्या मागण्या शक्य तितक्या कमी करून आपले प्रतिनिधि अगदीं शेवटच्या सीमेपर्यंत गेले होते. पण युद्धाचा बाकदपटशा दाखवून त्यांना त्या सीमेच्याही पलीकडे ओढण्यांत आलें. आजपर्यंत इंग्लंडनें आयर्लंडवर केलेल्या जुलमाचा हा कळस झाला. खरा सलोख्याचा तह बाजूला फेंकला गेला, आणि असला हा तह आमच्या प्रतिनिधींच्या डोक्यावर निर्लज्जपणें लादण्यांत आला. खरे करारनामे असे होत नसतात. चिरकाल टिकणारे तह अशानें होत नसतात. आपल्या प्रतिनिधींनीं केलेली चूक तुम्हांला अजून दुरुस्त करतां येईल, व आपली बाजू अजून सांवरतां येईल. कारण तुम्ही जें धोरण ठरवाल तेंच खरें व्यवहारांतील प्रत्यक्ष राजकारण ठरेल. तुम्ही ज्या धोरणाचा पुरस्कार कराल तेंच देशाचें राजकारण होऊन बसेल. खरा तह तुमच्याशींच

व्हावयाचा आहे व तो तुम्हीच करावयाचा आहे. पूर्ण स्वातंत्र्य म्हणजे भ्रम आहे असें तुम्हांला सांगण्यांत येतें. पण ज्यामुळें ब्रिटिश राजा, ब्रिटिश प्रधानमंडळ व ब्रिटिश पार्लमेंट यांच्या सत्तेचें या देशांतून पूर्ण उच्चाटण होईल, लॉइड जॉर्जेच्या कचेरीला सदा एक कान लावून येथील कारभार चालविणाऱ्या गव्हर्नर जनरलची ज्यामुळें बोळवण होईल, आणि ज्यामुळें आयरिश स्त्रीपुरुषांची खरी सत्ता देशांत चालूं होईल तें स्वातंत्र्य म्हणजे भ्रम कीं काय ? तें पूर्ण स्वातंत्र्य निवळ स्वप्न आहे असें तुम्हांला सांगून, लॉइड जॉर्ज तुमच्या विरुद्ध लढाई पुकारील अशी तुम्हांला भीति दाखविण्यांत येते. पण थोडा विचार करून पहाल तर तुमचें तुम्हांलाच स्पष्ट दिसेल, कीं पूर्ण स्वातंत्र्य हें स्वप्न नव्हे, आणि लॉइड जॉर्जनें युद्धाचें कितीही अवसान आणलें तरी खरोखरीच युद्ध पुकारण्याची आज त्याची हिंमत नाहीं.

म्हणून तुम्हांला जें सत्य वाटतें त्याचा आग्रह धरा. देशबांधवांनों, मोहाला वश होऊन अभ्रूचा सीधा मार्ग सोडून जाऊं नका. आज एकदां तुम्ही भिऊन कचरलांत आणि थोडीशी माघार घेतलीत, कीं ही माघार सारखी चालूं राहील आणि तुमची पुरती पीछेहाट होऊन स्वातंत्र्य पुरतें नाहींसें होईल.

इमॉन डी व्हॅलेरा."

डेल आयरेनचें प्रथम एक खाजगी अधिवेशन झालें. त्या वेळीं डी व्हॅलेरानें आपली तहाची योजना पुढें मांडली व सर्वांचें एकमत व्हावें यासाठीं त्यानें अनेक सूचना करून पाहिल्या. पण चार दिवस सारखी चर्चा होऊनही कांहींच निष्पन्न झालें नाहीं. शेवटीं १९ डिसेंबर रोजीं डेल आयरेनच्या जाहीर अधिवेशनास प्रारंभ झाला. ज्या तहावर प्रतिनिधींच्या सह्या झाल्या होत्या त्यास मान्यता दर्शविणें अगर तो अमान्य करणें हेंच काय तें काम सभेपुढें होतें. तह

मान्य करावा अशी सूचना पुढें मांडण्याच्या वेळच्या भाषणांत आर्थर ग्रिफिथ म्हणाला,

"सन ११७२ नंतर समतेच्या पायावर इंग्लंडचें सरकार व आयर्लंडचें सरकार यांजमध्यें झालेला हा पहिलाच तह आहे. आयर्लंडचे समान हक्क मान्य करणारा हा पहिला तह आहे. हा समतेचा तह आहे म्हणूनच मी याला अनुकूल आहे. आयर्लंडच्या स्वतंत्र राज्याला मान्यता देणारा तह मिळवून आम्ही लंडनहून आलों आहोंत. आपला गमावलेला झेंडा आम्ही घेऊन आलों आहोंत. यापुढें ब्रिटिश सैन्यानें आयर्लंड सोडून जावें व आयर्लंडनें स्वतःच्या सैन्याची उभारणी करावी असें ठरवून आम्ही आलों आहोंत. राष्ट्राच्या तिजोरीच्या किल्ल्या आमच्या हातीं रहाव्या, परराष्ट्रीय धोरण आमचें आम्ही ठरवावें, अशा प्रकारचे सारे महत्त्वाचे हक्क काबीज करून आम्ही आलों आहोंत."

मिशेल कॉलिन्स व डगन यांनीं तहाला अनुकूल भाषणें केलीं. दोन्ही बाजूंचे वक्ते आवेशपूर्ण भाषणांनीं आपापल्या मतांचें समर्थन करीत होते. रोजच्या रोज वक्तृत्वाच्या लाटा उचंबळत होत्या. त्यामुळें १९२२ सालचा जानेवारी महिना उजाडला तरी डेल आयरेनची बैठक चाललेलीच होती. कॉर्कचा माजी मेयर टेरेन्स मॅक्स्विनी याची बहीण मेरी मॅक्स्विनी इचें आवेशानें, वक्तृत्वानें व देशभक्तीच्या भावनेनें भरलेलें भाषण इतकें सरस वठलें, कीं ती पावणे तीन तास बोलत होती तेवढा सारा वेळ सभा चित्रासारखी तटस्थ बसली होती. तिचें भाषण डी व्हॅलेराच्या बाजूचें होतें. तिनें स्पष्ट बजावलें, कीं या तहाप्रमाणें आयरिश फ्री-स्टेट अस्तित्वांत आलें तर त्या सरकाराला प्रथम तिला कैदेंत टाकण्याचें काम करावें लागेल. मिस मॅक्स्विनी-प्रमाणेंच मिसेस ओकॅलॅघन या बाईचें भाषण अतिशय आवेशपूर्ण झालें. तिच्या देशभक्त नवऱ्याचा पूर्वी सरकारी शिपायांनीं खून केला होता. त्या गोष्टीचें सर्वांना स्मरण करून देऊन ती ओरडून म्हणाली,

" मीं वैधव्य कशासाठीं पतकरलें ? माझा नवरा मरण्यास कशासाठीं तयार झाला ? मी येथें उभें राहून ब्रिटिशांना राजनिष्ठेची शपथ द्यावी म्हणून कीं काय ? एकही बंदूक किंवा शिपाई आपल्या जवळ नसला तरी मी हेंच म्हणेन. ज्या भूमीवर स्वार्थत्यागी वीरांचें रक्त सांडलेलें असतें ती प्रजासत्तेलाच योग्य असते. त्या सत्तेचा अवमान कराल तर खबरदार ! "

लंडनला गेलेल्या प्रतिनिधींपैकीं जी. जी. डफी व आर. सी. बार्टन यांचीं जेव्हां भाषणें झालीं तेव्हां सभेपुढील तहाच्या प्रश्नांत एक निराळाच अनपेक्षित मुद्दा उपस्थित झाला. त्या दोघांनींही स्पष्ट सांगितलें, कीं तुम्हीं सही केली नाहीं तर आयर्लंडशीं युद्ध पुकारण्यांत येईल अशी इंग्लंडकडून धमकी घालण्यांत आल्यामुळेंच आम्हीं तहावर सह्या केल्या.

डेल आयरेननें तह अमान्य करावा असें प्रतिपादन करण्याकरितां डी व्हॅलेरा आपल्या भाषणांत म्हणाला,

" तह अमान्य करण्याविषयींचा स्वतंत्र ठरावच मीं सभेपुढें मांडला असता. पण कामकाजाच्या नियमांप्रमाणें मला तसें करतां येत नाहीं. बाकी हा प्रस्तुत ठराव मान्य करूं नका अशी सभेला विनवणी केल्यानेंसुद्धां काम भागेल अशी मला आशा आहे. आयरिश जनतेनें आपल्याला निवडून दिलेलें आहे. प्रत्येक निवडणुकीच्या वेळीं आयरिश प्रजासत्ताक राज्याची आम्ही सेवा करूं असें आम्ही लोकांना सांगत आलों. त्या वेळीं आपण सारे खोटें बोलणारे लबाड आहोंत अशीच लोकांची समजूत होती कीं काय ? आयर्लंडच्या राजकीय आकांक्षा व साम्राज्यसंबंध यांचा मेळ घालतां येईल कीं नाहीं हें पाहण्यासाठीं जेव्हां प्रथम निमंत्रण आलें तेव्हां तो प्रयत्न करण्यास माझी सर्वांपेक्षां अधिक तयारी होती. पण आज मी या तहाच्या विरुद्ध आहे याचें कारण हेंच, कीं या तहानें तो मेळ बसलेला नाहीं. मला लढाईची हौस

आहे म्हणून नव्हे, तर मला शांतता पाहिजे आहे म्हणूनच मी या तहाच्या विरुद्ध आहे. ग्रेट ब्रिटन व आयर्लंड यांमध्यें आज कित्येक शतकें चालत आलेलें वैर या तहानें शमणार नाहीं म्हणूनच मी या तहाच्या विरुद्ध आहे. आयर्लंडचें स्वातंत्र्य व साम्राज्यसंबंध यांचा समेट करण्यासाठीं आपले लोक लंडनला गेले, पण ते जो तह घेऊन आले त्यानें एकट्या आयर्लंडचें देखील समाधान होणें शक्य नाहीं, मग आयर्लंड व इंग्लंड या दोन्ही देशांचें समाधान होणें तर लांबच राहिलें!

आज या घटकेला आयरिश लोक लढाईला कंटाळले असल्यामुळें ते कदाचित् या तहाला संमति देतील. पण मी बजावून ठेवतों, कीं या तहानें तंटा पुन्हां मूळपदावर आल्यावांचून राहणार नाहीं व पूर्वीं आयर्लंड इंग्लंडशीं जोडलें गेलें तेव्हांपासून आतांपर्यंतच्या इतिहासाचीच पुनरुक्ति होईल. डाउनिंग स्ट्रीट येथील ब्रिटिश मंत्र्यांच्या कचेरींत लढाईची धमकावणी देऊन व आमच्या प्रतिनिधींवर पिस्तुलें रोखून आमच्या पसंतीचा तह लॉइड जॉर्जनीं धुडकावून लावला खरा, पण पूर्वीं पिटचें जसें झालें त्याप्रमाणेंच लॉइड जॉर्जला आपल्या कृतकर्मांचीं फळें भोगावीं लागतील. युद्धाच्या धमकीनें मान्य झालेला हा तह आहे हें विसरतां कामा नये. आपल्याला असा तह हवा होता, कीं त्यामुळें आयरिश लोक व इंग्लिश लोक एकाच दर्जाचे ठरून एकमेकांशीं हस्तांदोलन करूं शकतील. उलट आजच्या या तहानें ब्रिटिश हे आमचे धनी ठरले आहेत. ब्रिटनच्या राजाविषयीं एकनिष्ठतेची शपथ घेणें म्हणजे त्याला आपला मालक समजण्यासारखें आहे. आयरिश प्रजासत्तेशीं ही शपथ पूर्ण विसंगत आहे, व तशी ती विरुद्ध असूनही ती तुम्ही घेणार असलांत तर आयरिश प्रजासत्ता उलथून पाडायला तुम्ही उद्युक्त झालांत असेंच जग म्हणेल. अशी शरणचिठी लिहून देण्याइतकें लाजिरवाणें दुसरें काय असेल? ज्या या पिढींत अनेक नरवीर असे उत्पन्न झाले कीं त्यांच्या पराक्रमानें साऱ्या जगताचे डोळे

दिपून गेले त्या या आमच्या पिढीनें असल्या लाजिरवाण्या तहावर सही करावयाची कीं काय ?

या असल्या स्वातंत्र्याला स्वातंत्र्य कोण म्हणेल ? मी तुरुंगांत होतों तेव्हां आमचे वार्डर आम्हांला मोठ्या ऐटीनें सांगत, कीं तुरुंगाच्या कोठडींतून वाटेल तेव्हां लगतच्या लहानशा दालनांत जावयाची मोकळीक तुम्हांला आहे. त्या मोकळिकीसारखेंच हें स्वातंत्र्य आहे. तसेंच तुरुंगांत असतांना एखादे वेळीं आम्हांला बागेंत नेत व मग बागेंतील झाडें, फुलें, फळें व भोंवतालचीं टेंकाडें पाहण्याची आम्हांस मोकळीक असे. पण असल्या स्वातंत्र्यासाठीं आम्ही जेलरला आपले आत्मे विकले नाहींत. तुरुंगांतील त्या स्वातंत्र्यांत आणि या तहानें आयर्लंडला मिळणाऱ्या स्वातंत्र्यांत काय फरक आहे ? ज्या तहामुळें ब्रिटिशांना आयर्लंडवर सत्ता गाजवायला मिळेल त्या तहावर सही करण्यापेक्षां परमेश्वर आमच्या जुलमी राजांना नष्टप्राय करीपर्यंत गुलामगिरींत पडावयास आम्ही तयार आहोंत. ( टाळ्या ).

होमरूलचा कायदा किंवा तसलाच दुसरा एखादा कायदा ब्रिटिश सरकारनें पास केला असता तर तें होमरूल घेऊं नका असा उपदेश मीं कदाचित् केला नसता. मीं म्हटलें असतें, " ठीक आहे, तुरुंगाचा अधिकारी तुम्हांला कोठडींतून लगतच्या दालनांत जावयाची परवानगी देत आहे. घ्या तिचा फायदा ! " कारण होमरूल घेतल्यानें त्या राज्यपद्धतीविषयींचीं मान्यता आपण कांहीं आपल्या सहीशिक्यानिशीं नोंदून ठेवीत नाहीं.

या तहानें चिरकालिक शांततेचा पाया घातला जाईल अशा ढोंगी-पणाच्या बोलण्यानें जगाला फसवायचा तुमचा प्रयत्न असेल, तर असल्या प्रयत्नानें आयर्लंडचें खरें कल्याण होणार नाहीं हें लक्ष्यांत ठेवा. संमति मिळेपर्यंत ग्रिफिथ व कॉलिन्स यांनीं या तहाप्रमाणें डब्लिन शहरीं तात्पुरती राज्यव्यवस्था सुरू केली तर इंग्रजी राज्याइतकेंच तेंही

राज्य बेकायदेशीर आहे असें लोक म्हणतील कीं नाहीं पहा. लंडनला जे प्रतिनिधि गेले होते त्यांच्यावर वैयक्तिक टीकेचा हल्ला करण्याची सर्वांत कमी इच्छा जर कोणाला असेल तर ती मला आहे. त्यांना किती बिकट काम करावयाचें होतें हें माझ्याइतकें दुसऱ्या कोणालाच माहीत नाहीं. एखाद्या जंगी सैन्याला किंवा आरमाराला देखील करणें दुर्घट अशी गोष्ट या प्रतिनिधींना करावयाची होती. मीं डेलच्या सभेंत पूर्वीं असें बोलूनही दाखविलें होतें. या प्रतिनिधींनींनीं जें केलें तें स्वदेशप्रीतीनें प्रेरित होऊनच केलें असेंच मी अजूनही म्हणतों.

आयर्लंडचें व आयरिश लोकांचें कल्याण व्हावें असें इतरांना वाटतें व मला वाटत नाहीं असें थोडेंच आहे? पण ज्या तहामुळें आयरिश लोकांना लाजेनें खालीं माना घालाव्या लागतील असल्या तहावर सही करावयास माझा हात धजावत नाहीं. आपल्या देशाचा कारभार दुसऱ्याचा हवालीं करणाऱ्या या तहाच्या खर्ड्याला स्पर्श केल्याबद्दल साऱ्या जगाकडून स्वतःला हिणवून घेण्यापेक्षां पूर्वींसारखा झगडा चालूंच राहिला तरी तें मला अधिक बरें वाटेल. वाटेल तर स्वतः पूर्ण स्वतंत्र राहून ब्रिटिश साम्राज्याशीं केवळ बाह्य संबंध ठेवावा, किंवा वाटल्यास आपलें स्वातंत्र्य सोडून साम्राज्यांत समाविष्ट व्हावें, या दोन्ही गोष्टी आज आयर्लंडला शक्य आहेत. पण आज सात शतकांचें युद्ध केल्यानंतर आतां साम्राज्यांत शिरण्याइतके आयरिश लोक शेळपट बनले आहेत असें तुम्हांला वाटतें कीं काय? ज्या ब्रिटिश राजाच्या सैन्याशीं आपण आजपर्यंत झगडलों व ज्या ब्रिटिश राजाच्या सैन्यानें आपल्यावर राक्षसी जुलूम केले त्या राजाला आपला सार्वभौम धनी म्हणून कबूल करण्याइतके आपण बेहिमती झालों आहोंत कीं काय? आणि वस्तुतः पंचम जॉर्जला नव्हे तर लॉइड जॉर्जला तुम्ही आपला धनी म्हणून पतकरीत आहांत.

सर्वांत दुःखाची गोष्ट ही, कीं आपल्याला पाहिजे त्या प्रकारचा

तह घडवून आणून राष्ट्राचा भाग्योदय करण्याचें सामर्थ्य आज आपल्या मनगटांत आहे, आणि अशा वेळीं असला हा भिकार तह करण्याचे बेत चालले आहेत. असल्या तहानें राष्ट्रांत शांतता प्रस्थापित होण्याऐवजीं लोकांत असंतोष मात्र माजेल. उद्यां ग्रिफिथ यांनीं जॉर्ज राजाला बोलवून त्याच्या हस्तें आयर्लंडचें पार्लमेंट उघडण्याचा समारंभ करण्याचें ठरविलें, तर राजा इकडे आल्याबरोबर लोक आपापल्या घरांवर काळीं निशाणें उभीं करतील, आणि डब्लिनच्या रस्त्यांना स्मशानभूमीची कळा येईल. अशा प्रकारांनीं शांतता प्रस्थापित होईल असें तुम्हांला वाटतें काय? डब्लिनमध्यें राजा येतांच काळ्या, सुतकी निशाणांनीं त्याचें स्वागत झाल्यावर इंग्लंडचे लोक काय म्हणतील? राजाला आयर्लंडमध्यें आणण्याला आमची हरकत आहे असें नव्हे. आपल्याला हवा तसा, आपले सर्व हक्क मान्य करणारा तह झाला तर आपल्याला राजाला खुशाल इकडे आणतां येईल व त्याचें आपण आनंदानें स्वागत करूं. ( नाहीं! नाहीं! ) कां? नाहीं नाहीं कां म्हणतां? राजाचें स्वागत करावयास कोणती हरकत आहे? योग्य प्रकारचा तह झाला, तर इंग्लंडच्याच काय फ्रान्सच्या किंवा स्पेनच्या राजाला देखील, किंवा वाटेल तर अमेरिकेच्या प्रेसिडेंटलासुद्धां आपण आणूं शकूं, आणि आयरिश लोक मनःपूर्वक त्याचें सुस्वागत करतील. कारण त्या वेळीं जो राजा येईल तो आमचा धनी म्हणून न येतां एका स्वतंत्र राष्ट्रानें निमंत्रित केलेला पाहुणा म्हणून येईल. या कारणासाठींच मी या तहाच्या विरुद्ध आहे. मूलभूत गोष्टींचीच साध्यता या तहानें झालेली नाहीं. आणि त्यामुळेंच शांतता प्रस्थापित करण्याचें सामर्थ्य या तहाच्या अंगीं असणें शक्य नाहीं. शंभर वर्षांपूर्वीं आयर्लंड इंग्लंडशीं जोडलें गेल्यामुळें देशाची जी स्थिति झाली ती या तहानें कायमच ठेविली आहे.

गेल्या सात शतकांत ज्या खडतर दुर्दैवाच्या भाराखालीं आयर्लंड वांकलें तें मुख्यतः हें, कीं ग्रेट ब्रिटनच्या परक्या अंमलाच्या जाचामुळें

अंतःस्थ कलह व अंतःस्थ प्रश्न यांचा समाधानकारक उलगडा करणें अशक्य झालें. या तहाचा तुम्ही स्वीकार केलात तर हें दुर्दैव संपणार नाहीं. ज्या भूमिकेवर आपण आज उभे आहोंत त्या भूमिकेशीं हा तह सर्वस्वी विरुद्ध असल्यामुळेंच मी त्याच्या विरुद्ध आहे. आयरिश लोकांनीं प्रजासत्ता स्थापन केली आहे. त्या प्रजासत्तेला तुम्ही अनुकूल होतां म्हणूनच लोकांनीं तुम्हांला निवडून डेल आयरेनमध्यें पाठविलें. तेव्हां मी तर असेंच म्हणतों, कीं प्रजासत्तेशीं विसंगत अशी कोणतीहि गोष्ट करावयास डेल आयरेनला मुळीं अधिकारच नाहीं. या तहाला डेल आयरेननें संमति देणें सर्वस्वी बेकायदेशीर आहे. प्रजासत्तेचें ध्येय बदलण्याची सत्ता डेल आयरेनला नाहीं. लोकांना प्रजासत्ता नकोशी झाली असेल तर ती टाकून दुसरी राज्यव्यवस्था मान्य करण्याचा हक्क जनतेचा आहे. जनतेची मर्जी असेल तर ती तसें करील. पण डेल आयरेनला तसें करतां येत नाहीं.

याहून अधिक बोलण्याची गरज नाहीं. सर्वसाधारण रीतीनें तहाविषयीं मी आतांपर्यंत बोललों. पाहिजे असेल तर कलमवार तहाचा विचार करून त्याचा फोलपणा दाखवितां येईल. पण साऱ्या कलमांची चर्चा खाजगी बैठकींत झालेलीच असल्यामुळें तिची आतां अवश्यकता नाहीं. हा तह आपल्या आजच्या दर्ज्याला कमीपणा आणणारा आहे. आयरिश स्वातंत्र्याचा विक्रय करणारा हा तह आहे. या तहानें ब्रिटिश साम्राज्यांत आपण अडकणार आहोंत. हा तह म्हणजे ब्रिटिश राजा आयर्लंडचा धनी होय अशी कबुली आहे. हा तह झाला तर आयर्लंडमधील साऱ्या सत्तेचा मूलाधार ब्रिटिश राजा ठरेल. आयर्लंडचे मंत्री त्या राजाचे मंत्री ठरतील, आणि आयर्लंडचें सैन्य म्हणजे त्या राजाचें सैन्य होऊन बसेल! (नाहीं! नाहीं!) तुम्ही नाहीं म्हणून काय उपयोग? हे शब्द तुम्हांला कडू वाटत असतील. पण तहांत जे शब्द आहेत त्यांचा अर्थ हाच होतो. शब्दांची तुम्हीं थट्टा केलीत

तरी शब्दांचे अर्थ बदलत नाहींत. शब्दांना अर्थ असतो. असल्या महत्त्वाच्या तहाच्या मसुद्यांत जे शब्द असतात त्यांना तर अर्थ असतोच असतो. त्यांना अर्थ असतो म्हणूनच ते तहाच्या वेळीं वापरले जातात. त्या शब्दांमागें वस्तुस्थितीचे खडक उभे असतात, आणि त्या खडकांकडे डोळेझांक करून चालत नाहीं. या तहाचा अर्थ जर कांहीं होत असेल तर तो हाच, कीं आयर्लंडचे मंत्री इंग्लंडच्या राजाचे मंत्री म्हणून नांदतील, आणि आयर्लंडचें सैन्य इंग्लंडच्या राजाचें सैन्य म्हणूनच नांदेल! (नाहीं! नाहीं!) ठीक आहे, काळपुरुष याचें प्रत्यंतर आणून देईल. पण तें प्रत्यंतर मिळण्याची संधिच उरणार नाहीं. कारण तुम्ही हा तहाचा मसुदा फेंकून द्याल अशी मला दृढ आशा आहे. उलट तुम्ही या तहाचा स्वीकार केला तर मी म्हणतों तसाच त्याचा अर्थ होतो कीं नाहीं हें योग्य वेळीं कळून येईलच. माझें असें स्पष्ट मत आहे—आणि माझे हे शब्द कोणीं लिहून ठेवले तर तें मला पाहिजेच आहे—कीं, या तहाप्रमाणें आयर्लंडमधील कार्यकारी सत्तेचा उगम ब्रिटिश तक्तापासून होईल, त्या तक्ताच्या जोरावरच आयरिश मंत्री अधिकार चालवतील, आयर्लंड-च्या शिपायांचा सर्वांत वरिष्ठ अधिकारी ब्रिटिश राजाच असेल, आणि त्या राजाशीं एकनिष्ठ राहण्याची शपथ त्यांना द्यावी लागेल. असल्या या शिपायांना आपण 'आयर्लंडचे शिपाई' म्हणणार! मी तुम्हांला पुन्हां सांगतों, कीं आपल्या राष्ट्रीय आकांक्षांचा, राष्ट्रीय दर्ज्याचा आणि परंपरेचा घात करणारा हा तह आहे. या तहानें शांतता कधींही मिळावयाची नाहीं. तहाच्या कागदावर तुम्हीं आपल्या सह्या ठोकल्यात म्हणून परंपरेचा प्रवाह तुमच्या हातून बदलेल अशी तुमची कल्पना आहे कीं काय? पुढच्या पिढीच्या मार्गांत अडथळे काय म्हणून उभे करतां? असेंच कांहीं करण्याचा आग्रह पूर्वी पार्नेल याला करण्यांत आला होता. त्या वेळीं दिल्या जाणाऱ्या सुधारणांनीं आयर्लंडचें कायमचें समाधान होईल असें म्हणण्याची त्याला गळ घालण्यांत

आली होती. पण पार्नेलनें उत्तर दिलें, " असलें काम मला करावयास सांगण्याचा तुम्हांला कांहीं हक्क नाहीं. कारण राष्ट्राच्या प्रगतीला व महत्त्वाकांक्षेला सीमा आंखून देण्याचा कोणालाही अधिकार नाहीं!" पार्नेलचे हे शब्द डोळ्यांपुढें ठेवा. हा तह मान्य करणें म्हणजे आपल्या मायभूमीच्या प्रगतीला व स्वातंत्र्याला सीमा घालून देण्यासारखें आहे हें विसरूं नका. पुन्हां एकवार तुम्हां सर्वांना प्रार्थना करतों, कीं हा तह तुम्ही मान्य करूं नका."

परंतु डी व्हॅलेराच्या पूर्ण वर्चस्वाचे दिवस संपविण्याची दैवाची लहर होती. आयर्लंडचे दुर्दिन संपले नव्हते.

वादविवाद संपल्यानंतर जेव्हां मतें घेण्यांत आलीं तेव्हां तहाला अनुकूल ६४ व प्रतिकूल ५७ अशीं मतें पडून अवघ्या ७ मतांच्या मताधिक्यानें तह मंजूर झाला.

तहाला मंजुरी मिळालेली पाहून डी व्हॅलेराच्या अंतःकरणांत दुःख, निराशा आणि त्वेष यांचें केवढें काहूर माजलें असेल त्याची कल्पना करणें कठीण आहे. आपल्या सदुपदेशाला न जुमानतां आयर्लंडनें आत्मघात करून घेतला हें पाहून त्याला दुःख वाटलें असेल. आपल्या मायभूमीच्या स्वातंत्र्याचा या तहामुळें एकदां असा विक्रय झाल्यानंतर पुन्हां पूर्ण स्वातंत्र्याचे दिवस तिला कसले लाभणार अशी त्याला निराशा वाटली असेल. असला मानहानिकारक तह देशानें मान्य करावा म्हणून खटपट करणाऱ्या भ्याड देशसेवकांचा त्याला त्वेष आला असेल. मनोविकारांचें तें काहूर त्याला अंतःकरणांतल्या अंतःकरणांत दडपून ठेवतां येईना. तो एकदम आपल्या जागेवर उठून उभा राहिला व बोलूं लागला. सारी सभा तो काय बोलतो या उत्सुकतेनें निःशब्द झाली. डी व्हॅलेराचे तोंड गोरेंमोरें झालें होतें, त्याचें सर्वांग कांपत होतें, ऊर भरून आल्यामुळें तोंडांतून शब्दही नीटसा फुटत नव्हता. "दोस्तहो, गेलीं चार वर्षें आपण केवढे पराक्रम केले तें तुम्ही कसें

विसरलांत !" येवढेच शब्द त्यानें कसेबसे उच्चारले. पण ते उच्चारतांच त्याला आपल्या भावनांचा पूर आवरेनासा झाला. त्यानें आपले डोळे दोन्ही हातांनीं घट्ट झांकून धरले, आणि तो हुंदके देऊं लागला. ते पाहतांच सभास्थानीं प्रतिनिधि म्हणून आलेल्या सर्व स्त्रियाही ढसढसां रडूं लागल्या. दगडालाही पाझर फोडणारा तो देखावा होता.

आयर्लंडनें तह मिळविला पण सिंहासारखा पुढारी गमावला. पुढें घडून आलेल्या गोष्टींनीं डी व्हॅलेराचेंच भविष्य खरें ठरलें. तह झाला तरी देशांतील अस्वस्थता संपली नाहीं. दंगेधोपे, जाळपोळ, अत्याचार यांची नवी परंपरा सुरू झाली. हा दुर्दैवी आयर्लंड देश !

## प्रकरण आठवें

# रक्तानें माखलेलें वर्ष

मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें डेल आयरिननें ७ मतांच्या मताधिक्यानें तह मान्य केल्याबरोबर डी व्हॅलेरानें सभेपुढें आपला राजीनामा सादर केला. राजीनामा देतांना त्यानें सांगितलें, कीं आज-पर्यंत कार्यकारी मंडळांत जरी मतभेद होते तरी ते मतभेद विसरून सर्वांनीं कार्य पुढें ढकललें होतें. परंतु आतां वेळ अशीच आली आहे, कीं कार्यकारी मंडळाचीं पुरतीं दोन शकलें उडाल्यामुळें कोणत्या तरी एका पक्षानें खालीं बसलें पाहिजे. मात्र त्यानें असेंही बजावलें, कीं राजीनामा दिल्यानंतर आपण पुन्हां निवडणुकीसाठीं उभे राहणार व त्या निवडणुकींत यशस्वी झाल्यास तहाला राष्ट्राची संमति नाहीं असेंच धरून चालणार. डी व्हॅलेरानें राजीनामा द्यावा हें कॉलिन्स यास पसंत नव्हतें. म्हणून त्यानें अशी सूचना पुढें आणली, कीं दोन्ही पक्षांतील प्रतिनिधींची एक कमिटी नेमण्यांत यावी म्हणजे त्यामुळें सार्वत्रिक सुरक्षिततताही राहील व ब्रिटिशांपासून राज्याचीं सूत्रें हातीं घेणेंही सुकर होईल. परंतु डी व्हॅलेराला हा समेट इष्ट वाटला नाहीं. डेल आयरिन तहाला पूर्ण अनुकूल असेल तर तहाला अनुकूल असलेल्या माणसांचेंच कार्यकारी मंडळ तिनें निनडावें, नाहीं तर तहाला प्रतिकूल असलेल्या लोकांना निवडून सभेनें आपली तहा-विषयीची नापसंती दर्शवावी असा त्यानें आग्रह धरला. या आग्रहावर कॉलिन्सनें अशी टीका केली, कीं डी व्हॅलेरा लोकांना प्रिय असल्या-मुळें त्याला व त्याच्या पक्षांतील लोकांना डेलचे सभासद कदाचित् कार्यकारी मंडळासाठीं निवडतील, व मग ज्या डेल आयरिननें क्षणा-पूर्वीं तह मान्य केला तिनेंच लगेच दुसऱ्या क्षणीं तोच तह नामंजूर केल्यासारखें होऊन साऱ्या जगाच्या उपहासाला डेल आयरिन पात्र

होईल. पण या टीकेनंतर देखील डी व्हॅलेरा आपला आग्रह सोडीना. त्याचें म्हणणें एकच, कीं कार्यकारी मंडळ एक तहाला सर्वस्वी अनुकूल तरी किंवा सर्वस्वी प्रतिकूल तरी असलें तरच तें कार्यक्षम होईल. शेवटीं डी व्हॅलेराचा राजीनामा मंजूर करण्यांत आला व त्याच्या राजीनाम्याबरोबरच त्याच्या कार्यकारी मंडळानेंही राजीनामा दिला.

मग डेल आयरिनचा अध्यक्ष डी व्हॅलेरा असावा कीं ग्रिफिथ असावा असा प्रश्न निघून दोघांचींही नांवें निवडणुकीकरितां सुचविण्यांत आलीं. ग्रिफिथचें नांव सुचवितांना कॉलिन्स म्हणाला " एखाद्या गलबताला कप्तान नसावा त्याप्रमाणें आज आयरिश राष्ट्राची स्थिति झाली आहे. राष्ट्र भलतीकडे भडकून बेबंदशाही माजूं नये यासाठीं कधींही जें डळमळणार नाहीं असें सरकार आपण बनविलें पाहिजे."

निवडणुकींत ग्रिफिथ यशस्वी झाला. डी व्हॅलेराच्या पक्षाचा पराभव झाला, व डी व्हॅलेरा आपल्या अनुयायांसह सभास्थान सोडून गेला. याचा उघड अर्थ असाच होता, कीं ग्रिफिथ, कॉलिन्स प्रभृति मंडळींनीं तहान्वयें मिळणारें स्वराज्य चालविण्याची जबाबदारी आपल्या शिरावर घेतली, आणि डी व्हॅलेराच्या पक्षानें त्या स्वराज्यापासून अलग राहण्याचें ठरविलें. डी व्हॅलेरा आतां पुढें काय करतो इकडे सर्वांचे लक्ष लागून राहिलें. आपल्या पक्षांतील मंडळींची सभा त्यानें ओहिआ येथें भरविली. परंतु त्यांत काय चर्चा झाली व कोणत्या धोरणाचा निश्चय झाला हें लोकांना कळलें नाहीं. ओहिआ येथील बैठकींत काय ठरलें हें जरी जाहीर झालें नाहीं तरी डी व्हॅलेराच्या धोरणाविषयीं तर्क करणें कांहीं फारसें अवघड नव्हतें. आणि नंतर थोड्याच दिवसांनीं " अंतरराष्ट्रीय वृत्तमंडळा " चे प्रतिनिधि ओकोनेल यांनीं डी व्हॅलेराची मुद्दाम गांठ घेऊन मुलाखतीची जी सविस्तर हकीगत प्रसिद्ध केली तिच्यावरून तर तें धोरण पुरतेंच उघड झालें. " संपूर्ण स्वातंत्र्याचा उपभोग घेणारें आयरिश प्रजासत्ताक राज्य हेंच आयरिश लोकांचें

ध्येय आहे, तेंच डोळ्यांपुढें ठेवून मी आजपर्यंत वागलों, व तेंच डोळ्यांपुढें ठेवून मी यापुढेंही काम करणार" असें त्या मुलाखतींत डी व्हॅलेरानें पुनः पुन्हां सांगितलें.

तहाच्या मोहाला बळी पडून भलत्या दिशेला झुकलेलें लोकमत पुन्हां जागेवर आणण्याचें काम आतां डी व्हॅलेरास करावयाचें होतें. हें काम अत्यंत बिकट होतें. तथापि हेंही खरें, कीं तह मंजूर करून स्वराज्याची स्थापना करण्यास पुढें झालेल्या मंडळीचें कामही कांहीं सोपें नव्हतें. ग्रिफिथ व कॉलिन्स यांना अनेक विरोधांशीं टक्कर देऊन राज्याची उभारणी करावयाची होती. फ्री-स्टेट अस्तित्वांत न यावें म्हणून खटपट करणारा एकटा डी व्हॅलेराचाच पक्ष होता असें नव्हे. भिन्न हेतूनें पण फ्री-स्टेट टिकूं न देण्याचेंच काम करणारा आणखी एक पक्ष होता. तो पक्ष अल्स्टरवाल्यांचा होय. आयर्लंडचा उत्तर भाग म्हणजे अल्स्टर परगणा व दक्षिण भाग यांचा आज कित्येक दिवस वैरभाव चालत आलेला होता, व हा वैरभाव कायम राहून आपला पाय आयर्लंडमध्यें चिरकाल टिकावा या धोरणानेंच ब्रिटिश मुत्सद्दी आजपर्यंत राजकारणांचीं सूत्रें हालवीत आले होते. १९२० सालच्या कायद्यानें अल्स्टरचा राज्यकारभार वेगळा झालेला होता; आणि आतां जो तह झाला त्यानेंही तो सवता सुभा नाहींसा होईलच असें निश्चयानें सांगतां येण्यासारखें नव्हतें. तहांत असें एक कलम होतें, कीं आयर्लंडला मिळणाऱ्या फ्री-स्टेटमध्यें आपला राज्यकारभार सामील करण्याचें अल्स्टरनें कबूल केलें तर बरेंच झालें, पण तसें न झाल्यास अल्स्टर व फ्री-स्टेट यांच्या परस्पर सरहद्दी ठरविण्यासाठीं एक कमिशन नेमण्यांत यावें. परंतु तह झाल्यानंतर लवकरच अशीं चिन्हें दिसूं लागलीं, कीं त्यांवरून अल्स्टरचा हा प्रश्न सामोपचारानें मिटणार नाहीं असें उघड होऊं लागलें. तारीख १४ मार्च १९२२ रोजीं झालेल्या अल्स्टर पार्लमेंटच्या बैठकींत तर अल्स्टरचे प्रधान सर जेम्स क्रेग

यांनीं असें स्पष्ट बोलून दाखविलें, कीं १९२० सालच्या कायद्या-प्रमाणें अल्स्टरच्या ज्या सरहद्दी ठरलेल्या आहेत त्यांत एका रेषेचा देखील फरक होऊं देण्यास आम्हीं तयार नाहीं. यावरून सर-हद्दीच्या प्रश्नाबद्दल आपल्याला अल्स्टरशीं चांगलाच झगडा करावा लागणार असें ग्रिफिथ व कॉलिन्स यांनीं ओळखलें. डी व्हॅलेराच्या विरोधांत या विरोधाची आणखी भर पडली. एकीकडे डी व्हॅलेराच्या संपूर्ण स्वातंत्र्याच्या आग्रहाचा खडक व दुसरीकडे अल्स्टरवाल्यांच्या दुष्टाव्याचा खडक अशा बिकट स्थितींतून फ्री-स्टेटचें गलबत सुरक्षित-पणें हांकारण्याचें कठीण काम ग्रिफिथ व कॉलिन्स यांस करावयाचें होतें.

१४ जानेवारी १९२२ रोजीं तहान्वयें अस्तित्वांत आलेल्या पार्लमेंटची डब्लिन शहरीं बैठक झाली, तारीख १७ रोजीं राजेसाहेबांनीं आयर्लंडच्या व्हाइसरॉयामार्फत त्या पार्लमेंटला शुभाशीर्वादही पाठविले, आणि फ्री-स्टेटचें काम सुरूं झाल्याचा बाह्य देखावा बहुतेक संपला. पण कांहीं झालें तरी फ्री-स्टेटचा गाडा नीट चालूं न देण्याचा डी व्हॅलेरानें निश्चय केला होता. डेल आयरेनच्या नव्या वर्षाच्या निवड-णुकीची वेळ आतां आली होती. या संधीचा फायदा घेऊन निवड-णुकींत आपल्या पक्षाचेच लोक निवडून आणावयाचे व मग तह भिरकावून देऊन, नुकत्याच जन्मलेल्या फ्री-स्टेटच्या गळ्याला नख लावून तें नष्ट करावयाचें असें डी व्हॅलेरानें ठरविलें व त्याप्रमाणें ताबड-तोब तो कार्यालाही लागला. ता. १२ फेब्रुआरी रोजीं डब्लिन येथें भरलेल्या एका प्रचंड सभेंत त्यानें विस्तृत भाषण करून आपल्या पक्षाचें समर्थन केलें, व फ्री-स्टेटचा धिक्कार करून पूर्वीं प्रस्थापित झालेल्या प्रजा-सत्तेचा पाठपुरावा करणारे ठराव त्यानें पास करून घेतले. ता. २० रोजीं अशीच एक प्रचंड जाहीर सभा कॉर्क शहरीं झाली व त्या वेळच्या भाषणांत तर डी व्हॅलेरानें असें प्रतिपादन केलें, कीं रिपब्लि-कन सैन्य फ्री-स्टेटच्या विरुद्ध आहे. त्या सुमारास रिपब्लिकन सैन्यांत

खरोखरच दोन पक्ष झाले होते. कांहीं सैनिक फ्री-स्टेटला धनी समजून नोकरी करण्यास तयार होते. पण कांहीं असे होते, कीं ते फ्री-स्टेटचा अधिकार ओळखीत नव्हते, व डी व्हॅलेराच्या आज्ञेप्रमाणेंच चाल-ण्याची त्यांची इच्छा होती. हा पक्षभेद रोजच्या रोज वाढत जाऊन शेवटीं कळसास पोंचला, व ता. २९ मार्च १९२२ रोजीं फ्री-स्टेटच्या विरुद्ध असलेल्या सैनिकांच्या कार्यकारी मंडळानें असें स्पष्ट ठरविलें, कीं यापुढें फ्री-स्टेटच्या सेनापतींचे हुकूम पाळावयाचे नाहींत. डी व्हॅलेराच्या बाजूचें सैन्य आणि फ्री-स्टेटचें सैन्य यांमध्यें आतां उघड युद्ध सुरू होणार असाच याचा अर्थ होता, व त्याप्रमाणें तें लवकरच सुरू झालें.

फ्री-स्टेटचें सैन्य व प्रजासत्ताक सैन्य यांची पहिली चकमक २७ मार्चच्या सुमारास झाली. डॉनीगल परगण्यांतील एका खेडेगांवांत प्रजासत्ताक सैन्यांतील लोक मोटारगाड्यांतून मध्यरात्रीं अकस्मात् गेले. त्या गांवीं फ्री-स्टेटच्या सैन्याची छावणी ज्या ठिकाणीं होती त्या ठिकाणावर मारा करण्यास सोयीचीं पडणारीं सर्व घरें त्यांनीं ताब्यांत घेतलीं, व गोळीबार सुरू केला. फ्री-स्टेटच्या सैन्यानेंही उलट मारा सुरू केला. याप्रमाणें तीन तास बंदुकांच्या फेरी झडल्यावर प्रजासत्ता-वाले निघून गेले. या दिवसापासून असल्या चकमकी म्हणजे दैनिक क्रम होऊन बसला. डी व्हॅलेरा तहाविरुद्ध लोकमत तयार करीतच होता. ता. ७ एप्रिल रोजीं डनलोघेर येथील सभेंत बोलतांना तर त्यानें तहाविरुद्ध फारच कडक भाषण केलें व शेवटीं म्हटलें, “ या तहाच्या तुम्हीं फाडून चिटोऱ्या करून टाकल्या पाहिजेत. तात्पुरत्या स्थापन झालेल्या या सरकारचे हुकूमच तुम्ही धाब्यावर बसवलेत म्हणजे मग हें सरकार कसें आपलें काम चालवतें पाहूं ! ” पुढें ता. १० एप्रिल रोजीं तहाला अनुकूल असलेल्या लोकांची तुलामूर येथें एक जंगी सभा भरली असतांना प्रजासत्तावाल्या लोकांनीं गोंधळ माजवून प्लॅटफॉर्मवर

हल्ला केला, व मुख्य वक्ता गॅव्हन डफी यास फरफरां ओढीत नेलें. असले प्रकार प्रत्येक सभेंत व्हावयास लागले. याच सुमारास एका वृत्त-पत्राच्या प्रतिनिधीशीं झालेल्या मुलाखतींत डी व्हॅलेरानें स्वच्छ सांगितलें, कीं "सध्यां ज्या प्रकारच्या निवडणुकी होणार आहेत त्यामुळें तह कायम होईल. याकरितां त्या निवडणुकी हाणून पाडण्याचा शेवटचा उपाय म्हणून प्रजासत्तावाल्या सैनिकांना असल्या गोष्टी करणें भाग आहे." कांहींही करून निवडणुकी हाणून पाडण्याचें धोरण डी व्हॅलेरानें आपल्या पक्षापुढें ठेवल्यामुळें रोज सभा उधळण्यांत येऊं लागल्या, लहानसहान मारामाऱ्या ठिकठिकाणीं होऊं लागल्या, आणि लुटालूट व जाळपोळ येथपर्यंत देखील दोन्ही पक्षांची मजल गेली. राजरोस युद्ध सुरू झाल्यासारखें दिसूं लागलें. युद्धाच्या त्या देखाव्यांत जर कांहीं कमतरता असेल तर तीही ता. १५ एप्रिल रोजीं भरून निघाली. त्या दिवशीं डब्लिन शहरांतील न्यायकचेऱ्यांवर प्रजासत्ताक सैन्यानें भर मध्यरात्रीं एकदम छापा घातला, इमारती काबीज केल्या, व भोंवतालीं तटबंदी वगैरे करून आपलें कायमचें ठाणें त्या ठिकाणीं बसविलें. ईस्टरच्या सणाच्या दिवशीं आयर्लंडच्या तरुण पिढीला उद्देशून डी व्हॅलेरानें एक संदेश जाहीर केला. १९१६ सालीं डब्लिन शहरांत झालेल्या बंडाची आठवण करून देऊन डी व्हॅलेरानें त्या संदेशांत म्हटलें होतें, "आतां पल्ला थोडा राहिला आहे. मुक्काम डोळ्यांना दिसूं लागला आहे. पुढें व्हा. तुम्ही हात पुढें केलेत कीं आयर्लंड तुमच्या हातांत येईल. उठा, हात पुढें करा!" ग्रिफिथ, कॉलिन्स वगैरे मंडळी डी व्हॅलेराच्या अनुयायांच्या वर्तनाचा धिक्कार करीत होती. १८ मे रोजीं भरलेल्या डेल आयरिनच्या सभेंत ग्रिफिथ म्हणाला, "डी व्हॅलेराच्या लोकांची पाशवी वृत्ति कळसाला पोंचल्या-सारखी दिसते. प्रजासत्तेचे व सुराज्याचे हे लोक शत्रू होत. लोकांवर पिस्तुलें रोखून 'तुमचीं मतें आम्हांस द्या नाहीं तर प्राण घेतों' असें

धमकावणाऱ्या लोकांत आणि रस्त्यावर वाटसरूंना गांठून लुबाडणाऱ्या नीच दरोडेखोरांत काय अंतर आहे?" परंतु या धिक्काराचा व निषेधाचा कांहींच परिणाम होईना. प्रजासत्ताक सैन्यानें आपला अत्याचारांचा क्रम चालूच ठेविला, व त्या अत्याचारांचा प्रतिकार करण्याकरितां फ्री-स्टेटच्या सैन्यालाही कठोरपणानें वागणें भाग पडत होतें.

शेवटीं ही क्रियाप्रतिक्रियेची परंपरा चालावयाची तरी कोठपर्यंत असें ग्रिफिथ व कॉलिन्स यांस वाटूं लागलें. फ्री-स्टेट तात्पुरतें चालू झालें असलें तरी त्याला कायमचें स्वरूप द्यावयासाठीं किती तरी गोष्टी करावयाच्या होत्या. तहाच्या मसुद्यांत एक कलम असें होतें, कीं फ्री-स्टेटचें पार्लमेंट अस्तित्वांत आलें, कीं प्रथम त्या पार्लमेंटनें राज्यव्यवस्थेची तपशीलवार घटना तयार करावी व ती ब्रिटिश पार्लमेंटकडे पाठवावी. त्या घटनेला ब्रिटिश पार्लमेंटची संमति मिळाली म्हणजेच फ्री-स्टेटच्या राज्याला कायमचें स्वरूप यावयाचें होतें. पण हें घटनेचें काम अजून तसेंच पडलें होतें, व इतरही कित्येक महत्त्वाचीं कामें मागें राहिलीं होतीं. प्रजासत्तावाल्यांच्या अत्याचारांचा प्रतिकार करण्यांतच फ्री-स्टेटची सर्व शक्ति खर्च व्हावयास लागली तर राज्याला स्थिरता आणण्याचें खरें काम केव्हांच व्हावयाचें नाहीं अशी भीति ग्रिफिथ व कॉलिन्स यांना वाटूं लागली, व त्यांनीं डी व्हॅलेराशीं समेट करण्याचें ठरविलें.

ता. २० मे रोजीं डी व्हॅलेरा व कॉलिन्स यांच्यामध्यें समेट झाल्याचें वर्तमान जाहीर झालें. या समेटान्वयें असें ठरलें, कीं निवडणुकी इतक्यांत न होतां १६ जून रोजीं व्हाव्यात, तोंपर्यंत कार्यकारी मंडळांत अध्यक्ष व प्रधान यांखेरीज तहाला अनुकूल पांच व प्रतिकूल चार सभासद असावेत, व या संयुक्तमंडळानेंच राज्यघटनेचा मसुदा तयार करावा. या सुमारास डेल आयरिनची एक परिषद भरली त्यावेळीं २००० सभासदांपुढें डी व्हॅलेरानें ही समेटाची सूचना ठरावाच्या रूपानें पुढें मांडली. त्या वेळीं तो म्हणाला, "गेले सहा महिने

आपल्या राष्ट्राची अब्रू जाते कीं काय अशी भीति उत्पन्न झाली होती; पण आज शेवटीं सुबुद्धीचा व शांततेचा विजय झाला आहे !" डी व्हॅलेराच्या या ठरावाला कॉलिन्सनें स्वतः मोठें उत्साहाचें भाषण करून दुजोरा दिला व टाळ्यांच्या गजरांत एकमतानें ठराव पास झाला. डी व्हॅलेरा, ग्रिफिथ, कॉलिन्स वगैरे पुढाऱ्यांना या शुभसूचक समेटामुळें जितका आनंद झाला, तितकाच उत्तर आयर्लंडचे प्रधान सर जेम्स क्रेग व ब्रिटिश सरकार यांना तो समेट भीतिप्रद वाटला. ब्रिटिश सरकारला असल्या समेटानें भय वाटूं लागावें यांत मोठेंसें आश्चर्य नव्हतें. भेदनीति चालवून दुसऱ्यांचे देश कबजांत ठेवणाऱ्या ब्रिटिश सरकारला आयर्लंडमध्यें जितके पक्षोपपक्ष माजतील तितके पाहिजेच होते. डी व्हॅलेराचा व कॉलिन्सचा समेट होण्यापूर्वी समेटाचे गोडवे गाऊन ब्रिटिश सरकार सज्जनपणाचें नाटक करीत होतें. परंतु तो खरोखरच घडून आलेला पाहून ब्रिटिश सरकारला बरें वाटलें नाहीं. ब्रिटिश मुत्सद्यांना तर अशी धास्ती वाटूं लागली, कीं कदाचित् डी व्हॅलेराच्या मताचें पुन्हां वर्चस्व होऊन आयर्लंड प्रस्तुतचा तह नामंजूर करून संपूर्ण स्वातंत्र्याची पुन्हां मागणी करील. त्या मुत्सद्यांची ही धास्ती अगदींच वेडेपणाची व खोटी होती असेंही नव्हे. त्या वेळचा तो समेट चिरकालिक झाला असता तर खरोखरच ती धास्ती खरी ठरली असती. डी व्हॅलेराच्या हातीं डेल आयरिनचीं सूत्रें पुन्हां गेलेलीं पाहून ब्रिटिश पार्लमेंटचे सभासदही अस्वस्थ झाले व समेट मोडून टाकण्याच्या उद्देशानें पार्लमेंटमधील कांहीं वक्ते आपल्या भाषणांत आयर्लंडला धाक घालण्याचाही प्रयत्न करूं लागले. आयर्लंडच्या राज्यघटनेचा मसुदा समेटानें निर्माण केलेल्या संयुक्त मंडळाकडून या वेळीं तयार होत होता. त्या मसुद्याला उद्देशून चर्चिलसाहेब पार्लमेंट-मध्यें मोठ्या दिमाखानें असे म्हणाले, कीं "हा मसुदा जर आम्हांला समाधानकारक वाटला नाहीं तर आम्ही तहाला मान्यता देणार नाहीं."

पण ज्या मंडळांत डी व्हॅलेरा होता त्या मंडळापुढें चर्चिलसाहेबांच्या या धमकीचा टिकाव लागणें शक्य नव्हतें. उलट चर्चिलच्या या उद्गारांबद्दल एका वृत्तपत्राच्या बातमीदारानें डी व्हॅलेराची मुलाखत घेतली तेव्हां त्यानें ठांसून सांगितलें, कीं "चर्चिलच्या धमकावणीला आम्ही भीक घालीत नाहीं. आम्हांला वाटेल त्या प्रकारची घटना आम्ही तयार करूं. आयरिश लोकांनीं अमुक प्रकारची घटना करावी किंवा करूं नये असें चोंबडेपणानें सांगण्याचा इंग्रजांना काय अधिकार आहे?"

परंतु आयर्लंडच्या दुर्दैवाची गोष्ट ही, कीं ज्या समेटानें ब्रिटिश मुत्सद्यांना विषाद वाटत होता व आयरिश लोकांना आनंद झाला होता, तो समेट जून महिन्यांत निवडणुकी सुरू होईपर्यंतच टिकला. ता. २ जून रोजीं उमेदवारांच्या यादींत ६६ तहानुकूल उमेदवार व ५९ तहप्रतिकूल उमेदवार दिसून आले. पुढें ता. १० रोजींची परिस्थिति अशी होती, कीं निवडणुकींत तहानुकूल लोकांचे मताधिक्य होण्याचाच ज्यास्त संभव दिसत होता. शेवटीं १६ जून हा निवडणुकीचा दिवस उगवला तेव्हां प्रकरण हातघाईवर आलें. स्लिगो नांवाच्या भागांत निवडणुकीच्या वेळीं प्रजासत्ताक लोकांनीं दंगा केला, निवडणूक चालविणाऱ्या अधिकाऱ्यांच्या कामांत अडथळे उत्पन्न केले, आणि मतपत्रिकाही जाळून टाकल्या. इतकेंच नव्हे तर, कांहीं तहानुकूल मतदारांनाही त्यांनीं पकडून पळवून नेलें. शेवटीं निवडणुकीचा निकाल जाहीर झाला तेव्हां तो सर्वस्वीं तहाला अनुकूल असल्याचें दिसून आलें. एकंदर १२० यशस्वी उमेदवारांपैकीं फक्त ३४ प्रजासत्ताक पक्षाचे होते, आणि एकंदर मतांचा हिशोब पाहिला तर तहानुकूल पक्षाला ७२२८५ मतें पडलीं असून प्रजासत्ताक पक्षाला फक्त १०९२१ च मतें मिळालीं होतीं. या निवडणुकीमुळें समेटाचा शेवट झाला, डी व्हॅलेरा पुन्हां डेल आयरिनबाहेर निघाला, व ग्रिफिथ-कॉलिन्सच्या पक्षाला देशाचा पाठिंबा

असल्याचें सिद्ध झालें. आतां डेल आयरिनच्या द्वारें आपलें कार्य चालू ठेवण्याची डी व्हॅलेरास आशाच उरली नाहीं.

प्रजासत्तेचें आपलें ध्येय कायम ठेवण्यासाठीं फ्री-स्टेटचें राज्य ढांसळून पाडण्याची खटपट करण्याशिवाय आतां डी व्हॅलेरास गत्यंतर नव्हतें. समेटामुळें किंचित् शमलेल्या झटापटीलाच पुन्हां चलन देणें आतां प्राप्त होतें. फ्री-स्टेटशीं विरोध करण्यांत आपल्या देशबांधवांच्याच प्राणांची व वित्ताची हानि करावी लागणार हें डी व्हॅलेरास कळत होतें. फ्री-स्टेट हाणून पाडावयाचें म्हणजे कॉलिन्स, ग्रिफिथप्रभृति ज्या प्रिय संवगड्यांशीं इतकीं वर्षें आपण मोठ्या प्रेमानें सहकार्य केलें त्यांच्यावरच तरवार उगारावी लागणार हें पाहून डी व्हॅलेराच्या अंतःकरणाला पीळ पडत होता. या यादवीमध्यें देशाची नासधूस होईल हें पाहून देशभक्त डी व्हॅलेराला हळहळ वाटत होती. पण डोळे घट्ट मिटून हें सर्व करण्यास त्यानें आपल्या मनाची तयारी केली. आणि ती कां तर प्रजासत्तेच्या स्थापनेंतच आपल्या मायभूमीचें खरें वैभव आहे, आणि तें स्थापण्यासाठीं आज कांहींही करावें लागलें तरी त्यामुळें अखेर देशाचें कल्याणच होईल अशी त्याची खात्री होती म्हणून.

निवडणुकींचे निकाल होऊन समेट मोडला गेल्याबरोबर प्रजासत्तावाले व फ्री-स्टेटवाले यांच्यांत पूर्वीप्रमाणें सामना सुरू झाला. याच सुमारास ता. २२ जून रोजीं इंग्लंडचे सेनापति सर हेनरी वुइलसन यांचा लंडन शहरीं त्यांच्या घराबाहेर खून करण्यांत आला. त्या खुनाच्या आरोपावरून दोन आयरिश तरुणांना पकडण्यांत आलें, व तो खून प्रजासत्ताक पक्षाच्याच चिथावणीवरून झाला असा जिकडे तिकडे गवगवा झाला. वुइलसनच्या खुनाचा व प्रजासत्ताक पक्षाचा संबंध जोडण्याचा कांहीं लोक प्रयत्न करीत आहेत त्याबद्दल तुमचें काय म्हणणें आहे, असें कांहीं वृत्तपत्रकारांनीं डी व्हॅलेराची मुलाखत

घेऊन त्यास विचारलें. तेव्हां त्यानें सांगितलें, कीं " एखाद्या माणसाचा प्राण घेणें हा भयंकर अपराध होय. पण या अपराधाचा बळी एखादा दीनदुबळा, गरीब शेतकरी असला म्हणजे त्याची उग्रता कमी, आणि एखादा प्रसिद्ध, बडा अधिकारी मारला गेला म्हणजे तो अपराध अधिक भयंकर असें थोडेंच आहे? वुइलसनला कोणीं मारलें व कां मारलें तें मला माहीत नाहीं. पण मला एक गोष्ट माहीत आहे; ती ही कीं, सरकारनें जुलुमाचें व अत्याचाराचें धोरण चालूं ठेवलें म्हणजे प्रजेमध्यें एक प्रकारची हिंसकवृत्तीच उत्पन्न होते. सरकारच्या साम्राज्यतृष्णेमुळेंच असले भयंकर अत्याचार प्रतिकाररूपानें होत असले पाहिजेत, हेंच मत मला मान्य आहे. या अत्याचारापासून जर कोणता बोध घेण्यासारखा असेल तर तो हाच, कीं न्यायनीतीचा पाया असेल तरच दोन राष्ट्रांमध्यें परस्पर सख्य किंवा एखाद्या देशांत अंतःस्थ शांतता राहणें शक्य आहे. व्हर्सेलीस येथें तहासाठीं जमलेल्या राष्ट्रांनीं न्यायनीतीची जरा चाड बाळगली असती तर जगाला शांततेचा लाभ झाला असता. तसेंच गतवर्षींच्या डिसेंबरमध्यें आयर्लंडच्या प्रतिनिधींशीं तहाची चर्चा करतांना ब्रिटिश मुत्सद्यांनीं न्यायनीतीची थोडी तरी चाड दाखविली असती तर आज हे दोन देश हातांत हात घालून सुखानें नांदतांना दिसले असते. न्यायनीतीविषयींच्या प्रेमानें प्रेरित होऊन इंग्रज व आयरिश एके ठिकाणीं जमले तर या दोन देशांतील प्रश्नांचा आठ दिवसांत निकाल लागेल, आणि आयर्लंडचा अंतःस्थ प्रश्न तर चुटकीसरसा सुटेल. परंतु सारे अत्याचार संपावेत आणि चिरकालिक शांतता प्रस्थापित व्हावी यासाठीं प्रथम सर्वांनीं निर्भयपणें सत्याचा व न्यायाचा आग्रह धरला पाहिजे ! "

निवडणुकीच्या निकालानंतर फ्री-स्टेटवर निकराचे हल्ले चढविण्याचें प्रजासत्ताकवाल्यांनीं ठरविलें, त्याप्रमाणेंच प्रजसत्ताक सैनिक हे बंडखोर

आहेत असें फ्री-स्टेट सरकारनें जाहीर केलें, व त्यांचा पुरा बीमोड करण्याचेंही त्या सरकारनें ठरविलें. १५ एप्रिल रोजीं प्रजासत्ताकवाल्यांनीं डब्लिनच्या न्यायकचेऱ्या काबीज करून ठेवल्या होत्या, व अजूनही त्याच कचेऱ्यांत ठाणें देऊन ते बसलेले होते. त्यांच्या या ठाण्यांवर हल्ला करून त्यांना तेथून हुसकावून लावावयाचा फ्री-स्टेटनें आतां बेत केला. या बेताप्रमाणें सैन्याला हुकूम सोडण्यांत आले. ता. ३० जून रोजीं पहाटे फ्री-स्टेटच्या सैन्यानें डब्लिनच्या न्यायकचेऱ्यांवर अचानक छापा घातला. न्यायकचेऱ्यांच्या इमारती सुरुंगानें एकदम उडवून देण्यांत आल्या. दोन्ही सैन्यांची विलक्षण झटापट झाली. शेवटीं ठाणें शत्रूच्या स्वाधीन करून बाहेर पडणें प्रजासत्ताक सैन्याला भाग पडलें. डी व्हॅलेरानें आपलें सारें सैन्य कचेरीच्या बाहेर शहरांत पसरविलें, व एक जाहीरनामा प्रसिद्ध केला. त्या जाहिरनाम्यांत म्हटलें होतें, कीं, "आपल्या प्राणांसाठीं लढण्याचा प्रसंग प्रजासत्तेवर आला आहे. देशबांधवांनो, या वेळीं प्रजासत्तेच्या रक्षणासाठीं धांव घ्या. नेहमींच्याच शत्रूशीं झगडावयाचें आहे. तो शत्रू म्हणजे इंग्लंड. चर्चिलनें चाबूक कडाडदिशीं वाजविला व हुकूम केला म्हणूनच फ्री-स्टेटनें न्यायकचेऱ्यांवर हल्ला केला. चर्चिलच्या हुकमतीनें वागणाऱ्या या फ्री-स्टेटवाल्यांचा धिक्कार असो! प्राणांत प्राण आहे तोंपर्यंत प्रजासत्तेचें रक्षण करण्याचा प्रजासत्तावाल्यांचा कृतनिश्चय आहे!"

न्यायकचेऱ्यांतून निघून जावें लागल्यानंतर डी व्हॅलेरानें डब्लिन शहरांतील सॅकव्हिल नांवाच्या रस्त्याच्या आसपास व तेथील कांहीं हॉटेलांत आपल्या साऱ्या सैन्याचें एकीकरण करून ठाणें दिलें, व भोंवतीं ताबडतोब तटबंदी केली. पण ता. ३ जुलई रोजीं फ्री-स्टेटच्या सैन्यानें त्याही ठाण्यावर हल्ला चढविला. एक दिवसभर सारखी लढाईची धुमश्चक्री चालली होती. फ्री-स्टेटच्या सैन्याची सारखी चढाई चालू होती. चारी बाजूंनीं होणारा आगीचा वर्षाव अंगावर घेत प्रजासत्ताक

पक्षाचे लोक ग्रेशॅम हॉटेलच्या आश्रयानें लढत होते. पण त्यांचा अखेरपर्यंत टिकाव लागणें शक्य नव्हतें. शेवटीं जुलई ५ ला तें ठाणें सर्वस्वी फ्री-स्टेटवाल्यांच्या ताब्यांत गेलें. प्रजासत्तावाल्यांचे फार लोक कामीं आले. कॅथल ब्रूघा व बार्टन हे त्यांचे दोन पुढारी शत्रूच्या हातीं सांपडले. मोठ्या शिकस्तीनें डी व्हॅलेरा ऑस्टिन स्टॅक यासह ग्रेशॅम हॉटेलमधून सुरक्षितपणें निसटला. पुढें कॅथल ब्रूघा मरण पावला, व बार्टन फ्री स्टेटवाल्यांच्या तुरुंगांतून पळून येऊन पुन्हां डी व्हॅलेराला मिळाला.

डब्लिन शहर सोडून द्यावें लागल्यानंतर डी व्हॅलेरा खालीं नैऋत्येकडे सरकला व कॉर्क परगण्यांत त्यानें आपल्या सैन्याची जमवाजमव केली. मिशेल कॉलिन्स हा कार्क परगण्याचा रहिवाशी होता व फ्री-स्टेटच्या सैन्याची हुकमत त्याच्या हातीं होती. तेव्हां कॉर्क परगण्यांतील लढाईंत डी व्हॅलेरा व कॉलिन्स, यांची गांठ पडणार, व आयर्लंडचे जे दोन पुढारी कांहीं काळापूर्वीं खांद्याला खांदा भिडवून ब्रिटिशांशीं झगडले तेच दोघे आतां समरांगणावर समोरासमोर उभे राहणार अशीं स्पष्ट चिन्हें दिसूं लागलीं. कॉर्क परगण्यांतही डी व्हॅलेराच्या सैन्याचा पाय नीटसा कोठेंच रुजेना. टिप्परारी, कॅशेल, किलमॅलॉक, चार्लव्हिल वगैरे ठिकाणीं फ्री-स्टेट सैन्यानें त्यांचा चांगलाच पाडाव केला, ब्रूरी येथूनही त्यांना पळावें लागलें, व शेवटीं बटेव्हँट, मॅलो व फर्माय या तीन गांवांचा त्रिकोण साधून त्यांत डी व्हॅलेरानें आपले सारे लोक एकवटले. या सुमारास अशीही एक गप्प उठली, कीं पैशांची मदत मिळविण्यासाठीं डी व्हॅलेरा अमेरिकेला निघून गेला आहे. परंतु ती गप्प खोटी असल्याचें लवकरच सिद्ध झालें, व क्लोनोमल व वॉटरफोर्ड येथें डी व्हॅलेरा आपल्या सैन्यावर आहे याबद्दल शंका उरली नाहीं.

डी व्हॅलेराच्या पक्षाची याप्रमाणें सारखी पिछेहाट होत असतांना फ्री-स्टेट पक्षावरही दोन फार मोठीं संकटें गुदरलीं. ग्रिफिथ व

कॉलिन्स यांचे मृत्यू हींच तीं संकटें होत. ता. ११ ऑगस्ट रोजीं आर्थर ग्रिफिथ एका इस्पितळांत कांहीं कामासाठीं गेला असतांना जिन्याच्या पायऱ्या उतरण्याच्या वेळीं सैल झालेले बुटाचे बंद बांधण्यासाठीं खालीं वांकला तोंच त्याच्या छातींत कळ आली व तो तसाच खालीं पडला. एका मिनिटानंतर तो शुद्धीवर आला. पण ती शुद्ध पुरी मिनिटभर-देखील टिकली नाहीं व तो गतप्राण झाला. ग्रिफिथच्या या आकस्मिक मृत्यूनें फ्री-स्टेटच्या इमारतीला धरणीकंपाचा धक्का बसल्यासारखेंच झालें. आणि धरणीकंपाच्या वेळीं एक धक्का संपतो न संपतो तोंच दुसरा धक्का बसावा त्याप्रमाणेंच ग्रिफिथच्या मृत्यूविषयींच्या शोकाचा आवेग ओसरला नाहीं तोंच फ्री-स्टेटवाल्यांवर मिशेल कॉलिन्सच्या मृत्यूची बातमी ऐकण्याचें दुर्दैव ओढवलें. ता. २३ ऑगस्ट रोजीं सकाळीं कॉलिन्स आपल्या सैन्याची पाहणी करण्यासाठीं बॅंडन येथें गेला होता. तेथून संध्याकाळीं परत येत असतांना एका अडचणीच्या जागीं दोनशें प्रजासत्ताक शिपायांनीं त्याची मोटार अडविली. कॉलिन्स बरोबर अवघे वीस लोक होते. जोराची झटापट सुरू झाली. कॉलिन्स स्वतः मोटार खालीं उतरून बंदूक चालवूं लागला. एक तासभर गोळीबार चालला होता. शेवटीं प्रजासत्तावाले पळूं लागले व कॉलिन्सची बाजू यशस्वी होत आली. पण दुर्दैवानें तितक्यांतच कॉलिन्सच्या मस्तकांत एक गोळी शिरली व तो मृत होऊन पडला.

कॉलिन्सच्या मरणानें केवळ त्याच्या पक्षालाच नव्हे तर साऱ्या राष्ट्राला अपरिमित दुःख वाटलें. त्याच्या मृत्यूनें फ्री-स्टेटची जी हानि झाली तिला तर सीमाच नव्हती. ग्रिफिथ व कॉलिन्स हे फ्री-स्टेटचे पंचप्राण होते. ग्रिफिथचें बुद्धिबल आणि मिशेल कॉलिन्सचें बाहुबल यांवरच फ्री-स्टेटची सारी इमारत उभी राहिली होती. अवघ्या दहा बारा दिवसांच्या अंतरानें त्या इमारतीचे दोन्हीं आधारस्तंभ कोसळून

पडल्यामुळें आतां फ्री-स्टेट विलयाला जातें कीं काय, अशी भीति लोकांना वाटूं लागली.

पण तसें कांहीं झालें नाहीं. ता. ९ सप्टेंबर रोजीं फ्री-स्टेटच्या पार्लमेंटची जी बैठक झाली तीमध्यें वुइल्यम कॉसग्रेव्ह यांची अध्यक्ष-पदावर निवड करण्यांत आली, व फ्री-स्टेटचें काम सुरळीत चालू झालें. उलट डी व्हॅलेराच्या सैन्याची रोजच्या रोज अधिकाधिक दुर्दशा होऊं लागली. आज क्लोनोमल येथें तर उद्यां ब्लार्ने येथें व परवां मॅक्रूम येथें अशा प्रकारें त्याला आपलें सैन्य सारखें हलवावें लागूं लागलें. दऱ्याखोऱ्यांच्या आश्रयानें आपली छावणी ठेवून फ्री-स्टेटशीं गनिमी लढाई करण्यापलीकडे त्याला कांहीं करतां येईना. ता. २३ ऑगस्टरोजीं 'मॉर्निंग पोष्ट' पत्राच्या कॉर्क येथील बातमीदारानें अशी बातमी प्रसिद्ध केली, कीं लढाई करून प्रजासत्ता स्थापन करण्याचा आपला प्रयत्न फसला असें डी व्हॅलेरानें कबूल केलें असून तो आपल्या लोकांना शस्त्रें खालीं ठेवण्याचा व मग कायदेशीर उपायांनीं प्रजासत्तेच्या स्थापनेसाठीं खटपट करण्याचा उपदेश करणार आहे. ता. १३ सप्टेंबराला तर अशीही बातमी आली, कीं डी व्हॅलेरानें फ्री-स्टेटचा सेनापति मुल्काही याची गांठ घेतली, व मुल्काहीनें त्यास स्पष्ट वजावलें, कीं प्रजासत्तावाल्यांनीं हत्यारें खालीं ठेवल्याखेरीज शांतता होणें शक्य नाहीं. माफी मिळण्याची आशा दिसल्यास डी व्हॅलेराचे लोक त्याला सोडून फ्री-स्टेटच्या बाजूला येतील असें वाटून ता. ४ आक्टोबर रोजीं फ्री-स्टेटनें एक जाहिरनामा प्रसिद्ध केला. त्या जाहिरनाम्यांत असें म्हटलें होतें, कीं पुष्कळसे लोक केवळ दिशाभूल होऊन डी व्हॅलेरास जाऊन मिळाले आहेत हें सरकारला माहीत आहे, व अशा लोकांना आपली चूक सुधारण्याची संधि द्यावयाच्या हेतूनें सरकारनें असें ठरविलें आहे, कीं जे बंडवाले अजून बंडांतून आपलें अंग काढून घेतील त्यांना पूर्ण माफी मिळेल.

पण डी व्हॅलेराविषयींच्या या साऱ्या बातम्या व त्याचा पक्ष शरण

येण्याविषयींच्या सर्व आशा खोट्या होत्या. आज आठ दहा महिने त्याचा सारखा पाडाव होत होता हें खरें, व त्याच्या जवळ आतां फार मोठें सैन्य उरलें नव्हतें हेंही खरें; पण जे मूठभर लोक उरले त्यांच्या सहाय्यानें आपल्या ध्येयासाठीं लढत राहण्याचा डी व्हॅलेराचा निश्चय कायम होता. डी व्हॅलेरा निराश झाला अशा बातम्या जे लोक उठवीत होते व अशा बातम्यांवर जे लोक विश्वास ठेवीत होते त्यांना डी व्हॅलेराचें अंतःकरण कळलें नव्हतें असेंच म्हटलें पाहिजे. निराशाजनक परिस्थितीनें फाटण्यासारख्या कच्च्या दिलाचा डी व्हॅलेरा नव्हता.

तथापि यावेळीं दैव डी व्हॅलेराला प्रतिकूल होतें हें खचित. त्याच्या सैन्याला ठिकठिकाणीं माघार घ्यावी लागत होती, व त्याच्या पक्षाचे जे लोक फ्री-स्टेटवाल्यांच्या हातीं सांपडत त्यांना भयंकर कडक शिक्षा ठोठावण्यांत येत होत्या. १८ नोव्हेंबरला तर डी व्हॅलेराच्या पक्षांतील चार लोकांना डब्लिन शहरीं फांशीं देण्यांत आलें व त्या प्रकाराविषयीं फ्री-स्टेटच्या पार्लमेंटमध्यें बोलतांना कॉसग्रेव्हनें असें स्पष्ट सांगितलें, कीं "लोकांचे प्राण घेण्यासाठीं जे लोक हातांत हत्यारें घेऊन फिरतात त्यांना त्यांचेही प्राण सुरक्षित नाहींत ही गोष्ट पुरती पटवून दिलीच पाहिजे." याच सुमारास डी व्हॅलेराचा केवळ उजवा हात असा जो अर्स्किन चाइल्डर्स तो फ्री-स्टेट सरकारच्या हातीं सांपडला. त्याची लष्करी कोर्टापुढें झटपट चवकशी करण्यांत आली, व २४ नोव्हेंबर रोजीं सकाळीं त्याचा शिरच्छेद करण्यांत आला.

चाइल्डर्सचा अशा रीतीनें अंत झाल्यामुळें डी व्हॅलेराचा पक्ष आतां नामशेष होण्याच्या पंथास लागणार असें लोकांना वाटलें. प्रजासत्ता-वाल्यांचा फ्री-स्टेटशीं झगडा सुरू झाल्यापासून डी व्हॅलेरास चाइल्डर्सची कल्पनातीत मदत झाली होती. प्रजासत्तेविषयींची डी व्हॅलेराची निस्सीम भक्ति त्याच्या अंगीं पुरी मुरलेली होती, व डी व्हॅलेराच्या मनाची व अंतःकरणाची ठेवण त्याला इतक्या उत्तम रीतीनें समजली

होती, कीं कोणत्या संकटास कसें तोंड द्यावयाचें व कोणत्या वेळीं परिस्थितीचा फायदा घेऊन आपलें कार्य पुढें ढकलावयाचें याविषयींचे त्याचे व डी व्हॅलेराचे विचार तंतोतंत जुळत. १९२२ सालच्या बिकट परिस्थितींत चाइल्डर्ससारखा मुत्सद्दी मदतीला होता म्हणूनच डी व्हॅलेरास आपला पक्ष इतका तरी जिवंत ठेवतां आला. तेव्हां चाइल्डर्सच्या मरणानें डी व्हॅलेराला काय वाटलें असेल त्याचें स्पष्ट वर्णन करावयास पाहिजे असें थोडेंच आहे ?

चाइल्डर्सच्या शिरच्छेदानें डी व्हॅलेराचा पक्ष अतिशय चिडून गेला व त्या खुनाचा सूड उगविण्यासाठीं जो कोणी फ्री-स्टेटवाला हातीं लागेल त्याची कत्तल करण्याचा त्यांनीं सपाटा चालविला. फ्री-स्टेट सैन्याच्या डब्लिन शहरच्या कांहीं कांहीं ठाण्यांवर त्यांनीं हल्लेही केले. परंतु त्यांच्या या गडबडीचा कांहींच परिणाम होईना. उलट फ्री-स्टेटची रीतसर परिणति व्हावयाची ती होतच होती. फ्री-स्टेटच्या बिलाला कॉमन्स सभेची संमति पूर्वींच मिळाली होती. आतां डिसेंबरच्या ४ तारखेस लॉर्डांच्या सभेंतही तें बिल पास झालें, व फ्री-स्टेट परिपूर्ण रीतीनें अस्तित्वांत आल्यासारखें झालें. डिसेंबर ५ रोजीं टिम हिली यास ब्रिटिश सरकारनें आयर्लंडचा गव्हर्नर जनरल नेमलें. फ्री-स्टेटमध्यें सामील न होण्याचा आपला निश्चय अल्स्टरनें शेवटीं पार पाडला, व ड्यूक ऑफ ॲबरकॉर्न यांची उत्तर आयर्लंडचा गव्हर्नर म्हणून ब्रिटिश सरकारकडून नेमणूक करण्यांत आली. याप्रमाणें डिसेंबर १९२१ च्या तहानुसार सर्व गोष्टींची व्यवस्था लागली, आणि १२ डिसेंबर १९२२ रोजीं फ्री-स्टेटच्या सेनेटची पहिली बैठक होऊन फ्री-स्टेटच्या राज्यघटनेचा अंमल विधिपूर्वक सुरू झाला.

१९२२ सालाचा अस्त झाला त्यावेळची परिस्थिति अशी होती. आयर्लंडनें या वर्षाचा आढावा काढला तर जमेच्या बाजूस फक्त फ्री-

स्टेटचें कलम आणि खर्चाच्या बाजूला शेंकडों स्त्री-पुरुषांचे खून, जाळ-पोळ आणि रक्तपात असल्याचें दिसून आलें असतें. 'रक्तानें माखलेलें वर्ष' असेंच या सबंद वर्षाचें वर्णन करणें भाग आहे. वर्षअखेर डी व्हॅलेराचा पक्ष अगदीं निष्प्राण झालेला होता. कोणत्याही शहरांत उघडपणें ठाणें देऊन फ्री-स्टेटशीं झुंजण्याचें सामर्थ्य आतां त्या पक्षांत उरलें नव्हतें. डी व्हॅलेरा स्वतः कोठें आहे याविषयीं लोक नाना प्रकारचे तर्क करीत होते. त्याचा ठावठिकाण कोणालाच समजत नव्हता. दऱ्याखोऱ्यांत लपून छपून राहण्याची त्याच्यावर पाळी आली होती. पण डी व्हॅलेरा आपलें प्रजासत्तेचें ध्येय सोडण्यास तयार नव्हता. त्यानें अज्ञातवासांत राहूनही झुंज चालविण्याचेंच ठरविलें.

## प्रकरण नववें

# शमीवृक्षावर शस्त्रविसर्जन

नवजीवन देणारें व नवीन आशांकुर उत्पन्न करणारें १९२३ चें नवें संवत्सर उगवलें. परंतु नवसंवत्सराचीं तीं कोंवळीं किरणें डी व्हॅलेराला विशेष आल्हादकारक वाटलीं नाहींत. मागील वर्षीं सुरू झालेला त्याचा अज्ञातवास संपला तर नव्हताच; उलट आतां तो कधीं संपेल किंवा नाहीं अशी चिंता वाटण्यासारखी परिस्थिति उत्पन्न झाली. रानावनांत गुप्त राहून दिवस काढण्याचा डी व्हॅलेरावर प्रसंग आला होता. त्याच्या शत्रूंचें व मित्रांचें त्यांच्या हालचालींवर सारख्याच उत्सुकतेचें लक्ष होतें. तो हातीं लागला, कीं त्याचा अंत करावयास त्याचे शत्रू टपून बसले होते, तर उलट डी व्हॅलेरा कोठें आहे, काय करीत आहे, तो पुन्हां कधीं प्रगट होईल काय, प्रजासत्ताक पक्षाचें सुदैव उघडून डी व्हॅलेरा पुन्हां कधीं सत्ताधारी होईल काय, अशा प्रश्नांचा आपल्या निराश मनाशीं विचार करीत डी व्हॅलेराचे मित्र त्याच्या बातमीची चातकासारखी वाट पहात होते. परंतु शत्रुमित्रांना सारखेंच निराश करून अज्ञातवासांत कार्य करीत राहणेंच डी व्हॅलेरानें पसंत केलें. मधूनच एखाद्या वृत्तपत्राच्या बातमीदाराला त्याची मुलाखत घ्यावयास मिळे, व तिची हकीगत तो प्रसिद्धही करी. पण त्यालासुद्धां डी व्हॅलेराचा ठावठिकाणा सांगतां येत नसे. अशाच एका बातमीदारातर्फे डी व्हॅलेरानें आपला नवसंवत्सराचा संदेश आपल्या अनुयायांसाठीं जानेवारी महिन्यांत प्रसिद्ध केला. त्यांत त्यानें म्हटलें होतें, "नव्या वर्षाच्या सुमुहूर्तावर मायदेशासाठीं स्वार्थत्याग करावयास आम्ही पुन्हां नव्या निश्चयानें तयार होत आहोंत. प्रभूनें आमच्यावर कृपादृष्टि ठेवावी, आणि आयर्लंडला स्वातंत्र्य व शांति मिळवून देण्याच्या आमच्या प्रयत्नास त्याचे मंगल आशीर्वाद असावेत येवढीच आमची प्रार्थना आहे."

परंतु डी व्हॅलेराची ही प्रार्थना परमेश्वरानें ऐकली नाहीं. कारण गेल्या सहा महिन्याचा आयर्लंडचा इतिहास पाहिला तर डी व्हॅलेराच्या वनवासी पक्षानें फ्री-स्टेट सरकारच्या इमारतींची जाळपोळ करावी, त्यांच्या अधिकाऱ्यांवर रात्रीं बेरात्रीं हल्ले करावे किंवा रेल्वेच्या गाड्या उलथून पाडाव्या, आणि फ्री-स्टेटच्या लष्करानें व्हॅलेराच्या लोकांना अचानक पकडून ठार करावें, किंवा डी व्हॅलेरा व इतर पुढारी यांचा दऱ्याखोऱ्यांतून पाठलाग करावा, अशा उलटसुलट दंगलीखेरीज दुसरें कांहीं दिसून येत नाहीं. फ्री-स्टेट सरकारचा अंमल आयर्लंडांत सुरू झाल्यापासून डी व्हॅलेराच्या प्रजासत्ताक पक्षाचे लोक सरकारी रीतीनें 'बंडखोर' ठरले, आणि लोकमताचा वाराही बहुतांशीं फ्री-स्टेटच्या बाजूनें वाहूं लागल्यामुळें सामान्य लोकही डी व्हॅलेराच्या अनुयायांना 'बंडखोर' म्हणूनच ओळखूं व संबोधूं लागले. परंतु आपल्या ध्येयावर व तत्त्वांवर अढळ दृष्टि व श्रद्धा ठेवणाऱ्या प्रजासत्तावाद्यांनीं 'बंडखोर' हें दूषण भूषणासारखें मानून फ्री-स्टेटचा कारभार बंद पाडण्याचे अटोकाट प्रयत्न सुरू ठेवले. फ्री-स्टेटच्या मंत्रिमंडळांतील सभासदांना अचानक पकडून नेण्याचा नवीन उपक्रम त्यांनीं आरंभिला. ३० जानेवारी रोजीं बॅगवेल नांवाच्या एका प्रमुख सभासदाला त्यांनीं असेंच पळवून नेलें, आणि लगेच दोन दिवसांनीं त्याला सोडून देऊन असें जाहीर केलें, कीं प्रजासत्तावादी लोकांना फ्री स्टेटनें कोणत्याही प्रकारचा त्रास देऊं नये म्हणून आजपर्यंत पळवून नेलेल्या फ्री-स्टेटच्या लोकांना आम्ही ओलीस ठेविलेलें आहे. लगेच थोड्या दिवसांनीं फ्री-स्टेटचा अध्यक्ष कॉसग्रेव्ह याचा बंगला डी व्हॅलेराच्या लोकांनीं पेटवून दिला, व स्लिगो येथील रेल्वे स्टेशन जाळून पार जमीनदोस्त करून टाकलें. या जाळपोळीचा व दंग्याधोप्यांचा बंदोबस्त करण्याकरितां फ्री स्टेट सरकारनें असा हुकूम काढला, कीं फ्री-स्टेटच्या परवान्याखेरीज हत्यारें बाळगणें हा भयंकर अपराध समजला जाईल, व त्या अपराधाबद्दल

फांशीची शिक्षा देण्यांत येईल. हा नुसता शाब्दिक हुकूम सोडून स्वस्थ न बसतां फ्री-स्टेटनें सात लोकांना बिगर परवाना हत्यारें बाळगल्याबद्दल फांसावर चढविलें. या प्रकारानें प्रजासत्तावाद्यांना दहशत बसण्याचें लांबच राहून त्यांनीं चिडून जाऊन आपल्या अत्याचारांचें प्रमाण अधिकच वाढविलें. फेब्रुवारी महिन्यांत त्यांचे अत्याचार अगदीं कळसाला पोंचले. तुझें राहतें घर जाळून खाक करूं अशी धमकी देऊन डॉ० जॉर्ज सिगर्सन यास आयरिश पार्लमेंटच्या सभासदत्वाचा राजीनामा द्यावयास त्यांनीं भाग पाडलें, कॉर्कचा शेरीफ रसेल आणि विक्लो परगण्यांतील कर्नल पॉड यांचीं घरें जाळून बेचिराख केलीं, फ्री-स्टेटचे एक मंत्रि ओहिगिन्स यांच्या घरावर हल्ला करून त्यांच्या बापाला ठार केलें, आणि डब्लिन कॅसल येथील सरकारी कचेरीच्या सर्व इमारती बॉंब गोळ्यांच्या एका धडाक्यानें उडवून देण्याचा व्यूहही त्यांनीं रचला होता. तो सिद्धीस गेला नाहीं ही गोष्ट वेगळी. या अत्याचारपरंपरेला कंटाळून फ्री-स्टेटच्या बंदिखान्यांत असलेल्या कांहीं प्रजासत्तावाद्यांनीं अशी विनंति केली, कीं आमची मुक्तता कराल तर आम्ही समेट घडवून आणण्याची खटपट करूं. या त्यांच्या विनंतीवरून त्यांना मुक्त करण्यांत आलें. परंतु समेट घडवून आणण्याच्या प्रयत्नांत त्यांना यश येण्याचें चिन्ह दिसेना. कारण प्रजासत्तावाद्यांनीं आपला अत्याचारी हात आंखडता घेतला नाहीं. उलट मार्च महिन्याच्या पहिल्या आठवड्यांत त्यांनीं डब्लिन येथील इनकम् टॅक्सची कचेरी बॉंब फेंकून उडवून दिली. आयर्लंडांत सर्व ठिकाणीं कडक लष्करी बंदोबस्त ठेवूनही प्रजासत्तावाद्यांना दारुगोळा मिळतो हें पाहून दारुगोळा व हत्यारें यांचा प्रजासत्तावाद्यांना पुरवठा करणारे त्यांचे साथीदार इंग्लंड व स्कॉटलंड या देशांत असले पाहिजेत असा फ्री-स्टेटनें साहजिकच तर्क बांधला; आणि या साथीदारांचा समाचार घ्यावयाचें त्यांनीं ठरविलें. सर्व तयारी केल्यानंतर लंडन, मॅंचेस्टर, लिव्हरपूल, ग्लासगो वगैरे

शहरांतील निरनिराळ्या ठिकाणीं २ मार्च रोजीं रात्रीं फ्री-स्टेटच्या लष्करानें अवचित छापे घातले, व ते यशस्वीही झाले. एकंदर ११० लोकांना पकडण्यांत आलें. त्यांत १९ स्त्रिया होत्या. या छाप्यामुळें डी व्हॅलेराच्या पक्षाला मोठाच धक्का बसला, व फ्री-स्टेटच्या या कृत्याबद्दल निषेध व्यक्त करण्याकरितां आयरिश जनतेनें एका विशिष्ट दिवशीं बाजार, शाळा, शर्यती, करमणुकी, वगैरे सर्व प्रकारचा व्यवहार बंद ठेवून हरताळ पाळावा अशी डी व्हॅलेरानें जाहीर विनंति केली. डी व्हॅलेराच्या या विनंतीप्रमाणें लोकांनीं हरताळ पाळला तर सामान्य लोकमत त्याच्या बाजूचें आहे असें पर्यायानें सिद्ध होईल, हें जाणून फ्री-स्टेटनें लष्करी सैन्याच्या खड्या पहाऱ्यांत लोकांचे सामान्य व्यवहारच नव्हे तर नाटकतमाशेही पार पाडले, व डी व्हॅलेराच्या हरताळाला पूर्ण हरताळ फासल्याचा आनंद उपभोगिला. याचा सूड म्हणून प्रजासत्तावाद्यांनीं मार्च महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यांत फ्री-स्टेटच्या अधिकाऱ्यांच्या व त्यांच्या आप्तेष्टांच्या घरांवर घाले घालून अनेक प्रकारचीं क्रूर कृत्यें केलीं. उलट फ्री-स्टेटच्या लष्करानेंही प्रजासत्ताकपक्षाला कायमचा नामशेष करण्यासाठीं कमर कसली. डी व्हॅलेरा व त्याचे प्रमुख साथीदार यांना अचानक पकडण्यासाठीं फ्री-स्टेटच्या लोकांनीं त्यांच्या हालचालीवर पाळत ठेवून एके दिवशीं एका शेतांतील पडळींत त्यांची गुप्त बैठक भरली असतां त्यांजवर निकराचा हल्ला केला. या हल्ल्यांत डी व्हॅलेराच पकडला जावयाचा, पण त्याच्या सुदैवानें त्याला हात दिला. आपला नायक शत्रूच्या हातीं लागणार अशीं स्पष्ट चिन्हें दिसतांच सेनापति लियॅम लिंच यानें पुढें होऊन फ्री-स्टेट सैन्याच्या तुकडीस थोपवून धरलें, आणि त्यामुळें डी व्हॅलेराला सुरक्षितपणें पळून जाण्यास अवकाश मिळाला. या झटापटींत लियॅम लिंच मेला, आणि खेरीज लिंचच्या दफनविधीसाठीं क्लोनमल येथें देशभक्त मॅकस्विनीची बहीण मिस् मॅकस्विनी, कौंट प्लंकेट, लिंचचा भाऊ वगैरे निवडक

प्रजासत्तावादी पुढारी जमले होते तेही पकडले गेले. यानंतर थोड्याच दिवसांनीं, म्हणजे एप्रिल महिन्याच्या शेवटच्या आठवड्यांत डी व्हॅलेराच्या पक्षाचा फडनवीस ऑस्टिन स्टॅक हा क्नेमलच्या डोंगरांत फ्री-स्टेटच्या लष्कराच्या हातीं सांपडला, आणि प्रजासत्तावादी पक्षाचे बहुतेक सर्व अध्वर्यु नाहींसे होऊन डी व्हॅलेरा व कांहीं मूठभर अनुयायी यापलीकडे त्या पक्षांत कांहीं त्राण उरलें नाहीं.

१९२३ च्या या उलटसुलट अत्याचारांच्या हकीकती वाचल्या म्हणजे असा एक प्रश्न साहजिकपणेंच मनाला सुचतो, कीं इंग्लंडशीं तह होऊन फ्री-स्टेटची स्थापना झाल्यानंतर आणि आयरिश जनतेच्या बहुमताचाही पाठिंबा फ्री-स्टेटलाच असल्याचें प्रत्ययाला आल्यानंतरही आपल्याच तत्त्वांना हटवादीपणानें चिकटून राहून, व निर्भेळ स्वराज्याची स्थापना करण्याचें अशक्य ध्येय उराशीं धरून फ्री-स्टेटचा कारभार बंद पाडण्यासाठीं आपल्याच हजारों देशबांधवांच्या जीवितावर आणि मालमत्तेवर घाले घालण्यांत डी व्हॅलेरानें काय साधलें ? या प्रश्नाचें इतरांनीं उत्तर देण्यापेक्षां डी व्हॅलेराच्या एखाद्या अनुयायाकडून मिळालेलें उत्तरच अधिक मननीय होईल. ' मँचेस्टर गार्डियन ' पत्राचा एक खास प्रतिनिधि आयर्लंडमधील परिस्थिति प्रत्यक्ष पहावयास गेला असतांना त्यानें हाच प्रश्न एका प्रजासत्तावादी सैनिकाला विचारला. तेव्हां त्या सैनिकानें उत्तर दिलें, "ज्या तहाअन्वयें फ्री-स्टेट अस्तित्वांत आलें तो तहच मुळीं सबंद राष्ट्राला मान्य आहे असें म्हणतां येत नाहीं. कारण, त्या तहावर देशांतील सर्व स्त्रीपुरुषांचीं मतें केव्हांही घेण्यांत आलीं नाहीं. शिवाय, अमुक एका गोष्टीला लोकांचें बहुमत अनुकूल आहे म्हणून ती चांगली असलीच पाहिजे असा थोडाच सिद्धान्त आहे? कधीं कधीं लोक मोहानें, अज्ञानानें किंवा मूर्खपणानें भलत्याच दिशेला झुकतात, आणि देशाचें ज्यांत खरें हित आहे अशीं तत्त्वें डोळ्यांपुढें ठेवून त्याप्रमाणें वागणारे सुज्ञ

लोक दिसायला मूठभर आणि अल्पसंख्याकच दिसतात. अशा वेळीं बेअकली शेळ्यामेंढयांना ज्याप्रमाणें गुराखी बडगे मारून हिरव्या कुरणावर दामटीत नेऊन चरावयास लावतो, त्याप्रमाणें अज्ञानी आणि मूढ बहुसंख्येवर प्रसंग पडल्यास बंदुका झाडून त्यांना त्यांच्या हिताच्या गोष्टीकडे वळविणें भाग असतें. अशा वेळीं अल्पसंख्याकांनीं हत्यार चालविलें तरी त्यांत कांहीं अधर्म नाहीं." ही विचारसरणी कोणाला पटो वा न पटो, डी व्हॅलेराच्या पक्षाचे लोक कोणत्या दिशेनें विचार करीत होते व ते आपल्या भाईबंदांवर शस्त्र चालविण्यास कां उद्युक्त झाले होते, त्याचा थोडासा उलगडा या उत्तरावरून होण्यासारखा आहे येवढें खास.

मात्र हेंही तितकेंच खरें, कीं डी व्हॅलेराचा पक्ष कितीही उच्च तत्त्वांनीं प्रेरित झालेला असला किंवा त्याच्या हातून घडणाऱ्या अत्याचारांत स्वदेशहिताखेरीज दुसरा कोणताही हेतु नसला तरी आयर्लंडांतील बहुजनसमाजाची सहानुभूति त्या पक्षाजवळ यापुढें राहिली नव्हती. शांततेच्या काळासाठीं आयरिश जनता आतां अतिशय भुकेलेली होती. पदरांत पडलेलें फ्री-स्टेट अगदीं शंभर नंबरी स्वराज्य नसलें तरी त्याचा स्वीकार करून साधेल तितकें देशहित साधणें हेंच अधिक शहाणपणाचें होय असें सर्वांना वाटूं लागलें होतें. त्यामुळें फ्री-स्टेटच्या चालत्या गाड्याला खीळ घालूं पाहणाऱ्या डी व्हॅलेराच्या पक्षाविषयीं आयरिश जनतेला सहानुभूति वाटणें शक्य नव्हतें. आणि त्या पक्षाचे अत्याचार बंद करण्यासाठीं फ्री-स्टेट सरकारनें कितीही कडक उपाय योजले तरी लोकांना ते वावगे वाटत नव्हते.

हें सर्व जाणूनच एप्रिलच्या शेवटच्या आठवड्यांत डी व्हॅलेरानें आपल्या पक्षांतील लोकांस हुकूम सोडून फ्री-स्टेटविरुद्ध चाललेली लढाई तहकूब केली असल्याचें जाहीर केलें. डी व्हॅलेराच्या या कृत्यानें कांहीं लोकांना आशा वाटूं लागली, कीं कदाचित् फ्री-स्टेटशीं समेट

करावयास तो आतां तयार होईल. लढाई तहकूब केल्याचा हुकूम आपल्या पक्षांतील लोकांना दिल्यानंतर तीन दिवसांनीं अँड्रयू जेम्सन व जेम्स डग्लस या दोन फ्री-स्टेटच्या सभासदांना डी व्हॅलेरानें निरोप पाठवून कळविलें, कीं समेटाची चर्चा करण्यासाठीं तुमची भेट घेण्याची माझी इच्छा आहे. त्याप्रमाणें त्या दोघांनीं डी व्हॅलेराची गांठ घेतली, व त्यांच्या मध्यस्थीनें फ्री-स्टेटचा अध्यक्ष कॉसग्रेव्ह व डी व्हॅलेरा यांच्यामध्यें सुमारें सबंद मे महिनाभर पत्रव्यवहार चालला होता. कॉसग्रेव्ह आणि डी व्हॅलेरा यांनीं एकमेकांस पाठविलेल्या खलित्यांवरून असें दिसतें, कीं समेटाच्या मूलभूत तत्त्वांविषयीं आणि अटींविषयींच त्या दोघांचा मतभेद होता. कॉसग्रेव्हचें पहिलें तत्त्व हें होतें, कीं इंग्लंडआयर्लंडमध्यें झालेल्या ज्या तहाच्या अन्वयें फ्री-स्टेट अस्तित्वांत आलें तो तह सर्वस्वी मान्य समजण्यांत आलाच पाहिजे. उलट, डी व्हॅलेराचें पहिलें तत्त्व हें होतें, कीं त्या तहावर आयरिश जनतेचीं मतें केव्हांही घेतलीं गेलीं नसल्यामुळें तो तह आयर्लंडनें मान्य केला किंवा नाहीं या प्रश्नाचा निकाल अजून लागावयाचा आहे, व तो लावून घेण्यासाठीं अखिल जनतेच्या मतांची मोजदाद प्रथम केली पाहिजे. कॉसग्रेव्हचा दुसरा मुख्य मुद्दा असा होता, कीं आयरिश पार्लमेंटच्या प्रत्येक सभासदानें इंग्लंडच्या तक्ताविषयीं राजनिष्ठेची शपथ घेण्याचें जें कलम त्या तहामध्यें आहे तें मान्य करावें. डी व्हॅलेराचा या शपथेविरुद्ध तर पहिल्यापासून कटाक्ष होता. त्यानें कॉसग्रेव्हपुढें अशी एक सूचना मांडली, कीं ही राजनिष्ठेची शपथ घेणें न घेणें हें प्रत्येक सभासदाच्या इच्छेवर अवलंबून ठेवावें. पण डी व्हॅलेराची ही सूचना कॉसग्रेव्हला रुचणें शक्यच नव्हतें. याखेरीज कॉसग्रेव्हनें एक अट घातली ती अशी, कीं समेट झाल्यानंतर नवीन निवडणुकी होऊन नव्या सरकारची घटना होईपर्यंत सर्व प्रजासत्तावाद्यांनीं आपल्या जवळचीं हत्यारें व युद्धसामग्री फ्री-स्टेटच्या रखवालींत

द्यावीं. पुढें कॉसग्रेव्हनें ही अट जरा सौम्य केली व असें म्हटलें, कीं प्रजासत्तावाद्यांनीं हत्यारें फ्री-स्टेटच्या ताब्यांत देण्याऐवजीं आपापल्या गांवच्या धर्माधिकाऱ्यांच्या रखवालींत ठेवलीं तरी चालेल. परंतु ही अट देखील डी व्हॅलेरानें मान्य केली नाहीं. त्याचें म्हणणें असें होतें, कीं नव्या निवडणुकी होईपर्यंत कोणीं कोणावर शस्त्र चालवूं नये, आणि हत्यारांवर ताबाच रहावयाचा तर प्रजासत्तावाद्यांप्रमाणें फ्री-स्टेटवाल्यांच्या हातांतील हत्यारांवरही तो राहिला पाहिजे.

याप्रमाणें प्रत्येक महत्त्वाच्या मुद्यावर कॉसग्रेव्ह व डी व्हॅलेरा यांचा तीव्र मतभेद होत गेल्यामुळें मे महिनाभर सुरू असलेले समेटाचे सर्व प्रयत्न अखेरीस निष्फल ठरले, आणि शेवटीं मे महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यांत आयरिश पार्लमेंटच्या भरसभेंत कॉसग्रेव्हनें अध्यक्ष या नात्यानें जाहीर केलें, कीं डी व्हॅलेराचा व आमचा समेट होणें शक्य नाहीं. डी व्हॅलेरानें एकीकडे कॉसग्रेव्हशीं समेट न करण्यांत आपल्या तत्त्वांची निष्ठा कायम ठेवली, व दुसरीकडे सध्यांच्या परिस्थितींत आपल्या पक्षानें फ्री-स्टेटशीं उघड युद्ध चालू ठेवण्यांत व्यर्थ प्राणहानि व रक्तपात होईल हें जाणून आपल्या हातांतील शस्त्रास्त्रांना कांहीं काल अज्ञातवासांत विश्रांति देण्याविषयीं आपल्या अनुयायांना हुकूम सोडला. डी व्हॅलेरानें मे महिन्याच्या २४ तारखेस हा हुकूम काढला. त्यांत असें म्हटलें होतें, कीं "फ्री-स्टेटचा सशस्त्र प्रतिकार करण्याचें धोरण सध्यां सोडून दिलें पाहिजे. फ्री-स्टेट नाहींसें करून प्रजासत्ताक राज्याची स्थापना करण्यासाठीं आपल्या प्राणांचे व्यर्थ बळी देणें हें सध्यांच्या परिस्थितींत सूज्ञपणाचें होणार नाहीं. त्यासाठीं आतां आपल्याला निराळ्याच मार्गाचा अवलंब केला पाहिजे. हत्यारें खालीं ठेवणें हेंच आजच्या घटकेला देशाभिमानाचें कृत्य होईल. मात्र हत्यारें शत्रूच्या स्वाधीन करावयाचीं नाहींत. प्रजासत्तावादी सैनिकांनीं आपापली शस्त्रसामग्री कोठें तरी गुप्त स्थळीं ठेवावी, व कांहीं दिवस विश्रांति घेऊन प्रजा-

सत्ताक पक्ष जेव्हां पुन्हां त्यांना हांक मारील तेव्हां त्याच्या झेंडयाभोंवतीं नव्या दमानें गोळा व्हावें.''

अज्ञातवासाच्या वेळीं विराटाच्या नगरींत प्रवेश करण्यापूर्वीं पांडवांनीं आपलीं शस्त्रास्त्रें व कवचकुंडलें शमीवृक्षावर लपवून ठेवलीं, त्याप्रमाणें डी व्हॅलेराचा हा हुकूम मान्य करून प्रजासत्तावाद्यांनीं आपल्या शस्त्रांचें विसर्जन केलें. या शस्त्रविसर्जनाच्या वेळीं पांडवांप्रमाणेच त्यांच्याही मनाला परम दुःख झालें असेल. आपला अज्ञातवास संपल्यानंतर आपलीं प्रिय शस्त्रास्त्रें आपल्याला पुन्हां धारण करतां येतील अशा आशेच्या आधारावर पांडवांनीं आपलें दुःख गिळलें, त्याप्रमाणेंच प्रजासत्तावाद्यांनीं आपलें कष्टी मन आंवरून धरलें असेल, व जें अपरिहार्य त्याच्यापुढें मान वांकविलीच पाहिजे अशा विवेकानें डी व्हॅलेराची आज्ञा मान्य केली असेल. पण पांडवांचा अज्ञातवास संपला त्याप्रमाणें या देशभक्तांचा अज्ञातवास संपणार होता काय?

## प्रकरण दहावें

# फ्री-स्टेटचा कैदी !

आतां डी व्हॅलेराच्या पक्षाला पुरतें ग्रहण लागल्यासारखें झालें होतें. त्याच्या पक्षाच्या सैनिकांनीं त्याच्याच हुकुमावरून शस्त्रास्त्रें कशीं खालीं ठेवलीं तें मागच्या प्रकरणांत सांगितलेंच आहे. या सुमारास डी व्हॅलेराचे १३००० अनुयायी फ्री-स्टेटच्या तुरुंगांत कैदी म्हणून डांबले गेले होते, व सहस्त्रावधि प्रजासत्तावाद्यांनीं मायभूमीचा त्याग करून अमेरिकेस प्रयाण केलें होतें, यावरून डी व्हॅलेराच्या पक्षाला कसे दुर्दिन आले होते याची वाचकांस चांगली कल्पना येईल. डी व्हॅलेराचे बहुतेक प्रमुख सहकारी शूर पुरुष गतप्राण किंवा बंदिवासी झाले होते. प्रत्यक्ष डी व्हॅलेराच्याही प्राणावर फ्री-स्टेटचे सैनिक टपले होते. मोटारी, विमानें यांचाही उपयोग करून व वाटेल ते बरे वाईट उपाय योजून डी व्हॅलेराला पकडण्याची शिकस्त करण्याचें फ्री-स्टेटनें ठरविलें होतें. मूठभर स्वपक्षीयांबरोबर पहाडांत व जंगलांत लपून छपून दिवस कंठण्याचा प्रसंग डी व्हॅलेरावर आला होता, आयरिश जनतेंत त्याच्याविषयीं पूर्वींची निस्सीम भक्ति उरलेली नव्हती, त्याचेच देश-बांधव फ्री-स्टेटची सत्ता मान्य करून त्याच्या जिवावर उठले होते, आणि इंग्लंडांतील साम्राज्यवादी उर्मट वर्तमानपत्रें तर डी व्हॅलेराला पकडून एकदम तोफेच्या तोंडीं द्यावा असा फ्री-स्टेटला उपदेश करीत होतीं. अशा प्रकारें वैराचें काहूर चहूं बाजूंस माजलेलें असतांना निराधार व विपन्न स्थितींतही आपण आतां कोणतें धोरण स्वीकारावें याचा विचार करीत डी व्हॅलेरा आनंदानें दिवस काढीत होता, व नवलाची गोष्ट ही, कीं त्याला पकडण्यासाठीं फ्री-स्टेटचे भगीरथ प्रयत्न चालू असूनही त्यांचे प्रयत्न विफल करून डी व्हॅलेरानें आपलें स्वातंत्र्य कायम ठेवलें होतें.

अशा परिस्थितींत १९२३ चे जून व जुलई हे दोन महिने उगवले व मावळले. आतां डेल आयरेनची मुदत संपत आली होती व नव्या डेल आयरेनसाठीं नव्या निवडणुकी होण्याची वेळ जवळ येत चालली होती. आपल्या फ्री-स्टेट पक्षाला आयरिश लोकमताचा पूर्ण पाठिंबा आहे व डी व्हॅलेराचा पक्ष उचलून धरावयास राष्ट्रांतील फारच थोडीं माणसें तयार आहेत अशी प्रेसिडेंट कॉसग्रेव्ह याची समजूत होती. डी व्हॅलेराला पकडण्याचे आपले सर्व प्रयत्न फसल्या-बद्दल मनांतल्या मनांत वाटणारा विषाद लपविण्यासाठीं आणि सामान्य जनतेवर छाप मारण्यासाठीं, अशा दोन हेतूंनीं प्रेसिडेंट कॉसग्रेव्ह यांनीं या वेळीं डी व्हॅलेराला असें जाहीर आव्हान दिलें, कीं " तुम्ही असे लपून बसतां यांत काय पुरुषार्थ आहे ? आयर्लंड देश तुमच्या बाजूचा आहे अशी तुम्ही नेहमीं बढाई मारतां. ती खरी करून दाखवावयाची असेल तर ही लपालप सोडून प्रगट व्हा व आतां नव्या निवडणुकी होणार आहेत त्यांत उभे रहा ! " .

कॉसग्रेव्हला वाटलें होतें, कीं या जाहीर आव्हानाला डी व्हॅलेरा-कडून कांहीं उत्तर मिळावयाचें नाहीं व तो तसाच अज्ञातवासांत दिवस काढीत राहील. असें झालें म्हणजे " बघा हा पळपुटा डी व्हॅलेरा ! आपल्या पक्षाची लोकप्रियता सिद्ध करण्याची संधि आम्ही त्याला देत असून तो पुढें येत नाहीं ! यावरून त्याला आज देशांत कांहीं मान्यता नाहीं हें सिद्ध होत नाहीं काय ? " असा ओरडा आपल्याला करतां येईल, अशी कॉसग्रेव्ह यांची कल्पना होती. असा कावा मनांत योजूनच त्यांनीं तो डाव टाकला होता यांत शंका नाहीं. पण डी व्हॅलेराशीं कावेबाजीचा खेळ खेळणें सोपें नव्हतें. कॉसग्रेव्ह यांनीं डी व्हॅलेराला नीट अजमावला नव्हता हेंच खरें. कॉसग्रेव्हचें तें आव्हान जाहीर होतांच डी व्हॅलेरानें त्याला असें जाहीर प्रत्युत्तर पाठविलें, कीं येत्या निवडणुकींत केवळ आमचा पक्षच नव्हे तर मी

स्वतः उमेदवार म्हणून उभा राहणार आहे, व त्या वेळीं आमचा पक्ष विजयी झाल्यावर फ्री-स्टेटला आमची लोकप्रियता नीट कळेल.

डी व्हॅलेराचें हें प्रत्युत्तर जाहीर होतांच आयर्लंडमध्यें मोठी खळबळ उडाली. डी व्हॅलेरा पुन्हां प्रगट होणार हें समजतांच त्याच्या इमानी अनुयायांना अत्यानंद झाला. ज्यांच्या प्रजासत्तावादित्वावर फ्री-स्टेटच्या धमलामुळें थोडीशी धूळ चढली होती त्यांचा मूळचा अभिमान पुन्हां जागृत झाला व निवडणुकीमध्यें डी व्हॅलेराच्या पक्षाला मनोभावें साह्य करण्यासाठीं ते पुढें सरसावले. फ्री-स्टेटच्या पक्षांतील लोकांना डी व्हॅलेराचें प्रगट होणें हें एखाद्या मोठ्या संकटासारखेंच वाटूं लागलें. आणि डी व्हॅलेरा प्रगट झाल्याबरोबर फ्री-स्टेट त्याला पकडून फांशी देईल कीं काय अशी घोर शंकाही अनेक लोकांच्या मनांत डोकावूं लागली. एकीकडे लोकांच्या मनांत अशा प्रकारें निरनिराळ्या विचारांची खळबळ उडाली असतांना, निवडणुकीसाठीं प्रगट होण्याचा आपला बेत निर्भयपणें पार पाडण्याचें डी व्हॅलेरानें अगदीं पक्कें ठरविलें इतकेंच नव्हे, तर ता. १५ ऑगस्ट रोजीं दुपारीं क्लेअर परगण्यांतील एनिस गांवीं जी जाहीर सभा होईल त्या सभेंत डी व्हॅलेरा प्रगट होईल व भाषण करील, अशीही बातमी त्यानें प्रसिद्ध करविली. त्यामुळें डी व्हॅलेराचे शत्रु व मित्र १५ तारखेची अत्यंत उत्सुकतेनें वाट पाहूं लागले.

शेवटीं ती १५ तारीख उजाडली ! त्या दिवशीं एनिस गांवीं 'लेडी डे' नांवाचा कसलासा सण होता. सभेची वेळ दुपारीं एक वाजतां म्हणून जाहीर झाली होती. पण लोक सकाळपासून सभास्थानीं गर्दी करूं लागले. लोकांत हजार प्रकारच्या गप्पा उठल्या होत्या. डी व्हॅलेराला गिरफदार करणार अशी अगदीं दाट वदंता होती; आणि फ्री-स्टेटचे बरेचसे सैनिक ठिकठिकाणीं उभे राहिलेले पाहून ती बातमी लोकांना अधिकच खरी वाटूं लागली. फ्री-स्टेटच्या सैनिकांचे खिसे

पिस्तुलांनीं भारावल्यासारखे जड दिसत होते. सभास्थानीं जमणाऱ्या माणसांना ते सैनिक नाना प्रकारचे प्रश्नही विचारीत होते. कोणी म्हणे डी व्हॅलेरा येणारच नाहीं, असें प्रगट होऊन मरण ओढवून घेण्याइतका तो मूर्ख नाहीं; कोणी म्हणे, आज या सभास्थानीं प्रगट होण्याची त्याची छातीच नाहीं; तर कोणी म्हणे, आज डी व्हॅलेरा प्रगट होणार, त्याच्या पक्षाचे सारे सैनिक गोळा होऊन भयंकर युद्ध होणार, आणि फ्री-स्टेट आज उलथून पडणार ! अशा प्रकारें नाना प्रकारचे तर्क-वितर्क करीत लोक सभास्थानीं जमत होते, आणि सभेची वेळ जवळ येत चालल्यामुळें सर्वांची अधीरता अतिशय अनावर होत चालली होती.

शेवटीं दोन वाजण्याच्या सुमारास एक लहानशी मोटार सभास्थानाकडे येतांना लोकांना दिसूं लागली. त्यांत डी व्हॅलेराला पाहतांच " तो पहा डी व्हॅलेरा ! " अशी एकच आरोळी साऱ्या लोकांमधून उठली. डी व्हॅलेरानें अंगावर एक जांभळा ओव्हरकोट घातला होता, डोक्याला करड्या रंगाची टोपी घातली होती, आणि हातांत एक काठी धरली होती. त्याची मोटार सभास्थानीं येऊन पोंचतांच तींतून तो खालीं उतरला. त्याच्या चेहऱ्यावर पूर्वींची कांती दिसत नव्हती, आणि त्या क्षणीं त्याच्या अंतःकरणाची खळबळ उडाली असावी असें त्याच्या मुद्रेवरून वाटत होतें. डी व्हॅलेरा व्यासपीठावर चढल्याबरोबर सर्वांनीं आनंदानें आरोळ्या मारून त्याचें स्वागत केलें, व कांहीं वेळ सभास्थानचा तो प्रचंड जनसमूह हर्षानें वेडावल्यासारखा दिसला. थोड्या वेळानें सभेच्या कामाला प्रारंभ होऊन दोन तीन वक्त्यांनीं " आमच्या प्रजासत्ताक राज्याचा अध्यक्ष आज आमच्यांत परत आलेला पाहून आम्हां सर्वांना परमानंद होत आहे " असे उद्गार काढून डी व्हॅलेराचा गौरव केला.

नंतर डी व्हॅलेरा बोलावयास उठला. त्या वेळीं टाळ्यांचा प्रचंड कडकडाट आणि आनंदाच्या बेहोष आरोळ्या यांनीं वातावरण दुमदुमून गेलें. डी व्हॅलेरा म्हणाला, " दुर्दैवानें कांहीं काळ असा गेला, कीं त्या

वेळीं उघडपणें तुमच्यांत येऊन मिसळणें व आमचें म्हणणें काय तें तुम्हांला नीट उलगडून सांगणें शक्य नव्हतें. त्या काळीं आमच्या अडचणीचा फायदा घेऊन आमचे शत्रू तुम्हांला असें सांगत होते, कीं केवळ विनाशक कार्य करण्याचाच आमचा अट्टाहास आहे. एका भावानें दुसऱ्या भावावर शस्त्र चालवावें असें मीं आजन्मांत कधींही प्रतिपादन केलेलें नाहीं. एका पक्षाला दुसऱ्या पक्षाविरुद्ध लढावयास लावून आपण आपला फायदा करून घ्यावयाचा हा आमच्या शत्रूंचा ठरलेला डाव आहे, व त्या डावाचा उपयोग करण्याचें माझ्या मनांत कधींही आलें नाहीं, व येणें शक्य नाहीं. अगदीं प्रारंभापासून मीं एकाच पवित्र तत्त्वाचें प्रतिपादन केलेलें आहे. तें पवित्र तत्त्व सांगण्यासाठींच आज पुन्हां मी तुमच्यापुढें उभा राहिलों आहे—"

डी व्हॅलेराचें एवढेंच भाषण सर्व लोकांना नीट ऐकूं आलें. पुढें तो बोलत होता इतक्यांत आतांपर्यंत इकडे तिकडे रेंगाळणारे फ्री-स्टेटचे शिपाई हळुहळू शिस्तवार रांगेंत जमा झालेले लोकांनीं पाहिले. अल्पावकाशांतच त्या शिपायांनीं व्यासपीठाभोंवतीं गराडा घातला. त्याबरोबर "डी व्हॅलेराकी जय!" "रिपब्लिककी जय!" असा जयघोष करण्यास लोकांनीं प्रारंभ केला. तशा त्या दंगलींतही डी व्हॅलेरानें आपलें भाषण चालूंच ठेवलें होतें. लोकांनीं जयघोष सुरू करतांच त्या हत्यारबंद शिपायांनीं आपल्या बंदुका वर उचलल्या, आणि गोळ्या हवेंत उडतील अशा बेतानें एक फेर झाडली. त्याबरोबर जिकडे तिकडे एकच गोंधळ उडाला. लोक सैरावैरा धांवले, बायकांनीं किंकाळ्या फोडल्या व कांहीं स्त्रिया मूर्च्छित होऊन तेथेंच धरणीवर पडल्या, आणि लहान लहान बालकें सशासारखीं वाट सांपडेल तिकडे रडत ओरडत पळालीं. तितक्यांत डी व्हॅलेराही खालीं पडलेला लोकांनीं पाहिला, व तो गोळीबाराला बळी पडला अशा समजुतीनें सर्वांनीं एकच हाहा:कार केला. पळून गेलेले सारे लोक बाजारचौकांत जमले

व सैन्याशीं लढण्याचे बेत करूं लागले. मोठी झटापट होण्याचा रंग दिसूं लागला.

परंतु सुदैवानें तसें कांहीं झालें नाहीं. डी व्हॅलेरा गतप्राण झालेला नव्हता. ऐन गर्दींत त्याला एका शिपायाची लाथ लागल्यामुळें तो मूर्च्छित झाला होता. फ्री-स्टेटच्या सैनिकांनीं त्याला सावध केलें, व व्यासपीठावरून ते त्याला खालीं नेऊं लागले. तें पाहतांच डी व्हॅलेरास सोडविण्यासाठीं दहा वीस स्त्रीपुरुष सैनिकांच्या अंगावर धांवून गेले. पण त्यांना बाजूला करून डी व्हॅलेराला नेणें सैनिकांना कठीण नव्हतें. डी व्हॅलेरा स्वतः मुकाट्यानें त्या सैनिकांच्या स्वाधीन झाला.

डी व्हॅलेराला पकडल्याची बातमी आयर्लंडभर पसरावयास अवधि लागला नाहीं. ती बातमी कळतांच कोणी म्हणाले, फ्री-स्टेट आतां त्याला फांशीं देखील देईल, कोणीं म्हटलें कीं आतां नव्या निवडणुकींत डी व्हॅलेरा व त्याचा पक्ष अधिक यशस्वी होईल, तर कोणी म्हणूं लागले, कीं डी व्हॅलेराला मोकळा ठेवला असता व त्याला यथेच्छ बोलूं चालूं दिलें असतें तर फ्री-स्टेटच्या उमेदवारांच्या मार्गांत निवडणुकीच्या वेळीं एक मोठाच अडथळा उभा राहिला असता तो दूर केला हें फ्री-स्टेटनें शहाणपणाचेंच केलें. यांपैकीं कोणतें मत अधिक खरें होतें त्याची चर्चा या ठिकाणीं करण्याचें कारण नाहीं. इतकें खरें, कीं निवडणुकींची धामधूम ऐन रंगांत असतांना डी व्हॅलेरा पकडला गेल्यामुळें आयर्लंडांत बरीच खळबळ उडाली. ता. ८ ऑगस्ट रोजीं जुन्या डेल आयरेनचें विसर्जन झालें होतें, व नव्या निवडणुकी २७ तारखेस व्हावयाच्या होत्या. अशा स्थितींत ता. १५ रोजीं डी व्हॅलेराची धरपकड झाल्यामुळें त्या गोष्टीनें देशांतील सर्वच पक्षांना—कांहींना आनंदाचा, कांहींना आश्चर्याचा, तर कांहींना दुःखाचा—अनपेक्षित धक्का बसल्यासारखें वाटलें असल्यास नवल नाहीं. डी व्हॅलेराला पकडला तरी आपल्या पक्षाची निवडणुकींत सरशी करून दाखवावयाची अशा हट्टाच्या ईर्षेनें प्रजासत्तावादी मंडळी

आपल्या कामाला लागली. सरकार पक्षाचे उमेदवारही आपल्या प्रयत्नांची शिकस्त करण्यास पुढें सरसावले, व मजूर पक्ष, शेतकरी पक्ष, वगैरे उदयोन्मुख पक्षही निवडणुकींत यश मिळविण्यासाठीं अंग झाडून कामाला लागले. अशा प्रकारें ऑगस्ट महिन्यांतील या निवडणुकींना विलक्षण रंग चढला.

या नव्या निवडणुकींचें महत्त्व विशेष होतें यांत संशय नाहीं. डेल आयरेनच्या एकंदर सभासदांची संख्या १५३ असते. या १५३ सभासदांमध्यें निवडणुकीच्या जोरावर प्रजासत्तावाद्यांचें मताधिक्य झालें तर नवी बनणारी डेल आयरेन तहाला सर्वस्वी विरुद्ध अशा मताची होणार, व सुमारें दोन वर्षांपूर्वीं जो तह होऊन आयर्लंडचें 'स्वतंत्र-राज्य'-Free state-अस्तित्वांत आलें, तो तह कागदाच्या चिटोऱ्या-प्रमाणें समजून 'स्वतंत्र राज्य' मोडून टाकण्याचेंच काम ती डेल प्रथम करणार ही गोष्ट उघड होती. त्यामुळें या नव्या निवडणुकी म्हणजे एक 'जगावयाच कीं मरावयाचें' असाच प्रश्न होय असें 'स्वतंत्र राज्या'च्या पक्षपात्यांना वाटत होतें, व या निवडणुकीं-वरूनच आपल्या पक्षाच्या नशिबाचा काय तो सोक्षमोक्ष लागणार ही गोष्ट प्रजासत्तावालेही पुरतेपणीं जाणून होते. अर्थात् यशाचा प्रयत्न दोन्ही पक्ष चढाओढीनें करूं लागले. सारे उमेदवार व्याख्यानें झोडण्यांत गुंग होऊन राहिले. असल्या व्याख्यानांच्या प्रसंगीं कांहीं ठिकाणीं थोड्याबहुत मारामाऱ्याही होऊं लागल्या. सर्व पक्षांचा उत्साह व आवेश कळसास पोंचल्यासारखें झालें!

## प्रकरण अकरावें

# पुढें-१

अखेर एकदांच्या निवडणुकी झाल्या. कांहीं ठिकाणीं प्रत्यक्ष निवडणुकीच्या प्रसंगाही विरोधीपक्षांत मारामाऱ्या झाल्या. डी व्हॅलेराला पकडल्यानंतर प्रजासत्ताक पक्षाचे अध्यक्ष झालेले रूटलेज हे बॅलिना परगण्यातर्फे निवडून आले. त्या यशाच्या उत्सवासाठीं शेंकडों प्रजासत्तावादी बॅलिनाच्या किल्लयांत गोळा होऊन गाऊं नाचूं लागले व उत्साहाच्या भरांत त्यांनीं मोठमोठ्या आगट्याही पेटविल्या. हें पाहतांच किलाली येथील ठाण्यावरील फ्री-स्टेटच्या सैन्यानें त्यांजवर चाल केली, बरीच मोठी चकमक उडाली, व कांहीं लोक मृत्यु पावले. अशीच एक झटापट लिमेरिक परगण्यांत कॅसल कॉनेल येथें झाल्याचें फ्री-स्टेटनें जाहीर केलें. रूटलेजप्रमाणेंच प्रजासत्तापक्षाचा प्रसिद्ध पुढारी काउंट प्लंकेट हाही निवडून आला. स्वत: डी व्हॅलेरास तर निवडणुकींत अपूर्व यश मिळालें. तो तुरुंगांत होता तरी त्याचे भक्त त्याला विसरले नव्हते. उलट सध्यांच्या त्याच्या बंदिवासामुळें लोकमताचा ओढा त्याच्याकडे अधिकच वळला होता. तो आपल्या प्रिय क्लेअर परगण्यांतून निवडणुकीस उभा राहिला होता. त्याच्याविरुद्ध फ्री-स्टेटतर्फे मॅक्नील हा त्या परगण्यांतून उमेदवार होता. पण प्रत्यक्ष निवडणुकींत क्लेअर परगण्यानें आपली डी व्हॅलेराविषयींची निस्सीम प्रीति व फ्री-स्टेटविषयींची उपेक्षाबुद्धि साऱ्या देशाच्या निदर्शनास आणून दिली. मॅक्नीलला अवघीं ८१९६ व डी व्हॅलेरास १७७६२ मतें मिळालीं आणि डी व्हॅलेराच्या बाजूला आज देश नाहीं असें म्हणणाऱ्यांचीं तोंडें क्लेअर परगण्यानें चांगलींच बंद केलीं.

निवडणुकींचा सबंध निकाल जाहीर झाला त्या वेळीं डेलमध्यें निरनिराळ्या पक्षांचें पुढें दिल्याप्रमाणें संख्याबल झाल्याचें दिसून आलें.

| | |
|---|---|
| फ्री-स्टेटवाले . . . | ६३ |
| प्रजासत्तावादी . . . | ४४ |
| स्वतंत्र पक्षाचे . . . | १६ |
| मजूर पक्षाचे . . . | १५ |
| शेतकरी पक्षाचे . . | १५ |

डेल आयरेनमध्यें फ्री-स्टेट पक्षाचेंच मताधिक्य कायम राहिलें ही गोष्ट यावरून उघड झाली. प्रजासत्ता पक्षाचें मताधिक्य झालें असतें तर त्यांनीं इंग्लंडशीं झालेला तह अमान्य करूनच आपल्या नव्या राज्याला सुरवात केली असती हें जितकें खरें, तितकेंच आतां डेलमध्यें फ्री-स्टेट पक्ष सर्वांत प्रबळ राहिल्यामुळें तो तह कायम होऊन 'स्वतंत्र राज्या'चा आज दोन वर्षें चाललेला कारभारच पुढें चालू राहणार हें खरें होतें. तेव्हां तह फेंकून देऊन 'स्वतंत्र राज्य' नाहींसें करण्याच्या प्रजासत्ता पक्षाच्या महत्त्वाकांक्षेला या निवडणुकीनें वाव ठेवला नाहीं इतकें खास. अर्थात् प्रजासत्ता पक्षाच्या डोळ्यांपुढें यापुढचा प्रश्न उभा राहिला तो हा, कीं आपलें आज बहुमत नाहीं म्हणून डेलमधील जागा आपण अजीबात सोडून द्यावयाच्या, कीं मजूर व शेतकरी पक्षांशीं सहकार्य करून 'स्वतंत्र राज्या'च्या कारभारांत आपल्या पक्षाला प्रबळ 'विरोधी' पक्षाचें स्वरूप द्यावयाचें ? 'विरोधी' पक्ष या नात्यानें डेल आयरेनमध्यें बसण्याचा बेत प्रजासत्तावादी लोकांना एकदम मान्य होण्यासारखा नाहीं. कारण डेलमध्यें बसावयाचें म्हणजे 'स्वतंत्र राज्या'च्या घटनेंत ठरलेली राजनिष्ठेची शपथ घेतली पाहिजे; व या शपथेविरुद्ध तर डी व्हॅलेरा पहिल्यापासून झगडला ! डेलमधील आपापल्या जागा सोडून देऊन बाहेर रहावयाचें म्हटलें तरी प्रजासत्तावादी पक्षाला तेंही फारसें रुचण्यासारखें नाहीं. कारण 'स्वतंत्र राज्या'ला सशस्त्र विरोध करण्याची आज अंगांत शक्ति नसल्यामुळें डेल बाहेर प्रजासत्ता पक्षानें राहणें याचा अर्थ त्या पक्षानें

सध्यां कांहीं न करतां स्वस्थ बसणें हाच होणार! अशा दुहेरी पेंचांत डी व्हॅलेराचा पक्ष सध्यां सांपडलेला आहे. त्यांतून तो पक्ष कोणाचा मार्ग काढतो तें पाहणें आहे.

इकडे डी व्हॅलेरा स्वतः फ्री-स्टेटच्या तुरुंगांत कैदी म्हणून डांबला गेला आहे. क्लेअरच्या निवडणुकींत तो यशस्वी झाला असल्यामुळें सरकारनें त्याला आतां मुक्त केलें पाहिजे असें पुष्कळांचें मत आहे. प्रेसिडेंट कॉसग्रेव्ह जिनेव्हाच्या परिषदेला जातांना वाटेंत लंडन येथें उतरला होता, त्या वेळीं डी व्हॅलेराच्या सुटकेसंबंधीं त्याला प्रश्न विचारण्यांत आला. तेव्हां तो म्हणाला, कीं डी व्हॅलेराला सोडावा किंवा नाहीं हें नव्या डेलनेंच ठरवावयाचें आहे. नव्या डेलच्या पहिल्या बैठकींतच डी व्हॅलेराच्या मुक्ततेचा ठराव आणण्याचा त्याच्या बाजूच्या सभासदांचा विचार आहे. पण मुक्ततेनंतर 'स्वतंत्र राज्या'शीं आपण सशस्त्र विरोध करणार नाहीं अशी हमी डी व्हॅलेरानें दिली तरच त्याची मुक्तता होईल असें एकंदर परिस्थितीवरून वाटतें.

काय होईल कांहीं सांगवत नाहीं. आज जवळ जवळ तीन महिन्यांत आयर्लंडविषयीं कांहींच बातमी कळेनाशी झाली आहे. लंडन येथें भरलेल्या साम्राज्यपरिषदेचा देखावा बाह्यतः मनोहर करण्यांत व परस्परांचे स्तुतिपाठ गाण्यांत साम्राज्यांतील सर्व अधिकारी मुत्सद्दी गढून गेले असल्यामुळें, निरनिराळ्या देशांचें वैय्यक्तिक राजकारण जणूं कांहीं नामशेषच झालें आहे. आयर्लंडची परिस्थिति निवळून तिला जरा निश्चित स्वरूप आल्यावरच आयरिश धुरंधर डी व्हॅलेराच्या या चरित्राचें शेवटचें प्रकरण लिहिण्याची आमची फार इच्छा होती. परंतु कालाची इच्छा तशी दिसत नाहीं. या लोकविलक्षण धुरंधराच्या चरित्राचा उपसंहार कसा होईल याविषयीं नुसते तर्क करीतच लोकांनीं बसावें अशी कालाची लहर आहे, व तिला लेखकाच्या लेखणीनें प्रणाम केला पाहिजे.

डी व्हॅलेराच्या चरित्राचा शेवट कसाही होणार असो, त्याच्या आयुष्याचे सध्यांचे दिवस मोठेसे स्पृहणीय नाहींत, येवढें खरें. १९२२ सालापासून डी व्हॅलेराच्या खडतर नशिबाला प्रारंभ झाला. आपला प्रजासत्ता पक्ष सांवरून धरण्यासाठीं आपल्याच देशबांधवांशीं लढण्यांत त्याचे कांहीं दिवस गेले. पुढें त्याचे बहुतेक सहकारी मृत्युवश किंवा बंदिस्थ होऊन त्याचा पक्ष नामशेष झाल्यासारखा झाला, व अज्ञातवासांत दिवस काढण्याचा प्रसंग त्याच्या स्वतःवर आला. आणि आतां पुन्हां तो 'स्वतंत्र राज्या'च्या तुरुंगांत खितपत पडला आहे! डी व्हॅलेराचें चरित्र म्हणजे असाधारण धडाडी आणि असाधारण आत्मयज्ञ या दोन गुणांच्या पराकाष्ठेची हकीगत आहे. व्यावहारिक दृष्टीच्या मुत्सद्यांना डी व्हॅलेराचा आत्मयज्ञ व सत्याग्रह खुळेपणाचा वाटत असेल. पदरांत पडलेल्या फायद्याकडे पाहून तत्त्वांची धरसोड करावयास तयार होणाऱ्या पुढाऱ्यांच्या हिशोबी मनाला डी व्हॅलेराचें एकंदर वर्तन आततायीपणाचें वाटत असेल. ध्येय हें केवळ सद्वस्तु म्हणून पुढें ठेवून त्याचा फक्त तोंडानें गौरव करावयाचा असतो, पण प्रत्यक्ष व्यवहारांत त्या ध्येयाच्या उंचीवरून खालीं उतरूनच देशकार्य साधावयाचें असतें, अशा विचारसरणीच्या मुत्सद्यांना डी व्हॅलेराचा मूर्खपणा केंविलवाणा वाटत असेल. थोड्याच दिवसांपूर्वीं ज्या डी व्हॅलेरावरून पंचप्राण ओंवाळून टाकण्यास आयर्लंडांतील प्रत्येक स्त्री-पुरुषाची तयारी होती त्याच डी व्हॅलेरानें तेरा महिने अज्ञातवासांत काढावे, व त्यानंतर पुन्हां 'स्वतंत्र राज्या'च्या कैदेंत पडावें हा केवढा अधःपात, अशा विचारानें व्यवहारचतुर म्हणून मिरवणारे देशभक्त डी व्हॅलेराची कींवही करीत असतील. त्यांच्या दृष्टीला डी व्हॅलेराचें चरित्र एखाद्या शोकपर्यवसायी नाटकाप्रमाणें दिसत असेल.

परंतु डी व्हॅलेराची मनोभूमिकाच ज्यांना समजली नाहीं त्यांना असें वाटावें यांत आश्चर्य नाहीं. स्वर्गीय उच्च ध्येयाच्या सिद्धतेसाठीं

झटणाऱ्या देशभक्तांचें अंतःकरण फार थोड्या लोकांना कळावयाचें, व त्यांनीं आपल्या देहकष्टांनीं व आत्मत्यागानें तयार केलेल्या भूमिकेचा फायदा दुसऱ्याच लोकांना मिळून अज्ञातवास, वनवास व बंदिवास याच गोष्टी त्यांच्या स्वतःच्या वांट्याला यावयाच्या, हा या निष्ठुर जगांतील वक्र राजकारणाचा नियमच आहे. आजपर्यंतच्या इतिहासाची साक्ष अशीच आहे. स्वातंत्र्यासाठीं झगडणाऱ्या सर्व देशांचे इतिहास हेंच सांगतात. पूर्वीं इटलींत हेंच झालें, आज हिंदुस्थानांतही हेंच होत आहे आणि आयर्लंडांतही हेंच होत असल्यास नवल नाहीं. इटलीला संपूर्ण स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठीं मॅझिनी व ग्यारीबाल्डी या दोघांनीं नाना संकटें सोसलीं, छळ सहन केला, आपल्या घरादाराची राखरांगोळी होऊं दिली. पण शेवटीं त्यांच्या या स्वार्थत्यागामुळें इटलीला अर्धवट स्वातंत्र्य मिळूं लागलें तेव्हां मॅझिनीच्या मनाला तें अपुरें वाटलें, त्या अर्ध्या स्वातंत्र्याचा स्वीकार करण्यासाठीं काव्हूर पुढें झाला, आणि एखाद्या हद्दपार झालेल्या इसमाप्रमाणें इंग्लंडमध्यें जाऊन राहून उरलेलें आयुष्य कंठण्याची मॅझिनीवर पाळी आली! हिंदुस्थानांतही संपूर्ण स्वराज्याचें ध्येय डोळ्यांपुढें ठेवून झगडणारे लोकमान्य महात्मे तुरुंगांत खितपत पडत आहेत, आणि मुत्सद्यांचीं पिसें लावून मिरविणाऱ्या सन्माननीयांना त्यांच्या कार्याचीं फळें चाखावयास मिळत आहेत! आयर्लंडांतही असेंच होत असल्यास नवल तें काय? शेंकडों वर्षें लढून थकलेल्या आयर्लंडची भूक फ्री-स्टेटवर भागली यांतही आश्चर्य नाहीं, आणि 'स्वतंत्र राज्या'च्या बंदिवासांत पडण्याचें दुर्भाग्य डी व्हॅलेराच्या वांट्याला आलें यांतही आश्चर्य नाहीं!

"मीं आजपर्यंत कधींही स्वतःला ब्रिटिश प्रजाजन म्हणवून घेतलें नाहीं, व तसें म्हणवून न घेतांच मी मरेन!" असें डी व्हॅलेरानें अनेक वेळां बोलून दाखविलें आहे. या त्याच्या उद्गारांत त्याच्या मनोभूमिकेचें सार आहे. डी व्हॅलेरा 'स्वतंत्र राज्यांत'त कधीं

सामील होईल हें संभवनीय नाहीं. ईश्वराच्या अतर्क्य लीलेनें परिस्थितीची कांहीं विलक्षण उलटापालट झाली तर डी व्हॅलेरा बंधमुक्त होईल, त्याचा पक्ष पुनः बळावेल, फ्री-स्टेट उलथून पडेल, आयर्लंडचें व इंग्लंडचें पूर्वींचें युद्धही पुन्हां कदाचित् सुरू होईल, व शेवटीं आयर्लंडला पूर्ण स्वातंत्र्याचा लाभ होईल. किंवा कदाचित् सध्यांचीच परिस्थिति कायम राहून बंदिवासांतच जीवितयात्रा संपविण्याची डी व्हॅलेरावर पाळी येईल. किंवा निष्ठुर दैवाला आपल्या कठोरतेची साक्षच जगाला पटवावयाची असली तर 'स्वतंत्र राज्या'कडून फांसाच्या फळीवरही डी व्हॅलेराला मृत्यु येईल. डी व्हॅलेराच्या लोकविलक्षण चरित्राचें शेवटचें प्रकरण कशा प्रकारचें लिहिण्याचा विधीचा हेतु आहे तें काय सांगावें? इतकें मात्र खास, कीं तें प्रकरण कसेंही लिहिलें गेलें तरी आपल्या ध्येयाच्या आनंदांत गर्क असलेल्या डी व्हॅलेराला त्याचें सुखदुःख सारखेंच! या जगाच्या संसारांत पुढच्या घटकेला काय होईल हें देखील जर सांगतां येत नाहीं तर डी व्हॅलेराचें चरित्र कसें संपेल तें काय सांगावें? भविष्यकालाच्या खोल गुहेंत इतका गडद अंधकार खचलेला आहे, कीं मानवी नेत्रांना त्या गुहेंतील एकही वस्तु दिसत नाहीं. पुढें काय होईल या प्रश्नाचें उत्तर एकटा काळपुरुषच देऊं शकेल. पण तो तें उत्तर चटकन् देत नाहीं. वर्षानुवर्षें धीर धरावा तेव्हां त्याच्या उत्तराचें वाक्य पुरतेपणीं कानीं पडतें!

---

मुंबई युनिव्हर्सिटीनें बक्षीस दिलेलें

# दादाभाई नौरोजी
## यांचें चरित्र.

प्रो० ना. सी. फडके, एम. ए.

किंमत १-४.

पुस्तकें मागविण्याचे पत्तेः—

१ प्रो० फडके, २८ सदाशिव, पुणें.
२ व्यवस्थापक, विजयसाहित्य, पुणें.
३ डॉ० गणपुले, ६६५ शुक्रवार, पुणें.
४ परचुरे, पुराणिक मंडळी, माधवबाग, मुंबई.

पुस्तकें मागवितांना 'व्हॅलेरा'चा उल्लेख करावा.

E
47